PRICE RS 18/-

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

# अर्थसंवाद

भारतीय सौर आषाढ-भाद्रपद, 1924

जुलै-सप्टेंबर, 2002 / खंड 26, अंक 2

- लोकसंख्या, गरिबी आणि मानवी गुणवत्तेचे इष्टतमीकरण : नव्या युगासाठी नवीन प्रतिमान
- अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक 2001 माहितीचा अभाव आणि बाजार यंत्रणेचे अपयश
- केन्सोत्तर अर्थशास्त्र
- ग्रामीण पतपुरवठा संबंधीचा तज्ज्ञ समितीचा अहवाल
- 73 वी घटना दुरुस्ती आणि विकेंद्रित नियोजन
- आर्थिक विकासाच्या त्रिदशकात भारतीय स्त्रियांचे स्थान (1971-2001)
- विकास म्हणिजे स्वातंत्र्य
- 2001 वर्षातील बालकांची स्थिती युनिसेफचा महत्वपूर्ण अहवाल



लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये ।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित: ।।

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ: ।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जुलै - सप्टेंबर, 2002 / खंड 26, अंक 2

**प्रमुख संपादक**
विनायक श्रीधर देशपांडे

**सहायक संपादक**
रवीन्द्र शंकर जोशी

**सल्लागार मंडळ**
(2000-03)
माधव दातार
सुहास सहस्रबुद्धे
मुक्ता जहागिरदार
सर्जेराव ठोंबरे

**संपादकीय पत्रव्यवहार**
विनायक श्रीधर देशपांडे
'श्रीकमल', 48, विद्या -विहार
प्रताप नगर, नागपूर 440 022
दूरध्वनी क्र. (0712) 237042

## अनुक्रमणिका

■ लोकसंख्या, गरिबी आणि मानवी गुणवत्तेचे इष्टतमीकरण : नव्या युगासाठी नवीन प्रतिमान ( उत्तरार्ध ) 101
वसंत प्रभाकर पेठे

■ अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक 2001 माहितीचा अभाव आणि बाजार यंत्रणेचे अपयश 113
विनायक श्रीधर देशपांडे

■ केन्सोत्तर अर्थशास्त्र ( पूर्वार्ध ) 122
शरद शंकर जोशी

■ ग्रामीण पतपुरवठा संबंधीचा तज्ज्ञ समितीचा अहवाल 138
पद्माकर दुभाषी

■ 73 वी घटना दुरुस्ती आणि विकेंद्रित नियोजन 152
र. पु. कुरुलकर

■ आर्थिक विकासाच्या त्रिदशकात भारतीय स्त्रियांचे स्थान (1971 -2001) 164
धनश्री महाजन

■ विकास म्हणजे स्वातंत्र्य ( ग्रंथ परीक्षण ) 176
शि. ना. माने

■ 2001 वर्षातील बालकांची स्थिती युनिसेफचा महत्वपूर्ण अहवाल 189
किशोर महाबळ

**मराठी अर्थशास्त्र परिषद**
**कार्यकारी मंडळ (2002-2003)**

- **अध्यक्ष**
  **संतोष दास्ताने**

- **कार्याध्यक्ष**
  **व्यं. मु. पाटणकर**

- **कार्यवाह - खजिनदार**
  **सर्जेराव ठोंबरे**

- **प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**
  **विनायक श्रीधर देशपांडे**

- **सदस्य**
  **शरणाप्पा मानकरी**
  **गोविंद हडप**
  **कैलास पाटील**
  **दिलीप कदम**
  **जनार्दन जाधव**
  **कांतीलाल ठक्कर**
  **चारूदत्त गोखले**
  **विजय कांत**
  **कुंदा दामले**
  **मेधा देशपांडे**
  **अमृत पोळ**
  **कपूरचंद पोकरना**

- **अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :**
  1) पश्चिम विभागीय केन्द्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद , मुंबई.
  2) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

( टीप: म.रा.सा.सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

- **कार्यालयीन पत्रव्यवहार**

( वर्गणी पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, अर्थसंवाद वितरणाविषयी पत्रव्यवहार, इत्यादी ).
**डॉ. सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह - खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा समन्वयक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अभ्यास केन्द्र, विवेकानंद महाविद्यालय, समर्थ नगर, औरंगाबाद - 431001
( दूरध्वनी : 0240 - 380702 )

- **परिषदचे प्रमुख कार्यालय**

मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, एम. एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस, फ्लॅट क्रं.6 'एफ ब्लॉक', कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे ( पूर्व ), मुंबई 400 051.

## । वर्गणी ।

**( अ ) परिषदेचे सदस्य**

| | | |
|---|---|---|
| 1) आजीव सदस्य | : | रु. 800 (एकरकमी) |
| 2) साधारण सदस्य | : | रु. 150 (वार्षिक) |
| 3) संस्था सदस्य | : | |
| शैक्षणिक संस्था | : | रु. 150 (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : | रु. 200 (वार्षिक) |

**( परिषदेच्या सदस्यांना अर्थसंवाद त्यांच्या वर्गणीतच दिला जातो. )**

**(आ) अर्थसंवाद वर्गणीदार**

| | | |
|---|---|---|
| ग्रंथालये | : | रु. 150 (वार्षिक) |

**(इ) वर्षगणना : 1 एप्रिल ते 31 मार्च**

कृपया वर्गणी मनीऑर्डर वा डिमांड ड्राफ्टने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.

# लोकसंख्या, गरिबी आणि मानवी गुणवत्तेचे इष्टतमीकरण : नव्या युगासाठी नवीन प्रतिमान

(उत्तरार्ध)

● **वसंत प्रभाकर पेठे**

*युनिव्हरसिटी ग्रॅन्टस कमिशनचे इमेरिटस प्रोफेसर, पुणे विद्यापीठ (निवृत्त); फेलो, रॉयल सोसायटी ऑफ हेल्थ, FRSH(LONDON)*

**मानवी गुणवत्ता इष्टतमीकरणासाठी 'त्रिसूत्री निविष्टि': ज्ञान, आरोग्य व सुसंस्कार :**

आतापर्यंत माझ्या प्रतिमानाच्या प्रारंभिक प्रमेयाप्रमाणे 'बहुव्यापी दारिद्र्यामुळे मोठे कुटुंब आणि लोकसंख्यावाढ होते' हा कार्य-कारण भावच सत्य आहे हे मी सिद्ध केले आहे. मग मूलभूत प्रश्न निर्माण होतो तो हा की, गेल्या 50 वर्षात देशाची आर्थिक प्रगती झाली, तरीही आमजनतेसाठी गरिबीचे सातत्य तसेच का राहिले ? येथे आपण माझ्या प्रतिमानाच्या मध्यवर्ती सिद्धांताकडे येऊन पोहोचतो. हा सिद्धांत मी सुरुवातीलाच, माझ्या प्रतिमानाचे प्रमुख सिद्धांत सूत्ररुपाने देताना, तेथे मांडला आहे (पहा : पूर्वार्ध, पृष्ठ क्र.46 सिद्धांत क्रमांक 3) या सिद्धान्तात परस्परावलंबी अशी कारणे दिली आहेत. लोकसंख्या प्रश्नाच्या संदर्भात येथे काही महत्त्वाच्या कारणांचे विश्लेषण करु.

प्रत्येक व्यक्तीच्या स्तरावर, मानवाच्या सूप्त गुणांचा, उत्पादन क्षमता व सर्जनशीलता या स्वरुपात, पूर्णत्त्वाने विकास व इष्टतमीकरण न होणे, हे गरिबीचे निकटचे व सर्वात महत्त्वाचे कारण आहे. यासंबंधी चिंतन करताना साक्षात्कार व्हावा तसे मला लोकसंख्या प्रश्नातील 'संख्या' या बाजूपेक्षा दुसऱ्या व अत्यंत मौलिक पैलूचे, म्हणजे लोकांच्या 'गुणात्मकतेचे' महत्त्व, प्रकर्षाने भावले. आज भारतात 100 कोटींच्या वर लोक आहेत याने घाबरुन जाण्याचे काही कारण नाही. एवढे मनुष्यबळ ही भारतातील सूप्त स्वरुपातील अत्यंत मौल्यवान अशी साधन सामग्री आहे. लोकसंख्या दायित्व नाही तर जिंदगी आहे. आपत्ति नाही, तर संपत्ति आहे. संकट नाही, तर आव्हान आणि सुबत्तेची अपूर्व संधि आहे. मानवाच्या सूप्त गुणांच्या इष्टतमीकरण द्वारा मानवात केलेली गुंतवणूक ही प्रगतीची गुरुकिल्ली आहे. अर्थशास्त्रीय इतिहासाने हे सिद्ध केले आहे की मानवात केलेली गुंतवणूक ही भांडवली गुंतवणुकीपेक्षा विकासाला अधिक पोषक ठरते. म्हणून अतिशयोक्तीच्या दोषारोपाचा धोका पत्करुनही मला असे प्रतिपादन करावयाचे आहे की, सरकारने मानवी विकासासाठी ज्ञान (शिक्षण), आरोग्य आणि सुसंस्कार या 'त्रिसूत्रि निविष्टीचा' एक कलमी कार्यक्रम जरी वेगाने आणि यशस्वीपणे कार्यान्वित केला तरी पूर्वी कधीही अनुभवले नाही असे सुवर्णयुग या देशात अवतरेल. मानवाला सक्षम

केले की लोकसंख्या व गरिबी या सह अनंत प्रश्न सुलभतेने आणि वेगाने सुटतील.

या ठिकाणी, काउन्सिल ऑफ सायन्टिफिक ॲन्ड इंडस्ट्रियल रिसर्च या संस्थेचे संचालक विख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या 'पंचशील' संकल्पनेचा थोडक्यात विचार करणे संयुक्तिक ठरेल. डॉ. माशेलकर यांनी 'नवीन सहस्त्रकासाठी नवीन पंचशील' या पुस्तिकेत भारताच्या प्रगतिसाठी पाच उद्दिष्टे सांगितली आहेत. ती म्हणजे : (1) बालक केंद्रित शिक्षण (2)स्त्री केंद्रित कुटुंब (3)मानव-केंद्रित विकास (4)ज्ञान-केंद्रित समाज आणि (5) नवप्रवर्तन केंद्रित भारत. मला वाटते, डॉ. माशेलकर यांचे हे पंचशील प्रगतीची फलिते दाखविते. परंतु ही फलिते प्रत्यक्षात येण्यासाठी कोणती विचार सरणी वा प्रतिमान त्यांना अभिप्रेत आहे हे स्पष्ट होत नाही. माझी 'शिक्षण आरोग्य-सुसंस्कार' ही 'त्रिसूत्री', माझ्या नवीन प्रतिमानातून तर्कशास्त्रीय मीमांसेने साकार झाली आहे. शिवाय, पंचशील प्रत्यक्षात येण्यासाठी त्रिसूत्री व्यतिरिक्त दुसरा पर्याय नाही. कारण त्रिसूत्रीतले शिक्षण, आरोग्य व सुसंस्कार हे प्रगतीच्या प्रक्रियांना गतिमान करणारे पायाभूत घटक आहेत.

मागे निर्देश केल्याप्रमाणे जागतिक स्तरावर मानवी विकासाच्या निकषावर भारताचा 128 वा क्रमांक लागतो. यावरुन आपल्या लोकसंख्येची सूप्त गुणवत्ता कितीमोठ्या प्रमाणावर अविकसित राहीली आहे याचा अंदाज येतो. ही गुणवत्ता जितक्या वेगाने वाढवू तितक्या वेगाने आपली बहुव्यापी गरिबी कमी होत जाईल.

व्यक्तींच्या सुप्त गुणांच्या इष्टतमीकरणात येणारा प्रमुख अडसर म्हणजे सर्वासाठी समान संधीचा अभाव. ह्या अभावाची दोन महत्त्वाची कारणे आहेत. एक, समाजात मोठ्याप्रमाणावर असलेली आर्थिक विषमता. श्रीमंतांना आपल्या मुलांना अधिक आणि उच्च प्रतिचे शिक्षण देणे सहज शक्य होते. गरीब व मध्यम वर्गातील मुलांना इच्छा व बौद्धिक क्षमता असूनही हवे तितके व उच्च शिक्षण घेता येत नाही. गरिब मुलांना तर प्रसंगी शिक्षणाच्याबाबतीत पूर्णत: वंचित राहावे लागते.गेल्या काही वर्षात निरक्षरतेचे प्रमाण कमी झाले असले, तरी त्याचे प्रमाण अजूनहि खूप आहे. 2001 साली, निरक्षरतेचे प्रमाण असे होते: पुरुष:24.15, स्त्रिया:45.84, एकूण:34.62 . नॅशनल काउन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रीसर्च या संस्थेने कुटुंबाचे उत्पन्नानुसार संशोधन केले. यात असे दिसले की, 2001-02 मध्ये 32.8 टक्के कुटुंबे कनिष्ट वर्गात होते आणि 60.5 टक्के मध्यम वर्गात. श्रीमंत वर्गात केवळ 6.7 टक्के कुटुंबे होती ! ही प्रचंड विषमता नष्ट केल्याशिवाय 'त्रिसूत्री निविष्टितल्या शिक्षण क्षेत्रात, किरकोळ सरकारी सवलती दिल्या तरी फारशी सुधारणा होणार नाही. बहुसंख्य तरुण शिक्षण नसल्यामुळे गरीबच राहतील, आणि लहान कुटुंबाचे महत्त्व त्यांना पटविणे निष्फळ ठरेल.समान संधीतला दुसरा अडथळा म्हणजे शैक्षणिक सुविधांचा स्थानिक अभाव. भारतात 6 लाखांच्या वर खेडी आहेत. त्यात देशातील सुमारे 75 टक्के लोक राहतात. ग्रामीण भागात, विशेषत: संपर्क कठीण असलेल्या दूरवरच्या खेड्यापाड्यातून व आदिवासी भागात, शिक्षणाच्या सोयी नाहीत, किंवा आहेत त्यांचा दर्जा अत्यंत कमी प्रतीचा आहे. सुविधा नाही म्हणून शिक्षण नाही, शिक्षण नाही म्हणून कुशलता नाही, कुशलता नाही म्हणून चांगली कमाई नाही, चांगली कमाई नाही म्हणून गरिबी, असे हे दुष्टचक्र आहे. थोडक्यात निष्कर्ष असा की समान संधीच्या अभावी बहुसंख्य लोकांना आपल्या सुप्त गुणांचा विकास करता येत नाही. परिणामत: गरीबीचा प्रश्न दीर्घ काळ टिकतो; आणि देशाला मोठे कुटुंब व लोकसंख्यावाढ या सारखे गरिबीजन्य प्रश्न सोडविणे कठीण होत जाते.

**वैश्विक संपत्तीच्या संदर्भात लोकसंख्या प्रश्न व पाश्चात्य विध्वंसक वापर :**

समान संधीच्या विरोधात येणारे अडथळे अनेक आहेत. ते माझ्या प्रतिमानाच्या मध्यवर्ती सिद्धांतात समाविष्ट केले आहेत(पहा:पूर्वार्ध, पृष्ठ क्र.46) उपभोगवाद, लाचलुचपत, चुकीचे आर्थिक नियोजन कालबाह्य समाज रचना, नैतिक अध:पतन या सारखे अडथळे गंभीर स्वरुपाचे आहेत. या सर्वांचा परिणाम लोकसंख्या व गरिबी या परस्पर-संबंधित प्रश्नावर होतो. मला येथे स्पष्टपणे व विशेषत्वाने उल्लेख करुन एक निवेदन करावयाचे आहे. अगदी त्रोटकपणे ते उप-सिद्धांत म्हणून आधी मांडले आहे (पृष्ठ, 46) ते निवेदन असे: लोकसंख्या आणि गरिबी या प्रश्नाचा विचार, विशेषत: पाश्चात्य नवमाल्थसवादी विद्वान करतात, त्या प्रमाणे, एकाच देशाच्या किंवा मागासलेल्या देशांच्या संदर्भात अलग पणे करणे, हे सर्वथा असमर्थनीय आहे. याचे विश्लेषण संपूर्णत: जागतिकस्तरावरच व्हायला पाहिजे. यासाठी या वसुंधरेवरील एकूण साधन-सामग्रीचा-वापर किंवा गैरवापर-प्रगत व विकसनशील देशात त्यांच्या लोकसंख्येच्या संदर्भात कसा होत आहे, याची तुलनात्मक व पूर्वग्रह न ठेवता मीमांसा करणे आवश्यक आहे. तरच आपले या प्रश्नाचे आकलन सत्याला धरुन होईल. संशोधनावरुन असे स्वच्छ दिसते की, तथाकथित लोकसंख्या-विस्फोटासंबंधी मागासलेल्या देशांवर दोषारोप करण्यापूर्वी प्रगत पाश्चिमात्य देशांनी आपल्या विलासी वैभवाचे अर्थशास्त्र (की अनर्थशास्त्र) आणि विशेषत: नीतिशास्त्र डोळसपणे व परखडपणे तपासून पहावे. निष्कर्ष असा निघतो: विकसनशील देशातील लोकसंख्यावाढीमुळे विश्वाच्या साधन सामग्रीचा थोडासा 'अधिक वापर' होत असेल. पण सधन पाश्चिमात्य देशातील बेलगाम भोगवादामुळे याचा 'अनावश्यक व अतिरिक्त वापर'होतो. आणि शस्त्रास्त्र निर्मितीमुळे साधन-सामग्रीचा 'गैर आणि विघातक वापर' होतो. पुढारलेल्या पाश्चिमात्य देशांकडून होणारा हा असमर्थनीय वापर येत्या शतकात मानवी-कल्याणाच्या, किंबहुना अस्तित्त्वाच्या दृष्टीने , लोकसंख्या विस्फोटापेक्षाही अधिक विस्फोटक आणि नैसर्गिक संपत्तिच्या सर्वकष विनाशाकडे नेणारा आहे.

**विकासाची फळे खाणारा 'बकासुर': लोकसंख्या की बेलगाम चंगळवाद ?**

नवमाल्थसवादाच्या प्रकारांचे वर्गीकरण करताना तिसऱ्या प्रकारचा विनाशवादी सिद्धान्त लोकसंख्येला असूर ठरवितो. त्याला 'बकासुर' म्हटले जाते. लोकसंख्या वाढ आर्थिक विकासाची फलिते खाऊन टाकते, म्हणून गरिबी निवारण होत नाही असा युक्तिवाद केला जातो. खरे तर बहुव्यापी गरिबीचे कारण, लोकसंख्या विस्फोट नसून, चंगळवादाचा विस्फोट, हे आहे. या संदर्भात महात्मा गांधीचे एक वचन मननीय आहे. ते म्हणत, 'या पृथ्वीतलावर प्रत्येक माणसाची 'गरज' सहजपणे भागविण्या इतकी साधन संपत्ति आहे, परन्तू एका व्यक्तीची सुद्धा 'हाव' पुरी करण्यास ती अपुरीच पडेल !' हाव म्हणजेच चंगळवाद. प्रगत देशात चंगळवादाने नुसते थैमान घातले आहे. एकध्रुवी सर्वशक्तिमान व समृद्ध अशा अमेरिकेचेच उदाहरण घेऊ. उपभोगाच्या संबंधात, मी गमतीदार पणे अगदी मूलभूत असे एक गणित मांडतो. माझ्या मते, अमेरिकेची लोकसंख्या 27 कोटी नाही, ती 130 कोटी आहे. म्हणजे चीन पेक्षाही जास्त! जनगणने प्रमाणे दरडोई एक माणूस धरला जातो. पण समस्यांची मीमांसा करताना हे गणित पोरकट ठरते. एक अमेरिकन नागरिक सध्या जागतिक सरासरीच्या 4.77 पट उर्जा वापरतो. म्हणून अमेरिकेची लोकसंख्या जनगणनेच्या 4.77 पट मोजली पाहिजे. हे गणित दरडोई एक या प्रमाणे होत नाही, तर उपभोक्ता घटक या प्रमाणे होते. सुविख्यात अमेरिकन विचारवंत जेरेमी

रिफ्‌किन यांनी आपल्या 'एन्ट्रॉपी-ए न्यू वर्ल्ड व्ह्यू'(1980) या त्यांच्या गाजलेल्या ग्रंथात अशाच तऱ्हेच्या गणिताचा वापर केला आहे. त्यांचे या संबंधीचे विश्लेषण विचार प्रवर्तक आहे. ते म्हणतात, '' लोकसंख्येचा प्रश्न हा केवळ तिसऱ्या जगापुरताच प्रदेश-निष्ठ आहे असा आपण विचार करतो. परंतु आपण असा विचार करता कामा नये. लोक शारीरिक दृष्टया जगतात, त्या लोकांची संख्या हीच फक्त महत्त्वाचे नाही, तर ते दरडोई किती ऊर्जेचा उपयोग घेतात हे महत्वाचे आहे. एकूण 2200 कोटी लोक (22 बिलीयन) जगातील मर्यादित ऊर्जेचा जितका वापर करतील तितकी ऊर्जा आपण एकटया अमेरिकेत वापरत आहोत. नुसत्या माणसांच्या संख्येवर नाही, तर उर्जेचा उपभोग या निकषावर पृथ्वीचा लोकसंख्याकीय नकाशा तयार केला पाहिजे. अशा प्रकारच्या नकाशावरुन हे सिद्ध होईल की ऊर्जा अवक्षयाच्या दृष्टीने, आज जगातला सर्वात प्रचंड लोकसंख्येचा प्रश्न कोठे असेल तर तो अगदी येथे आपल्या अमेरिकेत आहे !'' (रिफकिनने हे विधान 1980 च्या आकडेवारीनुसार केले आहे)

आजकाल भारतीय समाजही, विशेषत: श्रीमंत वर्ग, नव-श्रीमंत व उच्च मध्यमवर्गीय, पाश्चात्य भोगवादाचे अंधानुकरण करीत आहेत. सत्ता स्पर्धेत जसे शक्ति- प्रदर्शन केले जाते, तसे लग्नकार्यासारख्या समारंभात वैभव-प्रदर्शनाची धनिकांमध्ये स्पर्धा लागते. याला काळा पैसा व लाच लुचपतीत मिळालेला, नोंद होत नाही असा पैसा मुख्यत: कारणीभूत आहे. सध्या चैनीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी कर्ज मिळणे सुलभ झाल्यामुळे व हप्ते-खरेदी पद्धतीमुळे मध्यमवर्गीयांचाही वस्तूंचा उपभोग घेण्याकडे कल वाढला आहे. जागतिकी करणामुळे महाबहुराष्ट्रीय कंपन्यांनी मोटारी, वातानुकूलित पासून ते खाद्य पदार्थापर्यंत आपल्या वस्तू व सेवा बाजारात आणल्या आहेत. लोकांना आकर्षित करण्यासाठी जाहिरातींवर तुफान पैसा खर्च होत आहे. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठी कितीतरी ऊर्जा व साधन सामग्री यांचा वापर होत आहे. भारतात 1997 साली 4610 लाख मेट्रिक टन इतका ऊर्जेचा वापर झाला. 1990-97या काळात ऊर्जा-वापराच्या वाढीचा सरासरी वार्षिक दर समारे 2% होता. आता शहरांतून मोटारी आणि पेट्रोलवर चालणारी दुचाकी व तीन चाकी वाहने इतकी वाढली आहेत की त्यामुळे हवा आणि ध्वनि प्रदूषणाचा महाभयंकर प्रश्न निर्माण झाला आहे. प्रदूषणाने धोक्याची पातळी केव्हाच ओलांडली आहे. हा उपभोगवादाचाच एक दुष्परिणाम आहे. धुंद भोगवादाचे अनेक दुष्परिणाम माहीत असूनही भोगवाद वाढत आहे. याला लगाम घालून तो मर्यादित प्रमाणात ठेवला तर यामुळे वाचलेली साधन सामग्री गरिबी निर्मूलनासाठी वापरता येईल.

तुलनेने गरीबांना अधिक मुले होतात म्हणून गरीब वर्गाकडून लोकसंख्या वाढीत भर पडते हे खरे धरले, तरी यामुळे साधन सामग्रीचा वापर किती प्रमाणात वाढेल ? फारच अल्प प्रमाणात. कारण दारिद्र्यामुळे गरीब व्यक्ति चैनीच्या महागडया वस्तू विकत घेऊ शकत नाही. या संबंधीची आकडेवारी बोलकी आहे. 1988 ते 1998 या कालखंडात सुमारे 35 टक्के जनता दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत होती. उत्पन्न व वस्तू उपभोग या संदर्भात, 20% सर्वात श्रीमंत लोकांचा वाटा 46% होता. या उलट 20% सर्वात गरीबांचा वाटा केवळ 8 टक्के होता. या आकडेवारी वरुन हे सिद्ध होते की 'बकासुर रूपी लोकसंख्या वाढीमुळे गरिबी' हा युक्तिवाद उथळ आहे, फोल आहे आणि वस्तुस्थितीला अजिबात धरुन नाही. खरा बकासुर आहे तो अंदाधुंद चंगळवाद आणि यात सहभागी झालेला, पाश्चात्य संस्कृतिच्या अनिष्ट पैलूंचे सुद्धा अंधानुकरण करणारा व भोगवादाने मोहित झालेला, उच्च-मध्यम व श्रीमंत वर्ग-विशेषत: काळा पैसावाले, भ्रष्टाचारी आणि वाममार्गाने

समाजाला लुटणारे गुन्हेगार समाजकंटक.

### विश्व-विनाशाचा भस्मासुर : लोकसंख्या की सर्वसंहारक शस्त्रास्त्र निर्मिती ?

गरीबीचे दुसरे महत्वाचे कारण म्हणजे संहारक शस्त्रास्त्र निर्मितीवर होणारा प्रचंड खर्च. नवमाल्थसवादी विचारवंत लोकसंख्येला 'पॉप्युलेशन बॉम्ब' म्हणतात आणि त्याला सर्व-विनाशी 'भस्मासुराची' उपमा देतात. परंतु पृथ्वीवरील साधन-सामग्रीच्या व मानवी अस्तित्त्वाच्या संदर्भात, पुराणातील नाही तर खराखुरा भस्मासुर पृथ्वीतलावर अवतरला आहे आणि तो म्हणजे अणुबॉम्ब, पॉप्युलेशन बॉम्ब नव्हे. तिसरे आण्विक महायुद्ध झाले तर सर्व जीव सृष्टी नष्ट होईल. विनोदाने म्हणतात- चवथे महायुद्ध झालेच तर ते उत्क्रांतीच्या अनेक सहस्त्रका नंतर दगड-धोंड्यानी होईल. तथाकथित अतिरिक्त लोकसंख्या म्हणजे भस्मासुर हा विचार किती उथळ व फोल आहे हे सिद्ध करण्यासाठी शास्त्र-शस्त्र-तंत्र विषयक आवश्यक असे सैद्धांतिक व आकडेवारीचे विवेचन त्रोटकपणे येथे करतो.

गेल्या शतकातील पारंपरिक दोन महायुद्धात अनुक्रमे 1.66 कोटी व 4.58 कोटी लोक जीवाला मुकले किंवा जायबंदी झाले. तिसऱ्या महायुद्धाचा अंदाज सोपा आहे - सर्वत्र मृत्युचे तांडव नृत्य होईल.

अण्वस्त्रे आणि लष्करी खर्च या संबंधीची आकडेवारी धक्कादायक आहे. 2,045 अणुचाचण्या झाल्या. त्यातून 510 मेगाटन स्फोटक शक्ति निर्माण झाली. आज जगात अणुबॉम्बच्या रूपाने, एकच नाही तर सुमारे 40,000 भस्मासुर अस्त्विात आहेत. भूतपूर्व अध्यक्ष रेगन यांची 1000 अब्ज डॉलर्सची 'स्टार वॉर' योजना होती.

सध्याच्या काळात प्रत्येक राष्ट्राला स्वसंरक्षणासाठी पैसा खर्च करणे आवश्यक असले, तरी पृथ्वीच्या साधन सामग्रीच्या वापराच्या दृष्टीने तो खर्च विनाशकारीच ठरतो. स्टॉक होम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिटयूटच्या आकडेवारी नुसार 2000 साली लष्करावर खालील प्रमाणे खर्च झाला: हे आकडे अब्ज (बिलीयन) अमेरिकन डॉलर्स मध्ये आहेत. अमेरिका खंड : 318, यूरोप :240 आशिया आणि ओसिआनिआ : 123, मध्यपूर्व देश : 61 आणि आफ्रिका :14. संपूर्ण जागतिक खर्च 756 अब्जडॉलर्स इतका प्रचंड होता.

अण्वस्त्रसाठा व लष्करी खर्च युद्धात वापरला तर तो विनाशकारी, आणि वापरला नाही तर तो जडवस्तुसंग्रहाप्रमाणे निरुपयोगी, अशा दोनही दृष्टीकोनातून तो जागतिक साधन-सामग्रीचा अपव्ययच ठरतो. विनाश विरुद्ध विकास यामध्ये विकासाची निवड केली, तर विनाशकारी खर्चाचा प्रवाह गरिबी निर्मूलन व विकास याकडे वळवता येईल. या संबंधात दोन जागतिक नेत्यांचे विचार मननीय आहेत.'इन्डिपेन्डन्ट कमिशन ऑन इंटर नॅशनल डेव्हलपमेंट इश्यूज- ए प्रोग्रॅम फॉर सर्व्हायव्हल' या अहवालात, त्याचे अध्यक्ष विली ब्रॅन्ट म्हणतात - एका अद्ययावत टँकची किंमत सुमारे 10 लाख डॉलर्स आहे. या रकमेतून 1 लाख टन तांदुळाची साठवण सोय होऊ शकेल. एवढीच रक्कम 30,000 विद्यार्थ्यांसाठी 1000 वर्ग-खोल्या पुरवू शकेल. एका जेट फायटरची किंमत 2 कोटी डॉलर आहे. यातून खेड्यापाड्यातून 40,000 औषधालयांची सोय करता येईल' दुसरे एक नेते म्हणतात:'निर्माण झालेलीप्रत्येक बंदूक, प्रत्येक युद्धनौका, प्रत्येक अग्निबाण हे चौर्यकर्म दर्शविते.कोणाची चोरी? जे भुकेले आहेत पण खायला अन्न नाही, जे थंडीने गारठले आहेत पण वस्त्र नाही, यांच्यावरील हा डाका आहे. शस्त्रास्त्रांनी भरलेले हे जगत केवळ पैसे खर्च करीत नाही, तर कष्टकऱ्यांचा घाम, वैज्ञानिकांची प्रतिभा, बालकांची आशा यांचा हा अपव्यय आहे. कोणत्याही अर्थाने हा जगण्याचा मार्ग नव्हे. युद्धाच्या

ढगाखाली वावरणाऱ्या मानवाला जणू काही सुळावरच चढवले गेले आहे' हे तिखट शब्द कोणाचे आहेत ? मार्क्सचे नाहीत, तर दुसऱ्या महायुद्धात गाजलेले महान वीर आणि अमेरिकेचे भूतपूर्व अध्यक्ष ड्वाईट आयसेनहोवर यांचे आहेत. यात 'लोकसंख्यावाढीचा बॉम्ब-भस्मासूर', असा उल्लेख सुद्धा कोठेही आला नाही. उलट, शस्त्रास्त्रावरील खर्च हा गरिबी-निर्मूलनातील एक अत्यंत महत्वाचा अडसर आहे, हेच तत्व यामध्ये प्रतीत होते.

भस्मासुरी, आण्विक आणि जैविक शस्त्रास्त्रे निर्माण करुन पृथ्वीवरील मर्यादित साधनसामग्रीचा विध्वंसक वापर करण्यास आणि गरिबी-निर्मूलनात अडथळा आणण्यास कोणती राष्ट्रे जबाबदार (बेजबाबदार) आहेत ? याचे वादातीत उत्तर: प्रगत राष्ट्रे ! मुख्यत: अमेरिका आणि यूरोप.2000 साली या खंडातील राष्ट्रांनी अनुक्रमे 318 आणि 240 अब्ज (बिलिअन) डॉलर्स खर्च केले.सर्व जागतिक खर्चात दोन्हींचा मिळून 558 अब्ज ही रक्कम 73.81% होती.

लष्करी महासत्तेच्या उन्मादात आंतरराष्ट्रीय वर्चस्वासाठी व आर्थिक लाभासाठी ज्यांनी अति संहारक शस्त्रास्त्रे निर्माण केली किंवा करतात त्यांना काय म्हणावे ? मी तर त्यांना 'भस्मासुराचे जन्मदाते' असेच म्हणेन. अशा शस्त्रांचे वितरण करणाऱ्या विक्रेत्यांना विख्यात गणितज्ज्ञ-तत्वज्ञानी बर्ट्रांड रसेल यांनी 'मर्चंटस् ऑफ डेथ' (मृत्यूचे सौदागर)असा किताब दिला आहे. अशा राष्ट्रातल्या पंडितांनी लोकसंख्येला'बॉम्ब' म्हणावे, हा केवढा विरोधाभास!

शस्त्रास्त्रे म्हणजे विध्वंस-साधन सामग्रीचा, पर्यावरणाचा, मानवाचा. बिचारी तथाकथित अतिरिक्त लोकसंख्या कशाचाही विध्वंस करीत नाही. शस्त्रास्त्रे मात्र फक्त विध्वंसच करतात. या वास्तवात न कळण्यासारखे असे काहीच नाही. तरीही नवमाल्थसवादी 'लोकसंख्या हा एक विनाशी भस्मासूर आहे' असा विचार मांडतात. शास्त्रीय दृष्टीकोनातून हा विचार दिशाभूल करणारा, बालीश, हास्यास्पद आणि वास्तवाचे अज्ञान व मूढता दर्शविणारा आहे.

गरिबी-निर्मूलनासाठी येणाऱ्या शस्त्रास्त्र निर्मितीवरील अफाट खर्चाचा अडथळा दूर केला पाहिजे. त्यासाठी जग अण्वस्त्रमुक्त झाले पाहिजे. लष्करी खर्च नाममात्र झाला पाहिजे. युद्ध आणि आतंकवाद मुक्त मानवतावादी शांतिचे पर्व प्रत्यक्षात अस्तित्वात आले पाहिजे. सुदैवाने, 1955 च्या 'रसेल-आईनस्टाईन जाहिरनाम्या' पासून ते आज पर्यंत शांतता मोहिमेने चांगल्या पैकी प्रगति केली आहे. ध्येयपूर्तिपर्यंत मोहिमेचे सातत्य टिकणे महत्वाचे आहे.

**लोक-गुणवत्तेचे इष्टतमीकरण : त्रिसूत्री-निविष्टि व सर्वोदय-पाङ्मुखी परिवर्तन :**

या लेखात गरीबीच्या कारणांचे विवेचन नवमाल्थसवादी पंडितांच्या लोकसंख्या व दारिद्र्य यासंबंधित तात्विक भूमिकेच्या संदर्भात केले आहे. भोगवाद व लष्करी खर्च यांचा विचार याच दृष्टीकोनातून केला आहे. आमजनतेची गरिबी हा विषय व्यापक आहे. लोकसंख्या वाढ हे दारिद्र्याचे एकमेव कारण आहे, या सारखा भाबडा विचार मी इतरत्र कोठेही पाहिला नाही. गरिबीची कारणे आर्थिक सामाजिक व नैतिक-सांस्कृतिक घटक आणि अंतिमत: मानवाच्या सत्-असत् प्रवृत्ति व मानसिकता यामध्ये खूप खोलवर रुतलेली आहेत. जन्माधारित आणि उत्पन्न व मालमत्ता मधील विषमता, बहुदेशीय कंपन्या व बडे कारखानदार यांच्या ठायी एकवटलेली धर्मशक्ति, सरकारी खात्यात होणारी पैशाची उधळपट्टी, चोरटा व्यापार, वाममार्गाने मिळवलेला काळा पैसा, ग्रामपंचायतीचे अध्यक्ष ते थेट पंतप्रधान यांची न्यायालय प्रविष्ट भ्रष्टाचार प्रकरणे, रोखे बाजारा मधील घोटाळे, उच्चभ्रू प्राङ्मुखी आर्थिक नियोजन व शेवटी सत् प्रवृतींवर (शिल्लक असेल

तर!) दुष्ट प्रवृत्तींनी केलेली मात, इ. गरिबीची अनेक कारणे आहेत. यासंबंधीचा भक्कम पुरावा उपलब्ध आहे. मुळ मुद्यावर यायचे म्हणजे गरिबीच्या कारण-मीमांसे वरुन हे सिद्ध होते की सामाजिक प्रश्नांचे विश्लेषण करताना पाश्चिमात्य नवमाल्थसवादाचा संकुचित 'संख्यात्मक रुपालोक' हा सर्वथा निरुपयोगी आहे. मी या लेखात सादर केलेल्या सर्वसमावेशक, गतिशील आणि स्वदेशाला प्रस्तुत, अशा प्रकारच्या, परिवर्तनवादी रुपालोकाचाच स्वीकार करायला हवा.

माझ्या प्रतिमानातील मध्यवर्ति सिद्धान्तानुसार लोकसंख्या, द्रारिद्रय आणि सामाजिक परिवर्तन यातील कार्य-कारणभाव साखळीतील दुवे खालील प्रमाणे दाखविता येतील:

मानवाची दुष्ट मानसिकता व विकृत वृत्ति-प्रवृत्ती —> नैतिक मूल्यांचा न्हास व सांस्कृतिक अवनति —> प्रतिगामी किंवा स्थितिशील आर्थिक व सामाजिक व्यवस्था—>व्यक्ति विकासासाठी समान संधीचा अभाव—>व्यक्तींच्या सूप्त गुणांचे, विशेषत: उत्पादकता आणि सर्जनशीलता, यांचे न्यून इष्टतमीकरण—>आमजनतेची गरिबी—>मोठे कुटुंब व लोकसंख्या वाढ आणि गरिबीजन्य अज्ञान, अनारोग्य, गुन्हेगारी, असंतोष या सारख्या अनेक समस्या.

ही साखळी गरिबी-निर्मूलन-प्राङ्मुखी करावयाची असेल तर क्रान्तीसम सामाजिक परिवर्तनाची आवश्यकता आहे. कार्यकारणभावाची साखळी पाहिली की असे वाटते की सामाजिक परिवर्तन ही फार दीर्घकालीन प्रक्रिया आहे. हे खरे आहे आणि असत्यही. कारण सामाजिक परिवर्तनाचा वेग हा त्यासाठी सामाजिक जागृति आणि राजकीय इच्छा किती जबरदस्त व तीव्र आहे यावर अवलंबून राहतो. इच्छा तीव्र असेल तर क्रान्तिसम परिवर्तन वेगाने होते. इतिहासात अशी उदाहरणे आहेत. इच्छा तीव्र नसेल तर परिवर्तनाला वेळ लागणार हे उघड आहे. पण म्हणून आपण, विशेषत: सरकारने, हतबल होऊन क्रियाशून्य राहणे आत्मघातकी ठरेल. वेग कसाही असो, परिवर्तन प्रक्रिया चालू असताना मी प्रतिपादन केलेल्या ज्ञान (शिक्षण) आरोग्य व सुसंस्कार हा मानवी विकासाचा त्रिसूत्री निर्विष्टि कार्यक्रम सरकारने त्वरेने कार्यान्वित केला पाहिजे. यामुळे परिवर्तनाला चांगली चालना मिळेल. खरे तर परिवर्तन आणि त्रिसूत्री कार्यक्रम हे एकमेकांना पूरक व गतिमान करणारे आहेत. या दोनही प्रवाहांचा संगम गरिबी-निर्मूलन, लोकसंख्या नियंत्रण, आर्थिक विकास व अनेक समस्यांचे निराकरण यात होईल.

दारिद्रयाचे मूळ अतिरिक्त लोकसंख्येत नाही हे खरे, तर सरकार आणि नेते 'सर्व समस्यांचे कारण लोकसंख्येचा भस्मासूर' असा युक्तिवाद नेहमी का करतात? याचे उत्तर सरळ आहे. एक, अनेक नेत्यांचे अज्ञान, दुसरे आणि याहीपेक्षा महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचा पलायनवाद. सरकारला आणि नेत्यांना अनेक सामाजिक समस्या सोडविण्यात अपयश आले आहे. या पासून पळवाट म्हणून विचारवंतांनी एक हुकमी एक्का त्यांना दिला आहे. तो म्हणजे नवमाल्थसवाद. आपल्या अपयशावर व नाकर्तेपणावर पांघरुण घालण्यासाठी पुढारी मंडळी लोकसंख्या बॉम्बचा बागुलबुवा निर्माण करतात आणि सतत जनतेची दिशाभूल करतात दुर्दैव हे की सत्य प्रतिपादन करणे हाच ज्यांचा धर्म असे तज्ज्ञसुद्धा 'करीअर'साठी यात सहभागी होतात आणि पाश्चात्य विचार सरणीचे अंधानुकरण करुन लोकसंख्या प्रश्नाचे जनतेपुढे चुकीचे प्रक्षेपण करतात.

## नवमाल्थसवादाच्या संदर्भात माझ्या प्रतिमानाची ठळक वैशिष्ट्ये :

नवमाल्थसवादाला छोटी पण समर्पक संज्ञा द्यावयाची असेल तर त्याला 'संख्या प्रतिमान' म्हणता येईल. माझ्या प्रतिमानाला मी 'लोक-गुणवत्ता

इष्टतमीकरण प्रतिमान' असे म्हणेन. माझ्या प्रतिमानाचे काही खास पैलू व मिति प्रकर्षाने प्रतीत व्हाव्यात या दृष्टीने नवमाल्थसवाद आणि माझे प्रतिमान यामधील महत्त्वाचे फरक तुलनात्मक दृष्टीने पाहू. ही तुलना काही निकषांच्या आधारे केली आहे.

आकलनाची सैद्धांतिक झेप : 'गरिबीचे कारण लोकसंख्या विस्फोट' या सिद्धांतामुळे नवमाल्थसवादाची, गरिबीसारख्या अत्यंत जटिल समस्येची मीमांसा, फक्त लोकसंख्या या एकच एक घटकापर्यंत येऊन गोठते. म्हणून या विचारसरणीचे विश्व अत्यंत मर्यादित व संकुचित आहे. माझ्या प्रतिमानाची झेप जवळजवळ वैश्विक आहे. त्यातील दारिद्र्यासंबंधीचे सैद्धान्तिक विश्लेषण हे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक व शेवटी मानवाची मूलगामी प्रवृत्ति व मानसिकता येथेपर्यंत जाऊन भिडते.

धोरणात्मक परिणामकता : नवमाल्थसवादाचा धोरणात्मक निष्कर्ष एकच. तो म्हणजे लोकसंख्या नियंत्रणातून गरिबी निर्मूलन. यासाठी कार्यक्रम एकच: संतति नियमन, संतति नियमन आणि संतति नियमन! माझ्या प्रतिमानाप्रमाणे, ज्ञान, आरोग्य, व कार्य-नीति या त्रिसूत्रीमुळे प्रत्येक व्यक्ति सक्षम होते. यामुळे लोकसंख्या व गरिबी हे प्रश्न एकसमयावच्छेदे करुन सुटु शकतात.

प्रादेशिक संदर्भ : नवमाल्थसवाद हा प्रदेशनिष्ठ आहे. माझे प्रतिमान विश्वव्यापी आहे. नवमाल्थसवादाप्रमाणे, लोकसंख्येचा प्रश्न तिसऱ्या जगापुरता मर्यादित आहे. माझे प्रतिमान लोकसंख्येचा विचार जगातील एकूण मर्यादित साधन सामग्रीच्या संदर्भात करतो. म्हणून तिसऱ्या जगातील लोकसंख्यावाढीचा विचार, आणि प्रगत देशातील बेबंद चंगळवाद व शस्त्रास्त्रावरील अफाट खर्च यांचा विचार, एकाच वेळी झाला पाहिजे अशी त्याची धारणा आहे. या दृष्टीकोनातून, मागे म्हटल्याप्रमाणे, लोकसंख्येचा खरा प्रश्न अमेरिकेत आहे, हा विख्यात विचारवंत रिफ्किन यांचा युक्तिवाद समर्थनीय वाटतो.

आंतरशास्त्रीय विवेचन : नवमाल्थसवाद लोकसंख्या व गरिबी या प्रश्नाचे विवेचन लोकसंख्याशास्त्र व अर्थशास्त्र या दोन मर्यादित ज्ञान क्षेत्रात करतो. माझे प्रतिमान असे मानते की या विशेषीकृत शास्त्रांच्या पलीकडे जाऊन समाजशास्त्र, मानसशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान अशा सर्व प्रस्तुत ज्ञानशाखांचा उपयोग करुन गरिबी व लोकसंख्या या समस्येची मीमांसा केली पाहिजे. प्रश्नाची उकल आंतरशास्त्रीय चिकित्सा पद्धतीने केली पाहिजे. याचे प्रतिबिंब माझ्या प्रतिमानात आहे.

गतिशीलता : सनातन माल्थसवाद हा प्रतिगामी आणि सुधारणाविरोधी आहे. याचे कारण तत्कालीन मान्यता ऱ्हासी प्रत्याय सिद्धांत आणि निर्वाह वेतन सिद्धांत या दोन सिद्धान्तात सापडते. नवमाल्थसवाद हा स्थितीशील आहे. कारण यानुसार गरिबीचे कारण लोकसंख्या आहे असे समजल्यामुळे गरिबी निर्मुलनासारख्या महत्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होते. माझे प्रतिमान गतिशील आणि परिवर्तनवादी आहे. लोकसंख्या, गरिबी व इतर सहगामी समस्या (concomitant) सोडविण्यासाठी क्रांतिसम सामाजिक परिवर्तनाची आवश्यकता आहे असा यातून निष्कर्ष निघतो. अशा परिवर्तनातूनच लहान कुटुंब ही 'जनतेची मोहिम' होऊ शकेल.

केंद्रस्थानातील घटक : नवमाल्थसवादात, विशेषतः कोल-हूवर आणि हॅरॉड-डोमर अनुबंधित प्रतिमानात, संतति-नियमन आणि भांडवल संचयन हे लोकसंख्या-गरिबी या नाटकातील 'नायक' आहेत. माझ्या प्रतिमानानुसार व्यष्टिस्तरावरील त्रिसूत्री मानवी-शक्ति प्रदान (human empowermentat micro level) हीच गरिबी-लोकसंख्या यासह अनेक प्रश्न सोडविण्याची गुरुकिल्ली आहे.

दृष्टिकोन : नवमाल्थसवाद व माझे प्रतिमान यांच्या दृष्टिकोनात मूलगामी फरक आहे. नवमाल्थसवादी विचार सरणीत 'लोकसंख्या' म्हणजे केवळ एक अंकगणिति संख्या आहे. माझ्या प्रतिमानाच्या दृष्टीने लोकसंख्या म्हणजे एक अमूल्य चैतन्यशील अशी मानवी साधन सामग्री आहे. नवमाल्थसवाद्यांना लोकसंख्या म्हणजे एक 'अरिष्ट' वाटते. मला ती विकासासाठी एक अपूर्व आव्हान आणि संधि वाटते. लोकसंख्या आपत्ति नसून सम्पत्ति आहे. तिचे अव्यक्त स्वरुप प्रत्यक्षात आणण्यासाठी मानवी शक्ति प्रदान आणि परिवर्तन यांची आवश्यकता आहे.

एकांगीपणा की बहुसंग्रहता : नवमाल्थसवाद हा एक टोकाची भूमिका घेणारा, मर्यादित व एकांगी 'वाद' आहे. तो 'अतिरिक्त' लोकसंख्येला अतिरिक्त महत्व देतो. बहुरुपदर्शकी व गतिमान समाजाला, सर्व संबंधित घटकांना एकत्र गुंफून विकसित केलेल्या सर्व संग्राहक (eclectic) आणि साकल्यशील (holistic) अशाच रुपालोकाची आवश्यकता आहे. माझ्या प्रतिमानात मी अनेक महत्वाच्या विचारसरणींमधील गतिशील तत्त्वांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ, अॅडॅम स्मिथच्या, निरंकुशतावादातील उपक्रमशीलता, मार्क्सच्या समाजवादातील समतेचे तत्त्व आणि गांधी विचारधारेतील श्रममूल्यासारखी नैतिक अधिष्ठाने यांचा संगम माझ्या प्रतिमानात आहे. आपल्यासारख्या विविध सांस्कृतिक रंगांनी विनटलेल्या, परंतू राष्ट्रीय एकात्मता असलेल्या, इंद्रधनुसम समाजाला सर्व संग्राहक रुपालोकच उपयुक्त ठरेल. म्हणूनच माझे प्रतिमान पौर्वात्य विशेषत: भारतीय आहे, असे मी म्हणेन.

### 'राष्ट्रीय लोकसंख्या धोरण-2000':आत्मा विरहित धोरण-निति !

अलिकडे भारत सरकारने 'National Population Policy-2000' असे लोकसंख्या धोरणाविषयी निवेदन असलेले प्रकाशन प्रसिद्ध केले. याची या लेखात फक्त नोंद घेत आहे. माझ्या या लेखाचा विषय सैद्धांतिक विचारसरणी हा आहे. परंतू सरकारी निवेदनात सैद्धांतिक मीमांसा करण्यासारखे काहीही नाही. सरकारी धोरण-नीति ही काही तात्वीक भूमिकेवर आधारलेली असते. तत्त्वज्ञान हा धोरणनीतीचा आत्मा आहे. पण निवेदनात त्यावर एकही ओळ नाही हे पाहून आश्चर्य वाटते. म्हणून या निवेदनाचे 'आत्मा नसलेली धोरण नीति' असेच वर्णन मी करेन. नवमाल्थसवाद जणु काही स्वयंसिद्ध सत्य आहे अशी सरकार, तसेच अनेकांची भाबडी समजूत आहे. सरकारचे धोरणात्मक निवेदन बारकाईने पाहिले तर त्यावर अप्रत्यक्षपणे नवमाल्थसवादाची पडछाया पडलेली दिसते. कारण त्यात सुचविलेले अनेक छोटे मोठे कार्यक्रम फुटकळ स्वरुपाचे आहेत. त्यात सैद्धांतिक एकसूत्रता कोठेच दिसत नाही. योजनांची ही एक 'शॉपिंग लिस्ट'सारखी यादी आहे - यातही संतति नियमांच्या साधनांप्रमाणे सरकारने 'कॅफेटेरिया अॅप्रोच' घेतलेला दिसतो ! जो पर्यंत सरकार गरिबी सारख्या मूलभूत प्रश्नाचे परिणामकारक रीतीने निराकरण करीत नाही तोपर्यंत नवमाल्थसवादी फुटकळ योजनांचा अपेक्षेप्रमाणे प्रभाव पडणार नाही. असा आतापर्यंतचा अनुभव आहे.

### माझी सैद्धान्तिक भूमिका - काही गैरसमजांची शक्यता :

मला येथे हे अगदी स्पष्ट केलेच पाहिजे की काही वाचकांचा माझ्याबद्दल गैरसमज होऊ शकेल. हा गैरसमज दोन प्रकारचा असू शकेल. एक, काहींना असे वाटेल की माझ्यामध्ये पाश्चिमात्य राष्ट्रांबद्दल शत्रूत्वभाव आहे. हे अजिबात खरे नाही. माझी टीका पाश्चात्य प्रतिमाने व त्यांचा आपल्या देशाच्या संदर्भात होणारा अंधवापर यावर आहे- पाश्चिमात्य समाज किंवा संस्कृती यावर नाही. पाश्चात्य संस्कृतिचे वैचारिक, विशेषत: शास्त्र व तंत्रज्ञान या क्षेत्रातले,

योगदान अलौकिक आहे हे मान्यच केले पाहिजे. माझ्याबद्दल दुसरा गैरसमज असा असू शकेल की मी 'लोकसंख्यावाढ ही गंभीर समस्या नाही' असे मानतो. हे ही बरोबर नाही. उलट मला गरिबी आणि लोकसंख्या वाढ हा जुळा प्रश्न अत्यंत चिंतनीय व निकडीचा आहे असेच वाटते. म्हणून माझे ठाम प्रतिपादन आहे की हा प्रश्न पक्षपाती दृष्टिने न पाहता, सर्व राजकीय पक्षांनी या प्रश्नाला राष्ट्रीय कार्यक्रमात अग्रक्रम दिला पाहिजे. माझे सरकारशी 'भांडण' एवढ्यासाठी आहे की शासनाचे यासंबंधीचे आकलन सर्वस्वी चुकीचे व विपर्यस्त आहे. म्हणूनच सरकारी धोरण-नीति अपेक्षेप्रमाणे यशस्वी होत नाही. हे आकलन बदलून नव्या विचारसरणीनुसार सरकारने आपल्या धोरणाला आमूलाग्र नवीन वळण दिले पाहिजे.

**विकृतिकडून संस्कृतिकडे :**

या लेखाचा उपसंहार करताना, लोकसंख्या व गरिबी या प्रश्नाविषयीची, सकृतदर्शनी मर्यादित वाटणारी, पण माझ्या प्रतिमानातून व्यक्त झालेली, स्थळ, काळ व आशय संबंधित सर्वसमावेशक झेप, लक्षात घ्यावयाला हवी. या दृष्टीने, माझ्या सैद्धांतिक मीमांसेचे दोन निष्कर्ष मला महत्त्वाचे वाटतात. प्रथम, आपण नवमाल्थसवादासकट सर्व उपऱ्या पाश्चात्य प्रतिमानांचा निश्चितपणे पूर्णत: त्याग केला पाहिजे. कारण ती अपयशी ठरली आहेत. आपण आपली उच्च परंपरा, प्रगल्भ स्वयंप्रज्ञा, निसर्गदत्त साधन सामग्री आणि संस्कृती यांच्याशी नाते जोडणाऱ्या प्रतिमानांची नवनिर्मिति केली पाहिजे. तरच आपण आत्मविश्वासाने व यशस्वीरीतीने प्रगति करु शकू. दुसरा निष्कर्ष असा, अन्तिम दृष्ट्या, समाज पुरुषाचे कर्तृत्व किंवा व्याधि-व्यथा यांची तात्वीक मीमांसा त्यांच्या अगदी मूळ उगमस्थानापर्यंत न्यायला हवी. लोकसंख्या व गरिबी हे दोन महत्त्वाचे प्रश्न. नवमाल्थसवाद हे द्वि-चलघटक प्रतिमान आहे. त्यामुळे बहुरुपी समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी ते निरुपयोगी आहे. आज आपण अत्यंत प्रक्षोभक काळात राहत आहोत. स्थळ, काळ आणि समस्या यांची व्याप्ति आणि मिति पार बदलून गेल्या आहेत. स्थळाच्या दृष्टीने जग म्हणजे एक 'जागतिक ग्राम' झाले आहे. आण्विक युद्धाच्या संभाव्यतेमुळे काळाने मानवापुढे विकास किंवा विनाश हे दोनच पर्याय ठेवले आहेत. आशयाच्या दृष्टीने सर्व प्रश्न प्रदेशनिष्ठ न राहता जागतिक झाले आहेत. लोकसंख्या व गरिबी हे प्रश्न देशांतर्गत (अमेरिकेत सुद्धा गरिबी आहे) आणि आंतरदेशीय आहेत. म्हणून या प्रश्नासह सर्व प्रश्नांची उकल करण्यासाठी त्यांचे मूळ उगम स्थान शोधले पाहिजे. माझे प्रतिमान बहुचल घटक प्रतिमान आहे. माझी गरिबी संबंधित मीमांसा कार्यकारणभाव साखळीचा मागोवा घेता शेवटी मानवाच्या सात्वीक आणि दुष्ट प्रवृत्ति या अन्तिम आदिबिंदू पर्यंत येऊन पोहोचते. या पैकी कोणत्या प्रवृत्ति अधिक प्रभावी होतात यावर मानवाचे भवितव्य अवलंबून आहे. दुष्ट मानसिकता बळावल्यामुळे, लोकसंख्या व गरिबी यासह अनेक समस्या स्फोटक होऊन अराजक माजणे ही समाजाची 'विकृति' आहे. विध्वंसक प्रवृत्तींना काबूत ठेवून, प्रत्येक नागरिकाला 'रोटी, कपडा और मकान' आणि सर्वसाधारण सुखसोयी मिळणे ही समाजाची 'प्रकृति' आहे. अल्‌कायदा व जेहादी आतंकवाद आणि प्रादेशिक लढाया यातील दानवी शक्तींचा पूर्ण पराभव झाला तर जगात शान्ति आणि समृद्धि नांदेल. अशा शान्ति पर्वात, विज्ञान आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडून येईल आणि प्रत्येक व्यक्तीच्या सूप्त गुणांचे इष्टतमीकरण होऊन, कला, साहित्य, समाजसेवा, क्रिडा, ज्ञानसाधना, अशा विविध क्षेत्रातील प्रतिभासंपन्न व्यक्तींच्या सर्जनशील नवनिर्मितीला बहर येणे ही समाजाची 'संस्कृति' होय. अशी उच्च संस्कृति भारतात व

विश्वात निर्माण होण्यासाठी तात्वीक दृष्टीने कोणतीही सैद्धांतिक विचारसरणी किंवा प्रतिमान हे विश्वव्यापीच हवे आणि त्याला मानवतेचे अधिष्ठान हवेच हवे.

## संदर्भ सूची


1) Galbraith, John Kenneth(1984),key-note Address at the world Food Day, United Nations, New York, 16-10-1984, quoted in:'Galbraith on Agriculture' by Sudhir Sen in Economic and Political Weekly, 17-11-1984, p. 1950.

2) Atal Behari Vajpayee (Prime Minister), personal letter to Dr. V. P. Pethe, dated 3 May1993.

3) Malthus Thomas R,(1798), An Essay on the Principle of Population as it effects the Future Improvement of Society, second enlarged edition : 1803

4) Coale A. J. and Hoover,(1958) Population Growth and Economic Development in Low Income Countries, Princeton University Press, U.S.A.

5)Harrod R.F.(1949)Towards Dynamic Economics, Cambridge university Press, UK.

6) Domar Evsey D.(1957)Essays in the Theory of Economic Growth, Oxfard University Press, New Yark.

7)Registrar-General of India, Census Reports (including Report for 2001 census)

8)Indira Gandhi, (1976), Consolidating National Gains, Speeches of Indira Gandhi, Ministry of Information and Broadcasting, Government of India.

9)Government of India(Dr. Karan Singh),(1976), National Population Policy.

10) शंकरराव चव्हाण, मुलाखत, माणूस साप्ताहिक, 2 सप्टेंबर 1978, पृ.11

11) Government of Maharashtra, (1976), A Bill to provide for compulsory sterilization, L.A.Bill No. XXV of 1976.

12) Tata Services Ltd., December 2000, Statistical Outline of India : 2000-01, Mumbai.

13) Kulkarni M.G. (1984) Population Policy :Its Broader Social and Ethical Dimensions, Asian Journal of Economics and Social studies.

14) United Nations Development Program (UNDP), Human Development Reports (Annual).

15) Human Development in South Asia (2001)Report published by Mahbub ul Hag Human Development Centre, Islamabad, (as quoted in Times of India, dated 15 Feb. 2002)

16)Enrlich Paul(1968), Population Bomb, Ballantine Books, USA.

17)Meadows D.H. (1972), The Limits to Growth, Universe Books, New York.

18)Pethe Vasant P.,(1981), Population Policy and Compulsions in Family Planning, Continental Prakashan, Pune-30

19)Pethe Vasant P., (1982)Malthusian Paradigm and the Issue of compulsion in Family Planning, International Journal of Social Economics, MCB Publications, UK, USA and Australia, Vol.9, Nos 6/7, 1982.

20)Pethe Vasant P.(1989),Beyond Demography, in Population Transition in India, Edited by Singh S.N., et al, B.R. Publishers, Delhi-7, Published during World Population Conference of International union for scientific study of population, Belgium and Uk.

21) सुलभा ब्रह्मे, (2000), अणुयुद्धाचा भस्मासूर, शंकर ब्रह्मे समाजविज्ञान संस्था, पुणे-4

22) चित्रा बेडेकर, 1988, अण्वस्त्रेशस्त्रस्पर्धा आणि शांतता आंदोलन मागोवा प्रकाशन(सुधीर बेडेकर), पुणे -4

23) Mashelkar R.A.,(2000), New Panchsheel of the New Millennium, Presidential Address at Indian Science Congress.

24) Tendulkar D.G.(1952), Life of M.K.(Mahatma)Gandhi, several volumes, Bombay.

25) Brandt Willy(1980),Program for Survival, Pan Books. London

26)Rifkin Jeremy,(1980), Entropy : A New World View, Viking Press, New Yark.

27)Gore N.G.,(1991), Relevance of Socialism, Janata(3-3-1991).

28)Smith Adam, An Inquiry into the Nature and Causes of the Wealth of Nations, UK.

29)Myrdal Gunnar, (1968), Asian Drama : An Inquiry into the Poverty of Nations, Penguin Books, UK, USA.

30)Karl Marx(1957), Das Kapital, translated by Moore and Aveling, Allen and Unwin, UK.

31)United Nations and ESCAP,(1982), Population of India, New Yark.

32)Government of India,(2000), National Population Policy-2000 Ministery of Health, New Delhi.

●●●

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### अंक परत आल्यास

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांचा पत्ता बदललेला असेल त्या सदस्यांनी आपला बदललेला पत्ता कार्यवाहांना लेखी कळवावा. म्हणजे कार्यालयातील दप्तरात आवश्यक तो बदल करून घेऊन त्या पत्त्यावर 'अर्थसंवाद' चे अंक पाठविले जातील. पत्ता बदलल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणाने 'अर्थसंवाद' चा अंक परत आल्यास त्यापुढील अंक पाठविण्याचे बंद केले जाते. सर्व आजीव सदस्यांनी कृपया याची नोंद घ्यावी.

**सर्जेराव ठोंबरे**

कार्यवाह-खजिनदार

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### अर्थमीमांसा–वैज्ञानिक की कलात्मक ?

**नी.वि. सोवनी**

**किंमत रु. 250(सूट 10 टक्के)**

अर्थशास्त्राच्या पदवी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना उपयुक्त संग्राह्य ग्रंथ.

**मिळण्याचे ठिकाण**

**डॉ. व्यं.सु. पाटणकर, फ्लॅट क्र.1, कपिल अपार्टमेंट्स**

**सर्व्हे क्र.29,तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे - 411 029**

# अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक - 2001 माहितीचा अभाव आणि बाजार यंत्रणेचे अपयश

● विनायक श्रीधर देशपांडे
*प्रपाठक पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर*
*आणि प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'*

**अ**र्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक यंदाच्या वर्षी अमेरिकेच्या तीन अर्थतज्ज्ञांना प्रदान करण्यात आले. 10 ऑक्टोबर 2001 रोजी या पारितोषिकाची घोषणा करण्यात आली. कॅलिफोर्निया विद्यापीठाचे जॉर्ज ए. ॲकरलॉफ(61 वर्षीय), स्टॅनफोर्ड विद्यापीठाचे ए. मायकेल स्पेन्स (58 वर्षीय) आणि जोसेफ इ. स्टिगलिट्झ (58 वर्षीय) कोलंबिया विद्यापीठ यांनी वित्तीय बाजाराबाबतचा सिद्धान्त विकसित करण्याचा प्रयत्न केला. पारितोषिकाची 9,43,000 डॉलर ही रक्कम तिघांमध्ये विभागण्यात आली. असममिति माहिती (ASYMMETRIC INFORMATION) उपलब्ध असलेल्या बाजारांचे विश्लेषण त्यांनी केले. बाजारात कार्यरत असलेल्या काही व्यक्तींजवळ इतरांच्या तुलनेत अधिक योग्य माहिती उपलब्ध असते. माहिती विनिमय बाबतच्या सामान्य सिद्धांताचा पाया 1970 साली या तीन अर्थशास्त्रज्ज्ञांनी घातला. त्यांचे योगदान आधुनिक 'माहिती अर्थशास्त्रासाठी' अत्यंत महत्वपूर्ण ठरले. विकसनशील राष्ट्रातील पारंपरिक कृषिमालाच्या बाजारापासून विकसित अर्थव्यवस्थेतील आधुनिक वित्तीय बाजारापर्यंतच्या व्यवहारांचा अभ्यास करताना या त्रिमूर्तींचा सिद्धान्त उपयोगात आणता येऊ शकतो.

कंपनीच्या व्यवस्थापकांना आणि मंडळाच्या सदस्यांना कंपनीच्या लाभप्रदतेबाबत, भागधारकांपेक्षा अधिक व्यवस्थित माहिती असणे किंवा धनकोला ऋण परतफेडीचे पूर्वेक्षण (Prospects) ऋणकोच्या तुलनेत अधिक योग्यरीतीने करता येणे ही काही उदाहरणे असममिती माहितीची देता येतील.

### जॉर्ज ए. ॲकरलॉफ :

जॉर्ज ए. ॲकरलॉफ यांचा जन्म 17 जून 1940 रोजी न्यु हॅवेन, कनेक्टीकट (यू.एस.)येथे झाला. येल विद्यापीठातून 1962 साली त्यांनी बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण केली तर मॅसाच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (MIT) येथून 1966 साली वयाच्या 26व्या वर्षी पीएच.डी. पदवी संपादन केली. सहप्राध्यापक या पदावर बर्कले येथील कॅलिफोर्निया विद्यापीठात 1966 साली जॉर्ज ॲकरलॉफ रुजू झाले. या काळातच 1967-68 या दरम्यान भारतीय सांख्यिकी संस्थेत (Indian Statistical Institute) अभ्यागत प्राध्यापक या पदावर ते कार्यरत होते. याच

काळात विविध नामवंत संस्थांशी त्यांचा संबंध आला. हार्वर्ड विद्यापीठात 1969 साली अल्पकाळ ते सह-संशोधक या पदावर होते. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे पैसा आणि बँकींग या विषयासाठी त्यांची प्राध्यापक या पदावर दोन वर्षांकरिता (1978-80) नेमणूक करण्यात आली. सध्या ते कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात कार्यरत आहेत.

जॉर्ज ॲकेरलॉफ यांनी विविध मानाची पदे भूषविली. अमेरिकन अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारी समितीचे ते सभासद होते. तसेच अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यु या नियतकालिकाचे साहाय्यक संपादक होते. त्यांना झुरिक विद्यापीठाच्या वतीने मानद आचार्य (Honorary Doctorate) ही पदवी गत वर्षी बहाल करण्यात आली. बर्कले येथील 61 वर्षीय ॲकरलॉफ हे 18वे नोबेल पारितोषिक विजेते असून तेथील अर्थशास्त्र या विषयाच्या प्राध्यापकांपैकी ते चौथे नोबेल पारितोषिकाचे मानकरी आहेत. या वर्षी गेरान्ड डेबेरु (1983) स्व. जॉन हर्सनी (1994) आणि गत वर्षी डॅनियल मॅकफॅडन यांना या पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. लागोपाठ दुसऱ्या वर्षीचे नोबेल पारितोषिक बर्कले येथील कॅलिफोर्निया विद्यापीठातील प्राध्यापकाला मिळाले आहे. अर्थतज्ज्ञ जेनेट एल. येल्लेन या ॲकरलॉफ यांच्या पत्नी आहेत. दोघांनी मिळून अनेक संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. फेडरल रिझर्व सिस्टीमच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्स वर श्रीमती येल्लेन सदस्य होत्या.

असममिती बाजारात (ASYMMETRIC MARKETS) आर्थिक समीकरणातील एका घटकाजवळ- (क्रेता किंवा विक्रेता) अधिक माहिती इतरांच्या तुलनेत उपलब्ध असते. ग्राहकापेक्षा विक्रेत्याजवळ अधिक जास्त प्रमाणात माहिती उपलब्ध असेल तर तो अधिक वरचढ ठरतो आणि विक्रीपासून जास्तीत जास्त नफा आपल्याकडे ओढण्याची क्षमता त्याला प्राप्त होते. काही बाजारांची कामगिरी निर्धारित करणारा 'असममिती माहिती' हा देखील एक महत्वपूर्ण घटक असतो, असा निष्कर्ष 30 वर्षांपूर्वी ॲकरलॉफ यांनी प्रथमत: मांडला. अर्थशास्त्राच्या क्षेत्रात ॲकरलॉफ यांचे कार्य पायाभूत आणि व्यापक स्वरुपाचे असून वर्तनवादी अर्थशास्त्राच्या सिद्धांताच्या विकासाचा मार्ग मोकळा होण्यास त्यांच्या योगदानामुळे मदत झाली. समाजशास्त्र आणि मानव्यशास्त्राच्या ज्ञानामुळे अर्थशास्त्र अधिक आशयसंपन्न, समृद्ध आणि अधिक सुस्पष्ट कसे होऊ शकेल हे दर्शविण्याचे कार्य ॲकरलॉफ यांनी प्रथम केले यात शंका नाही. इतर विषयातील ज्ञानाचा उपयोग अर्थशास्त्रात करताना त्यांची कल्पकता आणि सर्जनशीलता प्रकर्षाने जाणवते.

**जॉर्ज ए. ॲकरलॉफ यांचे भारताशी संबंध :**

दिल्ली येथील भारतीय सांख्यिकी संस्थेच्या नियोजन शाखेत (Planning Unit) कार्यरत असताना 1970 साली क्वार्टर्ली जर्नल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये प्रकाशित झालेला 'लिंबासाठी बाजार-गुणधर्म, अनिश्चितता आणि बाजार यंत्रणा' हा सुप्रसिद्ध शोधनिबंध ॲकरलॉफ यांनी पूर्ण केला. भारतीय सांख्यिकी संस्थेने या प्रकल्पाकरिता ॲकरलॉफ यांना अर्थसहाय्य केले होते. भारतीय शेती आणि सहकारी पत पुरवठा पद्धतीचा त्यांनी अभ्यास केला. या अभ्यासाची परिणती म्हणजे हा निबंध होय. लेखातील बराचसा भाग भारतातील अनुभवावर आधारित आहे. भारतीय संघराज्यातील केंद्र राज्य संबंध याविषयावर देखील ॲकरलॉफ यांचा आकलनीय विश्लेषण (Perceptive Analytical) असलेला लेख 1969 साली दि इंडियन इकॉनॉमिक रिव्ह्यु मध्ये प्रकाशित झाला. गाडगीळ सूत्राचा

अवलंब करण्यापूर्वी केंद्रामार्फत राज्यांना प्राप्त होणाऱ्या अर्थसहाय्यामुळे राज्यात विकास आणि कल्याण (सूत्राचा अवलंब केल्यानंतरच्या काळातील तुलनेत) अधिक जास्त प्रमाणात साध्य झाले होते असा युक्तिवाद अॅकरलॉफ यांनी या लेखात केला.

**शेवटी लिंबासाठीच :**

बाजार जरी अयशस्वी ठरला तरी बाजाराधिष्ठीत उपाय शासन नियंत्रित अर्थव्यवस्थेपेक्षा बरे, यावर अधिक भर या वर्षीच्या नोबेल पारितोषिक विजेत्यांनी दिलेला आहे. माहितीच्या अभावी बाजारात विचलन येऊन बाजार कोसळू शकतो या कडे या अर्थशास्त्रज्ञांनी लक्ष वेधले आहे. अॅकरलॉफ यांनी लिंबाबाबतचा सिद्धांत प्रथम 1970 साली मांडला. भारतात लिंबाला फळाचा संदर्भ आहे. परंतु अमेरिकेत, विक्रीसाठी उणीवा असलेल्या किंवा निम्न प्रतीच्या वस्तु उपलब्ध असल्यास त्याला लेमन(लिंबु) म्हणण्याची प्रथा आहे.

**वापरलेल्या वस्तूची खरेदी विक्री :**

अॅकरलॉफ यांनी आपला सिद्धांत स्पष्ट करण्याच्या दृष्टिने नेहमीच्या आर्थिक व्यवहाराचे विश्लेषण केले. वापरलेल्या मोटार गाडीची खरेदी-विक्री व त्यातील व्यवहार त्यांनी उदाहरणादाखल घेतला आहे. अशा वस्तुंची चांगली किंवा वाईट स्थिती, या बाबतची माहिती, खरेदी करणाऱ्यापेक्षा विक्रेत्याला अधिक असते. संभाव्य ग्राहक संपूर्ण माहिती उपलब्ध नसल्याने साशंक असतात आणि अशा प्रकारच्या मोटार गाडी सारख्या वस्तुंमध्ये नक्कीच काही तरी उणीवा असतील असे त्यांना वाटते. मर्यादित माहितीच्या आधारे असे ग्राहक वस्तुच्या गुणधर्माबाबत आपले स्वत:चे तर्क काढतात. हे ग्राहक यामुळे वस्तू विकत घेतांना कमीत कमी किंमतीला वस्तू पदरी पाडुन घेण्याच्या प्रयत्नात असतात. यामुळे किंमतींची घसरण सुरु होऊन उच्चप्रतीच्या वस्तु (मोटार गाडी) ज्या विक्रेत्यांजवळ उपलब्ध आहेत ते बाजारात प्रवेश करण्यास फारसे इच्छुक नसतात. याचाच परिणाम म्हणजे निम्न दर्जाच्या वस्तु विक्रीसाठी बाजारात उपलब्ध होऊ लागतात. अशा प्रकारच्या उणीवा असलेल्या हलक्या प्रतीच्या वस्तुंना अॅकरलॉफ यांनी 'लेमन' असे नाव दिले आहे. अशा घसरत्या दर्जाच्या पुन: विकलेल्या (वापरलेल्या)वस्तू बाजारात असल्याने ग्राहक अधिकच संशयी होतात आणि किंमतीची घसरण अधिकच वेगाने सुरु होते. उच्च प्रतीच्या वस्तू ज्या विक्रेत्यांजवळ आहेत ते विक्रेते बाजारातुन बाहेर पडतात आणि उतरत्या किंमतींमुळे बाजाराचे अस्तित्वच संपुष्टात येण्यास प्रारंभ होतो.

**आरोग्य निगा विमा :**

अॅकरलॉफ यांचे माहितीच्या अर्थशास्त्रातील उल्लेखनीय कार्य आरोग्य निगा विमा, श्रमिक आणि वित्तिय बाजाराच्या अभ्यासासाठी देखील उपयुक्त ठरले आहे. वापरण्यात आलेल्या वस्तुंच्या बाबतीत घडणारी प्रक्रिया विम्याच्या बाबतीत देखील लागु होते. विमा कंपन्यांपेक्षा रुग्णांना आपल्या स्वत:च्या आरोग्याबाबतची अधिक उत्तम माहिती असते. सर्वात अधिक आजारी लोक जास्तीत जास्त विमा उतरविण्याच्या प्रयत्नात असतात. विमा कंपनीला विमा घेणारा कितपत सुदृढ आहे या बाबतची योग्य आणि संपूर्ण माहिती नसते. भरपाई देण्याची रक्कम वाढल्याने विमा कंपन्यांना तोटा सहन करावा लागतो. म्हणून या कंपन्या असा तोटा भरुन काढण्यासाठी विम्याच्या हप्त्याची रक्कम अधिकाधिक ठेवण्याच्या प्रयत्नात असतात. या प्रक्रियेत इच्छुक आणि सुदृढ संभाव्य व्यक्तींना देखील जास्त किंमत मोजावी लागते. वाढत्या हप्त्याच्या रकमेमुळे अशा व्यक्ती स्वत:चा विमा उतरविण्याच्या भानगडीत न पडता या प्रक्रियेतूनच बाहेर पडतात आणि विमा बाजारात आजारी, रुग्ण व्यक्तींचे प्रमाण वाढीस लागण्याची

शक्यता निर्माण होते.


**बँका आणि व्याज दर :**

बँकांना देखील प्रत्येक वेळी सर्वात योग्य पतदार लघु कर्जदारांमधून निवडणे शक्य होत नाही. यामुळे सरसकट सर्व कर्जदारांसाठी उच्च व्याजाचा दर आकारण्यात येतो. याचा परिणाम म्हणजे उत्तम लघु व्यवसायकर्ते (कर्जाची परतफेड व्याजासहित ठराविक कालावधीत करणारे) जास्तीच्या व्याज दरावर कर्ज घेण्यास उत्सुक नसतात आणि बाजारातून असे व्यवसायकर्ते बाहेर पडल्यास कर्जाची परतफेड नियमितपणे न करणारे व्यावसायिक बाजारात राहतात. यामुळे कसूरदारांची संख्या वाढीस लागते आणि बँका अधिकाधिक व्याज आकारण्यास प्रवृत्त होतात.

**कर्ज बुडविणाऱ्यांमुळे व्याजाच्या दरावर होणारा परिणाम :**

परिपूर्ण बाजारात व्याजाचा दर संतूलीत व्याजाच्या दरापेक्षा जास्त राहणार नाही. कर्ज घेणारे अधिकाधिक आकर्षित व्हावे या उद्देश्याने कर्जाचा पुरवठा करणारे व्याजाचा दर कमी करण्याच्या प्रयत्नात असतात. खालील आकृतीत हे संतूलन OL* , या बिंदूवर होते. कर्जाची रक्कम येथे रु.100 असून व्याजाचा दर 10 टक्के असतो. परंतु भारतासारख्या

आकृती




देशामध्ये ऋणवित्त बाजार परिपूर्ण न राहण्याचे कारण म्हणजे कर्ज बुडविणारे. बुडीत कर्जामुळे व्याजाचा दर सामान्य व्याज दरापेक्षा अधिक होतो आणि उच्च व्याज दरामुळे पत नियतन (credit rationing) होण्यास सुरुवात होते.

परिपूर्ण बाजारात समजा संतुलित व्याजदर 10 टक्के आहे आणि कर्जाची रक्कम या व्याज दराला रु. 100 असल्यास कर्ज देणाऱ्याला रु.100 च्या कर्जावर रु. 110 मिळतील. कर्ज घेणाऱ्यासाठी रु. 10, कर्जाच्या खर्चाची स्वीकृत रक्कम राहील. परंतु धनकोला, कर्ज घेणाऱ्यांपैकी 20 टक्के कर्ज बुडविणारे राहतील याची कल्पना असल्यास रु.110 च्या परताव्यासाठी त्याला कर्ज घेणाऱ्या प्रामाणिक लोकांकरिता व्याज दर 10 टक्क्यापेक्षा अधिक आकारावा लागतो. अशा स्थितीत व्याजाचा दर 13.75 टक्के आकारल्यास परताव्याची रक्कम 110 होऊ शकेल. या उदाहरणा वरुन असे लक्षात येते की, कर्ज बुडविणाऱ्यामुळे बाजार व्याज दर वाढीस लागतो. दुसरा परिणाम पत नियतनावर होतो. वरील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे कर्ज घेणारे रु.100 ही कर्जाची रक्कम 10 टक्के व्याज असताना घेतील परंतु व्याजदर 13.75 टक्के झाल्यास त्यांची कर्जाची मागणी कमी होईल. कर्ज घेणाऱ्यांची संख्या OL वर स्थिरावेल. याचाच अर्थ LL* पत नियतनाची रक्कम दर्शविते. कर्ज बुडविणाऱ्यांमुळे कर्ज पुरवठ्यावर नियंत्रण येण्यास प्रारंभ होतो.

माहितीची समस्या बाजारयंत्रणा विस्कळीत करण्यास कारणीभूत ठरु शकते यात शंका नाही. वरील विश्लेषणाचा उद्देश अर्थशास्त्रातील मूलभूत तत्वे समजावून सांगणे नसून, कांही मूठभर कर्ज बुडविणारे महत्वाच्या बाजारात कशा घडामोडी आणू शकतात हे दर्शविणे हा होता. एक दशकापूर्वी फ्रेड्रिक फॉन हायेक यांनी बाजाराची क्षमता संगणकाप्रमाणे असते असे प्रतिपादन केले होते. बाजारयंत्रणा

समाजाच्या सर्व घटकांत माहिती पसरवित असते आणि या माहितीच्या आधारे लोक आपले आर्थिक निर्णय घेत असतात. बाजारयंत्रणा संदेश देत असते, आदेश नव्हे. माहितीच्या अर्थशास्त्राचे खऱ्या अर्थाने हायेक हे जनक आहेत. त्यांना देखील नोबेल पारितोषिकाने सन्मानीत करण्यात आले होते.

**लिंबासाठी बाजार यात सुधारणा कशी होईल ?**

शासकीय अधिकाऱ्यांमार्फत किंमत निश्चित करणे हा याकरिता योग्य मार्ग होईल का ? ग्राहकाला वस्तुची हमी देणे अधिक महत्वाचे आहे. ही हमी एखाद्या खाजगी प्रतिष्ठीत कंपनीमार्फत देखील प्राप्त झाल्यास बाजार यंत्रणेत सुधार घडुन येऊ शकेल. उदाहरणार्थ टोयोटा सारखी कंपनी गाडयांची पाहणी करुन, वापरलेल्या मोटार गाडयांची दुरुस्ती करुन, पुढील 1,00,000 मैलापर्यंतच्या अंतराची हमी ग्राहकाला देऊ शकेल. या माध्यमाने क्रेता आणि विक्रेता दोघांनाही सममिति माहिती (Symmetrical information) उपलब्ध होऊन बाजार यंत्रणा पुनश्च कार्यरत होईल.

विमा बाजारासाठी गटविमा हा एक उपाय होउ शकतो. गट विम्यासाठी (Group Insurance) कंपनी काही प्रमाणात सूट देते. यात संपूर्ण कंपनी किंवा सोसायटीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विमा उतरविता येत असल्याने सुदृढ आणि आजारी व्यक्तींचा योग्य मेळ साधल्या जातो. उपचाराला लागणाऱ्या खर्चाच्या 80 टक्के रक्कम विमा कंपनी देते तर 20 टक्के रक्कम रुग्णाला स्वत: द्यावी लागते हा एक तोडगा या बाबतीत होऊ शकतो.

बँकींग व्यवसायासाठी भांडवल पूर्तता किंवा बुडीत कर्जाची पाहणी करणारे राज्यकर्त्यांशी संबंधित नको. स्वतंत्रपणे त्यांनी आपली मते नोंदविण्याची आवश्यकता आहे.

**जोसेफ स्टिगलीट्झ आणि मायकेल स्पेन्स :**

जॉन बेट्स क्लार्क पदक दोन वर्षातून एकदा अमेरिकन इकॉनॉमिक असोसिएशनच्या वतीने अर्थशास्त्र या विषयात लक्षणीय संशोधन करणाऱ्या, 40 वर्षाखालील वयाच्या अर्थशास्त्रज्ञाला प्रदान करण्यात येते. जोसेफ स्टिगलीट्झ आणि मायकेल स्पेन्स दोघेही जॉन बेट्स क्लार्क पदकाचे मानकरी आहेत. स्टिगलिट्झ यांना 1979 साली तर मायकेल स्पेन्स यांना 1981 साली हे पदक प्राप्त झाले. असममिती माहितीच्या क्षेत्रात हे दोघेही अर्थशास्त्रज्ञ अग्रेसर आहेत.

**जोसेफ स्टिगलिट्झ :**

जोसेफ स्टिगलिट्झ यांचा जन्म 1943 साली गॅरी, इंडिआना(यु.एस.)येथे झाला. मॅसाच्युसेट्स इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी (MIT) येथून 1967 साली स्टिगलिट्झ यांनी आचार्य ही पदवी प्राप्त केली. गत वर्षी 2001 मध्ये कोलंबिया बिझिनेस स्कूल येथे प्राध्यापक पदावर ते रुजु झाले. या पूर्वी स्टिगलिट्झ 1997 ते 1999 या दरम्यान जागतिक बँकेचे प्रमुख अर्थशास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते. तसेच विकासाचे अर्थशास्त्र या उपविभागाचे जेष्ठ उपाध्यक्ष होते. 1993 ते 1997 या काळात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष क्लिंटन यांच्या कार्यकाळात ते यु.एस. कौन्सिल ऑफ इकॉनॉमिक ॲडवायझर्स चे अध्यक्ष होते. अर्थशास्त्रात 'माहितीचे अर्थशास्त्र' या नव्या शाखेची निर्मिती स्टिगलिट्झ यांनी केली. 'प्रतिकूल निवड आणि नैतिक जोखीम' (Adverse Selection and Moral hazard) या सिद्धांताच्या विकासात स्टिगलिट्झ यांनी मोलाची कामगिरी पार पाडली. धोरणांच्या विश्लेषणात या सिद्धांताचा प्रमाणित साधन म्हणून उपयोग करण्यात येतो. स्टिगलिट्झ यांनी पाठयपुस्तकेदेखील लिहिली आहेत. विविध भाषांमध्ये या पुस्तकांची भाषांतरे झाली आहेत.

वयाच्या 29व्या वर्षी अर्थमिती मंडळाचे ते सदस्य होते. 1970 साली केंब्रिज विद्यापीठ येथे स्टिगलिट्झ 'फुलब्राइट स्कॉलर' होते. बाजारात जुळवाजुळवीची (Market adjustment) प्रक्रिया कशा रीतीने पार पाडण्यात येते या बाबतचे विश्लेषण स्टिगलिट्झ यांनी केले. निवडीच्या पर्यायांची यादी देऊन कमी माहिती उपलब्ध असलेले लोक, जास्त माहिती उपलब्ध असलेल्या लोकांकडून माहिती कशा पद्धतीने काढून घेतात, या बाबतचे स्पष्टीकरण स्टिगलिट्झ यांनी दिले. सर्वसामान्य उदाहरण म्हणजे विमा कंपन्यांची पूर्वतपासणी. विमा कंपन्या ग्राहकांच्या जीविताची जोखीम लक्षात घेतात आणि त्यानुसार ग्राहकांची वर्गवारी करतात. यामुळे निम्न दर्जाच्या विमा हफ्त्यात जास्त रक्कम देऊन देखील प्राप्त होणारे फायदे कमी प्रमाणात असतात. अभिकर्त्यांना परिपूर्ण माहिती नसल्यास दोन भिन्न प्रकारचे विक्रेते दोन प्रकारच्या संविदांच्या (contracts) माध्यमाने कशा रीतीने वेगळे करता येउ शकतील या बाबतचा पर्यायी उपाय स्टिगलिट्झ यांनी मांडला. समजा निम्न दर्जाची मोटार गाडी वर्षातून एकदा बंद पडत असेल आणि उच्च दर्जाची गाडी जर अशी बंद होत नसेल तर एका संविदात क्रेता सुरुवातीला रु. 5000 देऊ करेल आणि मोटारगाडी जर बंद पडली नाही तर वर्षाच्या शेवटी रु. 5000 देण्याचे कबूल करेल अशा रीतीने गाडीची समजा किंमत रु.10,000 आहे. ही किंमत तो पूर्ण देईल. दुसऱ्या संविदात क्रेता रु. 8,000 चा पहिला हप्ता देण्याचे ठरवेल आणि गाडी जर बंद पडली नाही तर वर्षाच्या शेवटी रु. 2000 देण्याचे मान्य करेल. उच्च दर्जा असलेली मोटरगाडी विक्रेते पहिल्या संविदाचा स्वीकार करतील तर निम्न दर्जाची मोटार विक्रेते दुसऱ्या प्रकारच्या संविदाला मान्यता देतील. अशा रीतीने दोन्ही प्रकारच्या गाडयांची विक्री होऊ शकेल. अशा प्रकारच्या युक्त्यांचा उपयोग व्यवहारात कसा होऊ शकतो हे स्टिगलिट्झ यांनी दर्शविले.

**मायकेल स्पेन्स :**

मायकेल स्पेन्स यांचा जन्म 1943 साली मॉन्टक्लेर न्यु जर्सी(यु.एस.) येथे झाला. स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या ग्रॅज्युएट स्कूल ऑफ बिझिनेस येथे ते व्यवस्थापन या विषयाचे मानद प्राध्यापक आहेत. 1990 ते 1999 या कालावधीत मायकेल स्पेन्स स्टॅनफोर्ड बिझिनेस स्कूलचे अधिष्ठाता होते. ऑक्सफोर्ड विद्यापीठाची 1968 साली पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर हॉर्वर्ड विद्यापीठाची पीएच. डी. पदवी त्यांनी 1972 साली प्राप्त केली. स्टॅनफोर्ड येथे 1973 ते 1975 या दरम्यान स्पेन्स सह-प्राध्यापक होते. यानंतर त्यांनी हॉर्वर्ड येथे अर्थशास्त्र आणि व्यवसाय प्रशासन या दोन विषयाचे प्राध्यापक पद भूषविले. उत्कृष्ट शिक्षकाचे जॉन केनेथ गालब्रेथ पारितोषिक स्पेन्स यांना बहाल करण्यात आले होते. गणित आणि तत्वज्ञान या दोन्ही विषयात त्यांनी पदव्या प्राप्त केल्या आहेत. अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यु, बेल जर्नल ऑफ इकॉनॉमिक्स, जर्नल ऑफ इकॉनॉमिक थिअरी आणि पब्लिक पॉलीसी या नियतकालिकांच्या संपादकीय मंडळावर ते अनेकदा होते. हॉर्वर्ड विद्यापीठातील 1972 च्या उत्कृष्ट शोध प्रबंधाबद्दल डेव्हीड ए वेल पारितोषिकाने स्पेन्स यांना सन्मानित करण्यात आले होते.

स्पेन्स यांनी 'बाजार संकेत' ही संकल्पना मांडली. बाजारात सहभागी होणारे, फायदेशीर निष्पत्ती प्राप्त करण्यासाठी संधी साधण्याच्या प्रयत्नात असतात. उदाहरणार्थ, शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी जास्तीत जास्त वर्षे महाविद्यालयात राहून उच्च शिक्षण प्राप्त करण्याच्या प्रयत्नात असतात. अधिकाधिक कौशल्य आणि नैपुण्य प्राप्त करणे हा त्यामागील उद्देश स्पष्टच आहे. परंतु त्याचाच दुय्यम घटक म्हणजे, पदवी प्राप्त झाल्यास नोकरीस ठेवणाऱ्या मालकाला

व्यक्ती कितपत बुद्धिमान आणि कष्टकरी आहे याचा अंदाज येतो. व्यवसायाच्या संदर्भात, नफ्याच्या संकेत लाभांशाच्या माध्यमाने प्राप्त होऊ शकतो. रोखे बाजारात इतरांच्या तुलनेत स्वत:चे वेगळेपण प्रस्थापित करण्याची संधी यामुळे प्राप्त होते.

स्पेन्स यांनी असे दाखवून दिले की काही परिस्थिती मध्ये संपूर्ण माहिती प्राप्त असलेले अभिकर्ते उत्तम दर्जाच्या वस्तुंची खरेदी करणाऱ्या ग्राहकांना निवडू शकतात. उदाहरणादाखल वापरलेल्या मोटारींचे दोन भागात वर्गीकरण करु. उच्च दर्जा आणि निम्न दर्जा असलेल्या मोटारी. ग्राहक उच्चप्रतीच्या मोटारीसाठी रु.10,000 देण्यास तयार होतील आणि निम्नप्रतीच्या मोटारींसाठी रु. 8,000 देऊ करतील. अशाच मोटारींसाठी विक्रेते रु. 9,000 आणि रु. 7,000 क्रमश: मूल्य निश्चित करतील. ग्राहक आणि विक्रेते या दोन प्रकारच्या मोटारींचे वर्गीकरण करु शकले तर हितकारी व्यवहार (beneficial transaction) उच्चप्रतीच्या मोटारींसाठी रु. 9000 आणि रु.10,000 च्या किंमतीच्या दरम्यान होइल तर निम्न दर्जाच्या मोटारींसाठी रु. 7,000 आणि रु. 8,000 या किंमतीच्या दरम्यान घडून येईल. विशिष्ट विक्रेता नवा रंग देऊन टायर नवीन लाऊन मोटारीला आकर्षक करण्याचा प्रयत्न करेल. या द्वारे मोटारीचा दर्जा उत्तम आहे हा संकेत ग्राहकाला देण्यासाठी विक्रेता अधिकाधिक प्रयत्नशील असतो. अशा रीतीने जुन्या मोटारी आकर्षक बनविण्यास अधिक खर्च येतो. समजा या मोटारींमधील उच्च दर्जा असलेल्या मोटारींवर रु.1000 खर्च होत असतील आणि निम्न दर्जाच्या मोटारींसाठी रु. 4,000 लागतील तर विक्रेत्याच्या दृष्टिकोनातुन अशा मोटारींसाठी रु. 11,000 प्राप्त व्हावे. (= रु. 7,000 + रु 4,000) परंतु ही रक्कम उत्तम प्रतीच्या मोटारींसाठी ग्राहकाने नमूद केलेल्या ऐच्छिक किंमतीपेक्षा देखील अधिक राहील. अशा स्थितीत विक्रेते जुन्या मोटारींना आकर्षक बनविण्याचा खटाटोप करणार नाहीत. निम्न दर्जाच्या मोटारी प्रदर्शित करणेच ते पसंत करतील. अशा रीतीने दोन्ही प्रकारच्या मोटारी बाजारात विकल्या जातील.

**लेमन कायदा आणि भारतातील वाहन चालक:**

संपूर्ण माहितीच्या अभावी योग्य व्यवहार घडून येत नसल्याने व्यवहार करणाऱ्यांपैकी एका अभिकर्त्याला नुकसान सहन करावे लागते. लेमन ही संज्ञा ग्राहक संरक्षण कायदद्याच्या दृष्टिने महत्वपूर्ण ठरते. उत्पादित वस्तु दायित्व कायदद्याच्या ऐवजी ग्राहकांशी संबंधित व्यवहारासाठी 'ग्राहक जागरुक' कायदद्याची अमलबजावणी बहुतांश राष्ट्रांमध्ये झाली आहे. आता स्वयंचलीत वाहनांच्या व्यवहारासाठी अमेरिकेसारख्या राष्ट्रांमध्ये 'लेमन कायदा' पारित करण्यात आला आहे. या कायदद्यान्वये ग्राहकाला निम्न दर्जाचे वाहन (लेमन) प्राप्त झाल्यास ग्राहकांचे हक्क निर्धारित करण्यात आले आहेत. प्राश्वासन काळात (Warranty Period) वाहन दुरुस्तीसाठी विक्रेत्याकडे अनेक वेळा नेऊन त्याला रास्त संधी उपलब्ध करुन देखील वाहन नादुरुस्त स्थितीत असल्यास कॅलिफोर्निया लेमन कायदद्यानुसार अशा वाहनांना लेमन म्हणुन संबोधण्यात येते. वाहन लेमन असल्याचे सिद्ध झाल्यास ग्राहक त्याच्या पसंतीनुसार नवीन वाहन घेण्यास पात्र होतो.

**भारतातील वाहन चालक :**

भारतात 1986 चा ग्राहक संरक्षण कायदा आणि 1988 चा मोटार वाहन कायदा या दोहोंव्यतिरिक्त उत्पादन दायित्वाची कुठलीच तरतूद सुस्पष्ट नाही. परंतु उत्पादित वस्तु दायित्व कायदद्याच्या काही तरतुदींचा समावेश ग्राहक संरक्षण कायदद्यात करण्यात आला आहे. वाहनांसाठी देखील हा कायदा लागु होतो. असे असले तरी हा कायदा ग्राहक संरक्षणासाठी तितकासा परिणामकारक नाही.

आपल्या या कायदयाचा प्रमुख भर, भरपाई देण्यावर अधिक आहे. दंडात्मक तरतूद यात नाही. जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार (1994), आयातीवरील बाकी राहिलेली परिमाण बंधने 1 एप्रिल, 2001 पासून रद्द करण्यात आली आहेत. दुसऱ्याने वापरलेल्या (secondhand) मोटारी आता मुक्तपणे आयात करता येतील. देशातील उद्योजकांना संरक्षण देता यावे या उद्देशाने 2001 च्या अंदाजपत्रकात आयातीवरील मूलभूत सीमाशुल्क 105 टक्के आकारण्याची शिफारस करण्यात आली होती. ग्राहकांचे हित जपण्याचे दृष्टिने मात्र भारत शासनाने याबाबतीत कुठलीच पाऊले उचलली नाहीत.

निकृष्ट दर्जाचे टायर्स भारतातील रस्त्यावर होणाऱ्या अपघाताचे प्रमुख कारण आहे. राजमार्ग आणि जलदमार्गावरील अपघातात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसते. 1 नोव्हेंबर 2000 आणि 31 ऑक्टोबर 2001 या दरम्यान मुंबई -पुणे जलदमार्गावर 270 अपघाताची नोंद करण्यात आली. यात 71 लोक मृत्युमुखी पडले. यात देखील निकृष्ट दर्जाचे टायर हा घटक प्रमुख असल्याचे मानण्यात आले.

रस्त्याच्या कडेला बसणारे विक्रेते वाहनांच्या चाकांवरील झिजलेला पृष्ठभाग दुरुस्त करुन पूर्ववत करण्याचा प्रयत्न करतात. हातोडीने आघात केल्याने धातूच्या कडांना (Metallic Rim) इजा पोहचते. भरधाव वेगामुळे पंक्चरचे ठिगळ देखील सुटावते. वाढत्या अपघातासाठी अशा यंत्रज्ञ कामगारांना जबाबदार ठरवून त्यांच्याजवळील आधारभूत संरचनेकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे. ग्राहकांच्या हिताची जपवणूक केल्या खेरीज विक्रीत वाढ होउन कुठलाच उद्योग भरभराटीस येणार नाही.

बदलत्या परिस्थितीत किमान भारतात तरी शासनाला याबाबतीत हस्तक्षेप करुन कायदयाची अमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

बाजार यंत्रणा अयशस्वी कशी होते हे समजून घेण्याचे दृष्टीने यावर्षीच्या नोबेल पारितोषिक विजेत्यांचे योगदान मूलभूत स्वरुपाचे आहे. स्टिगलिट्झ यांनी बाजार अयशस्वीतेच्या समस्या दूर करण्यासाठी शासनाचा हस्तक्षेप कसा महत्वपूर्ण ठरु शकतो हे नोंदविले. दहा वर्षापूर्वी बाजार अयशस्वी होतो ही घटनाच कल्पनातीत (inconceivable)होती. बाजार यंत्रणा कशी कोलमडू शकते याचा शोध ॲकरलॉफ, स्टिगलिट्झ आणि स्पेन्स यांनी घेतला. बाजाराधिष्ठीत व्यवस्था कोसळल्यास शासनाने भरपाई करण्यास कशा रीतीने सज्ज असावे याबाबतची कल्पना या त्रिमूर्तींच्या अभ्यासाच्या आधारे येऊ शकेल.

## संदर्भ सूची


1.Aiyar Swaminathan S.Anklesaria (2001), 'The Ultimate Lemon' The Sunday Times of India, Oct; 21,2001.

2. Barman Abhishek (1997), 'What bad borrowers do to you' The Economic Times, Mumbai, Friday, 21st March, 1997.

3.ढेकणे भा.रा. (1993) 'फ्रेड्रिक ऑगस्ट फॉन हायेक: एक उपेक्षित अर्थशास्त्रज्ञ, अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर 1993 , खंड 17,अंक 2.

4. Kaushal, Neeraj (2001),'Oops, The market erred and earned the Nobel'. The Economic Times, Mumbai, Tuesday, 16th Oct., 2001.

5.Pangaria Arvind (2001), 'The Market for lemons', The Economic Times, Mumbai 16th Oct, 2001

6. Rao Suneeti (2002), 'Lemon Law' of Indian Auto Users. Economic and Political Weekly, Vol. XXXVII No.9, March 2-8-2002

# परिशिष्ट

## नोबेल प्राप्त अर्थशास्त्रज्ञांचे प्रमुख ग्रंथ आणि संशोधनपर लेख.

### (अ) जॉर्ज ॲकरलॉफ

1) An Economic Theorist's Book of Tales, Cambridge University Press, 1984

2) Introduction in Efficiency Wage Theories of the Labour Market, edited with Janet Yellen, Cambridge University Press 1986.

3) Stability, Marginal Products, Putty and clay in K. Shell, Editor, The theory of Optimal Economic Growth, The MIT Press 1967.

4) Balanced Growth-A Razor's Edge? International Economic Review (October 1967) with William Nordhaus.

5) The Market for Lemons Quality Uncertainty and the market Mechanism. Quarterly Journal of Economics (August 1970)

6) Rational Models of Irrational Behaviour. American Economic Review (May 1987) with Janet Yellen

7) Economics and Identity (with Rachel Kranton) Quarterly Journal of Economics August 2000.

8) Measurement of Unemployment Duration as Guides to Research and Policy: Reply American Economic Review(December 1983) with Brain Main.

9) Men without Children, Economic Journal March 1998.

10) Social Distance and Social Decisions (The Fisher-Shultz Lecture of the 1995 World Congress of the Econometric Society, Econometrica, September 1997)

11) An Analysis of out of wedlock Childbearing in the United States. Quarterly Journal of Economics,(with Janet Yellen and Michael Katz)May 1996

12) The Fair Wage-Effort Hypothesis and Unemployment. Quarterly Journal of Economics (May 1990) with Janet Yellen.

13) A near Rational Model of the Business Cycle with Wage and Price Inertia. Quarterly Journal of Economics (September 1985) with Janet Yellen.

14) Can Small Deviations from Rationality Make Significant Differences to Economic Equilibria? American Economic Review (September 1985) with Janet Yellen.

15) Rational Models of irrational Behavior. American Economic Review (May 1987) with Janet Yellen.

### (ब )जोसेफ स्टिगलिट्झ

1) Economics of the Public Sector : Third Edition (2000)

2) Economics. Second Edition (1997)

3) Principles of Microeconomics. Second Edition. (1997)

4) Principles of Macro Economics. Second Edition (1997)

5) Rethinking the East Asia Miracle (Edited book with Shahid Yusuf) 2001

6) Capital, Wages and Structural Unemployment. Economic Journal, June 1969, with George Akerloff.

### (क) मायकेल स्पेन्स

1) Market Signaling : Informational Transfer in Hiring and Related processes, Cambridge, Harvard University Press, 1974

2) Regulatory Strategies for Pollution Control (with Martin Weitzman) in A.F. Friedlaender (ed.) Approaches to Controlling Pollution, MIT Press ,1978.

3) Industrial Organisation in an Open Economy, with R.E. Caves and M.E. Porter, Harvard University Press, 1980.

4) The Optimal Control of Pollution (with E. Keeler and R.J. Zeckhauser), Journal of Economic Theory, February 1972.

5) Job Market Signaling, Quarterly Journal of Economics, August 1973.

6) Competitive and Optimal Responses to Signals: An Analysis of Efficiency and Distribution, Journal of Economic Theory, March 1974.

7) Informational Aspects of Market Structures: An Introduction, Quarterly Jounal of Economics, 1976.

8) The Effect of the Timing of Consumption Decisions and the Resolution of Uncertainty on the Choice of Lotteries (with R.J. Zeckhauser), Econometrica, March 1972.

9) Time and Communication in Economic and Social Interaction, Quarterly Journal of Economics, November 1973.

10) Competition in Salaries, Credentials and Signaling Prerequisites for Jobs. The Quarterly Journal of Economics, February 1976.

●●●

# केन्सोत्तर अर्थशास्त्र

(पूर्वार्ध)

● शरद शंकर जोशी

*भूतपूर्व प्रपाठक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे.*

विसाव्या शतकाचा एक अग्रगण्य शिल्पकार लॉर्ड जॉन मेनार्ड केन्स या विचारवंताच्या संपन्न ग्रंथसंपदेपैकी रोजगारसिद्धान्तविषयक महान ग्रंथाने[1]अर्थशास्त्राच्या वैचारिक विकासात क्रांतीच घडवून आणली आहे. जागतिक आर्थिक महामंदीच्या पार्श्वभूमीवर केन्सने केलेल्या ग्रंथरचनेचा प्रभाव व परिणाम अर्थशास्त्रीय विचारातील आमूलाग्र बदल दर्शवितात. ही केन्सप्रणीत क्रांती[2] अनेक दृष्टींनी अभ्यासता येते. तंत्रवैज्ञानिकदृष्टच्या प्रगत अशा आधुनिक अर्थव्यवस्थेच्या कार्ययंत्रणेच्या अंतरंगाचे यथार्थ ज्ञान केन्सच्या मौलिक ग्रंथातून प्राप्त होते. त्याची विशेष दखल न घेता किंबहुना त्याकडे काहीसे दुर्लक्ष करुन काही अर्थशास्त्रज्ञांनी पूर्वापार चालत आलेल्या अभ्यासपद्धतीचा अवलंब करुन केन्सचे विचार नवअभिमत चौकटीत बसविण्याचे प्रयत्न केलेले दिसत असले तरी केन्सचे अर्थशास्त्र सनातनपंथीय विचारांपेक्षा कसे वेगळे आहे, वास्तववादी आहे हे अनेक अर्थशास्त्रज्ञांनी दाखवून दिले आहे. रोजगार, व्याज आणि पैसा याविषयी केन्सने मांडलेला सामान्य सिद्धांत खरोखरीच कसा सामान्य, अधिक प्रस्तुत ठरतो हे विशद करण्यावर अनेक अर्थतज्ज्ञांनी भर दिलेला आहे.[3]

केन्सच्या 'ट्रीटीज ऑन मनी'[4] आणि 'जनरल थिअरी' ग्रंथातील विश्लेषणाची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न केन्सनंतरच्या काळात दिसतो. किंबहुना उत्पन्न-विभाजन, गुंतवणूक, गतिक वृद्धी इत्यादी विषयी केन्सने केलेले विश्लेषण पुढे नेऊन ते अधिक वास्तववादी करण्यावर भर देणारे आणि नवअभिमत विश्लेषणाला काही बाबतीत पर्यायी ठरणारे आर्थिक सिद्धांत म्हणजे केन्सोत्तर अर्थशास्त्रीय सिद्धांत, असे म्हणता येईल. विशिष्ट संस्थात्मक चौकट आणि बाजार-प्रक्रिया गृहीत धरणाऱ्या नवअभिमत अर्थशास्त्राशी पूर्ण विरोधी असणारे आर्थिक सिद्धांत म्हणजे केन्सनंतरचे अर्थशास्त्रीय सिद्धांत असे नव्हे. केन्सोत्तर अर्थशास्त्र म्हणजे एखादा ठरावीक संप्रदाय असेही मानता येणार नाही. केन्सच्या लिखाणामुळे जी वैचारिक क्रांती घडून आली त्याहीपेक्षा दूरगामी बदल केन्सोत्तर अर्थशास्त्राने सूचित केले जातात.[5] बदलत्या काळातील नव्या प्रश्नांची उकल करताना कोणतीही आग्रही भूमिका न घेता, मतभिनिवेशी न राहाता सामाजिक वास्तवाची दखल घेऊन समावेशक

व फलदायी दृष्टिकोनातून परिस्थितीची चिकित्सा, आर्थिक आजाराचे निदान आणि त्यानुसार धोरणात्मक उपाय सूचविण्याचा केन्सोत्तर अर्थशास्त्रज्ञांचा कल दिसतो. नवअभिमत अर्थशास्त्राच्या बाबतीत वैशिष्टचपूर्ण अभिमुखता आहे, त्या पारंपरिक अर्थशास्त्राच्या प्रत्येक पैलूला पूर्ण पर्याय केन्सोत्तर अर्थशास्त्राने उपलब्ध करून दिलेले नाहीत, केन्सोत्तर अर्थशास्त्र हे विस्थापक अर्थशास्त्र मानता येणार नाही. तथापि, अर्थशास्त्र अधिक वास्तववादी, अधिक समावेशक स्वरूपाचे कसे होउ शकेल, याकडे केन्सोत्तर अर्थपंडितांनी विशेष लक्ष पुरुविले आहे. त्यांचे हे योगदान केवळ वृद्धि गतिकीच्या बाबतीतच नव्हे तर अन्य बाबींच्या संदर्भातही उल्लेखनीय आहे.

केन्सनंतरचे आर्थिक सिद्धान्त किंवा केन्सनंतरचे अर्थशास्त्र ही संज्ञा अत्यंत व्यापक असून त्यात बहुविध अर्थशास्त्रज्ञांच्या लेखनकार्याचा अंतर्भाव होतो. सिडने विनट्रॉब याला केन्सोत्तर अर्थशास्त्राच्या योगदानाचा आद्यप्रवर्तक मानले जाते. सनातन पंथीय विचारसरणी कशी सदोष आहे हे दाखवून देऊन त्या प्रकारच्या मतांची पकड ढिली करण्याच्या बाबतीत केन्सचे योगदान मान्य करणारे अग्रगण्य अमेरिकी अर्थशास्त्रज्ञ म्हणून विनट्रॉब' चा उल्लेख केला पाहिजे. केन्सनंतरच्या अर्थशास्त्रात प्रामुख्याने पिरो स्राफा, जोन रॉबिन्सन, पॉल डेव्हिडसन, कॅलेकी, निकोलस काल्डर या सारख्या अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेली प्रतिमाने, त्या प्रतिमानांची वैशिष्टचे तसेच त्यांच्या लिखाणात केन्सप्रणीत विश्लेषण यांनी कितपत पुढे नेले या बाबतचा अभ्यास उद्बोधक ठरतो. केन्सनंतरच्या अर्थशास्त्राची ठळक वैशिष्टचे विशद करताना वृद्धि-गतिकीसारख्या समष्टीय बाजुंचा विचार केला जातो, त्याप्रमाणे त्या अर्थशास्त्राच्या व्यष्टीय आर्थिक मूलभूत घटकांचा देखील उल्लेख केला जातो, हे खरे. तथापि ते करताना प्रामुख्याने कॅलेकीने केलेले विश्लेषण किंवा स्राफाचा किंमतविषयक दृष्टिकोन एवढ्यापुरतीच ती चर्चा मर्यादित राहाते. किंमतनिश्चितीशी निगडित असणारे अन्य विषय हाताळले जात नाहीत. उदाहरणार्थ, उत्पादनसंस्थेचे स्वरूप, उत्पादन-विषयक योजना, उत्पादन खर्च, बाजारांचे संघटन इत्यादी प्रश्नांचा उहापोह त्यात फारसा दिसत नाही. केन्सोत्तर अर्थशास्त्रीय सिद्धान्ताचा आढावा घेताना त्यात समष्टीय अर्थशास्त्रावर भर दिलेला असतो. व्यष्टीय अर्थशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या विषयासंबंधीच्या सैद्धांतिक चर्चेला त्यात फारसे स्थान देण्यात न आल्याने केन्सनंतरचे अर्थशास्त्र म्हणजे केन्सनंतरचे समष्टीय अर्थशास्त्र असे त्याचे स्वरुप राहाते; व्यष्टीय अर्थशास्त्र काहीसे दुर्लक्षित होते, किंवा त्यात समाविष्ट करता येण्यासारख्या निरनिराळया बाबींना पुरेसा वाव देण्यात येत नाही.

व्यष्टीय पाया हे केन्सोत्तर आर्थिक विश्लेषणाचे एक वैशिष्टचच होय. केन्सोत्तर अर्थशास्त्रात उत्पादनसंस्था सीमान्त खर्च आणि सीमान्तप्राप्ती यांची समानता साधणारी नाही ; सीमान्त खर्च आणि सीमान्त प्राप्ती यांच्या समानतेचे सूत्र येथे आधारभूत सूत्र मानले जात नाही; तसेच उत्पादनसंस्था प्रचलित किंमत बंधनकारक मानणारी नाही; उत्पादनसंस्था किंमत स्वीकर्ती (Price taker) असते, असे येथे मानावे लागत नाही. पारंपरिक विश्लेषणापेक्षा वेगळया प्रकारचे विश्लेषण येथे अभिप्रेत आहे. मजुरीदर-निश्चितीच्या बाबतीत श्रमिकांच्या सीमान्त उत्पादकतेवर भर नाही. मजुरीदर श्रमिकांच्या सीमान्त उत्पादकते इतका असतो असे मानले जात नाही. वस्तूची किंमत आणि कामगारांची मजुरी वेगळ्याच घटकांनी ठरत असतात, यावर केन्सोत्तर विश्लेषणाचा भर आहे. पैशातील मजुरीदर हे कामगार संघटनांच्या सौदा-सामर्थ्यासारख्या बाह्य घटकांवर अवलंबून असतात. पैशातील मजुरीपातळी व्यष्टीय विश्लेषणाच्या दृष्टीने (व्यक्तिगत उत्पानसंस्था -

पातळीवर वस्तूची पैशातील किंमत ठरविण्याच्या संदर्भात) महत्त्वाची ठरते, हे ओघानेच येते. अनुभवाधिष्ठित पुरावा या विधानाला पुष्टी देणारा आहे. समष्टीयदृष्ट्या देखील पैशातील मजुरी-पातळीची भूमिका महत्त्वाची ठरते ती या अर्थाने की सर्वसाधारण किंमत-पातळी प्रभावित करणारा एक महत्त्वाचा घटक त्यातून सूचित होतो.

स्पर्धेची परिस्थिती केन्सोत्तर सिद्धान्तातही गृहीत धरलेली आहे ; तथापि, या गृहीतांचे स्वरूप नवअभिमत विश्लेषणातील गृहीताच्या तुलनेत तितकेसे काटेकोर नाही. स्पर्धेचा कडक नियम येथे नाही. व्यक्तिगत उत्पादनसंस्था, बाजारातील किंमत, मार्गदर्शक मानणारी असलीच पाहिजे, अशी अट घालण्याची येथे गरज नाही. बाजारपेठेतील उत्पादन संस्थांमध्ये एकमेकांशी बरोबरी करण्याची (किंवा अन्य उत्पादनसंस्थांच्या तुलनेत वरचढ होण्याचा प्रयत्न करण्याची) इच्छा असणे पुरेसे ठरते; लाभप्रद गुंतवणुकीच्या संधीचा भरपूर लाभ घेण्याचा प्रयत्न प्रत्येक उत्पादनसंस्था करीत असते. गुंतवणुकीपासून मिळू शकणाऱ्या उत्पन्नाचा दर सरतेशेवटी समान राहील या दृष्टीने उत्पादनसंस्थामध्ये स्पर्धा असते, असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. याचा अर्थ असा होतो की किंमत संदर्भातील स्पर्धेपेक्षा गुंतवणुकीच्या संबंधित स्पर्धेवर भर अधिक आहे .

अल्प कालखंडातील उत्पादनासाठी वापरले जाणारे तंत्र किंवा तांत्रिक परिस्थिती या विषयीचे गृहीतही ताठर स्वरुपाचे नाही. केन्सनंतरच्या काही अर्थवेत्त्यांना मान्य असलेल्या या दृष्टिकोनानुसार उत्पादनाच्या विशिष्ट टप्प्यात उत्पादनसंस्थेचा प्रत्यक्ष खर्च स्थिर राहातो; त्यापुढील उत्पादन टप्प्यात मात्र खर्च वाढू लागतो. खर्चवक्राचा हा भाग उजवीकडे असतो.[7] हा खर्च वर्क U आकाराचा नाही. प्रत्यक्ष खर्च स्थिर राहाण्याचा टप्पा लक्षात घेता वस्तूची किंमत वाढविण्याच्या बाबतीत उत्पादनसंस्थेवर खर्चाच्या बाजूने कोणतेही दडपण येत नसते. उत्पादनसंस्थेच्या खर्चवक्राचा आकार लक्षात घेता असे म्हणता येईल की, उत्पादनसंस्थेचा नफा (किंवा उर्वरित उत्पन्न) स्थापित क्षमता वापराच्या दराचे (मागणी पातळीचे ) वाढते फलन राहिल. याचे कारण असे की प्रति एकक (दर नगामागे) स्थिर खर्च सतत घटतो. म्हणून सरासरी एकूण खर्चात अपेक्षित नफा समाविष्ट केलेला असला (वस्तूची किंमत ठरविताना उत्पादनखर्चाबरोबरच अपेक्षित नफा हिशेबात धरला असला) तरीही स्थिर किंमत आणि सरासरी एकूण खर्च यातील तफावत वाढते. मागणी पातळी उंचावत असताना उत्पादन संस्थेच्या उर्वरित उत्पन्नात होणाऱ्या (प्रमाणशीरतेपेक्षा अधिक) वाढीमुळे व्यष्टीय पातळीवर पुनर्विभाजनात्मक परिणाम घडून येतात.

उपरोक्त विश्लेषणातून स्थूलमानाने सूचित होणाऱ्या अधिपरिव्यय किंमतनिश्चिती प्रतिमानाची मांडणी कॅलेकीने केली. ॲन्ड्र्यूससारख्या अभ्यासकांनी या संदर्भात केलेल्या लिखाणाचाही हाच रोख आहे. अलिकडील काळात केन्सोत्तर अर्थशास्त्रज्ञानी उत्पादनसंस्थेच्या अपेक्षित नफ्याचे प्रमाण (किंमतीतून उत्पानखर्च भरून निघाला पाहिजे त्याचप्रमाणे जो नफा मिळाला पाहिजे त्याचे प्रमाण) आणि परिणामत: बचतीचा दर ठरविणाऱ्या घटकांकडे लक्ष वळविले आहे.

वस्तूची किंमत ठरविताना त्यात समाविष्ट करावयाचा अपेक्षित नफा मक्तेदारी शक्तीवर अवलंबून असतो, यावर कॅलेकीने भर दिला; तर डोनाल्ड हॅरिससारख्या अभ्यासकांनी अन्य काही घटकांचा उल्लेख केलेला आहे. उदाहरणार्थ, स्थापितक्षमता-वापराचा अपेक्षित दर, गुंतवणुकीची नियोजित पातळी. गुंतवणुकीची अपेक्षित पातळी जितकी उच्चतर तितका अपेक्षित नफ्याचा दर अधिक राहील. आयशनर[8] याने हे घटक एकत्रित रीतीने विचारात घेऊन नियोजित गुंतवणूक आणि (उपरोक्त)अपेक्षित नफा

यांच्यातील संबंधावर वेगळे भाष्य केले आहे.

वस्तूची किंमत ठरविताना खर्च भरुन निघाला पाहिजे हा विचार महत्त्वाचा असतो; त्याचप्रमाणे ती किंमत ठरविताना जो नफा वसूल व्हावा अशी अपेक्षा असते तो अपेक्षित नफाही विचारात घ्यावा लागतो. अपेक्षित नफा गुंतवणुकीसाठी आवश्यक असणाऱ्या रकमांकरिता मागणी किती आहे यावर अवलंबून असतो. पारंपरिक विश्लेषणात प्रामुख्याने बाह्य मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या वित्तीय साधनसामग्रीवर भर आहे; केन्सोत्तर विश्लेषण मात्र उत्पादनसंस्थेला नफ्याच्या मार्गाने मिळू शकणाऱ्या रकमांवर म्हणजेच प्रामुख्याने अंतर्गत मार्गांनी उपलब्ध होऊ शकणाऱ्या वित्तीय साधनसामग्रीचा विचार करते. अपेक्षित नफ्यात गुंतवणूक-वृद्धीचा दर प्रतिबिंबित होत असतो.

**2.मूल्यनिर्धारण प्रक्रिया :**

केन्सनंतरचे विश्लेषण अभ्यासताना किंमतनिर्धारण-विषयक विविध तत्वे लक्षात येतात; अधिपरिव्यय किंमत, (Mark-up price) प्रसामान्य परिव्यव किंमतनिश्चिती आणि प्राप्तीचे विशिष्ट लक्ष्य गाठण्याच्या दृष्टिने किंमत निश्चिती प्रक्रिया इत्यादी. अधिपरिव्यय किंमतनिश्चितीचे तत्त्व स्थिर सरासरी प्रत्यक्ष परिव्यय प्रतिमानावर आधारित असून अनेक अर्थशास्त्रज्ञांनी तेच अधिक पसंत केले आहे. प्रत्यक्षातील परिस्थिती बघता बाजाराधिष्ठित औद्योगिक अर्थव्यवस्थांमध्ये उत्पादनसंस्था उपरोक्त मूल्यनिर्धारण पद्धतींचा अवलंब करीत आहेत, असे अनुभवास येते. काही उत्पादनसंस्थांच्या बाबतीत मात्र असे आढळले की, त्यापैकी नेमक्या कोणत्या पद्धतीचा अवलंब करावयाचा याविषयी निर्णय करताना विक्रीनुसार ठरणारा उत्पादनसंस्थेचा आकार आणि विविधीकरणाचे प्रमाण या घटकांना महत्त्व दिले जाते. तसेच सरासरी प्रत्यक्ष परिव्यय आणि सरासरी प्रत्यक्ष श्रम-परिव्यय हे स्थिर आहेत, असे गृहीत धरता येत नाही; अनुभवाधिष्ठित पुरावा त्या परिव्ययाच्या स्थैर्याला पुष्टी देणारा नसल्याचे आढळते. पण मग स्थिर सरासरी प्रत्यक्ष परिव्ययावर भर देऊन किंमतनिश्चितीच्या एकल प्रक्रियेवर भिस्त ठेवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आर्थिक वास्तव नाकारण्यासारखे आहे. अशा खटाटोपामुळे विश्लेषण अधिक वास्तववादी करुन केन्स प्रणीत विश्लेषण पुढे नेणारे ते केन्सोत्तर अर्थशास्त्र(ज्ञ) असे म्हणण्यात जे व्यवच्छेदेक लक्षण अधोरेखित केले जाते ते येथे कोठे आढळते ?

किंमतनिश्चितीची धोरणे, उद्दिष्टे, नफ्याचे विशिष्ट प्रमाण सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने खर्चाबरोबरच काही टक्के नफा लावून किंमत निश्चित करण्याची व्यवहारात आढळणारी रीत इत्यादि विषयांचा अभ्यास अनेकांनी हाती घेतला. गेल्या चार पाच दशकांच्या काळातील अशा अन्वेषणाची जाणीव असती तर केवळ उपरोक्त एकल प्रक्रियेवरच भर दिला गेला नसता. किंमतनिश्चितीसंबंधी ती मीमांसा इंग्लंडबाहेरील देशात अनेकांनी केलेली आहे. काहीशा वेगळया राजकीय वातावरणात काम करणाऱ्यांची वैचारिक बैठक वेगळी संभवत असल्याने त्यांनी मांडलेली किंमतनिश्चितीची प्रतीमाने वरील प्रकारच्या साचेबंद प्रतिमानासारखी नाहीत.[९] एखादी विशिष्ट किंमतनिश्चिती प्रक्रियाच संयुक्तिक मानून विशिष्ट संकेतानुसार तिचेच चित्रण केल्याने आणि अन्य अर्थपंडितांच्या योगदानाकडे दुर्लक्ष करण्याच्या प्रवृत्तीमुळे केन्सोत्तर व्यष्टीय आर्थिक विश्लेषण अधिक काळजीपूर्वक अभ्यासणे गरजेचे ठरते.

जो (उपरोक्त) मूल्यसिद्धांत केन्सोत्तर मूल्यसिद्धान्त म्हणून मानला जातो तो सिद्धान्त (कालक्रमाने केन्सनंतरचा असला तरी) पूर्णतया अनुभवधिष्ठित विश्लेषणावर आधारित आणि वास्तववादी नाही. गार्डिनर मीन्स आणि फिलिप ॲन्ड्रयूस यासारख्यांनी केलेले विश्लेषण मार्गदर्शक मानून त्यानुसार केलेली मांडणी अपुरीच ठरते.

केन्सोत्तर व्यष्टीय आर्थिक विश्लेषणाची झेप त्यात अभावानेच आढळते; नवअभिमत संकल्पनांचा व परिभाषेचा साज चढविलेली चर्चा विचार करण्याच्या विशिष्ट वैयक्तिक वैशिष्ट्यांपलीकडे जाऊ शकली नाही. केन्सच्या विश्लेषणाचे एक वैशिष्ट्य म्हणून वास्तवाचा संदर्भ महत्त्वाचा ठरतो. केन्सच्या समष्टीय विश्लेषणाला पूरक ठरणारे व्यष्टीय विश्लेषण नवअभिमत संकल्पनांच्या जाचक बंधनातून मुक्त आणि त्याची मांडणी वास्तवाला धरुन असावयास हवी. व्यष्टीय आर्थिक विश्लेषण अधिकाधिक वास्तववादी करण्याचे प्रयत्न करणाऱ्यांनी वास्तवातील उत्पादन फलनावर आधारित आणि अनुभवाधिष्ठित रीतीने तयार केलेले मूल्यनिश्चितीचे प्रतिमान मांडले; केन्सप्रणीत समष्टीय विश्लेषणाला मजबूत आधार त्यामुळे प्राप्त झाला.

केन्सोत्तर व्यष्टीय अर्थशास्त्राचा विचार करताना येथे काही मूल्यसिद्धांत लक्षात घेतले आहेत. केन्सोत्तर व्यष्टीय अर्थशास्त्राचाच भाग असलेले सिद्धान्त म्हणजे प्रशासित मूल्यनिर्धारण तत्त्व, प्रसामान्य परिव्यय तत्व आणि अधिपरिव्यय किंमतनिश्चितीचे तत्त्व. ही तत्त्वे ज्या सैद्धान्तिक चर्चेतून पुढे आली ती वैचारिक भूमिका, त्या संदर्भातील युक्तिवाद, समर्थनार्थ स्पष्टीकरणे इत्यादींचा अभ्यास उद्‌बोधक ठरतो.

अर्थशास्त्राचा जनक ॲडॅम स्मिथ याने भांडवलशाहीवर लक्ष केंद्रित केले होते. त्यानंतर डेव्हिड रिकार्डो, कार्ल मार्क्स, जॉन स्टुअर्ट मिल, अल्फ्रेड मार्शल यासारख्यांना अभिप्रेत असलेली भांडवलशाही, विसाव्या शतकातील इंग्लंड-अमेरिकेतील भांडवलशाहीपेक्षा अनेक दृष्टींनी वेगळी होती आणि आताही आहे. गार्डिनर मीन्स, ॲन्ड्र्यूस, कॅलेली आदी अर्थशास्त्रज्ञांनी विसाव्या शतकातील भांडवलशाहीच्या संदर्भात लिखाण केले. मार्शल, मार्क्स, रिकार्डो यासारख्यांनी निर्माण केलेल्या परंपरांशी केन्सोत्तर अर्थशास्त्रज्ञांनी केलेल्या सैद्धान्तिक चर्चेचा संबंध मान्य करुनही असे म्हणता येईल की प्रशासित मूल्यनिर्धारण तत्त्व विकसित करताना मीन्स याने स्मिथ, मार्शल आदींच्या परंपरेशी जवळीक साधलेली नाही. स्थूलमानाने विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन-तीन दशकांच्या काळातील नवअभिमत मूल्यनिर्धारण तत्त्व आणि सीमांतवादाचे समर्थन या गोष्टी प्रत्यक्षात कशा अप्रस्तुत ठरतात, याकडे लक्ष वेधून घेण्याचा मीन्स, ॲन्ड्र्यूस आदींचा हेतू होता. नवअभिमत व्यष्टीय विश्लेषणाविरुद्ध प्रतिक्रिया हाच त्यांच्या लेखनाचा रोख होता. केन्सोत्तर व्यष्टीय आर्थिक विश्लेषणात मोलाचे योगदान करणाऱ्या मीन्स, ॲन्ड्र्यूस आदींनी प्रत्यक्षातील परिस्थिती विचारात घेऊन उपरोक्त मूल्यनिर्धारण तत्वांची मांडणी केली. उद्योगक्षेत्राविषयीच्या संशोधनाच्या आधारे त्या तत्वांचे परिष्करण केले. त्यातूनच केन्सोत्तर व्यष्टीय आर्थिक विश्लेषण विकसित होते आहे. केन्सच्या विचारांचा गाभा अबाधित राखून केन्सोत्तर पठडीतील अर्थशास्त्रज्ञांनी केलेल्या सैद्धान्तिक चर्चेचा, मांडणीचा शाखा-विस्तार बहुआयामी आहे. मात्र ते विश्लेषण नवअभिमत स्वरुपाचे नाही हा त्याचा एक महत्त्वाचा गुणविशेष होय.

उपरोक्त तीन मूल्यसिद्धान्तांपैकी प्रशासित मूल्य तत्त्व आणि प्रसामान्य परिव्यय तत्त्व ही दोन तत्त्वे नवअभिमत विश्लेषणापासून बरीच दूर जाणारी आहेत. अधिपरिव्यय मूल्य तत्त्व मात्र प्रारंभी सीमान्तवादाशी जवळीक दर्शविणारे होते. मिचेल कॅलेकीचे व्यष्टीय आर्थिक विश्लेषण सीमान्तवादावर आधारित असले आणि परिणामत: अधिपरिव्यय मूल्यतत्त्वाची सुरुवातीची मांडणी नवअभिमत स्वरुपाची असली तरी नंतर मात्र त्या तत्त्वाच्या विशदीकरणाचे स्वरुप बरेच पालटले. कॅलेकीने केलेल्या मांडणीचे परीक्षण अनेकांनी केले आणि त्या तत्त्वांच्या सुधारित मांडणीत प्रारंभीची सीमान्तवादी

वैशिष्टचे राहिलेली नसल्यामुळे केन्सोत्तर व्यष्टीय विश्लेषणात अन्य दोन तत्त्वांबरोबरच अधिपरिव्यय मूल्य तत्त्वाचाही अंतर्भाव करता येईल.

**3. नवअभिमत अर्थशास्त्राची अप्रस्तुतता :**

विसाव्या शतकातील अमेरिकी अर्थव्यवस्थेचे स्वरुप आणि त्या अर्थव्यवस्थेची कार्यपद्धती पूर्वीपेक्षा बरीच बदललेली होती; असे बदल घडत राहाणे हा त्या अर्थव्यवस्थेचा स्थायीभाव आहे. त्या अर्थव्यवस्थेतील व्यवहार आणि कार्यपद्धती नवअभिमत अर्थशास्त्र कितपत स्पष्ट करु शकते याबद्दल शंका व्यक्त केली जाते. तेथील आर्थिक घडामोडींची कारणमीमांसा देण्याच्या बाबतीत नवअभिमत अर्थशास्त्र असमर्थ ठरते.[10] स्मिथ, रिकार्डो, मिल यांच्या परंपरेतील अर्थशास्त्र पुढे मार्शल, वॉलरा आदींनी विकसित केले. या विचारावर भर देऊन तीच परंपरा पुढे सुरु ठेवण्याकडे अभ्यासकांचा पूर्वी कल होता. मार्क्सवाद्यांना आणि संस्थावादी अर्थवेत्त्यांना त्यामध्ये अर्थातच स्थान नव्हते. तथापि मीन्ससारख्या अभ्यासकांनी मात्र ठामपणे प्रतिपादन केले की पारंपरिक अर्थशास्त्र विसाव्या शतकाच्या अमेरिकी अर्थव्यवस्थेला लागू पडत नाही. त्यांच्या मते वास्तवातील स्थिती लक्षात घेता उत्पादनसंस्थेची मालकी आणि त्या संस्थेचे व्यवस्थापन हे एक मानण्यापेक्षा मालकी, नियंत्रण आणि व्यवस्थापन या तीन बाबी विभिन्न आहेत असे मानणे संयुक्तिक ठरते. मालक हेच व्यवस्थापक असे म्हणण्यापेक्षा उत्पादनसंस्थेचे मालकीहक्क, नियंत्रण-अधिकार आणि व्यवस्थापनाचे कार्य यांच्यातील फरक लक्षात घेऊन त्यानुसार त्या तीन संकल्पना वापरल्या पाहिजे. कंपनीच्या व्यवहारांच्या बाबतीत दिशा दर्शविण्याचा आणि कंपनीच्या नफ्याची वाटपनिश्चिती करण्याचा अधिकार म्हणजे कंपनीचे नियंत्रण होय. कंपनीचे कायेशीर नियंत्रण संचालक मंडळाकडे आणि (वरिष्ठ) व्यवस्थापकांकडे असल्याने ज्या अनेक व्यक्तींकडे किंवा गटांकडे संचालक निवडण्याचा अधिकार असतो अशा अनेक व्यक्ती नियंत्रक ठरतात; नियंत्रण अशा व्यक्तींच्या ठिकाणी स्थित असते.

व्यष्टीय आर्थिक विश्लेषणाच्या दृष्टीने असे तिहेरी वर्गीकरण उपयुक्त ठरते. मालकी हक्क व नियंत्रण यामध्ये अशा रीतीने फरक करण्यामुळे खाजगी मालमत्तेच्या संकल्पनेचे अक्रिय व सक्रिय असे दोन भाग करता येतात. भाग (शेअर्स) व रोखे हे कंपनीच्या संपत्तीवरील हक्क दर्शवितात; त्यावरुन उत्पन्न-प्रवाहाची कल्पना येते. कंपनीची मूर्त मालमत्ता आणि ख्यातिमूल्य या गोष्टी त्यापेक्षा वेगळ्या. अशा रीतीने नवअभिमत विश्लेषणातील पारंपरिक संपत्ती-संकल्पना बदललेली असून त्याचे घटक कसे वेगवेगळे ठरतात, हे दिसते.

वरील प्रकारच्या विभक्तीकरणातून सैद्धान्तिकदृष्टया अत्यंत महत्त्वाच्या बाबी सूचित होतात, असे मीन्सने प्रतिपादन केले. पारंपरिक विश्लेषणातील बचत-गुंतवणूक प्रक्रियेत दोन स्वतंत्र शक्ती दडलेल्या असून त्यांचे नियंत्रण दोन वेगवेगळया गटांच्या हाती राहाते. बचत-गुंतवणूक प्रक्रियेच्या विभक्तीकरणामुळे विभिन्न भांडवल-बाजार स्पष्ट होतात आणि ते कसे वेगळे राहू शकतात हेही समजते. त्या दोन बाजारातील कल एकमेकांशी जुळणारे असतातच असे नाही. त्यांच्यात अनुरुपता बहुधा अभावानेच आढळते. पारंपरिक आर्थिक विश्लेषणात आर्थिक व्यवहारांची सुरळीत यंत्रणा चित्रित केली जाते. प्रत्यक्षात तसा सुसंवादी समन्वय का आढळत नाही याचे स्पष्टीकरण देण्याच्या दृष्टीने वरील विभक्तीकरण निश्चितच महत्त्वाचे ठरते.

व्याज आणि मजुरी इत्यादी खर्च वजा जाता उर्वरित नफा म्हणजे जोखीम पत्करण्याबद्दल आणि नफ्याचे कमालीकरण करण्याच्या दृष्टीने कंपनीचे संचालन करण्याबद्दलचा मोबदला होय. ही नवअभिमत विश्लेषणातील मांडणी न स्वीकारता धोका

पत्करण्याचे कार्य आणि कंपनीच्या व्यवस्थापनाचे व संचालनाचे कार्य या मधील फरकावर मीन्सने भर दिला. त्यांच्या मते मालकांना त्यांनी पत्करलेल्या धोक्याचा मोबदला द्यावा आणि वाढाव्यातील उर्वरित भाग कंपनीच्या कार्यक्षम व्यवस्थापनाबद्दल आणि संचालनाबद्दल मोबदला म्हणून दिला जावा. अशा रीतीने मालकी आणि नियंत्रण यातील भेद वाढाव्याच्या वाटपाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा ठरतो. या संदर्भात मीन्सने केलेल्या विश्लेषणाचा निष्कर्ष असा की, त्या अर्थव्यवस्थेत मोठ्या कंपन्यांचे प्राबल्य असते आणि मालकी हक्क व नियंत्रण यांचे विभक्तीकरण आढळते. अशा अर्थव्यवस्थेत नफ्याची प्रेरणा ही आर्थिक व्यवहारांची दिशा निर्धारित करणारी प्रभावी प्रेरणा असते किंवा सामाजिकदृष्ट्या लाभदायक ठरणारी असते, असे निश्चितपणे सांगता येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे आधुनिक काळातील मोठ्या कंपन्यांच्या वाढीमुळे आर्थिक व्यवहारांचे नियमन करणाऱ्या स्पर्धेची परिणामकारकता घटत जाते; वाढत्या उत्पन्नाबरोबर व्यवस्थापकीय प्रेरणा कमी होत जाण्याची शक्यता असल्यामुळे व्यवस्थापनात आणि सामाजिक कल्याणात विशेष सुधारणा होत राहीलच, अशी खात्री देता येत नाही.

**4. कंपनीचा आकार आणि प्रभाव :**

नवअभिमत व्यष्टीय विश्लेषणातील अनेक संकल्पनांची प्रस्तुतता कशी कमी झालेली आहे, हे केन्सोत्तर मूल्य निर्धारण विश्लेषणात दाखवून देण्यात आलेले आहे. त्यादृष्टीने मीन्सचे सांख्यिकी संशोधन महत्त्वाचे ठरते. आधुनिक कंपनीचा आकार आणि आर्थिक वर्चस्व याविषयीच्या त्याच्या संशोधनाने नवअभिमत अर्थशास्त्रातील संकल्पनांच्या पर्याप्तते विषयी शंका उपस्थित केल्या आहेत. विसाव्या शतकात (अमेरिकेसारख्या अर्थव्यवस्थेत) मोठ्या आकाराची कंपनी हीच प्रातिनिधिक उत्पादनसंस्था ठरत असल्याने मार्शलप्रणीत 'प्रातिनिधिक उत्पादनसंस्था' हल्लीच्या आर्थिक विश्लेषणाच्या दृष्टीने अप्रस्तुत ठरते. शेकडो किंवा हजारो मालक व कामगार ज्यामध्ये असतात आणि कित्येक उद्योगांवर ज्या कंपनीचे वर्चस्व असते अशी कंपनी मक्तेदार नसूनही बाजारातील किंमतीवर परिणाम घडवून आणू शकते. उत्पादनसंस्थेचा आकार, मालकीहक्क व व्यवस्थापन यांच्यातील संबंध इत्यादी दृष्टींनी हल्लीच्या काळातील कंपनी बरीच वेगळी ठरते. व्यक्तिगत मालकीची संपत्ती अल्प असली तरी केवळ त्यामुळे आधुनिक काळातील कंपनीच्या आकारावर मर्यादा येत नाही. तंत्रशास्त्रीय घटकांवर देखील आकार अवलंबून असतोच असे नाही. कंपनीच्या व्यवहारांचा, उलाढालीचा कारभार पाहण्याच्या (यशस्वी प्रबंध करण्याच्या)कुवतीवर कंपनीचा आकार अवलंबून राहातो. कंपनीच्या यशस्वी व्यवस्थापनासाठी आवश्यक ती प्रशासकीय यंत्रणा, कंपनीचे नियंत्रक उपलब्ध करुन देऊ शकतात. त्यानुसार कंपनीचा आकार निश्चित होतो. या दृष्टीने विचार करता नवअभिमत अर्थशास्त्रातील पर्याप्त उत्पादनसंस्था ही संकल्पना आधुनिक काळातील कंपनी संघटन प्रकाराच्या अभ्यासाच्या संदर्भात अप्रस्तुत ठरते.

नवअभिमत विश्लेषणात बाजारपेठेतील मागणी पुरवठ्याच्या शक्तींनुसार आर्थिक व्यवहारांचा समन्वय केला जातो. तथापि अलिकडील काळात प्रशासनाचे व समन्वयाचे हे कार्य व्यवस्थापकीय मंडळाकडून केले जाते. याचा अर्थ असा होतो की उत्पादन-व्यवहार केवळ बाजारावर अवलंबून न राहता मोठ्या कंपन्यांनी हे व्यवहार आपल्या अधीन ठेवले आहेत; उत्पादन-व्यवहाराचे अंतर्गतीकरण करण्यात आलेले आहे. या कंपन्या, उत्पादन-व्यवहार आपल्या प्रशासकीय समन्वय यंत्रणेच्या अधीन ठेवून, समन्वय राखण्यासाठी स्वत:च्या वतीने बाजारपेठांमध्येही प्रवेश करतात.[11]

मोठ्या कंपन्या अस्तित्वात येऊ लागल्यामुळे

नवअभिमत मूल्यसिद्धान्ताच्या ग्राह्यतेविषयी शंका घेतली जाऊ लागली. त्या प्रकारच्या मूल्यनिश्चिती-विश्लेषणाची सप्रमाणता अमान्य करताना मीन्सने असा युक्तीवाद मांडला की मोठ्या कंपन्यांचे अस्तित्वहेच अर्थव्यवस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते तेव्हा परिव्ययाची निश्चिती आणि किंमत निश्चितीच्या संदर्भातील मागणी-पुरवठ्याच्या तत्त्वाला आधार मिळणे अशक्य होते, पारंपरिक मूल्यसिद्धान्ताचे आधारतत्त्वच नव्या परिस्थितीत गैरलागू व अप्रस्तुत ठरते. बदललेल्या परिस्थितीच्या संदर्भात मांडलेल्या प्रशासित किंमतीच्या संकल्पनेमुळे किंमतनिश्चितीच्या मागणी-पुरवठा तत्त्वाला पुष्टी मिळेनाशी होते.

मार्शलच्या[12] मते उद्योजक दोन निरनिराळी कार्ये करीत असतो. त्यापैकी एक म्हणजे धोका पत्करण्याचे कार्य; याचे स्वरुप परिकल्पना किंवा सट्ट्याच्या व्यवहारासारखे असते. वस्तूंच्या खरेदी-विक्रीशी हे कार्य निगडीत असते. दुसरे कार्य म्हणजे उत्पादनप्रक्रियेचे संघटन आणि उत्पादनावर देखरेख.हे दुसरे कार्य अभियांत्रिकी व प्रशासकीय कार्यासारखे असते. आधुनिक काळातील मोठ्या कंपन्यांचे प्राथमिक आर्थिक व्यवहार प्रशासकीय स्वरुपाचे असतात. संस्थान्तर्गतदृष्ट्या विचार करता कंपनी आपल्या उत्पादनकार्याचा प्रबंध करीत असते. बाह्यत: कंपनी आपल्या वस्तूंच्या किमतींची बाजारपेठेत अंमलबजावणी करीत असते. यावरुन असे म्हणता येईल की, ज्या अर्थव्यवस्थेत मोठ्या कंपन्यांचे वर्चस्व असते अशा अर्थव्यवस्थेत बाजाराचे स्वरुप नवअभिमत विश्लेषणात मानले जाते त्याप्रमाणे नसून बाजारपेठ प्रशासित स्वरुपाची राहाते. अनियंत्रित मागणी-नगसंख्या या क्वचितच कधी तुल्यबल किंवा समतोलावस्थेत आढळतात. अशा किमती अल्पकाळापुरत्या राहातील किंवा दीर्घकाळातही राहातील असे निश्चित सांगता येत नाही. त्या दृष्टीने पाहाता प्रशासित किंमत बाजारांचे विश्लेषण करताना पारंपरिक विश्लेषणासाठी वापरली जाणारी साधने उपयुक्त ठरत नाहीत. नवअभिमत आर्थिक विश्लेषणाची चौकट येथे वापरता येत नाही.

**5.प्रशासित किंमत :**

प्रशासित किंमतीचे स्वरुप लक्षात घेता त्यातील बदलाच्या बाबतीत सातत्याचा अभाव का असतो हे समजते; हे किंमतबदल काहीसे स्वेच्छाधीन स्वरुपाचे राहातात. विक्रीनग संख्येतील बदल किंवा वस्तुसाठ्यासाठी बदल इत्यादी घटकांचा प्रशासित किंमतीवर परिणाम घडून येतोच असे नाही. ज्या बाजारातील किंमती प्रशासित स्वरुपाच्या असतात अशा बाजारांमध्ये वस्तूकरिता मागणीत बदल घडून आल्यास त्याचा परिणाम म्हणून श्रम व भांडवल या घटकांच्या सेवायोजनांत बदल घडून येतात. याचे एक कारण असे की त्या घटकाच्या किमती म्हणजेच मजुरी दर व व्याजदर हे देखील प्रशासित स्वरुपाचे असतात. ज्या बाजारातील किमती परिवर्तनशील असतात, अशा बाजारात मागणी-बदल घडून आल्यास त्या बदलाचा किमतीवर तत्काळ परिणाम घडून येतो; पण उत्पादनपातळी सर्वसाधारणपणे बदलत नाही. उत्पादन घटकांची रोजगार पातळी देखील सामान्यत: स्थिर राहाते. म्हणूनच आर्थिक महामंदीच्या काळात शेतकी क्षेत्रात उत्पादन, रोजगार सापेक्षतेने स्थिर राहून शेतमालाच्या किमती मात्र घटल्या; पण औद्योगिक आणि अभियांत्रिकी क्षेत्राच्या बाबतीत उत्पादन, रोजगार कमी होऊन किमतीत मात्र तेवढे बदल झाले नाहीत.

काळाच्या ओघात उत्पादनसंस्थेचा आकार वाढू शकतो. विशिष्ट वस्तूचे उत्पादन करणाऱ्या उत्पादनसंस्थेचा उर्ध्वस्तर संयोग घडून येऊलागतो व त्या वस्तूंची उत्पादनप्रक्रिया अन्य वस्तूंच्या उत्पादनाशी अधिकांशाने निगडीत होऊ लागते. अशा रीतीने वस्तूचे उत्पादन परस्परासंबंधित होत असते. विशिष्ट आदानाचा वापर अधिक वस्तूंच्या

उत्पादनासाठी केला जातो. अमेरिकेसारख्या अर्थव्यवस्थांमध्ये मोठ्या कंपन्यांच्या उदयाबरोबर उत्पादनप्रक्रियेची गुंतागुंत वाढू लागली. याचा एक परिणाम असा की एखाद्या विशिष्ट वस्तूच्या उत्पादनासाठी खर्च नेमका किती करावा लागतो हे निश्चितपणे सांगणे कठीण होऊ लागते. मोठ्या कंपन्या ऊर्ध्व संयोगाचा बऱ्याच प्रमाणात अवलंब करतात; अशा परिस्थितीत त्यांच्या मार्फत उत्पादन केल्या जाणाऱ्या कोणत्याही एखाद्या वस्तूचा खर्च दोन किंवा अधिक आदानांवर अवलंबून राहातो. त्यामुळे वस्तूचा उत्पादन परिव्यय नेमकेपणाने ठरविण्याच्या बाबतीत गोंधळाची परिस्थिती उद्भवते. नवअभिमत परिव्यय तत्त्वाच्या दृष्टीने पाहाता आधुनिक कंपन्यांकडून उत्पादन केल्या जाणाऱ्या वस्तूंचा उत्पादन परिव्यय अनिश्चित राहतो. त्यामुळे प्रशासित किंमतबाजारांचे विश्लेषण करण्यासाठी नवअभिमत परिव्यय तत्त्व, उत्पादनसंस्थेचा पुरवठावक्र, बाजाराचा पुरवठावक्र इत्यादींचा अवलंब करता येणे शक्य नसते.

### 6.पूर्ण परिव्यय किंमत :

हॉल् आणि हिच् यांनी प्रत्यक्षातील उत्पादनखर्च, किंमत इत्यादीविषयी उद्योजकांकडून जी आधारसामग्री मिळविली त्या माहितीच्या आधारे पूर्ण परिव्यय किंमत निर्धारण तत्त्वाची मांडणी केली. हॉल्-हिच् यांनी किंमत-निर्धारण विषयक सीमान्तवादी तत्त्वांचा गाभा विशद केला आहे. उद्योजक वस्तूची किंमत कशी ठरवितात याविषयीचे सीमान्तवादी तत्त्व दोन गोष्टींवर अवलंबून राहाते. 1) उद्योजकांनी वस्तूकरिता मागणीच्या लवचिकतेचा अंदाज घेतला पाहिजे, तसेच मागणीवक्राच्या स्थितीविषयी अंदाज व्यक्त केला पाहिजे. 2) सीमान्त प्राप्ती आणि सीमान्त खर्च समान ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण प्रत्यक्षातील आधारसामग्री लक्षात घेता वस्तुची किंमती निश्चित करण्यासाठी उद्योजक सीमान्त प्राप्ती आणि सीमान्त खर्च, मागणीची लवचिकता हे घटक विचारात घेत नसल्याचे दिसते. वस्तूची किंमती ठरविताना उद्योजक वेगळयाच घटकांवर भर देतात. त्यातून सूचित होणाऱ्या तत्त्वांचा निर्देश हॉल्-हिच् यांनी 'पूर्ण परिव्यय किंमत-निर्धारण तत्त्व' असा केलेला आहे. बहुसंख्य कंपन्या याच तत्त्वाचा अवलंब करीत असल्याचे दिसून आले. कंपनीचा आकार आणि स्थिती कशीही असली तरी किंमतनिश्चितीचे हेच तत्त्व अनुसरले गेल्याचे हॉल्-हिच् यांना आढळून आले. त्यामुळे नवअभिमत अर्थशास्त्रातील सीमान्तवादी साधने वापरात राहू शकली नाहीत. किंमतनिश्चितीच्या प्रस्तुत तत्त्वानुसार दीर्घकालीन विश्लेषण अल्पकालखंडाला देखील लागू पडत असल्याने पूर्ण परिव्यय किंमत केवळ अल्पकालीन किंमत किंवा निव्वळ दीर्घकालीन किंमत नव्हे; ही किंमत काहीशी मिश्र स्वरुपाची असते. बदलणाऱ्या परिस्थितीचा प्रत्यक्षात दिसणारा परिणाम असे त्याचे स्वरुप असते.

उद्योजक किंमत-स्थैर्य कसे स्पष्ट करतात हे हॉल्-हिच् यांनी दाखवून दिले; विकुंचित मागणीवक्र ही संकल्पना कशी महत्त्वाची ठरते हे त्यांनी विशद केले. सीमान्तवादाचे तर्कशास्त्र आणि पूर्ण परिव्यय किंमतनिर्धारण व किंमत-स्थैर्य याविषयीचा अनुभवाश्रित पुरावा या दोहोंचा मेळ घालण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेले प्रतिपादन महत्त्वाचे योगदान ठरते.

सैद्धान्तिक संकल्पना या दृष्टीने पूर्ण परिव्यय किंमत ही सीमान्तवादी किंमतीपेक्षा वेगळी ठरते. पूर्ण परिव्यय किंमतीच्या बाबतीत बाजार-निरसन गुणधर्म अभावानेच आढळतो; अशी किमत वस्तूच्या उत्पादनापूर्वीच निश्चित केली जाते. कोणत्याही विशिष्ट व्यवहारात अनुस्यूत असलेल्या नगसंख्येचा त्या किमतीवर परिणाम होत नसल्याने अशा व्यवहाराशी निगडीत असणाऱ्या प्रत्यक्षातील सरासरी एकूण खर्चाशी पूर्ण परिव्यय किंमतीचा संबंध राहात नाही. सीमान्तवादी विश्लेषणात आढळणारे किंमत, उत्पादनखर्च उत्पादनपातळी यांच्यातील संबंध पूर्ण

परिव्यय किंमत निर्धारण विश्लेषण का अंतर्भूत नसतात, हे त्यावरुन स्पष्ट होते. म्हणूनच याबाबतीत पूर्ण परिव्यय किंमत संकल्पनात्मक दृष्ट्या सीमान्तवादी किंमतीपेक्षा भिन्न ठरते. उत्पादनपातळी, उत्पादनखर्च आणि किंमत यांच्यातील संबंधाच्या अभावामुळे पूर्ण परिव्यय किंमतीच्या बाबतीत स्थैर्य हा गुणधर्म दिसून येतो.

समजा, एखाद्या विक्रेत्याने किंमत कमी केली. परिणामत: (विक्रेत्यांमध्ये किंमतस्पर्धा गृहीत धरल्यास) अन्य विक्रेत्यांना त्यांच्या किमती कमी करणे भाग पडेल. हॉल्-हिच् यांच्या मते विक्रेत्यांमधे (उत्पादकांमध्ये) तशी किंमतस्पर्धा नसेल तर हा परिणाम संभवत नाही. विक्रेत्यांमधील किंमतस्पर्धा कमी करणारा (संरोध) घटक किंमती (पूर्ण परिव्यय किंमती) स्थिर का राहातात याचे स्पष्टीकरण देतो. हॉल्-हिच् यांच्यामते हा संरोध-घटक म्हणजे उद्योजक किंमत-कपातीचे अनुकरण करु शकतात, पण किंमत-वाढीकडे कानाडोळा करतात. वस्तूची किंमत विशिष्ट पातळीवर ठेवण्यामुळे नफ्याचे कमालीकरण होते किंवा नाही याहीपेक्षा, उद्योजकांना आपला टिकाव लागणे आणि उत्पादनसंस्थेची वाढ होत राहाणे महत्त्वाचे असते. दुसरे असे की वस्तूची विक्रीनगसंख्या या वस्तूच्या किंमतीतील बदलानुसार बदलतेच असे नाही.

सीमान्तवादी तत्त्वानुसार उत्पादनपातळी (विक्रीनगसंख्या) बदलली तर किंमतीत बदल संभवतो आणि अशा रीतीने त्या विश्लेषणात अल्पकालीन किंमत व दीर्घकालीन किंमत किंवा बदलत्या उत्पादन पातळीची वैशिष्ट्ये ओघानेच येतात; तथापि पूर्ण परिव्यय किमत निर्धारण विश्लेषणात तशी वैशिष्ट्ये नाहीत. अशा विश्लेषणात कमी-अधिक नगसंख्येच्या व्यवहारांच्या बाबतीत सारखीच किमत राहाते. एखाद्या संयंत्राच्या संदर्भात यथाक्रम अनुसरल्या जाणाऱ्या निरनिराळ्या (उत्पादन, विक्री) नगसंख्या-व्यवहारांच्या बाबतीत एकच किंमत आकारली जाते. संयंत्राचे सर्व दृष्टीने पुनर्संघटन अतर्क्य असते, असे नव्हे; पण पूर्ण परिव्य किमती तशा अमर्यादित पुनर्संघटनावर आधारित दीर्घकालीन किंमतीसारख्या नसतात. सीमान्तवादी विश्लेषणातील अल्पकालखंड, दीर्घकालखंड, असे कालखंडाचे वर्गीकरण आणि नफ्याचे कमालीकरण करण्याची किंमतनिश्चिती इत्यादी वैशिष्ट्ये प्रस्तुत विश्लेषणाच्या बाबतीत आढळत नाहीत. हॉल्-हिच् यांच्या विश्लेषणाचा रोख लक्षात घेता सीमान्तवादी विश्लेषण वास्तवापासून किती दूर जाणारे आहे आणि वास्तवातील बाजारांना लागू पडणारे नवे विश्लेषण कसे सरस ठरते, हे समजते.

### 7. उत्पादनसंस्थेची उद्दिष्टे :

सीमान्तवादी विश्लेषणावरील टीकेच्या पार्श्वभूमीवर फिलीप अँन्ड्रयूस याने स्पर्धात्मक अल्पजनाधिकार तत्त्वाची मांडणी केली. कारखानदारी-व्यवसायविषयक तत्त्वाच्या मांडणीतून त्याने औद्योगिक बाजारांचे तत्त्व मांडले. त्या विश्लेषणाची व्याप्ती वाढवून त्याने बाजारांचे सर्वसाधारण तत्त्व - स्पर्धात्मक अल्पजनाधिकार तत्त्व - विशद केले. त्यामध्ये प्रसामान्य परिव्यय किमतनिर्धारण तत्त्व अंतर्भूत आहे.[13] त्याने केलेल्या विश्लेषणात उत्पादनसंस्थेची दोन उद्दिष्टे उल्लेखिलेली आहेत-तग धरुन राहाणे आणि उत्पादनसंस्थेची वृद्धी घडवून आणणे- ही ती दोन उद्दिष्टे होत. त्या उत्पादनसंस्थेच्या अल्पकालीन विक्रीनगसंख्येवर कोणताही परिव्यय (खर्च) संरोध नाही किंवा दीर्घकाळात उत्पादनाचे प्रमाण विस्तारण्याच्या बाबतीत कोणत्याही परिव्यय संरोधाला तोंड द्यावे लागत नाही. तथापि, असे अंतर्गत संरोध नसणे म्हणजे त्या उत्पादनसंस्थेच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे संरोध नाहीत असे नव्हे; प्रत्यक्षात काही अन्य प्रकारचे संरोध-उदाहरणार्थ, पर्यावरणात्मक संरोध-असू शकतात.

कारखानदारी व्यवसायासंबंधीचा अँन्ड्रयूसचा

दृष्टिकोन स्पष्ट करण्यासाठी उत्पादनसंस्थेची सरासरी परिव्यय संरचना अभ्यासणे जरुरीचे ठरते. त्याचप्रमाणे त्या उत्पानसंस्थेच्या किंमतविषयक धोरणावर परिणाम घडवून आणणारे पर्यावरणात्मक संरोध लक्षात घ्यावे लागतात. उत्पादनसंस्थेचा एकूण सरासरी खर्च म्हणजे सरासरी प्रत्यक्ष खर्च आणि सरासरी अप्रत्यक्ष खर्च या दोहोंची बेरीज होय. उत्पादनसंस्थेच्या उत्पादनाचा (प्रवाह) दर वाढत राहून तो जसजसा पूर्ण क्षमतेप्रत जाऊ लागतो, तसतसा त्या उत्पादनसंस्थेचा सरासरी एकूण खर्च घटत जातो. उत्पादनातील कायम स्वरुपाच्या वाढीबरोबर व्यवस्थापकीय खर्च देखील घटतो. उत्पादनाच्या प्रमाणातील वाढीला अनुरुप अशी व्यवस्थापकीय तंत्रे जोपर्यंत उपलब्ध होतात तोपर्यंत वाढत्या प्रमाणावरील उत्पादनाबरोबर सर्वसाधारण सरासरी व्यवस्थापकीय खर्चही घटत जातो. अशा रीतीने पूर्वनियोजित वाढत्या उत्पादनानुसार प्रत्यक्षातील उत्पादन वाढत असताना त्या उत्पादनसंस्थेचा सर्वसाधारण सरासरी एकूण खर्च घटत जातो.

ॲन्ड्र्यूसच्या परिव्यय विश्लेषणाचा एक निष्कर्ष असा की उत्पादनाचे संघटन व संरचना आणि परिव्यय संरचना या घटकांमुळे उत्पादनसंस्थेच्या वृद्धिक्षमतेवर निर्बंध येत नाहीत. दुसरे अनुमान असे की संयंत्र व यंत्रसामग्री दिलेली (स्थिर) असो किंवा त्यात बदल केले जात असोत-या दोन्ही परिस्थितीत उत्पादनसंस्थेचा सर्वसाधारण सरासरी एकूण खर्चवक्र बदलत नाही. उत्पादनसंस्थेचा दीर्घकालीन सर्वसाधारण सरासरी एकूण खर्चवक्र म्हणजे अल्पकालीन सर्वसाधारण सरासरी एकूण खर्च वक्रावरील बिंदु-मालिका (श्रेणी) होय. नवअभिमत विश्लेषणात अल्पकालीन सर्वसाधारण सरासरी एकूण खर्चवक्र दीर्घकालीन खर्चवक्राच्या वरच्या बाजूस असतो. पण प्रत्यक्षातील उत्पादन (प्रवाह) दर सर्वसाधारण उत्पादन प्रवाहापेक्षा अधिक असताना अल्पकालीन खर्चवक्र दीर्घकालीन खर्चवक्राच्या खालच्या बाजूकडे असतो.

उत्पादनसंस्थेच्या दृष्टीने पाहाता संबंधित उद्योग आणि बाजारपेठ या दोन घटकांमुळे निर्माण होणाऱ्या वातावरणात उत्पादन संस्थेला आपला व्यवसाय करावा लागतो. संबंधित उत्पादनसंस्थेच्या तग धरुन राहाण्याच्या कुवतीवर व वृद्धिक्षमतेवर त्या दोन घटकांमुळे निर्बंध येत असतात.

अशा परिस्थितीत नफ्याचे कमालीकरण हा उद्देश नसला तरी आपले अस्तित्व टिकून राहाण्यासाठी विशिष्ट किमत निश्चित करणे उत्पादनसंस्थेच्या दृष्टीने गरजेचे असते. आपल्या वस्तूची विशिष्ट किंमत कार्यवाहीत आणताना त्यायोगे उत्पानसंस्थेची वृद्धी सुनिश्चित करणे आवश्यक ठरते. तथापि जी किंमत प्रशासित किंमत म्हणून कार्यवाहीत आणावयाची ती किंमत नेमकी किती ठेवावयाची याबाबत निर्णय करताना उत्पादकांपुढे फारसे पर्याय उपलब्ध नसतात. याचे एक कारण म्हणजे औद्योगिक क्षेत्रातील अल्पजनाधिकारी परिस्थिती. वस्तूच्या किमतीत बदल करुन त्याद्वारे बाजारपेठेतील ग्राहक अन्य विक्रेत्यांकडून आपल्याकडे खेचून घेता येत नाहीत; वस्तूची विक्रीनगसंख्या किमत-बदलांना अपेक्षित प्रतिसाद देतेच असे नाही; विक्री नगसंख्या केवळ किमतीवर अवलंबून नसते. त्यामुळे आपल्या प्रतिस्पर्ध्याने ठेवलेल्या किमतीशी जुळणारी किंमत कार्यवाहीत आणली जाते.

### ८. प्रसामान्य परिव्यय किंमतनिर्धारण तत्त्व :

कारखानदारी उत्पादनसंस्थांकडून अवलंबिली जाणारी किंमतनिश्चितीची पद्धती विशद करण्यासाठी ॲन्ड्र्यूसने प्रसामान्य परिव्यय किंमतनिर्धारण तत्त्व प्रयोज्य मानले. ज्या प्रक्रिया अवलंबिल्याने स्थिर किंमतीत परिणती होते त्या पद्धती स्पष्ट करण्यासाठी त्याने प्रस्तुत तत्त्व विकसित केले. या संदर्भात त्याने केलेल्या अभ्यासावरुन हॉल्-हिच् यांच्याच भूमिकेला दुजोरा मिळत असल्याचे दिसून आले. उत्पादनसंस्था विशिष्ट उत्पादनपातळी गाठण्याच्या दृष्टीने कराव्या

लागणाऱ्या सरासरी एकूण खर्चात काही टक्के नफ्याची पूर्वनियोजित रक्कम मिळवून त्यानुसार किमती ठरवितात. हॉल्-हिच् यांच्याच सिद्धान्ताला अँन्ड्र्यूसने पुष्टी दिली असली तरी त्याने त्याच्या तत्त्वांची मांडणी काहीशा वेगळया रीतीने केली. त्याने केलेल्या विश्लेषणाचा निष्कर्ष असा की आपली उत्पादनसंस्था तग धरून राहावी किंवा चालू व्यवसायसंस्था म्हणून व्यवहार करीत राहावी यासाठी केवळ एकजिनसी वस्तूंच्या बाबतीत स्पर्धकांनी निश्चित केलेल्या किमतीइतक्याच किमती निश्चित करण्याचे धोरण अवलंबिले जाते. पण उत्पादनाच्या प्रवाह-दरात होणाऱ्या अल्पकालीन बदलाचा परिणाम म्हणून खर्च व किंमत यामध्ये बदल घडवून आणणे त्या किमतनिश्चितीच्या धोरणात अंतर्भूत नाही.

एकंदरीत अँन्ड्र्यूसने केलेल्या विश्लेषणात उत्पादनसंस्था तग कशी धरु शकेल किंवा ती संस्था कार्यरत ठेवण्याच्या दृष्टीने किमतनिर्धारण प्रक्रिया किंवा किमतनिश्चितीविषयक धोरण ठरविण्यावर भर आहे. किमत स्थैर्य आढळते ते प्रसामान्य-परिव्य-किंमत विषयक धोरणाचा अवलंब करणे जरुरीचे असल्याने, उत्पादन संस्थेत जे तात्पुरते बदल घडून येतात त्या अल्पकालीन बदलांचा प्रसामान्य परिव्यय किमतीशी संबंध जोडला जाणे प्रस्तुत किमतनिर्धारण प्रक्रियेत अभिप्रेत नाही. याचा अर्थ असा होऊशकतो की, प्रसामान्य परिव्यय किमत उत्पादनसंस्थेच्या प्रत्यक्ष परिस्थितीच्या कक्षेबाहेरील घटकांकडून निश्चित केली जाते. पण याउलट, सीमान्तवादी दृष्टिकोनात अभिप्रेत असलेल्या किमतनिर्धारण प्रक्रियेचा अवलंब केल्यास प्रस्तुत विश्लेषणातील उत्पादनसंस्था चालू व्यवसायसंस्था (प्रत्यक्षात उत्पादनाचे कार्य करीत असलेली संस्था) राहाण्याची शक्यता दुरावते.

प्रस्तुत विश्लेषणातील उत्पादनसंस्था ज्या किंमतनिर्धारण प्रक्रियांचा अवलंब करते त्यायोगे नफ्याचे कमालीकरण केले जात नाही, हे उघड आहे. पण किंमतनिर्धारण प्रक्रिया नफ्याचे कमालीकरण करणारी असण्यासाठी उत्पादन संस्थेचा मागणीवक्र माहीत असावा लागतो. अँन्ड्र्यूसने केलेल्या विश्लेषणातील उत्पादनसंस्थेच्या बाबतीत मात्र तसा मागणीवक्र नाही. त्याने समतोल किंमतीची संकल्पना मान्य केली असली तरी समतोल नगसंख्येची संकल्पना मात्र स्वीकारलेली नाही. नवअभिमत अर्थशास्त्रीय विश्लेषणात आढळणाऱ्या नफ्याचे कमालीकरण करणाऱ्या किंमत प्रक्रिया येथे अभिप्रेत नाहीत. प्रसामान्य परिव्यय किंमतनिर्धारण तत्त्व नवअभिमत किंमतनिश्चितीप्रत नेणारे नाही. अँन्ड्र्यूसचे विश्लेषण नफा-कमालीकरणाच्या चौकटीत बसणारे नाही; प्रस्तुत विश्लेषणात नफ्याचा विचार असला तरी तो सीमान्तवादी तत्वाला अभिप्रेत असणाऱ्या प्रतिमानापेक्षा वेगळा ठरतो.

प्रसामान्य परिव्यय किंमतनिर्धारण तत्त्वाच्या विकासाच्या दृष्टीने अँन्ड्र्यूसनंतर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी महत्त्वाचे योगदान केले. या तत्त्वाच्या विकासाचे स्वरुप बरेच बदलत गेले. किंमतनिर्धारण प्रक्रिया आणि किंमतीसंबंधीच्या नवअभिमत विश्लेषणाशी न जुळणाऱ्या सिद्धान्ताच्या सम्यक् मांडणीपेक्षा, त्या संदर्भात समग्र विश्लेषण करण्या'पेक्षा सायलो लॅबिनी, एडवर्डस विल्यम्स आदींनी प्रस्तुत तत्त्वाच्या विशिष्ट पैलूंवर लक्ष केंद्रित केले. उपभोक्त्याचे वर्तन, अनुक्रमानुसारी उत्पादनाची संकल्पना, स्पर्धात्मक प्रक्रिया, सामाजिक नियम व संस्था, बाजारभाव, सर्वसाधारण परिव्यय किमतीतील तफावत (वधघट) इत्यादी घटक लक्षात घेउन त्यांनी लेखन केले आहे.

**9.अधिपरिव्यय (मार्क्‌अप्), किंमत तत्त्व :**

एकोणीसशे तिशीच्या आणि चाळीशीच्या दशकात मिचेल कॅलेकीने मांडलेल्या सैद्धान्तिक युक्तिवादामध्ये 'अधिपरिव्यय किंमत' निश्चितीच्या विश्लेषणाची बीजे आढळतात. त्याच्या मते

उत्पादनसंस्था म्हणजे एकाच संयंत्राच्या साहाय्याने एकजिनसी वस्तूंचे उत्पादन करणारे स्वयंपूर्ण प्रघटक होय. उत्पादनसंस्था आणि किंमती याविषयी विवेचन करताना त्याने चल परिव्यय (प्रत्यक्ष खर्च) आणि स्थिर परिव्यय (अप्रत्यक्ष खर्च) असे वर्गीकरण केले. उत्पादन संस्थेची भांडवली साधनसामग्री स्थिर आहे असे गृहीत धरता स्थापित क्षमतेच्या प्रमाणात केल्या जाणाऱ्या बदलांच्या बाबतीत सरासरी चल परिव्यय (प्रत्यक्ष खर्च) आणि म्हणून सीमान्त खर्च स्थिर राहातो. याउलट एकूण अप्रत्यक्ष खर्च (स्थिर खर्च) मात्र बदलत नसल्याने स्थापित क्षमतेच्या वाढत्या प्रमाणातील वापराबरोबर सरासरी अप्रत्यक्ष खर्च घटत जातो. परिणामतः वाढत्या उत्पादनाबरोबर (स्थापित क्षमतेच्या वाढत्या प्रमाणातील वापराबरोबर) सरासरी एकूण खर्च घटतो. उत्पादनसंस्थेची परिव्यय संरचना आणि मागणीवक्र या गोष्टी दिलेल्या असताना संयोजक, ज्यायोगे सीमान्तखर्च आणि सीमान्तप्राप्ती यांमध्ये समानता प्रस्थापित होईल अशी किंमत निश्चित करतो असे कॅलेकीचे प्रतिपादन आहे.

सीमान्तवादी किंमत निर्धारण तत्त्व सुरुवातीला उघडपणे अवलंबिले नसले तरी व्यापारचक्रे, वस्तूंवरील करआकारणी इत्यादी विषयांवर सन 1937 मध्ये त्याने जे लेखन केले त्यामध्ये त्या तत्त्वाचा वापर केला. किंमती, उत्पादन, नफा इत्यादीविषयी त्याने केलेल्या विवेचनाचा महत्त्वाचा भाग म्हणून सीमान्तवादी मूल्यनिर्धारण प्रक्रियेचा उल्लेख करावा लागेल. सीमान्तवादी किंमतनिश्चितीचे तत्त्व हा त्या लेखनाचा आधार होता. नंतर मात्र हॉल्-हिच् यांच्या किंमतनिर्धारण प्रक्रियेकडे त्याचे लक्ष वेधले गेले.

वस्तूंची किंमत आणि सरासरी प्रत्यक्ष परिव्यय यातील फरक त्याने 'स्थूल-नफा-अंतर' या संज्ञेने दाखविला. स्थिर परिव्यय आणि नफा हे घटक होत. सरासरी प्रत्यक्ष खर्च दिलेला असताना स्थूल-नफा-अंतर मक्तेदारीच्या प्रमाणावर अवलंबून राहाते. याचाच अर्थ, बाजारातील अपूर्णता, अल्पजनाधिकाराचा अंश या घटकांवर स्थूल-नफा-अंतर अवलंबून असते. उत्पादनसंस्थेने आपल्या उत्पन्नातून प्रत्यक्ष विक्रीखर्चासाठी अधिक रक्कम वापरली, अशा खर्चाची रक्कम वाढविली तर मक्तेदारीच्या प्रमाणावर आणि स्थूल नफा अंतराचे परिमाण यांवर परिणाम घडून येऊ शकतो. व्यापारचक्राच्या काळात मक्तेदारीचे प्रमाण प्रतिचक्रीय रीतीने बदलते. मंदीच्या काळात मजुरीदर आणि कच्च्या मालाच्या किंमती कमी होत असल्या तरी सरासरी प्रत्यक्ष खर्चात घट होत असताना किंमत-कपात टाळण्याचा प्रयत्न संयोजक करतील. विघातक किंमतयुद्ध टाळण्याचा त्यामागे हेतू असतो. उलटपक्षी तेजीच्या काळातील खर्चवाढ पुढे ढकलता येणे त्यांना शक्य होणार नाही; अशा परिस्थितीत मक्तेदारीचे प्रमाण कमी होईल. त्याच्या मते दीर्घकालखंडात मात्र मक्तेदारीचे प्रमाण वाढण्याची प्रवृत्ती असते. आर्थिक विकासाबरोबर बाजारातील अपूर्णता कमी होत असल्या तरी औद्योगिक संकेंद्रणातील दीर्घकालीन वाढीमुळे अल्पजनाधिकाराचे प्रमाण अधिकांशाने वाढते[14] आणि म्हणूनच मक्तेदारीचे प्रमाण वाढते.

किंमतनिश्चितीविषयक निर्णय तसेच गुंतवणूकविषयक निर्णय महत्त्वाचे ठरतात. संयोजकाकडून केली जाणारी भांडवलवस्तूंची (म्हणजेच उत्पादन-वस्तूंची) खरेदी त्याच्या गुंतवणूक विषयक निर्णयावर अवलंबून राहाते. गुंतवणूक विषयक निर्णय हे नफ्याच्या अपेक्षित दरावर अवलंबून असतात, तसेच कोणत्याही वेळी उत्पादन संस्थेने जी एकूण गुंतवणूक केलेली असते तीही नफ्याच्या अपेक्षित दरावर आधारित असते. कॅलेकीच्या मते नफ्याचा अपेक्षित दर राष्ट्रीय उत्पन्न आणि भांडवलीसाठा या घटकांवर अवलंबून असतो. मागील काळातील गुंतवणूक विषयक निर्णयांमुळे चालू काळातील राष्ट्रीय उत्पन्न उच्च पातळीवर असले तर नफ्याच्या

दराविषयीच्या अपेक्षा उंचावतात आणि अशा रीतीने किफायतशीर ठरणाऱ्या गुंतवणूक प्रकल्पांची संख्या वाढते. याउलट, राष्ट्रीय उत्पन्न सापेक्षतेने स्थिर असताना भांडवलसाठा वाढल्यास स्थापित क्षमतेच्या वापराचे प्रमाण घटते; परिणामत: भावी काळातील नफ्याच्या दराविषयीच्या संयोजकाच्या अपेक्षा खालावतात आणि संयोजकांच्या दृष्टिने किफायतशीर ठरु शकणाऱ्या गुंतवणूक-प्रकल्पाची संख्याही कमी होऊ लागते.[15]

### 10. व्यष्टीय विश्लेषण आणि समष्टीय विश्लेषण यांचे परस्परावलंबी स्वरूप :

केन्सोत्तर अर्थशास्त्र काळाच्या ओघात विस्तारणाऱ्या अर्थव्यवस्थेचे विश्लेषण करणारे आहे. असे चित्रीकरण करताना बदलाच्या दराबरोबरच बदलाचा आधार-पूर्वेतिहास आणि भावी काळाबद्दलच्या अपेक्षा यांचा चालू काळातील निर्णयांवरील परिणाम लक्षात घ्यावा लागतो. भूतकाळातील घडामोडी आणि भविष्यकाळाबद्दलच्या अपेक्षा यांचा प्रभाव गुंतवणूक व बचत या चलांच्या बाबतीतील बदलांमार्फत जाणवतो. या चलांच्या वर्तनामध्ये तो परिणाम प्रतिबिंबित होत असतो. म्हणूनच गुंतवणूक व बचत यांच्या भूमिकांचा विचार केवळ समष्टीय आर्थिक विश्लेषणातच नव्हे तर व्यष्टीय विश्लेषणातही केला गेला पाहिजे. केन्सोत्तर विश्लेषणात वृद्धि-गतिकी बद्धमूल असून केन्सोत्तर विश्लेषण नव अभिमत विश्लेषणापेक्षा कसे वेगळे आहे हे या वृद्धि-गतिकीमुळे पुन्हा स्पष्ट होते.

केन्सोत्तर समष्टीय सिद्धान्तातील गतिक घटकावयव सर रॉय हॅरॉड[16] च्या मूलभूत समीकरणात सापडतो. आर्थिक वृद्धितत्त्वाचे विश्लेषण (कालक्रमाने) केन्सनंतर अनेकांनी केले. तथापि, ते सर्वच विश्लेषण केन्सच्या विचारांशी इमान राखणारे मानता येणार नाही, केन्सच्या अर्थशास्त्राशी सुसंगत रीतीने केलेले वृद्धितत्त्वाविषयीचे विश्लेषण म्हणून जोन रॉबिन्सन, कॅल्डार, मिरलीज, पॅसिनेती आदींच्या प्रयत्नांचा उल्लेख करावयास हवा.

उत्पन्न वाटपातील बदलांबरोबर बचतप्रवृत्ती बदलू शकतात. थोडक्यात, सरासरी बचत प्रवृत्ती स्थिर मानता येत नाही. नवअभिमत परंपरेतील आर्थिक वृद्धि प्रतिमान प्रयोज्य व प्रस्तुत ठरावे म्हणून प्रयत्न झाले असले तरी प्रत्यक्षात विषमतोलावस्थेत असणाऱ्या अर्थव्यवस्थेचे विश्लेषण केन्सोत्तर अर्थशास्त्राचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असून केन्सोत्तर पठडीतील अर्थशास्त्रज्ञ अंतिमत: या विश्लेषणात लक्ष घालतात. असमतोलावस्थेच्या प्रश्नाची चिकित्सा करीत असताना दीर्घकालीन विश्लेषण आणि अल्पकालीन विश्लेषण यामध्ये फरक केला जातो. दीर्घकालीन विश्लेषण शक्य-कमाल-वृद्धीदर ठरविणाऱ्या घटकांवर लक्ष केंद्रित करते तर अल्पकालीन विश्लेषण शक्य-कमाल-वृद्धीदराशी तुलना करता आढळणाऱ्या प्रत्यक्ष वृद्धिदराच्या चक्रीय विचलनाचा विचार करते.

बाजाराभिमुख आणि विकसित अर्थव्यवस्थेची वृद्धी ज्या घटकांवर अवलंबून असते ते घटक म्हणजे भांडवली साधनसामग्री, तांत्रिक प्रगतीचा दर, कामगारदल आणि वास्तव मजुरीदर. जोन रॉबिन्सनच्या या प्रतिपादनाला पूर्णत्व आणण्याच्या दृष्टीने जरुर असलेला घटक म्हणजे आर्थिक व्यवहारांच्या स्पष्टीकरणात उत्पन्न वाटपाला असणारे स्थान होय; केन्सोत्तर विश्लेषणाचे एक वैशिष्ट्यच म्हणून याची दखल घेतली पाहिजे.

केन्सोत्तर विश्लेषणात उत्पन्न वाटपाच्या प्रश्नाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. त्यात उत्पन्न-वाटपाचे स्वरुप, प्रचलीत उत्पन्नवाटपाची कारणे व त्याचे परिणाम याविषयीच्या अन्वेषणावर विशेष भर दिलेला दिसतो. आर्थिक प्रक्रियेत उत्पन्न-वाटपाची भूमिका महत्वाची ठरते, हे त्याचे कारण होय. भाववाढातिराविषयीच्या सैद्धान्तिक चर्चेत अर्थव्यवस्थेतील निरनिराळ्या गटांचे उत्पन्न-हिस्से

किती आहेत, यावर लक्ष केंद्रित केले जाते. उत्पन्नवाटपाविषयीचे मुद्दे विशेषत: आर्थिक वृद्धिविषयक सिद्धान्तांच्या संदर्भात ठळकपणे चर्चिले जातात.

उत्पन्न-वाटप हा चल घटक राजकीय विचारांच्या आणि पटनीतीच्या अधीन असला तरी आर्थिक वृद्धि दराशीही तो संलग्न राहातो. या संदर्भातील केन्सोत्तर प्रतिमानाची मांडणी असे दाखविते की गुंतवणूक-दरावरील नियंत्रण हे उत्पन्न वाटपावरील आणि नफ्याच्या दरावरील नियंत्रण ध्वनित करते.[17]

या प्रतिमानाच्या साध्या मांडणीत राष्ट्रीय उत्पन्न हे मजुरी-उत्पन्न व एकूण नफा या दोन घटकांचे असते असे कॅल्डॉरने प्रतिपादन केले.

उत्पादनतंत्र आणि पैशातील मजुरीदर स्थिर असताना वृद्धिदरातील वाढीतून गुंतवणूक-दरातील वाढ ध्वनित होते आणि म्हणूनच त्यातून उत्पन्न वाटपातील बदल सूचित होतात; नफ्याचे मजुरीशी जे गुणोत्तर असेल त्यात वाढ दर्शविणारे आणि या अर्थाने वेगळे उत्पन्न-वाटप अस्तित्वात येईल. याउलट आर्थिक वृद्धिदर घटल्यास नफ्याचे मजुरीशी गुणोत्तर कमी होईल.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटपातून सूचित होणारे सापेक्ष हिस्से ठरविणारे मूलभूत घटक म्हणजे गुंतवणुकीचे एकूण उत्पादनाशी गुणोत्तर आणि नफ्याच्या रकमेतून उपभोगावर खर्च करण्याची उपभोग-प्रवृत्ती. उत्पन्न वाटपातील बदल आणि उत्पन्न-वाढीतील बदल या दोहोंमध्ये फरक केला पाहिजे.

राष्ट्रीय उत्पन्न-वाटपात कामगारांचा हिस्सा घटत असताना कामगारांना मिळणाऱ्या उत्पन्नाची पातळी वाढू शकते, असे केन्सोत्तर विश्लेषणातून समजू शकते. कामगार बचत करीत असतील आणि त्यातून होणाऱ्या गुंतवणुकीवर त्यांना उत्पन्न मिळू शकत असेल तर त्यांना मजुरीच्या मार्गाने आणि मजुरीव्यतिरिक्त मार्गाने देखील उत्पन्न मिळू लागेल. अशा परिस्थितीत कामगार आणि भांडवलदार यांच्यातील उत्पन्नवाटप हे मजुरी आणि नफा यातील उत्पन्न वाटपासारखेच राहाणार नाही; कारण नफ्यातील काही भाग कामगारांना त्यांच्या बचतीवरील उत्पन्न म्हणून द्यावा लागेल.

तथापि, पॅसिनेती याने असे दाखवून दिले आहे की कामगार (त्यांच्या बचतरुप गुंवतणुक-वित्तपुरवठ्याचा परिणाम म्हणून) नफ्यातील हिश्शाचे हक्कदार ठरत असले तरी त्यामुळे (मजुरी व नफा या दोन घटकांमधील उत्पन्न वाटप लक्षात घेता) फरक पडत नाही. मजुरीचे एकूण उत्पन्नाशी गुणोत्तर हे एकूण उत्पादनातील गुंतवणूकीचा हिस्सा आणि भांडवलदारांची सीमान्त उपभोग प्रवृत्ती या दोन घटकांनीच ठरते. फरक एवढाच की समाजातील एक वर्ग म्हणून कामगार आणि अन्य उत्पन्न गृहीते यांच्यातील वाटपावर परिणाम होईल. कामगारांना दिला जाणारा हिस्सा त्यांच्या सीमान्त बचतप्रवृतीबरोबर वाढेल.[18]

उत्पन्नातील हिश्शांविषयी केन्सोत्तर अर्थवेत्त्यांनी केलेले प्रतिपादन हे सामाजिक वर्गांमधील उत्पन्न-वाटपापेक्षाही संविदाबद्ध उत्पन्न आणि उर्वरित उत्पन्न यातील फरकाविषयींच्या प्रतिपादनासारखे आहे. त्यांनी केलेले विश्लेषण आधुनिक काळातील मोठ्या उत्पादनसंस्थेच्या (कंपनीच्या) संदर्भासहित लक्षात घेता, हा मुद्दा अधिक स्पष्ट होतो.

उत्पन्न वाटपाविषयी केन्सोत्तर युक्तिवाद मोठ्या उत्पादनसंस्थांच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या अर्थव्यवस्थेला बरोबर लागू पडतात हे लक्षात घेऊन या संदर्भातील सैद्धान्तिक मांडणी पद्धतशीर रीतीने विकसित करण्याचे प्रयत्न क्रेगेल[19] आयशनर आदींनी केलेले आहेत.

क्रेगेलने केलेल्या विश्लेषणात भांडवलवर्गाची बचत-प्रवृत्ती या संज्ञेऐवजी निगम क्षेत्राची बचत-प्रवृत्ती ही संज्ञा वापरण्या व्यतिरिक्त कोणतेही मूलगामी बदल नाहीत. त्यामुळे कामगार आणि भांडवलदार या दोन वर्गांमध्ये विभागल्या गेलेल्या अर्थव्यवस्थेच्या बाबतीत लागू पडणारे निष्कर्ष मोठ्या उत्पादन संस्थांच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या अर्थव्यवस्थेला देखील लागू पडतात.

क्रेगेलच्या मते मोठ्या कंपन्या ज्या दराने लाभांश देण्याचा निर्णय करतात त्या दरावर बचत अवलंबून राहाते. लाभांश-दर जितका अधिक तितका अवितरित नफ्याचा दर कमी राहील आणि परिणामत: त्या मार्गाने उत्पन्न मिळविणाऱ्यांची सीमान्त बचत प्रवृत्ती निम्न पातळीवर राहील. आयशनरच्या मते मोठ्या कंपन्यांची बचत त्यांच्या किंमतविषयक धोरणावर अवलंबून राहाते. बचतीचा दर वाढविण्यासाठी मोठ्या कंपन्यांना वस्तूची किंमत ठरविताना खर्च भरुन काढण्याबरोबरच जो पूर्वनिश्चित नफा हिशेबात धरला जातो त्यामध्ये वाढ करावी लागते. अशा रीतीने क्रेगेलने वस्तूची किंमत स्थिर धरुन अवितरित नफ्याच्या दरावर लक्ष केंद्रित केलेले आहे; तर आयशनर याने अवितरित नफ्याचा दर कायम ठेवून वस्तूच्या किंमत निश्चितवर भर दिला आहे.

( या लेखाचा उर्वरित भाग पुढील अंकात )

## संदर्भ सूची


1. Keynes, J.M.(1936) The General Theory of Employment, Interest and Money, London : Macmillan.

2. Klein, Lawrence R. (1947) The Keynesian Revolution, New York : Macmillan.

3. Robinson, Joan (1952), The Rate of Interest and Other Essays, London: Macmillan.

4. Keynes, J.M. (1930)Treatise on Money, New York : Macmillan.

5. Galbraith, J.K. (1978) 'On Post-Keynesian Economics', Journal of Post Keynesian Economics Vol. 1, No.1 Fall 1978, pp. 8-11.

6.Weintraub, Sidney (1959), A general Theory of the Price-level, Output, Income Distribution and Economic Growth. Philadelphia : Chilton.

Weintraub, Sidney (1966), A Keynesian Theory of Employment Growth and Income Distribution, Philadelphia : Chilton.

Weitraub, Sidney (1971),'Keynes and The Monetarists' Canadian Journal of Economics, February.

7. Kregel, J.A. (1973) The reconstruction of political economy : An introduction to Post-Keynesian economics. New York : Wiley, Halsted Press.

8. Eichner, A.S. (1976) The megacorp and oligopoly:Micr oF oundations of macrodynamics, New York : Cambridge University Press.

9. Lee Frederic S (1998) Post Keynesian Price Theory, Cambridge University Press, p.3

10. Lee, F.S. and Samuels, W.J. (1992) Introduction : Gardiner C. Means, 1896-1988,in Lee and Samuels (eds.)

11. Berle, A. A. and Means, G.C. (1967) The Modern Corporation and Private property, (Revised edn.) New York : Harcourt, Brace and World.

12. Marshall, A. (1920) Principles of Economics, p. 293.

13. Lee, F.S. and Earl, P.E. (Editors) (1993) The Economics of Competitive Enterprise, Selected Essays of P.W.S. Andrews : A Collection. Aldershot : Edward Elgar.

14. Sawyer, M.C.(1985) The Economics of Michal Kalecki, London : Macmillan.

15. Feiwel, G.R. (1989) "Towards an integration of imperfect Competition and Macrodyamics : Kalecki, Keynes, Joan Robinson", in G.R. feiwel (ed.) The Economics of Imperfect Competition and Employment: Joan Robinson and Beyond, London : Macmillan.

16. Harrod, R. (1973), Economic Dynamics, London : Macmillan.

17. Pasinetti, L.L. (1974) Growth and Income Distribution, Essays in economic theory. London : Cambridge University Press.

18. Ibid.

19. Kregel, J.A. (1973) The Reconstruction of Political Economy : An Introduction to Post-Keynesian economics, New York : Wiley.


●●●

# ग्रामीण पतपुरवठा संबंधीचा तज्ञ समितीचा अहवाल

● पद्माकर रा. दुभाषी
*निवृत्त भारतीय लोकसेवा अधिकारी आणि*
*भूतपूर्व कुलगुरु, गोवा विद्यापीठ*

ग्रामीण विकासामध्ये कार्यक्षम ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेचे अनन्यसाधारण स्थान आहे. गेल्या पन्नास वर्षात उद्योग व सेवा क्षेत्रात जरी लक्षणीय वाढ झाली, तरी आजही ग्रामीण व कृषी क्षेत्रात, देशातील बहुसंख्य लोक आपला उदरनिर्वाह करीत आहेत. म्हणूनच ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाकडे सातत्याने लक्ष देणे आवश्यक आहे. त्याकडे दुर्लक्ष केले तर रोजगार मिळविण्यासाठी खेड्यातून शहराकडे धाव घेणाऱ्यांची संख्या वाढतच राहील. सतत वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी लागणारा अन्नपुरवठा कमी पडेल, औद्योगिकरणासाठी लागणारा कच्चा माल उपलब्ध होणार नाही व दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या घटणार नाही.

गेल्या पन्नास वर्षात ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेकडे राष्ट्रीय व राज्य पातळीवर बरेच लक्ष पुरविण्यात आले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सर्वसमावेशक पतपुरवठ्याची सोय असावी या दृष्टीने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजतागायत जे महत्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात आले त्यातले तीन निर्णय महत्वाचे ठरले.

1954 साली रिझर्व्ह बँकेने नेमलेल्या ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण समितीने ग्रामीण पतपुरवठा परिस्थितीचा सर्वंकष अभ्यास केला. त्यात असे दिसून आले की ग्रामीण पतपुरवठ्याचा केवळ तीन टक्के भाग हा संस्थांच्या मार्फत दिला जातो. बाकी सर्व खाजगी सावकारांकडून मिळतो. सावकारी पाश हा शेतकऱ्याला विनाशाकडे नेतो. कर्जाचा दर भरमसाठ असतो व कर्जाची परतफेड वेळेवर न झाल्यामुळे गहाण ठेवलेल्या जमिनीला शेतकरी वंचित होतो. संस्थांमार्फत पतपुरवठा करणे त्यामुळे अत्यावश्यक आहे. खाजगी बँका शहरातच कार्यरत आहेत व त्या उद्योग, व्यापार यांनाच पतपुरवठा करतात. ग्रामीण पतपुरवठ्याचे कार्य केवळ सहकारी पतपुरवठा संस्थाच करु शकतील. आजवर त्यांच्या कार्यात त्या अयशस्वी ठरल्या आहेत. परंतु त्या यशस्वी झाल्या पाहिजेत. त्या दृष्टीने समितीने खालील सूचना केल्या

1) शेतकऱ्यांना अल्प, मध्यम व दीर्घ मुदती साठी पतपुरवठा मिळावा.

2) अल्प व मध्यम मुदती पतपुरवठ्यासाठी त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संस्था उभाराव्यात-

ग्रामीण संस्था, जिल्हानिहाय बँका व राज्यस्तरावरील शिखर बँक. दीर्घावधी गुंतवणूकीसाठी तालुका व राज्यपातळीवर संस्था असाव्यात. त्यांच्या माध्यमाने शेतकऱ्यांच्या व ग्रामीण उद्योग-व्यापाराच्या सर्व गरजा पूर्ण कराव्या.

3) पीक उत्पादन कर्जव्यवस्थेत जमिनी गहाण ठेवून कर्ज देण्याच्या पद्धतीऐवजी उत्पादन कार्यक्रमाच्या आधारे कर्ज द्यावे.

4) कर्जाचा सदुपयोग होईल याची काळजी घ्यावी. कर्जाचा काही भाग बी, खते, कीटकनाशके औषधी इत्यादी स्वरुपात द्यावा.

5) कर्जाची वेळेवर परतफेड व्हावी यासाठी उत्पादित मालाची विक्री सहकारी विक्रय संस्थामार्फत करावी. म्हणजे शेतकऱ्यांसाठी मिळणाऱ्या रकमेतून परतफेड करता येईल.

6) सहकारी संस्थांना रिझर्व्ह बँकेचे, राष्ट्रीयीकृत स्टेट बँकेचे व सरकारचे पाठबळ असावे. या शिफारशीनुसार देशातील सर्व राज्यात सर्वसमावेशक सहकारी ग्रामीण पतपुरवठा व्यवस्था उभारण्यात आली.

दुसरा महत्वाचा टप्पा म्हणजे 1969 साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 14 मोठ्या खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा घेतलेला निर्णय होय. आजवर खाजगी बँकांच्या शाखा शहरातूनच काम करीत होत्या व त्याचा फायदा मोठे कारखानदार व व्यापारी घेत होते. राष्ट्रीयीकरणाचा उद्देश्य असा होता की देशाच्या विकासासाठी ज्या क्षेत्रांना अग्रक्रम दिला होता त्या कृषि, लहान उद्योग व निर्यात यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांनी कर्जपुरवठा करावा. त्यादृष्टीने राष्ट्रीयीकृत बँकांच्या हजारो शाखा ग्रामीण भागात उघडण्यात आल्या. कृषिसाठी आपल्या कर्जपुरवठ्यापैकी किमान 18 टक्के भाग द्यावा असा दंडक केंद्रसरकारने घालून दिला. हेच सूत्र पुढे नेऊन असाही विचार आला की ज्याठिकाणी जिल्हा सहकारी बँका दुर्बल वा अक्षम आहेत त्याठिकाणी ग्रामीण सहकारी संस्था कर्जपुरवठ्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांना जोडण्यात याव्यात.

1975 साली आणखी एका नवीन तऱ्हेच्या पतपुरवठा संस्थांची स्थापना करण्यात आली. त्यांचे नाव प्रादेशिक ग्रामीण बँक. रिझर्व्ह बँकेचे भूतपूर्व गव्हर्नर श्री. नरसिंहम् यांच्या नेतृत्वाखालील एका समितीने अशा बँकांसंबंधी सूचना केली. कल्पना अशी होती की सहकारी बँकांची ग्रामीण जनतेशी असलेली जवळीक व खाजगी बँकाची व्यावसायिक क्षमता या दोहोचा संगम नव्या तऱ्हेच्या बँकात असावा. क्रमाक्रमाने देशाच्या कानाकोपऱ्यात अशा 196 बँका स्थापन झाल्या. त्या बँकांच्याही हजारोंनी शाखा ग्रामीण भागात कार्यरत झाल्या.

भारतात दर दहा वर्षांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेची समीक्षा करण्याचा पायंडा पडला. 1966 साली रिझर्व्ह बँकेचे भूतपूर्व डेप्युटी गव्हर्नर श्री. वेंकटप्पय्या यांनी पहिली समीक्षा केली. व्यापक अभ्यास करुन त्यांनी अनेक सूचना केल्या. त्यातील एक महत्वाची म्हणजे ग्रामीण पतपुरवठ्यात लहान शेतकरी व भूमिहीन कुटुंबे यांचा अत्यल्प वाटा असल्याने त्यांच्यासाठी खास व्यवस्था केली पाहिजे. लघु शेतकरी विकास एजन्सी तसेच सीमांतिक शेतकरी आणि कृषी श्रमिक एजन्सी या नवीन संस्थांची त्यांनी शिफारस केली. गरीब वर्गांना दिलेल्या ऋणाचा काही भाग अनुदान स्वरुपात असावा अशीही व्यवस्था करण्यात आली. 1977 साली क्राफिकार्ड समितीने पुन: एकदा ग्रामीण पत पुरवठा व्यवस्थेची समीक्षा केली. त्यांची एक महत्वाची सूचना जी पूर्वी शेतकी आयोगानेही केली होती- म्हणजे राष्ट्रीय स्तरावर ग्रामीण पतपुरवठ्याला पाठबळ देणारी एक स्वतंत्र बँक स्थापन करावी अशी होती. आजपर्यंत रिझर्व्ह बँकेची ग्रामीण पतपुरवठा शाखा हे काम पहात होती.

परंतु ग्रामीण पतपुरवठ्याचे महत्व लक्षात घेऊन एका स्वतंत्र बँकेची स्थापना करण्याची वेळ आली आहे असे या समितीला वाटले. त्या सूचनेनुसार 1979 साली नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर ॲंड रुरल डेव्हलपमेंट- नाबार्ड- या संस्थेची स्थापना झाली.

1989 साली प्रा. खुस्रो यांच्या अध्यक्षतेखाली आणखी एका समितीने ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेची समीक्षा केली तसेच इतर अनेक समित्यांनी ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेच्या वेगवेगळया पैलूंचा अभ्यास करुन विविध सूचना केल्या.

1991 साली देशाच्या आर्थिक धोरणात कायापालट झाला. 1951 पासूनच्या नियोजित, नियंत्रित अर्थव्यवस्थेऐवजी मुक्त अर्थव्यवस्था, सार्वजनिक क्षेत्राच्या जागी खाजगीकरण असे हे आर्थिक नीतीतील मूलभूत परिवर्तन होते. नियोजन युगात सहकारी क्षेत्राला विशेष स्थान देण्यात आले होते. त्या क्षेत्राच्या विकासासाठी खास सोयी सवलती होत्या. यापुढे कोणत्याही क्षेत्राला अशा सवलती देउ नयेत, स्पर्धात्मक युगात प्रत्येक क्षेत्र आपापल्या क्षमतेवर टिकून रहावे अशी अपेक्षा आहे. गेल्या शतकाच्या अखेरच्या वर्षात म्हणजे 2000 साली नाबार्डने नेमलेल्या तज्ज्ञ समितीला ग्रामीण पतपुरवठा संस्थांचा या नवीन संदर्भात विचार करावयाचा होता. स्पर्धात्मक अर्थव्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेने व्याजदर ठरवून देण्याऐवजी ते बाजारातील परिस्थितीनुसार प्रत्येक बँकेने ठरवावेत, आंतरराष्ट्रीय पातळीवर निश्चित केलेले प्रतिबंधक प्रमाणक खाजगी बँकां प्रमाणे सहकारी बँकांच्या व्यवहारांना सुद्धा लागू करावेत व सरकारचा सहकारी बँकातील आर्थिक सहभाग काढून घ्यावा इत्यादि निर्णय क्रमप्राप्त होते.

नवीन आर्थिक धोरणाच्या संदर्भात ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेचे समालोचन करुन तज्ज्ञ समितीने खालील मुद्दांवर शिफारशी कराव्यात असे नाबार्डने आपल्या विज्ञप्तीमध्ये म्हटले होते.

1) विद्यमान व्यवस्थेमध्ये अनेक उणीवा आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील (अ) काही क्षेत्रांना (ब)काही घटकांना व (क) काही भागात- जसे उत्तरपूर्व भागात अपुरा पतपुरवठा होतो. या उणीवा कशा भरुन काढता येतील ?

2) ग्रामीण पतपुरवठा संस्थांच्या संघटनेत कोणते बदल करावेत ? विशेषत: सहकारी पतपुरवठा संस्था तीन स्तरावर कार्यरत आहेत. हे तीन स्तर आवश्यक आहेत काय? कर्ज पुरवठा करण्याचा खर्च कमी करुन व्याजदर घटविण्याच्या दृष्टीने एखादा स्तर काढून टाकणे शक्य आहे काय ?

3) कर्जपुरवठा करण्याच्या पद्धतीत कोणत्या सुधारणा करता येतील की जेणे करुन ती सोपी, लवचिक व कर्जदारांच्या दृष्टीने सोयीची परंतु त्याचवेळी अधिक सक्षम होऊ शकेल? त्याचवेळी कर्जाची परतफेड होण्याच्या दृष्टीने कायद्यात कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत ?

4) पतपुरवठा व्यवस्थेला योग्य विकासात्मक धोरणांचा आधार हवा. तो कसा अधिक प्रभावी करता येईल ?

समितीला समग्र पतपुरवठा व्यवस्थेचा विचार करावयाचा होता- त्यात सर्व संस्थांचा सहकारी, राष्ट्रीयीकृत व खाजगी बँका, प्रादेशिक बँका व इतर सर्व आर्थिक संस्थांचा समावेश होता.

अहमदाबाद स्थित इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंटचे भूतपूर्व संचालक व प्रसिद्ध कृषि अर्थशास्त्रज्ञ प्रा. विजयशंकर व्यास यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या तज्ज्ञ समितीचा मी एक सदस्य होतो. केंद्रीय कृषि खात्याचे भूतपूर्व सचिव डॉ. पी. व्ही.शेणॉय, अर्थशास्त्रज्ञ प्रा. अभिजित सेन व प्रा. डी. झा, पश्चिम बंगाल राज्याच्या शिखर

सहकारी बँकेचे अध्यक्ष अशोक बन्दोपाध्याय व अलाहाबाद बँकेचे अध्यक्ष श्री. समाल, आनंदच्या ग्रामीण व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. कटारसिंग व गुजरात मधील सेवा संघटनेच्या प्रवर्तक व योजना आयोगाच्या भूतपूर्व सदस्या श्रीमती इलाबेन भट इत्यादी समितीचे इतर सदस्य होते. विविध विषयांचे ज्ञान व आपापल्या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव या सदस्यांच्या गाठीशी होता.

ग्रामीण पतपुरवठा संबंधीच्या विद्यमान व्यवस्थेविषयीची सम्यक् माहिती मिळविण्यासाठी समितीने खालील प्रयत्न केले.

1) प्रश्नावली तयार करुन ती पतपुरवठा संस्थांना व राज्य सरकारांना पाठवली.

2) गोहाती, कलकत्ता, लखनौ, दिल्ली, बेंगळूर व पुणे येथे प्रादेशिक चर्चासत्रे आयोजित केली. त्यात समितीला सुपूर्द केलेल्या सर्व विषयांचा साकल्याने विचार झाला. पतपुरवठा संस्था व राज्य सरकारे यांच्या सुमारे पन्नास प्रतिनिधींनी प्रत्येक चर्चासत्रात भाग घेऊन आपल्या सूचना मांडल्या. एकूण सुमारे तीनशे प्रतिनिधींशी समितीच्या सदस्यांनी विचारविनिमय केला.

3) भारतीय बँकांची अखिल भारतीय परिषद व सहकारी बँकांचा अखिल भारतीय संघ यांच्या पदाधिकाऱ्यांची सभा बोलावून समितीच्या सदस्यांनी त्यांचे विचार जाणून घेतले.

4) इंटरनेटवर वेब साईट सुरु करुन सूचना मागविल्या.

5) देशातल्या काही भागातील ग्रामीण स्तरावरील सहकारी पतपुरवठा संस्थांना प्रत्यक्ष भेटी दिल्या.

6) प्रत्येक विषयावर नाबार्डमधील तज्ज्ञ मंडळींकडून अभ्यास लेख तयार करुन घेतले. समितीचे सदस्य सचिव श्री. शर्मा हे नाबार्डचे भूतपूर्व ज्येष्ठ अधिकारी असल्याने समितीचे काम सुकर झाले व प्रभावीपणे पार पडले. या विचारमंथनाचा परिपाक म्हणजे एका वर्षाच्या अवधीनंतर सादर केलेला तज्ज्ञ समितीचा अहवाल.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेतील परिवर्तन :**

गेल्या दहा वर्षातील उदारीकरणाच्या धोरणामुळे व त्या आधी 1967 सालापासून अमलात आणलेल्या नवीन कृषि धोरणाचा परिपाक म्हणून प्रत्यक्षात आलेल्या हरितक्रांतीमुळे, ग्रामीण अर्थव्यवस्थेत फार मोठे परिवर्तन घडून आले आहे. ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेचा विचार करतांना या परिवर्तनाची दखल तज्ज्ञ समितीने घेतली आहे. त्या परिवर्तनाचे स्वरुप असे-

**(1) बाजारीकरण** - कृषि व्यवसाय अधिकाधिक बाजार व्यवहाराशी जोडला गेला आहे. बाजारातून विकत घेतलेल्या कृषि साधनात- जसे खते, बी-बियाणे, कृमिनाशक औषधी, वीज- वेगाने वाढ झाली आहे. तसेच 1966-96 या कालखंडात कृषीचे यांत्रिकीकरण दरवर्षी 12% टक्क्याने वाढत आहे. ट्रॅक्टर व पॉवर टिलरच्या उपयोगासाठी अधिकाधिक डिझेल खरेदी होत आहे.

**(2) जागतिकीकरण** - कृषि क्षेत्र निर्यातीकडे वळल्यामुळे फुले, फळे, भाज्या इत्यादींच्या उत्पादनात वाढ झाली आहे. या उत्पादनात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग होत असल्याने अत्याधुनिक 'तंत्रज्ञानाधारित' कृषि म्हणून ते ओळखले जाते.

**(3) वैविध्यीकरण** - कृषि बरोबर इतर जोड उद्योगात झपाट्याने वाढ झाली आहे. त्यात दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन, मत्स्योत्पादन, फलोत्पादन व अरण्य कृषि समाविष्ट आहेत. दुधाचे दरवर्षीचे उत्पादन विक्रमी, 75 दशलक्ष टन इतके म्हणजे जगात अत्याधिक झाले आहे. त्यामुळे खेड्यापाड्यातून दूध गोळा करुन शहरातील उपभोक्त्यांपर्यंत पोहोचविणे,

जनावरांसाठी खाद्य तयार करणे, उत्तम जातींची वासरे वाढविणे इत्यादी उद्योगाच्या माध्यमाने रोजगार उपलब्ध होत आहे. कुक्कटपालन उद्योगात आज असंख्य लहानलहान उत्पादन केंद्रे ग्रामीण प्रदेशात स्थापन झाली आहेत. अंड्यांच्या उत्पादनात आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाचा देश झाला आहे. या उद्योगांना तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी अनेक व्यावसायीकांनी सल्ला-सेवा उपलब्ध केली आहे. मत्स्योत्पादन, तळ्यातून तसेच समुद्रातून होत आहे. अलीकडच्या सर्वोच्च न्यायालयाच्या पर्यावरण विषयक निवाड्यामुळे कोळंबी उत्पादनाला काहीसा धक्का पोचला आहे. परदेशात विक्रीसाठी फळांचा दर्जा वाढविणे अगत्याचे झाले आहे. अरण्यात घट झाल्यामुळे अरण्यशेती व रस्त्याकडेची वृक्षनिर्मिती याकडे लक्ष पुरविण्यात येत आहे. तसेच स्थानिक जनतेचे सहकार्य घेण्याकडे अरण्यखाते लक्ष देत आहे.

(4) **बिगरकृषि उद्योग** - उपभोक्त्यांच्या गरजा पुरविण्यासाठी ग्रामीण प्रदेशात नवीन उद्योग उभे रहात आहेत त्यामुळे कृषिक्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांचे प्रमाण घटले आहे. एवढेच नाही तर 1999-2000 मध्ये प्रथमच कृषिक्षेत्रात काम करणाऱ्यांची एकूण संख्या घटली आहे. तरीही बिगर कृषिक्षेत्रासाठी उपलब्ध असणारा पतपुरवठा अपुरा आहे. पारंपरिक ग्रामीण उद्योगापैकी हातमाग उद्योगाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील स्थान अनन्यसाधारण आहे. हातमागाची संख्या 40 लाख एवढी आहे. हातमाग कापडाचे उत्पादन व विक्री यासाठी विणकर सहकारी संस्थांना पतपुरवठ्याची गरज आहे. कृषि ''जमा पत्रिका''(Credit card) प्रमाणे विणकर ''जमा पत्रिके'' ची ही आवश्यकता आहे.

(5) मोठ्या जमीनमालकाचा (पाच हेक्टरहून भूमिक्षेत्राची मालकी) प्रभाव कमी झाला आहे. मध्यम वर्गातील शेतकऱ्यांच्या (अडीच हेक्टर ते पाच हेक्टर) मालकीची जमीन 1971-72 मध्ये 24 टक्के होती 1992-93 मध्ये ती 36 टक्के एवढी झाली आहे.

**ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी :**

(1) ग्रामीण पतपुरवठा संस्था आज जरी सर्व खेड्यापर्यंत पोहोचल्या असल्या तरी ग्रामीण समाजातील गरीब लोक पतपुरवठा व्यवस्थेचा लाभ उठवू शकले नाहीत. 1991च्या अखिल भारतीय कर्ज व्यवस्था समीक्षेनुसार केवळ 1/6 एवढीच कर्जाची सोय ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेतून झाली आहे. बाकी गरजेसाठी गरीब वर्गाला सावकाराकडेच धाव घ्यावी लागते. लहान शेतकरी व स्त्रिया या पतपुरवठा व्यवस्थेबाहेरच आहेत. लहान कर्जदारांची संख्या 2 कोटी 77 लाखावरुन 1 कोटी 77 लाखापर्यंत घटली आहे. विशेषत: खाजगी बँकांनी लहान कर्जदारांकडे पाठ फिरवली आहे. या सर्वांचा अनिष्ट परिणाम आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, पंजाब इ. राज्यात दिसून आला आहे. सावकारी कर्जाच्या विळख्यात सापडलेले शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त झाले.

(2) कोरडवाहू शेतीला गौणस्थान मिळाले आहे. केवळ अनिश्चित व अपुऱ्या पर्जन्यवृष्टीवर अवलंबून राहणाऱ्या कृषिसाठी पाणलोट विकास कार्यक्रम अतिशय महत्वाचा आहे. 1986 साली राष्ट्रीय पाणलोट कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. या पाणलोट क्षेत्रात हवा तसा पतपुरवठा उपलब्ध होत नाही. अवर्षण काळात अल्पावधी कर्जाचे मध्यमावधी कर्जात रुपांतर करुन शेतकऱ्यांवरचा आर्थिक ताण कमी करण्याची योजना आहे. परंतु ही योजना वेळेवर सुरु होत नाही. त्यासाठी महसूलखात्याने आणेवारी निश्चित करे पर्यंत वाट पहावी लागते.

(3) कृषि अभिवृद्धीसाठी ग्रामीण क्षेत्रात गुंतवणूकीची आवश्यकता आहे. अशा गुंतवणूकीतूनच ग्रामीण उत्पादनशक्ती वाढीस लागते. परंतु उदारीकरणाच्या दशकात ही गुंतवणूक घटली आहे. राज्यसरकारांची

आर्थिक अवस्था बिघडल्यामुळे त्यांची गुंतवणूक करण्याची क्षमता घटली आहे. सिंचन प्रकल्प, पाणलोट योजना, बुजलेली तळी पुन: खोदणे, विहिरी खणणे, सिंचक जलपायन व ठिबक सिंचन योजना अमलात आणणे, भूमि व जलसंधारण इत्यादी गुंतवणूक सातत्याने करित राहिल्याशिवाय कृषि उत्पादन क्षमता वाढू शकणार नाही.

(4) ग्रामीण पतपुरवठ्याला खते व उत्तम बी-बियाणे यांचा पुरवठा, कृषिमालाची योग्य साठवण व विक्रीव्यवस्था, कृषिसल्ला, कृषि संशोधन यांची जोड मिळाली पाहिजे. पहिल्यापासून या मुद्यावर जोर देऊनही त्याकडे दुर्लक्षच झाले आहे. ग्रामीण व कृषि उत्पादनाला योग्य किंमत मिळत नाही कारण विक्रय सहकारी संस्था ठीक काम करत नाहीत व आपला वाटा उचलत नाहीत. केवळ सरकारवर किंवा खाजगी व्यापाऱ्यांवर अवलंबून चालणार नाही. शीतगृहांची सोय अपुरी असल्यामुळे उत्पादित फळभाज्यांचा नाश होतो.

(5) कृषि क्षेत्रातील परिवर्तनामुळे आता अत्याधुनिक तंत्रावर आधारित कृषि अस्तित्वात येत आहे. त्यासाठी पतपुरवठा मोठ्या प्रमाणावर लागेल. परंतु सहकारी संस्था जुनाच मापदंड लावून पतपुरवठ्याची सोय करण्यास बांधली आहे. हे मापदंड बदलले पाहिजेत.

**ग्रामीण पतपुरवठा संस्थांची संघटना -**

**सहकारी संस्था:**

अल्पावधि व मध्यम मुदती ऋणव्यवस्था व दीर्घावधि ऋण व्यवस्था यासाठी दोन वेगवेगळ्या संस्था आहेत. यापैकी पहिल्या व्यवस्थेत 4 कोटी 4 लाख इतके कर्जदार आहेत तर दुसऱ्या व्यवस्थेत 90 लाख इतके. ही संख्या मोठी वाटत असली तर एकूण सदस्यांपैकी पहिल्या व्यवस्थेत 51 टक्के इतकेच तर दुसऱ्या व्यवस्थेत 24 टक्के इतकेच सदस्य कर्जाचा लाभ घेऊ शकले आहेत. दोन्ही व्यवस्थेत हे प्रमाण 40 टक्के एवढे आहे. म्हणजे एकूण सदस्यांपैकी 60 टक्के सदस्य कर्जाचा लाभ घेऊ शकले नाहीत. ग्रामीण पतपुरवठा संस्था - त्यांची संख्या 92000 एवढी आहे. हा सहकारी पतपुरवठा व्यवस्थेचा पाया आहे. परंतु पाया व त्यावर उभारलेल्या वरच्या स्तरातील सहकारी संस्थांची आर्थिक अवस्था चिंताजनक आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे कर्जाची थकबाकी. वर्षानुवर्षे ती वाढत गेल्यामुळे सहकारी पतपुरवठा संस्था डबघाईला आल्या आहेत. खालील आकड्यांवरुन त्यांच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना येईल.

| अल्पावधि व मध्यममुदती | एकंदर तोटा |
|---|---|
| ऋण व्यवस्था - | |
| जिल्हा सहकारी बँका | 497 कोटी रुपये. |
| राज्य सहकारी बँका | 2817 कोटी रुपये. |
| **दीर्घावधि ऋण व्यवस्था** | |
| प्राथमिक संस्था | 891 कोटी रुपये. |
| राज्य सहकारी बँका | 779 कोटी रुपये. |
| एकूण | 4984 कोटी रुपये. (सुमारे पाच हजार कोटी) |

हा तोटा भरुन काढण्यासाठी इ. 2000 साली रिझर्व्ह बँकेने नेमलेल्या कपूर समितीने पाच हजार कोटी रुपये एवढे धनसहाय्य या संस्थांना उपलब्ध करण्याची सूचना केली. कारण ही तूट खात्यातून काढून टाकल्याशिवाय नवीन पतपुरवठा करणे साध्य होत नव्हते. हा तोटा भरुन काढण्यासाठी लागणाऱ्या धनसंचयापैकी केंद्र व राज्य सरकारांनी प्रत्येकी चाळीस व पंचेचाळीस टक्के भार सोसावा अशी कपूर समितीची शिफारस होती. परंतु ती योजना अजून कार्यरत झाली नाही. त्यामुळे ग्रामीण पतपुरवठा खंडीत झाला आहे.

सहकारी पतपुरवठ्याच्या या दयनीय

अवस्थेस त्या व्यवस्थेतील अनेक दोष कारणीभूत आहेत. पहिले म्हणजे सहकारी संस्थांचे नाबार्डवरील परावलंबित्व सहकारी कर्जपुरवठ्याचा बराचसा भाग हा नाबार्डने दिलेल्या पैशातून होतो. ग्रामीण स्तरावरील सहकारी संस्था ग्रामीण जनतेची बचत संकलित करण्याच्या कामात रस घेत नाहीत. जणुकाही नाबार्डच्या पैशातून कर्जपुरवठा करणे एवढेच आपले कार्य आहे असे ते समजतात. परंतु आपल्या कार्याविषयीची त्यांची कल्पना चुकीची आहे, हे त्यांना समजले पाहिजे. ऋण व बचत या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जर खाजगी बँका ग्रामीण जनतेच्या ठेवी मोठ्या प्रमाणावर जमा करु शकतात तर सहकारी संस्थांना ते का जमू नये ? परंतु तशी दृष्टी नाही. आता हे सर्व बदलले पाहिजे व प्राथमिक सहकारी संस्थांनी कर्जा एवढीच बचत गोळा करण्यावरही भर दिला पाहिजे.

जिल्हा व राज्य स्तरावरील सहकारी बँका ठेवी गोळा करतात. परंतु त्या अवाजवी व्याज देतात. त्यामुळे साहजिकच त्यातून केलेल्या कर्जाचा दरही वाढतो. तो खाजगी बँकांच्या 12 टक्के व्याजाने दिलेल्या कर्जपुरवठ्याच्या तुलनेत शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळे शेतकरी, सहकारी संस्थांना सोडून खाजगी बँकांकडे वळतात. आजच्या स्पर्धायुक्त बाजार व्यवस्थेत ते अटळ आहे. बचत व कर्जपुरवठा यात यशस्वी सांगड घातल्याशिवाय सहकारी पतपुरवठा संस्था आगामी काळात तग धरु शकणार नाहीत.

हे सर्व समजून घेऊन काम करण्यात सहकारी संस्थांच्या सदस्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. परंतु सहकारी संस्थांच्या कोटच्यवधी सदस्यांना आपल्या जबाबदारीची जाणीवही नाही. त्यासाठी त्यांच्या प्रशिक्षणाची गरज आहे. प्रशिक्षणाचे काम राज्य सहकारी संघाचे. गेले कित्येक वर्षे सहकार शिक्षणाचा कार्यक्रम चालू आहे. परंतु हे एक कार्यक्रमाचे गुऱ्हाळ आहे. कार्यक्रम प्रभावी नाही व सदस्य उदासीन आहेत. हा सहकारी व्यवस्थेतील मोठा दोष आहे. सहकारी संस्था म्हणजे आर्थिक लोकशाही. लोकशाही यशस्वीरीतीने चालावयाची असेल तर सदस्य सुजाण व जागरुक हवेत.

सदस्य उदासीन असल्यामुळे प्राथमिक संस्था ह्या सचिवांच्या ताब्यात गेल्या आहेत. त्यांना सदस्यांशी बांधिलकी वाटत नाही. त्यांनी आर्थिक गैरव्यवहार केला तरी त्यांना शिक्षा होत नाही. सचिव श्रेणी (secretary cadre) हे सरकारच्या अधिन असल्यामुळे त्यांना प्राथमिक संस्थांना आपण जबाबदार आहोत असे वाटतच नाही हे सर्व बदलले पाहिजे. श्रेणीबद्ध रचना मोडीत काढून सचिवांना पूर्णतया जबाबदार धरण्यासाठी त्यांची नेमणुक सदस्यांच्या ठरावानुसार झाली पाहिजे. त्यांची नेमणुक करण्यासाठी कोणते निकष असावेत हे जिल्हा बँकांनी निश्चित करावे.

प्राथमिक संस्थांवर जिल्हा बँकांची व जिल्हा बँकांवर राज्य शिखर बँकांची देखरेख असावी. वेळोवेळी त्यांच्या कामाचा आढावा घेऊन मार्गदर्शन व मदत करणे ही आपली जबाबदारी आहे हे वरील स्तरावरील संस्थांनी समजून घेतले पाहिजे. असे झाले तर सहकारी पतपुरवठा संस्था एकसंध राहून प्रभावी काम करु शकतील.

अनेक वेळा सरकार आपल्याला हवे ते काम सहकारी संस्थांवर सोपवितात. प्राथमिक सहकारी संस्थांचे जाळे ग्रामीण प्रदेशात सर्वत्र पसरल्याने सरकारला वाटते की ग्रामीण प्रदेशातील आपल्या योजना राबविण्याची जबाबदारी सहकारी संस्थांवर टाकता येईल. परंतु या योजना सहकारी संस्थांना सोपवितांना त्यांना आतबट्ट्याचा व्यवहार करावा लागू नये याची काळजी मात्र सरकार घेत नाही. याचे एक महत्वाचे उदाहरण म्हणजे अन्नधान्य व इतर

गरजेच्या पदार्थांचा ग्रामीण उपभोक्त्यांना पुरवठा करणे हे होय. पुरेसा नफा नसल्यामुळे संस्था आर्थिक डबघाईला येतात.

सरकारला हे समजले पाहिजे की सरकारी संस्था या शासन यंत्रणेचा भाग नाही. त्या स्वायत्त संस्था आहेत व ही स्वायत्तता जपली पाहिजे. तरच त्या यशस्वीपणे काम करु शकतील. परंतु या मूलभूत मुद्यालाच बगल दिल्यामुळे सहकारी चळवळीलाच विकृत स्वरुप प्राप्त झाले आहे. सरकारी हस्तक्षेपाबरोबर राजकीय हस्तक्षेपही वाढल्यामुळे केवळ आर्थिक व्यवहार करणाऱ्या स्वायत्त संस्था असे त्यांचे स्वरुप राहिलेले नाही. सरकारच्या दबावाचा एक भाग म्हणजे या संस्थांचे अंकेक्षण सरकारने आपल्याकडे ठेवले आहे. ते वेळेवर व व्यावसायिकरीत्या होत नाही. स्वायत्तता त्यामुळे धोक्यात येते. सहकारी संस्थाचे अंकेक्षण व्यावसायिक सनदी लेखापालास सोपविण्याची वेळ आली आहे. परंतु तसे करण्यापूर्वी सहकारी संस्था या केवळ आर्थिक लाभ मिळविण्यासाठी काम करणाऱ्या खाजगी संस्था नव्हेत. याचे भान सनदी लेखापालाने ठेवले पाहिजे. त्यांना सहकारी संस्था व खाजगी संस्था यांच्या आर्थिक व्यवहारातील मूलभूत फरक समजला पाहिजे. त्यांना सहकारी संस्थांचे खरे स्वरुप समजले पाहिजे.

सहकारी संस्थांची स्वायत्तता राखण्यासाठी सध्याचा कायदा बदलला पाहिजे. विद्यमान कायद्यात सरकारी नियंत्रण वाढविण्यासाठी वेळोवेळी विशेष तरतुदी समाविष्ट केल्या गेल्या आहेत. त्यांचा सहकारी स्वायत्ततेवर अनिष्ट परिणाम झाला आहे. बऱ्याच वर्षापूर्वी योजना आयोगाने ब्रह्मप्रकाश यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीने सहकारी संस्था स्वायत्त रहाव्यात या दृष्टीने सरकारी हस्तक्षेप पूर्णपणे टाळणारा असा कायदा सुचविला होता. परंतु महाराष्ट्रासह अनेक राज्यात तो अद्याप स्वीकृत झालेला नाही. विद्यमान महाराष्ट्र सरकारने त्या निमित्त्याने पुढाकार घेतला, परिषद घेतली परंतु आपले नियंत्रण अबाधित रहावे असे वाटल्यामुळे हा सर्व पुढाकार बारगळल्यासारखा दिसतो. आंध्रप्रदेश राज्यात नवीन समांतर कायदा लागू केला आहे. परंतु नवीन संस्था या कायद्यानुसार स्थापन झाल्या तरी विद्यमान संस्था जुन्या कायद्याच्या जोखडातच काम करीत आहेत.

सहकारी संस्था स्वायत्त असल्या तरी सहकारी बँका सदस्यांशिवाय सर्वसाधारण जनतेपासून ठेवी गोळा करुन आर्थिक व्यवहार करत असतील तर सार्वजनिक हित लक्षात घेऊन बँक विनिमय कायदा त्यांना लागू करुन रिझर्व्ह बँकेने नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रिझर्व्ह बँकेच्या देखरेखीखाली सहकारी बँकेचे आर्थिक व्यवहार चोख राहतील अशी अपेक्षा आहे. परंतु सर्व ठेवीदार व कर्जदार हे सहकारी संस्थेचे सदस्य आहेत याची काळजी घेतली- आर्थिक लोकशाहीचा तोच अर्थ आहे-तर बँक विनिमय कायदा लागू होणार नाही व रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाचीही गरज भासणार नाही.

स्वायत्तता म्हणजे केवळ बाह्य बंधनांचा अभाव नव्हे. स्वायत्ततेसाठी अंतरीची कुवत हवी आणि ती तेव्हाच शक्य आहे की जेव्हा सहकारी संस्था बळकट असतील व त्यांचे व्यवस्थापन सक्षम असेल. सहकारी पतपुरवठा संस्था तीन स्तरावर आहेत- ग्रामीण, जिल्हा व राज्य. या तीनही स्तरावरील संस्था सक्षम असल्या पाहिजेत आणि त्यांचे परस्परांशी संबंध चांगले असले पाहिजेत. पतपुरवठा संस्था तीन स्तरावर असाव्यात काय ? असा आज प्रश्न विचारला जात आहे. प्रत्येक स्तरावर खर्च होतो व त्यामुळे शेवटच्या कर्जावरील व्याजाचा दर तीन-साडेतीन-चार टक्क्याने वाढतो. तो कमी करण्यासाठी एक स्तर कमी करता येणार नाही का ?

तसे केले तर राज्यबँकेकडून सरळ प्राथमिक संस्थांना कर्जपुरवठा करता येईल या विषयाचा खोलवर विचार करण्यासाठी तज्ज्ञ समितीने लखनौ स्थित नाबार्डच्या ''बर्ड'' (बँकिंग इन्स्टिटयूट फॉर रुरल डेव्हलपमेंट) या संस्थेला संशोधन करण्यास सांगितले. जिल्हा बँका बंद करुन त्यांचे रुपांतर ''शाखा'' मध्ये करुन त्यांचा कारभार राज्यस्तरावरील शिखर बँकेने घेतला, तर खर्च कमी होण्याच्या ऐवजी तो वाढण्याचा संभव आहे कारण जिल्हा बँकेचा नोकर वर्ग शिखर बँकेच्या कर्मचाऱ्यांचा वाढीव पगार व भत्ते मागू लागेल. त्यामुळे जिल्हा बँकेचे शिखर बँकेत विलीनीकरण केल्याने खर्च कमी होणार नाही किंवा कारभारातही सुधारणा होणार नाही म्हणून तज्ज्ञ समितीने जिल्हा बँकांचा स्तर कमी करण्याची सर्वसाधारण सूचना केली नाही. परंतु लहान राज्यात दोन स्तरावरील रचना पुरेशी होईल असा विचार व्यक्त केला आहे. दुसरी संघटनाविषयक सूचना म्हणजे आज वेगवेगळया असलेल्या अल्पकालीन, व दीर्घकालीन पतपुरवठा व्यवस्थांचे एकत्रीकरण करणे. तात्विक दृष्ट्या सर्व तऱ्हेच्या पतपुरवठ्यासाठी एकत्रित व्यवस्था असणे श्रेयस्कर होईल. अल्पावधि कर्जाचा सदुपयोग व्हावयाचा असेल तर दीर्घकालीन कर्जातून गुंतवणूक करणे हितकारक ठरते; तसेच अशी गुंतवणूक केली तर अल्पावधि मध्यममुदती कर्जाची अधिक आवश्यकता भासते. दोन्ही परस्परपूरक आहेत. परंतु तात्विक दृष्ट्या दोन व्यवस्थांचे विलीनीकरण श्रेयस्कर असले तरी आंध्रप्रदेशातील अनुभव लक्षात घेतला तर विलीनीकरणात अनेक अडचणी आहेत हे लक्षात येईल. या दोन्ही व्यवस्था अनेक वर्षे आपले अलग अस्तित्व बाळगुन राहिल्या आहेत व आपापले हितसंबंध संरक्षिण्यासाठी या दोन स्वतंत्र घटकांचा विलीनीकरणाला विरोध आहे. तसेच दीर्घावधि पतपुरवठा संस्था आर्थिक दृष्ट्या अधिक कमकुवत असल्यामुळे अल्पावधि पतपुरवठा संस्थांवर त्यांचा बोजा पडणार आहे. त्यांना सांभाळता सांभाळता त्यांची स्वत:ची अवस्था अधिक बिकट होईल म्हणून तज्ज्ञ समितीने शिफारस केली आहे की विलीनीकरणाच्या सूचनेचा पूर्ण अभ्यास करुनच निर्णय घेतला पाहिजे तसेच विलीनीकरण सक्तीचे न करता ऐच्छिक असावे. दोन व्यवस्थांचे विलीनीकरण जोपर्यंत होत नाही तो पर्यंत अल्पावधी पतपुरवठा संस्थांना दीर्घावधि ऋण देण्याची मुभा असावी.

सहकारी पतपुरवठा संस्थांतील कर्मचाऱ्यांची संख्या कमी करुन दर्जा वाढविणे आवश्यक आहे. आजची कर्मचारी संख्या आवश्यकतेपेक्षा अधिक आहे. 92,000 प्राथमिक संस्थात 2.5 लाख आणि जिल्हा व शिखर संस्थांत 1.1 लाख इतके कर्मचारी कार्यरत आहेत. त्यात कपात करणे शक्य आहे. कर्मचारी संख्या वाढण्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे या संस्थांतील राजकीय हस्तक्षेप होय. प्रत्येक संचालकाला आपला 'ठराविक हिस्सा' असावा असे वाटते. ही अगदी अनिष्ट प्रथा आहे व ती बंद केली पाहिजे. कर्मचाऱ्यांच्या आवश्यकतेची गरज लक्षात घेऊनच नोकरभरती केली पाहिजे व ती क्षमतेच्या निकषानुसार निवडसमिती मार्फतच केली पाहिजे. जिल्हा व शिखर बँकेचा मुख्य कार्यकारी अधिकारी हा सरकारी नोकर नसावा. तो अल्पकालासाठी येतो व दीर्घयोजनेनुसार काम करु शकत नाही. नाबार्डच्या मदतीने कुशल व्यावसायिक बँक अधिकाऱ्याची निवड करता येईल. त्याला पूर्ण अधिकार द्यावेत व त्याच्या दैनंदिन कारभारात संचालकांची लुडबुड नसावी. संचालक मंडळाने धोरणात्मक मार्गदर्शन करावे व वेळोवेळी कामाचे समालोचन करावे.

**खाजगी बँका :**

1969 सालच्या राष्ट्रीयीकरणानंतर बँकांनी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर आपल्या शाखा सुरु केल्या. 2 कोटी 40 लाख ग्रामीण भागातील कुटुंबांनी या शाखांत आपली खाती उघडली. ग्रामीण शाखांनी भरपूर ठेवीही गोळा केल्या .कर्जवितरण ग्रामीण

भागात 19615 कोटी रुपये तर शहरी भागात 12890 कोटी रुपये इतके केले. सरकारने घालून दिलेल्या निर्देशानुसार आपल्या कर्जवाटपातील किमान 18 टक्के भाग कृषीसाठी उपलब्ध करुन द्यावा असा सरकारचा दंडक होता. प्रत्यक्षात 16% टक्के इतकाच होता. तरी सुद्धा सहकारी बँकांच्या जोडीला खाजगी बँकांनाही ग्रामीण कर्जपुरवठ्यात मोठेच योगदान दिले. दारिद्र्य निर्मूलन योजनेत प्रथम समग्र ग्रामीण योजना व अलिकडे त्या जागी आलेली स्वर्णजयंती रोजगार योजना -खाजगी बँकांनी आपला वाटा उचलला परंतु 1991 सालच्या उदारीकरणाच्या धोरणानंतर मात्र खाजगी व राष्ट्रीयकृत बँकांनी आपला दृष्टिकोन बदलण्यास सुरूवात केली आहे. कृषीसाठी उपलब्ध केलेल्या कर्जाचा 10 टक्के भाग दुर्बल वर्गाला द्यावा अशी घोषणा अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी ग्रामीण मूलभूत सोयी विकास निधी स्थापन करण्याची घोषणा केली. ग्रामीण कृषी पतपुरवठा 18 टक्क्यापेक्षा कमी झाला तर ती भरपाई निधीत गुंतवणूक करुन पूर्ण करावी असा निर्देश दिला. त्याचा बँकांनी भरपूर फायदा उठविला कारण या निधीत केलेल्या गुंतवणूकीवर 12 टक्के व्याजदर बसल्या जागी मिळत असेल तर कोणता बँक अधिकारी खेड्यात पायपीट करुन शेतकऱ्यांना कर्ज देण्याची तसदी घेणार ? रिझर्व्ह बँकेने ग्रामीण कर्जावरील व्याजदर 12 % इतका माफक ठेवल्यामुळे-सहकारी पतपुरवठ्यापेक्षाही 1% कमी - त्यातून बँकांना फारसे उत्पन्नही मिळत नसे. खाजगी-राष्ट्रीयीकृत बँका कर्ज पुरवठ्यापेक्षा ठेवी गोळा करण्यातच ग्रामीण प्रदेशात अधिक यशस्वी झाल्या. त्यामुळे 1991 साली कर्ज-ठेवी प्रमाण 53% इतके होते ते 2000 साली 36 इतके झाले. म्हणजे ग्रामीण प्रदेशात पैसा जाण्याऐवजी तो बँकांकडे म्हणजे पर्यायाने शहराकडे व बड्या उद्योगाकडे खेचला गेला असे म्हटले पाहिजे.

अशी परिस्थिती आगामी काळात चालू राहिली तर बँकांचे ग्रामीण प्रदेशाकडे अधिकाधिक दुर्लक्ष होत राहील. तसे होऊ नये या दृष्टीने तज्ज्ञ समितीने शिफारस केली आहे की, निश्चित गुंतवणूक केलेल्या रकमेवरील व्याजदर 9% इतका कमी करावा व निश्चित केलेल्या 18 टक्के भागापेक्षा ग्रामीण पतपुरवठा 2 टक्क्यांनी किंवा अधिक प्रमाणात कमी झाला तर व्याजदर 7% इतकाच असावा. उद्देश असा की त्यामुळे कर्जपुरवठा करण्याऐवजी निश्चित पैसे गुंतवण्याच्या प्रवृत्तीला आळा बसावा. समितीने आणखीही अशी शिफारस केली आहे की ग्रामीण पुरवठ्यावर 12% इतका व्याजदर सीमित नसावा. हा व्याजदर सहकारी दरापेक्षाही बराच कमी आहे. तो वाढविण्याची बँकांना मुभा असावी म्हणजे बँकांना ग्रामीण कर्जपुरवठा हा आतबट्ट्याचा व्यवहार वाटू नये. किंबहुना आर्थिक निकषावरही केवळ सामाजिक जबाबदारीच्या दृष्टीने नव्हे - तो आकर्षक वाटावा. बँक अधिकारी ग्रामीण प्रदेशात काम करण्यात नाखूष असतात. ग्रामीण प्रदेशात मुलांच्या शिक्षणाच्या सोयी अपुऱ्या असतात. म्हणून त्यांना बायकामुलांना शहरात ठेवावे लागते. त्यामुळे ग्रामीण शाखेत काम करण्यास नेमलेला अधिकारी बदली होऊन केव्हा एकदा शहरातील शाखेत जाता येईल याची वाट पहात असतो. ग्रामीण जनतेशी त्याची बांधिलकी नसते किंवा ग्रामीण प्रदेशात तो मन लावून कामही करीत नाही. त्यामुळे तज्ज्ञ समितीने शिफारस केली आहे की अधिकाऱ्याना ग्रामीण प्रदेशात काम करण्यासाठी विशेष सोयी द्याव्यात. उदाहरणार्थ, कुटुंबाला शहरात ठेवले असेल तर अधिकाऱ्याला ग्रामीण प्रदेशात राहण्यासाठी बँकेच्या खर्चाने जागा उपलब्ध करावी. तसेच ग्रामीण प्रदेशात काम करणे हा एकंदर कारकीर्दीचा आवश्यक भाग समजावा. ग्रामीण प्रदेशात केलेल्या कामाची दखल घेऊन बढतीसाठी त्याचा विचार करावा. त्याचबरोबर ग्रामीण शाखेत नेमलेल्या अधिकाऱ्याने जवळच्या शहरात राहून काम

करण्याच्या पद्धतीवर पूर्णपणे नियंत्रण ठेवावे. ज्या ग्रामीण शाखेत अधिकाऱ्याची नेमणुक होते तेथेच त्याने राहिले पाहिजे. ग्रामीण जनतेशी एकरुप झाले पाहिजे. त्यात कोणतीही टाळाटाळ केली तर त्या अधिकाऱ्यावर कारवाई केली पाहिजे.

**प्रादेशिक ग्रामीण बँका :**

1975 साली सुरु केलेल्या या बँकांची संख्या वाढत वाढत 196 वर पोहोचली आहे. या बँकांचे वेळोवेळी मूल्यमापन झाले आहे. 1977 साली अस्तित्वात असलेल्या 98 बँकांचे परीक्षण केल्यानंतर दांतवाला समितीने या बँका चांगल्या काम करीत आहेत, त्या चालू ठेवाव्यात एवढेच नव्हे तर अशा आणखी बँका स्थापन कराव्यात अशी शिफारस केली. 1987 साली केळकर समितीने सुचविले की लाभकारी व्यवहार वाढविण्याच्या दृष्टीने वैयक्तिक कुटुंबांशिवाय, संस्थांनाही (जशा खाजगी कंपन्या) कर्ज द्यावयास हरकत नाही. परंतु 1989 साली खुस्रो समितीला मात्र असे वाटले की या बँका पुढे चालू ठेवण्यात काही अर्थ नाही. खाजगी बँकांच्या शाखा ग्रामीण प्रदेशात कार्यरत असतांना वेगळया तऱ्हेच्या प्रादेशिक बँकांची काहीच आवश्यकता नाही असे त्यांचे मत होते. सुरूवातीची कल्पना होती की या कमी खर्चाच्या बँका असतील. त्या जरी खाजगी बँकांची निर्मिती असल्या तरी तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन खाजगी बँकांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनापेक्षा कमी असेल. परंतु आपल्याला ती वेतन श्रेणी लागू असावी कारण आपल्या कामाचे स्वरुप तेच आहे असा हेका धरुन ग्रामीण बँकांतील कर्मचाऱ्यांनी उग्र आंदोलन केले. सुप्रीम कोर्टानेही या बँकांचे वेगळे स्वरुप लक्षात न घेता कर्मचाऱ्यांची बाजू उचलून धरली. परिणाम स्वरुप खर्च वाढून या बँकातोटयात जाऊ लागल्या. या बँकाचे काय करावे, त्यांचे भवितव्य काय असा सरकारपुढे प्रश्न निर्माण झाला. सरकारने खुस्रो समितीची शिफारस स्वीकारली नाही व या बँका चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. या बँकांना तोटा भरुन काढून त्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार 196 पैकी 187 बँकांना 1200 कोटी रुपये आर्थिक मदत देऊन तोटा भरुन काढण्यात आला आहे. अलिकडे तिंगाळया समितीने सुचविले की या बँकांच्या शाखांची पुनर्बांधणी करावी. तोटयात चाललेल्या शाखांचे एकत्रीकरण करावे. व्याजदरात योग्य ते बदल करावेत. असे केले की पुनरुज्जीवित ग्रामीण बँका लाभदायक ठरतील. पुनरुज्जीवनासाठी प्रयत्न केल्यानंतर या बँकांचे काम आता चांगल्याप्रकारे चालू आहे.

ही परिस्थिती लक्षात घेता या बँका ग्रामीण पतपुरवठयाचा एक आवश्यक भाग म्हणून भविष्यातही चालू ठेवाव्यात अशी शिफारस तज्ज्ञ समितीने केली आहे. या बँकांत 1 कोटी 16 लाख खाती आहेत. त्यातील 97 टक्के लहान कर्जदारांची आहेत. या बँकांनी 13,184 कोटी रुपये एवढ्या रकमेचे कर्जवाटप केले आहे. त्याहूनही बचत ठेवी गोळा करण्यात त्या अधिक यशस्वी ठरल्या आहेत. 1979 साली त्यांचे कर्ज-ठेवी प्रमाण हे 136% इतके होते. ते 2000 साली 41% इतके घसरले आहे.

त्यांच्या कामात सुधारणा झाली पाहिजे. आपले पैसे कर्जवाटपासाठी न वापरता आपल्या पालक बँकेत ठेवून त्यावर व्याज मिळविण्याच्या प्रवृत्तीला आळा घातला पाहिजे. कर्जवाटपात दरवर्षी किमान 5% वाढ व्हावी अशी तज्ज्ञ समितीने शिफारस केली आहे.

आज प्रादेशिक बँका आपल्या पालक बँकेच्या छायेत काम करीत आहेत. खाजगी बँकांची एक दुय्यम आवृत्ति असे त्यांचे स्वरुप आहे. ज्यांना पालक बँकेत जागा नाही त्यांची वर्णी प्रादेशिक बँकेत लावण्यात येते असा समज निर्माण झाला आहे. तो घालविला पाहिजे. प्रतिभावंत अधिकाऱ्यांची या बँकांच्या

अध्यक्षपदासाठी निवड केली पाहिजे , त्यांना अधिक स्वायत्तता दिली पाहिजे. त्यांनी नवीन नवीन कल्पक योजना आखल्या पाहिजेत. एक वेगळया तऱ्हेची स्थानिक बँक अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली पाहिजे.

**इतर आर्थिक संस्था :**

सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका यांच्या शिवाय आज इतर संस्थाही ग्रमीण प्रदेशात कर्जवितरण करण्यास पुढे येत आहेत. जसे ''अधिकोषणेतर वित्तीय संस्था'' महेन्द्र ट्रॅक्टरने आपले ट्रॅक्टर व वाहने ग्रामीण प्रदेशात विकण्यासाठी खास कर्ज देण्याची व्यवस्था आपल्या स्वतंत्र अशा आर्थिक कंपनीच्याद्वारे केली आहे. सुंदरम् मोटर्स यांचीही अशीच एक संस्था आहे. नागरी सहकारी बँकाही ग्रामीण प्रदेशात शाखा उघडण्यासाठी परवाने घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत अनेक स्वयंसेवी संस्थांनी ''व्यष्टीय अधिकोषणाची'' ची कल्पना साकार करण्याचा प्रयत्न केला आहे.शेतकऱ्यांचे विशेषत: ग्रामीण स्त्रियांचे स्वसहाय बचत गट तयार करावयाचे व त्यांच्यासाठी स्वत:च्या बचतीशिवाय गटऋण देण्याची ही व्यवस्था (बँकेतून किंवा अन्यथा) असावी असा प्रयत्न आहे. यातून स्त्रियां मध्ये व वंचित गरीब कुटुंबात एक नवीन आत्मविश्वास निर्माण होईल अशी अपेक्षा आहे.

**कार्यपद्धतीत सुधारणा :**

पतपुरवठा संस्थांची कार्यपद्धती अशी असावी की जी कर्जदारांना सोयीची असावी, परंतु त्याचवेळी कर्जाची परतफेड होईल हे बघण्यास सक्षम असावी. या दृष्टीने तज्ज्ञ समितीने कायद्यात व नियमात सुधारणा करण्यासाठी खालील शिफारशी केल्या आहेत.

(1) कर्जासाठी लागणारे दस्ताऐवज सोपे व सुटसुटीत असावेत. (2) भूधारका संबंधीचे दाखले अद्यावत् व सहज उपलब्ध असावेत. (3) जमिनी खंडाने देण्यात अडचणी नसाव्यात. (4) जमीन गहाण ठेवण्यासाठी लागणारे दस्ताऐवज सहजगत्या तयार करता यावेत. यासाठी जिल्हयाच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची आवश्यकता नसावी.(5) मुद्रांक शुल्क व नोंदणी फी कमी करावी.(6) राज्यघटनेच्या तरतुदीनुसार आदिवासी यांची जमीन गहाण ठेवता येत नाही त्यामुळे पतपुरवठा संस्था त्यांना कर्जही देउ शकत नाहीत. त्यात योग्य ती सुधारणा करावी. (7) कुळांनाही आपल्या हक्कानुसार कर्ज मिळविता यावे अशी व्यवस्था करावी. (8) ''कंत्राटी शेती'' ला आक्षेप नसावा. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगले बी-बियाणे मिळेल व त्यांच्या मालाच्या विक्रीत निश्चिती येईल.

कर्ज पुरवठा पुरेसा असावा. प्रगतिपर व आधुनिक शेतीला अधिक पैशाची आवश्यकता असते. परंतु केव्हातरी लागू केलेले निकष तसेच चालू ठेवल्यामुळे अपुरे कर्ज मिळते. तसेच अमुक एका सीमेपर्यंतच कर्ज देण्याचे बंधनही नसावे. शेतीमालावरही कर्ज देण्याची सोय असावी. त्यामुळे साठवण, विक्री व प्रक्रिया या कृषि उत्पादनानंतरच्या व्यवहारासाठी कर्जपुरवठा होईल.

ऋणवितरणात समग्र दृष्टिकोण असावा. शेतकऱ्याच्या सर्व गरजा लक्षात घेऊन पतपुरवठा करावा. केवळ एकाच बाबीसाठी नव्हे. आज शेतकरी शेती बरोबर इतरही आर्थिक उत्पादन करतो. त्याची दखल घ्यावी.

पतपुरवठा करतांना मुख्य उद्देश्य हा असावा की शेतकरी व ग्रामीण उत्पादक स्वत:च्या पायावर उभा राहू शकेल. हे उद्दिष्ट गरिबी निर्मूलन योजनांखाली केलेल्या कर्जपुरवठा पद्धतीमुळे साध्य होत नाही. पतपुरवठा संस्थांची तक्रार आहे की या योजनेत सबसिडीवर अधिक भर आहे. तिचा लाभ मिळविण्यासाठी दारिद्रय रेषेखालील कर्जदारांचा समावेश सरकारी विकास अधिकारी करतात. बँकांच्या

अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करत नाहीत. त्यामुळे केवळ सबसिडी मिळविण्यासाठी दिलेल्या ऋणाची परतफेड होत नाही. अनेकदा सबसिडीची रक्कम कर्जदारांपर्यंत पोहचतच नाही. या भ्रष्टाचारामुळे योजना फलदायी होत नाहीत व कर्जपुरवठा पद्धतीलाच धोका पोहोचतो.

सबसिडी केंद्रित योजनांऐवजी आत्मनिर्भर योजना तयार कराव्यात. या संदर्भात अलिकडच्या वर्षात काही स्वयंसेवी संस्थांनी स्वसहाय गट तयार करण्यावर जो भर दिला आहे तो स्वागतार्ह आहे. अशा गटात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होत आहे. एक बचतगट म्हणून याची सुरूवात होते. वेळोवेळी बचत करुन धनसंचय होतो व त्यातून लहान लहान उद्योग व व्यवहार सुरू करता येतात. गटाचे सदस्य एकमेकांना आधार देतात. अशा गटांना ऋण वितरण केल्यास त्याचा सदुपयोग होऊ शकतो व तो अधिक फलदायी ठरतो. गटातून व्यवहार केल्यामुळे आत्मविश्वास वाढीस लागतो. अशा गटात व पतपुरवठा करणाऱ्या बँका यांच्यात निकोप संबंध स्थापन केल्यास पतपुरवठा व्यवस्था नव्या शक्तीने उभी राहू शकेल. नाबार्डने असे देशभरात दीड लाख गट निर्माण करण्याचा संकल्प सोडला आहे. हे योग्य दिशेने उचललेले पाऊल आहे असे तज्ज्ञ समितीला वाटते.

कर्जपुरवठा करतांना नैसर्गिक आपत्तींचा विचार झाला पाहिजे. नैसर्गिक आपत्तीत कर्जपुरवठा रोखल्यास शेतकरी अडचणीत येतो. अशाच वेळी त्याला मदतीची अपेक्षा असते. अशावेळी त्याला मदत न केल्यास त्याचे पर्यवसान आत्महत्येत होते हे आपण पाहिले आहे. अडीअडचणीच्या वेळी पतसंस्थांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे.

कर्जाची परतफेड होण्यासाठी योग्य वातावरण निर्मिती केली पाहिजे. त्या दृष्टीने तज्ज्ञ समितीने खालील शिफारशी केल्या आहेत. (1) कर्जवसूलीचे कायदे कडक केले पाहिजेत. या विषयावर तलवार समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी केली पाहिजे. (2) कर्जवसुलीसाठी बँकांना कोर्टात जावे लागू नये व या संबंधीचे अधिकार, कायद्यानुसार बँक अधिकाऱ्यांकडे असावेत त्यांना आव्हानपत्र काढण्याचे व जरुर पडल्यास कर्ज बुडविणाऱ्या माणसास अटक करण्याचे अधिकार असावेत. (3) कर्जवसूली करण्याच्या दृष्टीने संस्थांच्या नोकरवर्गाला काही "रोख प्रेरक" - बक्षिश द्यावे (4) बँकेची कर्जफेड न करणे किंवा तसे करण्यास आवाहन करणे हा गुन्हा समजण्यात यावा. (5) कर्जवसुलीतील राजकीय नेत्यांची लुडबुड बंद होण्यासाठी मुख्यमंत्र्यांनीच आदेश काढावेत. (6) राजकीय पक्षांनी आपल्या जाहीरनाम्यात कर्जमाफीसाठी सरसकट आश्वासने देऊ नयेत. निर्वाचन आयोगाने घालून दिलेल्या आचार संहितेतच तसा उल्लेख करावा. (7) राज्य किंवा केंद्र सरकारने केवळ सवंग लोकप्रियतेसाठी सरसकट कर्जमाफी देऊ नये. पूर्वी असे केल्यामुळे पतपुरवठा व्यवस्थेला जबरदस्त धक्का पोचला.

**पतपुरवठा विषयक धोरण :**

केंद्र सरकार, राज्यसरकार, रिझर्व्ह बँक व नाबार्ड या सर्वांना योग्य पतपुरवठा पोषक धोरण आखण्यात आपापले योगदान देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने तज्ज्ञ समितीने खालील शिफारशी केल्या आहेत.

**रिझर्व्ह बँक** - (1) ज्याप्रमाणे रिझर्व्ह बँक वार्षिक सर्वसाधारण पतपुरवठा जाहीर करते त्याप्रमाणे कृषि पतपुरवठा धोरणही जाहीर करावे.(2) रिझर्व्ह बँकेने ग्रामीण पतपुरवठ्यासंबंधी वार्षिक परिषद बोलवावी. त्यात केंद्र सरकार, राज्य सरकार, नाबार्ड आणि खाजगी, प्रादेशिक व सहकारी बँकांचा सहभाग असावा. अशा परिषदेत ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेचे समग्र समालोचन व्हावे. (3) रिझर्व्ह बँकेने ग्रामीण

पतपुरवठ्याला अग्रक्रम देण्याचे धोरण चालू ठेवावे. (4) नाबार्डला आर्थिक आधार देण्याचे धोरण चालू ठेवावे.

**नाबार्ड**-(1) ग्रामीण पतपुरवठ्याचा पाठपुरावा करणारी एक भक्कम आर्थिक संस्था म्हणून तिचे स्वरुप कायम असावे. (2) अलिकडे या संस्थेवर प्राप्तीकर बसविण्यात आला आहे. नाबार्ड ही आर्थिक लाभासाठी व्यवहार करीत नसून ग्रामीण पतपुरवठ्यास सहाय्य करणारी संस्था आहे. त्यामुळे तिच्यावर प्राप्तीकर लादणे अनुचित आहे. म्हणून हा निर्णय काही वर्षे पुढे ढकलावा व त्यावर पुनर्विचार करावा. (3) ग्रामीण पतपुरवठा संस्थांवर देखरेख ठेवण्याची यंत्रणा अधिक मजबूत करावी. जिल्हास्तरावर विकास व देखरेख अधिकारी नेमावेत. त्यांनी पतपुरवठा संस्थांचे व्यवस्थापन सुधारण्यासाठी मदत करावी. (4) जिल्हा व शिखर सहकारी बँकांसाठी मार्गदर्शिका तयार करावी. (5)सहकारी पतपुरवठा संस्थांचा आढावा घेणारा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करावा. त्यात सर्व तऱ्हेची माहिती उपलब्ध असावी.

**केंद्र सरकार** - (1) रिझर्व्ह बँकेने बोलाविलेल्या वार्षिक परिषदेत सहभागी व्हावे. (2) नाबार्डवरील प्राप्तीकर पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा (3) आंतरराज्यीय सहकार कायद्यातील स्वायत्ततेला बाधा पोहोचविणाऱ्या तरतुदी काढून टाकाव्यात.

**राज्य सरकार** - (1)कर्जवसूलीसाठी सर्वतोपरी सहाय्य करावे. (2) जिल्हा स्तरावरील पतपुरवठा नियोजनात व योजनेच्या कार्यवाहीत सकारात्मक सहभाग घ्यावा.

**सामाजिक जबाबदारी** - सामाजिक व धार्मिक नेत्यांनी कर्जाची परतफेड ही नैतिक जबाबदारी आहे यासाठी जनमत तयार करावे. स्वयंसेवी संस्थांनाही स्वसहाय्य गटांची निर्मिती व विकास यात मोठे योगदान करावयाचे आहे.

तज्ज्ञसमितीचा अहवाल ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेला नवी दिशा देऊ शकेल. पण त्याची कार्यवाही तत्परतेने झाली पाहिजे. यासाठीच हजारो पानांचा शोधनिबंध तयार न करता सुटसुटीत परंतु ठोस सूचना देणारा अहवाल तज्ज्ञ समितीने सादर केला आहे. ग्रामीण विकासात रस आसणाऱ्या सर्वांनीच या समितीच्या शिफारशींचा पाठपुरावा केला पाहिजे.

●●●

**सांख्यिकीय माहिती**

**संघटीत क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग (%)**

| वर्ष | सार्वजनिक क्षेत्र | खाजगी क्षेत्र | एकूण |
|---|---|---|---|
| 90 | 12.0 | 18.4 | 13.8 |
| 95 | 13.4 | 20.2 | 15.4 |
| 96 | 13.6 | 21.1 | 15.8 |
| 97 | 13.9 | 22.0 | 16.4 |
| 98 | 14.2 | 23.0 | 16.9 |
| 99 | 14.5 | 23.2 | 17.2 |
| 00 | 14.8 | 23.9 | 17.6 |

स्रोत : इटी, इण्टेलिजन्सने संकलीत केलेली माहिती.

विनायक श्रीधर देशपांडे
प्रमुख संपादक

# 73 वी घटना दुरुस्ती आणि विकेंद्रित नियोजन

● र. पु. कुरुलकर

*माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मराठवाडा विद्यापीठ आणि सदस्य, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, औरंगाबाद.*

**प्रास्ताविक :**

भारतात आर्थिक नियोजनाची सुरुवात 1951 साली पहिल्या पंचवार्षिक योजनेने झाली. आतापर्यंत आपल्या देशाने 9 पंचवार्षिक योजना पूर्ण केल्या असून, यावर्षी पासून आपली दहावी पंचवार्षिक योजना (2002-2007) सुरु झाली आहे. रशियन सप्तवार्षिक योजनांच्या अनुभवावरुन भारताने देखील 'केंद्रिय नियोजनाची' कास धरुन, आजपर्यंत बरीच प्रगती केली यात वाद नाही. परंतु या प्रकारच्या नियोजनात सामान्य जनतेच्या गरजांचे प्रतिबिंब उमटेलच असे नाही. 50 वर्षाच्या नियोजनानंतरही जनतेच्या पिण्याच्या पाण्याची सोय आपण करु शकलो नाही, तर हजारो खेडी रस्त्याने जोडू शकलो नाही. साक्षरता प्रमाण, प्राथमिक शिक्षण व आरोग्य सोईबाबत आपण अजूनही खूप मागे आहोत. सन 1998 सालच्या यु.एन.डी.पी. च्या अहवाला प्रमाणे, ''मानव विकास निर्देशांकाच्या'' संदर्भात भारताचा क्रम 174 देशांमध्ये 138वा आहे ही गोष्ट निश्चितच भूषणावह नाही. केंद्र सरकारने 1992 मध्ये केलेली 73वी घटना दुरुस्ती(पंचायत संस्थांसाठी) व 74वी घटनादुरुस्ती (नगरपालिका/महानगरपालिका) म्हणजे लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दिशेने टाकलेले एक महत्वाचे पाऊल होय असे म्हणता येईल. या घटना दुरुस्तीमुळे दोन महत्वाचे बदल अपेक्षित होते.

(अ) राज्य निवडणूक आयोगाची स्थापना व

(ब) राज्य वित्त आयोगाची स्थापना

राज्य निवडणूक आयोगाच्या स्थापनेमुळे आता पंचायत राज संस्था व नगरपालिका/महानगरपालिकांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी घेणे आता राज्य सरकारवर बंधनकारक झाले असून या निवडणुकांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर टाकण्यात आली आहे. यापूर्वी अनेक राज्यात (महाराष्ट्रासह) पंचायतराज संस्थांच्या निवडणूका 20 वर्षाचा कालावधी पूर्ण होऊन देखील घेण्यात येत नसत.

राज्य वित्त आयोगाच्या स्थापनेमुळे पंचायत राज संस्था व नगरपालिकांना राज्य सरकारच्या कररुपी एकूण उत्पन्नाचा विशिष्ट भाग मिळणे अपेक्षित आहे. दर 5 वर्षांनी राज्याचे मा. राज्यपाल अशा राज्य वित्त आयोगाची स्थापना करतील.

(केंद्रीय वित्त आयोगाच्या धर्तीवर). या आयोगाच्या शिफारशींमुळे, पंचायत राज संस्था आणि नगरपालिकांच्या उत्पन्नात भरीव वाढ होऊन त्या अधिक कार्यक्षम होतील असे अपेक्षित आहे.

73 व्या व 74 व्या घटना दुरुस्तीमध्ये ''तळापासून नियोजनाची'' संकल्पना अभिप्रेत असून, ''नियोजनात जनतेचा सहभाग'' हा दुसरा महत्वाचा भाग समाविष्ट आहे. या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याने केलेल्या प्रगतीची तुलना केरळ राज्याने 1996 ते 2000 या काळात केलेल्या प्रगतीशी केली आहे. त्यावरुन आपण लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत कुठल्या पातळीवर आहोत हे स्पष्ट होईल. हाच या लेखाचा प्रमुख उद्देश आहे.

**2. महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन :**

महाराष्ट्रात लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया सन 1961 सालच्या ''महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती'' कायद्याने झाली. या कायद्याची प्रत्यक्ष अमलबजावणी सन 1962 पासून करण्यात आली. नियोजनाच्या प्रक्रियेत जनतेचा सहभाग असावा. या दृष्टिकोनातून महाराष्ट्रात पंचायत राज संस्था त्रिस्तरीय करण्यात आली. (1) जिल्हा परिषद, (2) पंचायत समिती, व (3) ग्रामपंचायत. या सर्व स्तरावर निवडणुकीद्वारे प्रतिनिधि निवडून पाठविले जातात.

जिल्हा-जिल्ह्यातील आर्थिक प्रगती आणि विकासाचा वेग असमान असल्याचे लक्षात आल्यानंतर महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्ह्याचा समतोल विकास साधण्याच्या उद्देशाने ''जिल्हा नियोजनाचा'' स्वीकार केला, व 1974 पासून महाराष्ट्रात जिल्हा नियोजनाची सुरुवात केली. म्हणूनच महाराष्ट्र राज्य भारतात जिल्हा नियोजनाच्या क्षेत्रात एक अग्रेसर राज्य समजले जाते.

जिल्हा पातळीवर आर्थिक नियोजनाची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने ''जिल्हा नियोजन आणि विकास मंडळाची'' स्थापना केली. मागील 25 वर्षापासून ही मंडळे कार्यरत असून ग्रामीण भागाचा विकास करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. तरी सुद्धा ही जिल्हा नियोजन मंडळे, तालुका-तालुक्यातील असंतुलन कमी करण्यात अयशस्वी ठरली आहेत असे अनेक अभ्यासावरुन स्पष्ट होते. वास्तविक पाहता असे असंतुलन कमी करणे हे त्यांचे अनेक उद्दीष्टापैकी एक प्रमुख उद्दीष्ट असावयास हवे. जिल्हा नियोजनाच्या 25 वर्षानंतरही पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील अवर्षणग्रस्त तालुके फारशी प्रगती करु शकले नाहीत हे सुद्धा जिल्हा नियोजनाच्या धोरणाचे अपयश म्हटले पाहिजे.

सध्याच्या जिल्हा नियोजन आणि विकास मंडळावर करण्यात येणारी प्रमुख टीका म्हणजे, जिल्ह्याच्या नियोजनाचा आराखडा राज्य सरकारच्या खाते प्रमुखाकडूनच तयार केला जातो. प्रत्येक जिल्ह्याला त्या वर्षीच्या नियतव्ययाची कमाल मर्यादा देण्यात येते. निरनिराळ्या खात्यांच्या अधिकाऱ्यांनी केलेली मागणी ही या मर्यादेपेक्षा दुप्पट/तिप्पट असते. शेवटी फेरफार करुन ही मागणी शासनाने दिलेल्या कमाल मर्यादेत बसविली जाते. अशा प्रकारे सर्व जिल्ह्यांच्या नियोजनाचा आराखडा एकत्रित करुन राज्याचा नियोजनाचा आराखडा तयार केला जातो. या सबंध प्रक्रियेत 'जनतेचा सहभाग' तर नसतोच, याशिवाय जनतेच्या गरजा काय आहेत, गरजांचा अग्रक्रम कोणता या गोष्टी दुर्लक्षित होतात हे स्पष्ट आहे.

भारत सरकारने केलेल्या 73व्या व 74व्या घटना दुरुस्तीस अनुसरुन महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती' कायदा 1961 आणि '' मुंबई ग्रामपंचायत कायदा 1958'' यात योग्य ते बदल/दुरुस्त्या केल्या आहेत. या बदलांची

अंमलबजावणी 1 मे 1994 पासून सुरु झाली आहे. त्याला आता ''महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती दुरुस्ती कायदा 1994'' असे म्हटले असून त्यात 73व्या घटना दुरुस्तीच्या तरतुदी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. (अ) त्यातील कलम 243 (के) प्रमाणे, शासनाने राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली असून (ब) कलम 243 (आय) प्रमाणे, राज्य वित्त आयोगाची स्थापनाही केली आहे. पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाने आपला अहवाल 1997 मध्ये सादर केला. या आयोगाने केलेल्या अनेक शिफारशीपैकी फारच थोड्या पूर्णत: मान्य तर इतर पण महत्वाच्या पूर्णपणे अमान्य करण्यात आल्या आहेत. बहुतांशी शिफारशी दुरुस्तीसह अंशत: मान्य केल्या आहेत. अलीकडेच मार्च 2002 मध्ये 'दुसऱ्या महाराष्ट्र वित्त आयोगाने' आपल्या शिफारशी शासनास सादर केल्या असून हा अहवाल अद्याप प्रसिद्ध झाला नाही.

### 3. जिल्हा नियोजन समित्या :

73 व्या घटना दुरुस्तीस अनुसरुन महाराष्ट्र शासनाने पूर्वीच्या ''जिल्हा नियोजन आणि विकास समित्या'' (D.P.D.C.) बरखास्त केल्या असून त्याजागी ''जिल्हा नियोजन समित्यांची'' स्थापना केली आहे. महाराष्ट्र शासनाने 9 ऑक्टोबर 1998 रोजी काढलेल्या अध्यादेशाप्रमाणे, आता नव्यानेच स्थापन होत असलेल्या ''जिल्हा नियोजन समित्यांची'' रचना व कार्ये संक्षिप्तपणे पुढील प्रमाणे असतील :

(1) जिल्ह्यातील पंचायती व नगरपालिका यांनी तयार केलेल्या योजना एकत्रित करण्यासाठी व संपूर्ण जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसुदा तयार करण्यासाठी, पोटकलम दोन मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, प्रत्येक जिल्ह्यासाठी किमान 30 व कमाल 50 सदस्यांचा समावेश असलेली एक ''जिल्हा नियोजन समिती'' असेल. ही सदस्य संख्या त्या जिल्ह्याच्या लोकसंख्येवर आधारीत असेल.

2(अ) ज्या जिल्ह्याची लोकसंख्या 20 लक्षापर्यंत असेल अशा जिल्हयात जिल्हा नियोजन समितीत 30 सदस्य असतील. लोकसंख्या 20 लक्ष ते 30 लाखापर्यंत असल्यास सदस्य संख्या 40, तर लोकसंख्या 40 लाखावर असल्यास सदस्य संख्या 50 असेल.

**जिल्हा नियोजन समितीची रचना :**

प्रत्येक जिल्हा नियोजन समितीत पुढील सदस्यांचा समावेश असेल

(1) पदसिद्ध सदस्य : (अ)जिल्हयाचा पालकमंत्री (ब) जिल्हापरिषदेचा अध्यक्ष (क) जिल्ह्याकरिता असलेल्या संबंधित वैधानिकविकास मंडळाचा एक प्रतिनिधि (ड) जिल्ह्याचा विभागीय आयुक्त (इ) जिल्ह्याचा जिल्हाधिकारी (फ) जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी.

(2) नाम निर्देशित सदस्य : राज्य शासन 40 सदस्य असलेल्या जिल्ह्यांच्या बाबतीत दोन सदस्य व 50 सदस्य असलेल्या जिल्ह्याबाबत चार सदस्य नामनिर्देशित करु शकेल. अशा सदस्यांना जिल्हा नियोजनाच्या कामकाजा विषयी ज्ञान असावयास हवे.

(3) निवडून दिलेले सदस्य : जिल्हा नियोजन समिती मधील सदस्यांच्या एकूण संख्येच्या किमान एक पंचमांश इतके सदस्य हे जिल्हयातील ग्रामीण क्षेत्राची लोकसंख्या आणि नागरी क्षेत्राची लोकसंख्या यांच्यामधील गुणोत्तर प्रमाणात, जिल्हा पातळीवर पंचायती व नगरपालिकांच्या निर्वाचित सदस्यांनी त्यांच्यामधून निवडलेले असतील.

निवडणुकीद्वारे भरल्या जाणाऱ्या जागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व मागास वर्ग आणि स्त्रियांसाठी जागा राखून ठेवल्या जातील.

(4) विशेष निमंत्रित : जिल्हा नियोजन समितीच्या

क्षेत्रामधून निवडून आलेले संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य विधान मंडळाचे सदस्य, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकांना स्थायी विशेष निमंत्रित असतील.

(5) जिल्हयाचा पालकमंत्री जिल्हा नियोजन समितीचा अध्यक्ष असेल तर जिल्हयाचा जिल्हाधिकारी जिल्हा नियोजन समितीचा सदस्य सचिव असेल.

वरील प्रकारची 'जिल्हा नियोजन समितीची' रचना अजून कार्यान्वीत झालेली नाही. निवडणुका पूर्ण होताच ती अस्तित्वात येईल असे वाटते.

**जिल्हा नियोजन समितीची कामे :**

(1) राज्य शासन आदेशाद्वारे निर्देशित केलेल्या तारखेपासून जिल्हा नियोजनाची कामे समितीवर सोपवील, ज्यात, जिल्हयातील पंचायतींनी आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या वार्षिक योजना विचारात घेणे आणि एकत्रित करणे; आणि संपूर्ण जिल्हयाची विकास योजना तयार करणे.

(2) पंचायतींनी व नगरपालिकांनी तयार केलेल्या पंचवार्षिक योजना व सम्यकदर्शी योजना मसुद्यांचे समन्वय करणे व तो तयार करणे.

(3) जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रगतीचा आढावा घेणे आणि संनियंत्रण करणे, आणि राज्य शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हा वार्षिक योजनेच्या मंजूर तरतुदींचे पुनर्विनियोजन करणे.

(4) विकास योजनेच्या मंजूर मसुद्याची अध्यक्षामार्फत राज्य शासनाकडे शिफारस करणे.

(5) संविधानाच्या अनुच्छेद 243 च्या खंड(3)च्या तरतुदीचे अनुपालन केले जात असल्याची निश्चिती करणे.

(6) राज्य शासनास या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असेल तर कार्यकारी समितीची व उप समितीची रचना करता येईल.

**73 व 74 व्या घटना दुरुस्तीतील प्रमुख तरतुदी :**

73व्या व 74व्या घटना दुरुस्तीमुळे, घटनेतील 11व्या यादीतील 29 कार्ये पूर्णपणे पंचायत राज संस्थांकडे योग्य त्या नोकरवर्गासह हस्तांतरीत करणे अपेक्षित आहे. त्यासाठी लागणारा जादा निधि राज्य वित्त आयोगा मार्फत (बिगट योजना निधि) व योजना निधि पंचायत राज संस्थाकडे हस्तांतरीत होणे आवश्यक आहे. या संदर्भात केरळ राज्याने भारतात आघाडी घेतली असून 1996 ते 2000 या काळात (नववी पंचवार्षिक योजना) वरील घटना दुरुस्तीतील सर्व कलमे अंमलात आणली आहेत. 11व्या यादीतील सर्व 29 कार्ये पंचायत संस्थाकडे हस्तांतरीत केली असून योजना निधिचा 35 ते 40% भाग या संस्थांकडे नोकरवर्गासह हस्तांतरीत केला आहे. यासंदर्भात तुलना केल्यास महाराष्ट्र अजून बराच मागे आहे. पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवाला प्रमाणे (1977), अजूनहि 29 पैकी 9 प्रमुख क्षेत्रे राज्य सरकारने स्वत:कडेच ठेवली आहेत. सरकारने याबाबत दिलेली कारणे फारशी संयुक्तीकही वाटत नाहीत. तसेच एकूण योजना निधिपैकी पंचायत संस्थांना मिळणारा वाटाही केरळच्या तुलनेने फार कमी आहे.

घटनेच्या कलम 243 मध्ये पंचायत संस्थावर नियोजन विषयक पुढील जबाबदारी टाकण्यात आली आहे.

(1) आर्थिक व सामाजिक न्याय या उद्दीष्टास अनुसरुन विकास योजना तयार करणे.

(2) कलम 243 (1) मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, ''प्रत्येक राज्यात जिल्हास्तरावर एक जिल्हा नियोजन समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती पंचायत संस्था व नगरपालिकांनी तयार केलेल्या योजनांचे एकत्रिकरण करुन त्याआधारे त्या जिल्हयाचा एकत्रित असा विकास योजनेचा मसुदा तयार करतील''.

(3) आर्थिक विकास व सामाजिक न्याया संदर्भात सर्व योजनांची अंमलबजावणी पंचायत राज संस्थावर सोपविण्यात यावी. यामध्ये घटनेच्या 11व्या यादीत जी कार्ये दिली आहेत ती कार्ये यात समाविष्ट असावीत. योजना तयार करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निरनिराळ्या स्तरावरील संस्थांची असावी. जिल्हा नियोजन समिती ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांनी तयार केलेल्या नियोजनाच्या आराखड्याची एकत्रिकरण करणारी एक संस्था असून, हे काम करण्याची जबाबदारी या संस्थेवर आहे. अनेक स्तरीय योजनाना एकत्रित स्वरुप देऊन जिल्हयाचे आर्थिक नियोजन करणे हे त्यात अभिप्रेत आहे.

(4) घटनेच्या कलम 243 झेड-डी (3) (अ) मध्ये पुढील गोष्टींचा उल्लेख करण्यात आला आहे. (अ) जिल्हचाचे आर्थिक नियोजन करताना, जिल्हा नियोजन समितीने पुढील बाबी ध्यानात घ्याव्या : '' ज्या बाबी पंचायत राज संस्था व नगरपालिका यांच्या समान जिव्हाळयाच्या असतील अशा बाबींचा नियोजन करताना एकत्रितपणे विचार व्हावा. यामध्ये स्थलीय नियोजन (Spatial Planing) पाण्याचे वितरण, भौतिक व नैसर्गिक संसाधने, पर्यावरण संवर्धन व एकात्मिक आर्थिक आधारभूत संरचनेचा विकास यांचा समावेश असावा.

**प्रत्यक्ष स्थिती :**

वरील माहितीवरुन हे स्पष्ट होते की, घटनेने पंचायत राज संस्था आणि नगरपालिकांना जिल्हा नियोजनाच्या प्रक्रियेत फार व्यापक स्वरुपाचे अधिकार दिले आहेत व जिल्हा नियोजन समितीवर जिल्हचाचा एकत्रित नियोजन आराखडा तयार करण्याचे कार्य सोपविले आहे. परंतु प्रत्यक्षात, काही अपवाद वगळता कोणत्याही राज्य सरकारने आपल्या राज्यातील ''जिल्हा नियोजन समितीला'' वरील प्रकारचे घटनात्मक अधिकार दिलेले आहेत तसेच जिल्हयाचे नियोजनही ग्रामसभेपासून होत नाही. काही राज्यांनी मामुली फेरबदल मात्र केला आहे. परंतु अजूनही नियोजन करण्याचे काम पूर्णपणे नोकरशहांच्या नियंत्रणाखाली असून, अशासकीय तज्ज्ञ केवळ सल्लागार म्हणून काम करतात. उदा. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक वगैरे. फक्त केरळ राज्याने मात्र 1996 पासूनच (नववी योजना), मुळापासून नियोजनाची प्रक्रिया म्हणजे ग्रामसभेपासून राबविली आहे. मे 2000 मध्ये केरळ सरकारने '' विकेंद्रित लोकशाहीच्या'' या नाविन्यपूर्ण प्रयोगाचे मूल्यमापन करण्यासाठी एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते, त्यात प्रस्तुत लेखकाला सहभागी होण्याचा योग आला. लेखाच्या दुसऱ्या भागात केरळ राज्याने विकेंद्रीत नियोजनाच्या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. त्यावरुन महाराष्ट्र राज्यास पुढील काही वर्षे केरळ प्रतिमानावरुन बरेच काही घेण्यासारखे आहे. हे लक्षात येईल

**भाग 2**

**जिल्हा नियोजनाचे केरळ प्रतिमान :**

केरळ राज्याने आपली 9वी पंचवार्षिक योजना, जनतेच्या सहभागावर आधारित अशी तयार करुन राबविली. ही योजना यशस्वी होण्यामागे दोन कारणे आहेत (1) केरळ राज्याने योजना निधिचा 35% ते 40% हिस्सा पंचायत राज संस्थाकडे वळविला व (2) नियोजनाची सुरुवात ग्रामसभेपासून करुन '' नियोजनात जनतेचा सहभाग'' ही संकल्पना प्रभावीपणे राबविली. या दोन्ही गोष्टींचे सविस्तर विवेचन करणे आवश्यक आहे.

(1) वार्षिक योजना निधिचे हस्तांतरण : यापूर्वी सांगितल्याप्रमाणे 73व्या घटना दुरुस्तीस अनुसरुन केरळ राज्याने 11व्या यादीतील सर्व 29 कार्ये स्थानिक स्वराज्य संस्थाकडे निधि व नोकर वर्गासह हस्तांतरित

केली आहेत. विशेष म्हणजे, पंचायत संस्थांना दिल्या जाणाऱ्या निधिपैकी 70% निधि ग्रामपंचायतींना; 15% टक्के पंचायत समितीला तर बाकी 15% जिल्हा पंचायतींना दिला जातो. 1996-97 ते 2000-2001 या पांच वर्षात योजना निधिचे वाटप तीन स्तरावर कसे झाले आहे हे तक्ता-1 मध्ये दाखविले आहे. त्यावरुन हे प्रमाण 1996-97 साली फक्त 10.9 % होते, पण 1997-98 मध्ये 37.92% झाले. हस्तांतरित झालेला निधि दोन प्रकारचा आहे.

(अ) बिनाअट निधि :- ज्याचा वापर पंचायत संस्था आपल्या अग्रक्रमा प्रमाणे करु शकतात तर (ब) योजना आधारित निधि विशिष्ट योजनेसाठी दिला जातो. बिनाअट योजना निधिचे प्रमाण बरेच मोठे असते.

(2) पंचायत संस्थांना मिळणाऱ्या शासकीय अनुदानाशिवाय, इतर मार्गाने जादा निधि उपलब्ध होत असतो ज्यात पुढील स्रोतांचा समावेश होतो : (अ) राज्य स्तरीय योजना (ब) केंद्र पुरस्कृत योजना (क) स्थानिक स्वराज्य संस्थेचा शिल्लक निधि (ड) वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारणी (इ) जनतेच्या देणग्या व (फ) ऐच्छिक श्रमदान.

(3) ग्रामस्तरावर मिळणाऱ्या निधिचे वाटप विशिष्ट निर्देशक वापरुन केले जाते. तक्ता-2 मध्ये निर्देशक व त्यांचे भार दिले आहेत. हे निर्देशक सामाजिक न्यायाचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी उपयुक्त वाटतील.

(4) ग्रामस्तरावर मिळणाऱ्या निधिचा वापर काही मार्गदर्शक तत्वानुसार करावा लागतो.(अ) 40% निधिचा वापर वस्तू उत्पादक कार्यासाठी करणे बंधनकारक आहे. उदा. कृषि व कृषि निगडीत कामे, ग्रामोद्योग वगैरे. (ब) 15% निधि आर्थिक संरचनेसाठी राखून ठेवला जातो, तर (क) बाकीची 15% रक्कम ग्रामस्थांच्या निकडीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरली जाते.

**केरळ राज्यातील नियोजनाचे टप्पे व जनतेचा सहभाग :**

आर्थिक नियोजनात जनतेच्या सहभागाची सुरुवात राज्यातील ग्रामपंचायती / नगरपालिका पासून होतो. स्थानिक स्वराज्य संस्था हा नियोजनाचा पायाभूत घटक समजला जातो. या स्तरावर नियोजनाचा आराखडा तयार करताना पुढील बाबींचा विचार केला जातो.

(अ) खेड्यातील ग्रामस्थांच्या निकडीच्या गरजा.

(ब) स्थानिक उपलब्ध साधनांचा वस्तुनिष्ठ आढावा आणि त्यासंदर्भात आकडेवारीची उपलब्धता.

(क) ग्रामपंचायतीचा विकास आराखडा तयार करणे.

सुरुवातीच्या वर्षी म्हणजे ऑगस्ट/सप्टेंबर 1996 मध्ये केरळ राज्यात प्रथमच ग्रामसभेत स्थानिक गरजावर आधारित विकास योजना तयार करण्यात आली. ग्रामसभेद्वारे नियोजनाच्या प्रक्रियेत साधारण 25 लक्ष व्यक्तिंनी सहभाग घेतला व पुढील प्रकारचे अभ्यास पूर्ण केले.

(अ) दुय्यम स्वरुपाची आकडेवारी गोळा करणे.

(ब) स्थानिक उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा अभ्यास व ग्रामपंचायतीची भौगोलिक स्थिती.

(क) सध्या चालू असलेल्या निरनिराळ्या विकास योजनांच्या प्रगतीचा आढावा.

(ड) स्थानिक ऐतिहासिक पार्श्वभूमिचे संक्षिप्त विवेचन व नोंद.

(य) ग्रामसभेच्या अहवालाचे एकत्रिकरण.

(र) प्राथमिक सर्वेक्षण व संसाधनांचे

नकाशीकरण(Mapping Resources).

वरील सहा प्रकारच्या अभ्यासातून शेवटी " ग्राम पंचायतीचा विकास अहवाल" तयार केला जातो, जो साधारण 75 ते 100 पृष्ठाचा असतो. पहिल्या प्रकरणात खेड्यातील प्रशासकीय यंत्रणा, स्थानिक इतिहास व सामाजिक चळवळीचा संक्षिप्त आढावा घेण्यात येतो. दुसऱ्या प्रकरणात स्थानिक नैसर्गिक साधन संपत्ती व उपलब्ध मनुष्य बळाचे विश्लेषण केले जाते. त्यानंतरच्या 12 प्रकरणात खेड्याच्या संदर्भात प्रत्येक क्षेत्राचे (रस्ते, सोयी वगैरे) विश्लेषण व सद्यस्थितीचे वर्णन असते. तसेच खेड्यात चालू असलेल्या योजनांचा आढावा घेऊन त्यातील अडचणी व त्यावरील संभाव्य उपायांची चर्चा असते. असे या ग्रामपंचायतीच्या अहवालाचे स्वरुप असते. नंतर या अहवालावर परिपूर्ण अशी चर्चा ग्राम पातळीवरच एका परिसंवादात केली जाते. चर्चेच्या शेवटी हा अहवाल सर्व संमतीने मान्य केला जातो. सबंध केरळ राज्यात तीन लाखापेक्षा अधिक व्यक्तिंनी अशा प्रकारच्या परिसंवादात सहभाग घेतला असावा असा अंदाज आहे.

(2) 'जनतेच्या सहभागाने नियोजन' या प्रक्रियेतील दुसरा टप्पा म्हणजे प्रत्येक ग्राम पंचायतीने / नगरपालिकेने तयार करावयाची वार्षिक योजना होय. कारण ग्रामसभेने तयार केलेल्या " ग्रामपंचायत विकास अहवालातील" शिफारशींची संख्या फार मोठी असते व त्या सर्व अंमलात आणणे निधिच्या मर्यादेमुळे अशक्य असते. त्यामुळे साहजिकच ग्रामपंचायतीस निधिची उपलब्धता ध्यानात घेऊन प्रथम गरजांचा अग्रक्रम ठरवावा लागतो व जेवढा निधि उपलब्ध तेवढयाच योजनांची निवड करुन त्यांचा समावेश खेडयाच्या वार्षिक योजनेत करावा लागतो. हे काम करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीत 12 कार्य समित्यांची नियुक्ती केली जाते. प्रत्येक कार्यसमितीत साधारण 10 ते 12 सदस्य असतात. ही कार्यसमिती वार्षिक योजनेतील प्रत्येक योजना शासन मान्य मार्गदर्शक तत्वास अनुसरुन आहे किंवा नाही हे तपासते. सोयी साठी 'नमुना योजना प्रस्ताव' सर्व ग्राम पंचायतींना वितरीत केले जातात, ज्यामुळे ग्रामपातळीवर वार्षिक योजना तयार करणे सोपे जाते. तसेच प्रत्येक योजनेचा सरासरी खर्च दर्शविणारे तक्तेही एका स्वतंत्र पुस्तिकेत देण्यात येतात. उदा. शाळांच्या खोल्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे, घरकुले, रस्ते, समाज मंदिरे, वगैरे खर्चामध्ये (1) भांडवली खर्च, कच्च्या मालाचा खर्च (2) कुशल व अकुशल कामगारांची संख्या, ही माहिती असते. त्यामुळे ग्राम पातळीवर योजना तयार करणे फार सोयीचे होते.

ग्रामपातळीवर वार्षिक योजना तयार करण्याची प्रक्रिया बरीच प्रगतीपथावर आल्यानंतर पंचायत समिती स्तरावर वार्षिक नियोजनाचा आराखडा तयार करण्याचे काम सुरु होते. या स्तरावर त्याच त्या योजनांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेतली जाते, व या स्तरावरील योजना खालच्या स्तरावरील योजनांना पूरक ठरतील हे पाहिले जाते. अशा प्रकारे सर्व स्थानिक योजनांचे एकत्रिकरण गट पातळीवर केले जाते.


(3) तिसऱ्या टप्प्यात तालुका व जिल्हा स्तरावरील नियोजनाचा समावेश केला जातो. या दोन्ही स्तरावर प्रत्येकी 15% योजना निधि उपलब्ध असतो. या स्तरावर सर्व योजनांचे एकत्रिकरण करुन गट व जिल्हा स्तरावरील योजनांचा त्यात समावेश केला जातो.

(4) या शेवटच्या टप्प्यावर तळापासून आलेल्या योजनांचे व प्रकल्पांचे एकत्रिकरण करुन अंतिम जिल्हा नियोजनाची प्रक्रिया पूर्ण केली जाते. केरळ राज्याचा या संदर्भातील अनुभव लक्षात घेता असे दिसून येते की, अजूनही नियोजनाच्या प्रक्रियेत निरनिराळ्या स्तरावर एकसूत्रता नाही, तसेच वरच्या

स्तरावरुन जी माहिती हवी आहे ती मिळविण्यात अडचणी व विलंब लागतो. त्यामुळे ही नियोजनाची प्रक्रिया यशस्वी करावयाची झाल्यास त्यासंबंधीची पूर्वतयारी किमान 3/4 वर्षे अगोदर करणे गरजेचे आहे, तरच ही पद्धत स्थायी स्वरुपाची ठरु शकेल. विक्रेंद्रित नियोजनाचे वरील चार टप्पे पुढील आकृतित स्पष्ट केले आहेत.

**आकृती -1**

केरळ राज्यातील विकेंद्रित नियोजनाची प्रक्रिया दर्शविणारी आकृती




**तक्ता क्र.-1**

केरळातील पंचायत राज संस्थांना वार्षिक योजना निधिचे हस्तांतरण (कोटी रु.)

| वर्ष | राज्याची वार्षिक योजना | ग्रामपंचायत बिनाअट | ग्रामपंचायत योजनाआधा. | पंचायत समिती बिनाअट | पंचायत समिती योजना | जिल्हा पंचायत बिनाअट | जिल्हा पंचायत योजना | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1996-97 | 2200 | 100.00 | 80.88 | 15.00 | 17.80 | 28.00 | 12.30 | 253.98 (11.54) |
| 1997-98 | 2855 | 420.48 | 86.38 | 108.70 | 288.45 | 123.94 | 54.91 | 1082.86 (37.93) |
| 1998-99 | 3100 | 549.54 | 65.06 | 135.02 | 97.52 | 142.67 | 27.94 | 1017.75 (32.83) |
| 1999-2000 | 3250 | 595.01 | 44.24 | 144.41 | 56.08 | 148.39 | 21.35 | 1009.48 (31.06) |
| 2000-01 | 3535 | 608.91 | 27.46 | 148.79 | 36.51 | 153.06 | 30.67 | 1005.40 (28.44) |

स्त्रोत : Status of Pachayat Raj in Kerala, State planning Board Kerala, May 2000

(कंसातील आकडे वार्षिक योजना निधिशी % प्रमाण आहेत)

**तक्ता क्र.-2**

योजना निधिचे वाटप ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापंचायत मध्ये पुढील सूत्राने केले जाते

| अ.क्र. | निर्देशक | ग्राम पंचायत (भार) | पंचायत समिती (भार) | जिल्हा पंचायत (भार) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसंख्या (मागास जाती/ जमाती वगळून) | 65 | 65 | 55 |
| 2 | भौगोलिक क्षेत्र (जंगल क्षेत्र वगळून) | 5 | 10 | 15 |
| 3 | भाताखालील क्षेत्र | 5 | - | - |
| 4 | ग्रामपंचायतीचे स्वत:चे उत्पन्न | 10 | - | - |
| 5 | शेतमजूर, मत्स्यव्यवसाय, पशु संवर्धन यात गुंतलेल्या मजुरांचे प्रमाण, सीमांत शेत मजुरांचे प्रमाण या सर्वांचा संयुक्त निर्देशांक | 15 | 25 | 20 |
| 6 | स्वच्छता गृहे व वीज नसलेली घरे यांचा संयुक्त निर्देशांक | - | - | 10 |
| | एकूण | 100 | 100 | 100 |

स्त्रोत : Status of Pachayat Raj in Kerala, State planning Board Keral Planning May 2000

**तक्ता क्र.-3**

1996 ते 2000 या काळात 'जनतेचा नियोजनात सहभाग' या चळवळीने केरळ राज्यात साध्य केलेली काही प्रमुख उद्दीष्टे :

| घटनाक्रम | उद्दीष्टपूर्ती | विकेंद्रीत लोकशाही व विकासाच्या दृष्टीने महत्व |
|---|---|---|
| 1 | राज्याच्या वार्षिक योजना निधिच्या 35% ते 40% निधिचे, नोकर वर्गासह, स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरण | वित्तीय विकेंद्रिकरण |
| 2 | तीस लक्ष व्यक्तिंचा ग्राम सभेच्या नियोजन प्रक्रियेत सहभाग | जनतेचा सहभाग |
| 3 | छोटया गट सभे द्वारे चर्चा सत्राचे आयोजन | ,, |
| 4 | खेडयासंबंधी आकडेवारी व माहिती गोळा करणे | ,, |
| 5 | खेडयाचा पंचायत विकास अहवाल तयार करुन, त्यावर चर्चासत्र आयोजित करणे | ,, |
| 6 | नियोजनाचा वार्षिक मसुदा तयार करणे; गावाच्या गरजांना अग्रक्रम देणे व मान्य योजनांची अंमलबजावणी करणे | ,, |
| 7 | भ्रष्टाचार नष्ट अथवा कमी करणे | शासन सुधारणा |
| 8 | योजनेतील भौतिक उद्दीष्टे साध्य करणे | जनतेच्या जीवन मानात गुणवत्ता वाढ |

| | | |
|---|---|---|
| 9 | नियोजनात ऐच्छिक श्रमदान मिळविणे, उत्पादनासाठी निविष्टी | ,, |
| 10 | महिलांसाठीच्या योजनात त्यांचा सहभाग मिळविणे | ,, |
| 11 | मागास जाती/जमाती साठीच्या योजनासाठी निधि उपलब्ध करणे | ,, |
| 12 | जनतेचे शिक्षण (साक्षरता) व प्रशिक्षण करणे | स्थायी विकास |
| 13 | अपवादात्मक अशा काही उत्कृष्ट ग्रामपंचायतींचे इतर ग्रामपंचायती समोर आदर्श म्हणून उदाहरण ठेवणे | ,, |
| 14 | पंचायत संस्थांच्या निरनिराळया स्तरावर योजनांच्या अग्रक्रमांचे विभाजन करणे | शासन सुधारणा |
| 15 | सेन समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार ''जनतेच्या सहभागाच्या'' चळवळीची कायदेशीर व संस्थात्मक बांधणी करणे | स्थायी विकास |
| 16 | कुटुंबांच्या छोटया वस्त्यांची निर्मिती करणे | जनतेचा सहभाग |
| 17 | पंचायत कार्यालयाचे संगणीकीकरण करणे | शासन सुधारणा |
| 18 | पर्यावरणासंबंधी चर्चा व जल संधारणाविषयी जनजागृती करणे | स्थायी विकास |

स्त्रोत : "The Kerala Decentralization Experiment" by Richard W. Franke and Barbara H. Chasin Research Paper presented at the International Coference on " Democratic decentralization", Thiruananthpuram, Kerala, May-23-27,2000.

**मार्गदर्शक तत्वे :**

नियोजन करण्यापूर्वी शासन प्रत्येक स्तरावर काही मार्गदर्शक तत्वे प्रसारीत करते. स्थानिक स्वराज्य संस्थांनी तयार केलेल्या निरनिराळया योजना जिल्हास्तरावर मान्य झालेल्या योजनांशी कितपत मेळ साधतात याचा अभ्यास केला जातो. जर त्यात फार मोठा फरक असल्यास तो दुरुस्त कसा करता येईल ? ऐवढेच नव्हे तर स्थानिक स्तरावर मान्य झालेल्या योजना व जनतेने (ग्रामसभेत) मांडलेल्या समस्या यांच्यात किती मेळ आहे ? या सर्वांचा अभ्यास करुन मार्गदर्शक तत्वांत बदलही करता येतात. जिल्हयाच्या यथार्थदर्शी योजनेत विभागवार कोणकोणते विषय असतात याची यादी परिशिष्ट 1 मध्ये दिली आहे.

**केरळ राज्याने साध्य केलेली उद्दीष्टे :**

(1) 1996 ते 2000 या चार वर्षात केरळ राज्याने ''जनतेच्या सहभागाने नियोजन'' या चळवळीने कोणकोणती उद्दीष्टे साध्य केली याचे संक्षिप्त विवेचन तक्ता-3 मध्ये दिले आहे. त्यात एकूण 18 घटनांपैकी 6 घटनामध्ये जनतेच्या सहभागाचे उद्दीष्ट साध्य झाल्याचे दिसते. 4 घटनाक्रमात स्थायी विकासाचे तर 3 घटकामध्ये शासन सुधारणाचे उद्दीष्टे साध्य झाले आहे. जनतेच्या जीवनमानात सुधारणा करण्याचे उद्दीष्ट 4 घटनाक्रमात दिसते.

(2) 9व्या योजनेच्या पहिल्या दोन वर्षातच केरळ राज्यात 98,500 घरे बांधण्यात आली. पुढील तीन वर्षात प्रत्येक कुटुंबास घर हे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

(3) याच काळात एकूण 2,40,300 शौचकुपे व 17,489 सार्वजनिक नळांची व्यवस्था करण्यात आली. 2003 सालापर्यंत प्रत्येक कुटुंबास शौचकूप व 200 मीटर अंतराच्या आत शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणार आहे.

(4) वयोगट 7-11 मधील प्रत्येक मुले/मुलींना प्राथमिक शिक्षणाची सोय मिळणार आहे.

**केरळ राज्याच्या प्रगतीची कारणे :**

शेवटी, केरळ राज्याने विकेंद्रित नियोजनाच्या क्षेत्रात केलेल्या विस्मयजनक प्रगतीस कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरल्या हे पाहणे उद्बोधक ठरेल.

(अ) कम्युनिस्ट मार्क्सिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते व विचारवंत इ. एम्. एच्. नंबुद्रीपाद यानीच सर्वप्रथम नियोजनात जनतेचा सहभाग ही संकल्पना मांडली व या संकल्पनेस एक सैद्धांतिक बैठक दिली. त्याच पक्षाच्या नायनार सरकारने ही संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणली व यशस्वी करुन दाखविली. साहजिकच या नावीन्यपूर्ण प्रयोगाचे श्रेय केरळीय जनता नंबुद्रीपाद यांना देते.

(ब) केरळातील अनेक अर्थशास्त्रज्ञ व विशेष करुन सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. के. एन. राज व त्यांनी स्थापन केलेली इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज, केरळ राज्य नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. आय. एस. गुलाटी, डॉ. इसाक यांनी या चळवळीस दिलेले सैद्धांतिक पाठबळ महत्त्वपूर्ण मानले जाते.

(3) केरळातील केरळ विज्ञान परिषद व केरळ साहित्य परिषद या संस्थांनी आर्थिक नियोजनात जनतेचा सहभाग'' या चळवळीत सिंहाचा वाटा उचलला आहे असे तेथील स्थानिक चर्चेवरुन समजले.

(4) केरळ राज्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे 90% पेक्षा अधिक असे स्त्री, पुरुष, साक्षरता प्रमाण होय. त्यामुळे राजकीयदृष्ट्या केरळीय जनता अतिशय जागृत आहे हे जाणवले. नियोजनात जनतेचा सहभाग ही चळवळ यशस्वी करण्यात या दोन घटकांचा प्रभाव व फायदा केरळ राज्याला मिळाला असे म्हणता येईल.

पुढील 2/3 वर्षात महाराष्ट्रासह भारतातील इतर राज्यात घटनेच्या 73 व 74 व्या घटना दुरुस्तीची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने करावयाची झाल्यास केरळ प्रतिमानाच्या धर्तीवर विकेंद्रित नियोजनाची अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे असे वाटते.

**संदर्भ सूची:**


(1) State Legislation on Panchayati Raj : Rajiv Gandhi Foundation, New Delhi, September 1993

2) The first Maharashtra State Finance Commission Report, Govt. of Maharashtra, Mumbai, Jan. 1997.

3) The Maharashtra Zilla Parishad and, Panchayat Samiti Act, 1961, Govt. of Maharashtra, Mumbai, 1962

4) The Bombay Village Panchayat Act 1958, Govt. of Mumbai.

5) Development Perspective : First step in the the Formulation of a District Plan : A case study of Thiruananthpuram Dist. Editors : Mridul Eapen, Srikumar Chattopadhyay. Joy Elamon : State Planing Board, Kerala, May 2000.

6) Pachayati Raj in India-Status Report, 1999 : Rajiv Gandhi Foundation, New Delhi, March 2000.


**परिशिष्ट-1**

केरळातील जिल्हा नियोजनाचा आराखडा

भाग 1 : जिल्हयाची यथार्थदर्शी विकास योजना

1.0 उपलब्ध साधन संपत्ती व विकास
1.1 प्रास्ताविक
1.2 विकासाचा इतिहास
1.3 नैसर्गिक साधन संपत्ती
1.4 लोकसंख्या व श्रमशक्ति
2.0 वस्तु निर्माणक क्षेत्रे व आर्थिक संरचना
2.1 कृषिक्षेत्र

2.2 पशुसंवर्धन
2.3 मत्स्य व्यवसाय
2.4 उद्योग क्षेत्र
2.5 सहकार
2.6 नागरी विकास
2.7 ऊर्जा
2.8 वाहतुक व दळणवळण
2.9 वित्त
3.0 सामाजिक व विशेष क्षेत्रे
3.1 आरोग्य
3.2 पिण्याचे पाणी व स्वच्छता
3.3 गृहनिर्माण
3.4 शिक्षण
3.5 सामाजिक कल्याण
3.6 संस्कृति
3.7 मागास जाती व मागास जमातीचा विकास
3.8 स्त्रीयांचे प्रश्न व त्यांचे विश्लेषण
भाग-2 स्थानिक स्वराज्य संस्थाच्या योजनांचे एकत्रिकरण
4.1 वित्तीय संसाधनाची उपलब्धता.
4.2 क्षेत्रवार गुंतवणूक
4.3 विशेषघटक योजना व आदीवासी उपयोजना
4.4 स्त्री घटक योजना
4.5 राज्य व केंद्रशासनाचे प्रकल्प योजना.
4.6 नियोजन प्रक्रियेचा टीकात्मक आढावा
भाग-3 मार्गदर्शक तत्वे
5.1 बंधनकारक मार्गदर्शक तत्वे
5.2 सूचना/शिफारशी

●●●


## मराठी अर्थशास्त्र परिषद

**प्रकाशन पाचवे व सहावे**

**मूल्य व वितरण (भाग 1 आणि 2) लेखक : ग. प्र. पिंपरकर**

बी.ए. आणि एम.ए. च्या अभ्यासक्रमासाठी उपयुक्त ग्रंथ

या ग्रंथाचे भाग 1 आणि 2 स्वतंत्रपणे आता विद्यार्थी व अध्यापकांना पुनर्मुद्रित स्वरुपात उपलब्ध झाले आहेत. प्रत्येक भागाची किंमत रु. 200/- आहे. पाच वा अधिक प्रती घेणाऱ्यांना विशेष सूट मिळेल. पुस्तकाच्या प्रतींसाठी वितरकांकडे/कार्यवाहांकडे मागणी करावी.

वितरक : अनमोल प्रकाशन. अप्पा बळवंत चौक, पुणे 411 002

**सर्जेराव ठोंबरे**

कार्यवाह - खजिनदार

# आर्थिक विकासाच्या त्रिदशकात भारतीय स्त्रियांचे स्थान ( 1971-2001 )

● धनश्री महाजन
*अधिव्याख्याता, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

**प्रास्ताविक :**

भारतीय सभ्यता जगातील एक प्राचीन सभ्यता आहे. भारतात इतिहास काळापासून संस्कृतिचे वैविध्य दिसून येते. हे संस्कृतींचे वैविध्य समकालीन भारतात टिकून आहे. इतिहासात भारतीय स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या तुलनेत निम्न होता असे दाखवतात.

आधुनिक भारतात स्त्री व पुरुष यांच्यासाठी समान हक्क मान्य करण्यात आले आहेत. भारतीय राज्यघटनेने जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्री-पुरुषांना समान हक्क बहाल केले आहेत. सामाजिक सुधारणा हा भारतीय स्वातंत्र्य लढ्याचाच एक भाग मानला गेला होता. ज्योतिबा फुले, राजा राममोहन रॉय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर अनेकांनी अस्पृश्य व सर्व जाती-धर्माच्या स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यावर भर दिला. त्या काळात देशी भाषांतील दोहयांमधून अनेकदा स्त्रियांबाबत अनुदार उल्लेख केले जात. (ढोल, घोडयाचा नाल, पशु, आणि स्त्रिया या सर्वांची लायकी मार खाण्याचीच आहे अशा आशयाचा एक दोहा आहे. ढोल, नाल, पशु और नारी सब ताडन के अधिकारी).

आधुनिक भारताच्या इतिहासात सर्वसामान्य स्त्रियांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची संधी पहिल्यांदा महात्मा गांधींनी दिली. इ.स. 1918 साली ''यंग इंडिया'' दैनिकात महात्मा गांधीनी स्त्रियांबाबत विचार मांडले होते, ''स्त्री ही पुरुषाची सहचारिणी आहे. तिची मानसिक क्षमता पुरुषाच्या बरोबरीची आहे. तिचा देखील पुरुषाइतकाच स्वातंत्र्यावर हक्क आहे...फक्त एका दुष्ट रुढीमुळे अत्यंत अज्ञानी आणि अति सामान्य कुवतीच्या पुरुषांना स्त्रियांपेक्षा श्रेष्ठत्व प्राप्त झाले असून त्यास ते (पुरुष) लायक नाहीत व म्हणून त्यांना ते मिळावयास नको.''

---

प्रस्तुत शोध निबंध 24 ते 26 जुलै 2001 बंगलोर (कर्नाटक) येथे University of Agricultural Sciences, Bangalore आणि Texas A & M University, USA यांनी संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या "International conference on society, Polity and Economy" या आंतरराष्ट्रीय परिषदेत Indian Women and Three Decades of Economic Development: 1971-2001" या शीर्षकाखाली सादर करण्यात आलेल्या शोधनिबंधाचे मराठी रुपांतर आहे.

भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येस (14 ऑगस्ट 1947 रोजी) राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून "दारिद्र्य, अज्ञान, रोगराई व संधीची असमानता नाहीशी करणे" ही भारतासमोरील मुख्य आव्हाने आहेत असे म्हटले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली घटना समितीने मसुदा समिती स्थापन केली होती. जगातल्या लोकशाही राष्ट्रांत जे हक्क स्त्रियांना झगडून मिळवावे लागले ते स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने स्त्रियांना तत्परतेने दिले.

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्याला अर्धशतकाहून अधिक काळ लोटला आहे. अशा परिस्थितीत पंडित नेहरुंनी उल्लेखिलेली आर्थिक आव्हाने कितपत पूर्ण झाली याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे. विश्लेषणासाठी 1971 ते 2001 या त्रिदशकांतील आकडेवारीचा वापर केला आहे.

**उद्दिष्टे :**

1. निवडक आर्थिक निर्देशकांच्या मदतीने भारताच्या आर्थिक विकासाचे मूल्यमापन करणे.
2. जीवनमानाचा दर्जा दाखविणाऱ्या निर्देशांकात सुधारणा आहे कां हे तपासणे.
3. शिक्षणाच्या संधी बाबत स्त्रियांच्या बाबतीतील पूर्वग्रहाचे मापन करणे.
4. भारतातील स्त्रियांच्या आर्थिक कार्यरततेचे मूल्यमापन करणे.
5. निर्णय प्रक्रीयेतील स्त्रियांच्या सहभागाच्या प्रमाणाची चर्चा करणे.
6. निवडक लोकसंख्याशास्त्रीय निर्देशांकातील प्रवृत्तींचा अभ्यास करणे.

**1. भारताच्या आर्थिक विकासाची पातळी :**

भारताने काही क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केली आहे. त्यातही ही कामगिरी लोकशाही व्यवस्थेची चौकटीत व त्या व्यवस्थच्या मर्यादांमध्ये राहून केली आहे. हे विशेष उल्लेखनीय आहे.

भारतीय अर्थव्यवस्था हिंदू अभिवृद्धिदराच्या सापळ्यातून (सकल अंतर्गत उत्पादिताचा वार्षिक अभिवृद्धी 3 टक्केच्या आसपास राहणे) आता बाहेर पडली आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचा अभिवृद्धी दर वाढविण्यासाठी अंतर्गत बचत व गुंतवणुकीत वाढ करणे देखील अत्यंत आवश्यक झाले आहे. निर्देशांकाबाबतही भारताने चांगली कामगिरी दाखविली आहे.

दरडोई नक्त उत्पादिताचा निर्देशांक 1950-51 या पायाभुत वर्षाच्या (100) तुलनेत 1993-94 मध्ये 203 इतका वाढला आहे. 1970-71 ते 1990-91 या काळात कृषी उत्पादन वार्षिक सरासरी 2.5 टक्के दराने तर औद्योगिक उत्पादन सरासरी 5.8 टक्के या वार्षिक दराने वाढले आहे (तक्ता क्र.1 पहा)

त्याच प्रमाणे ग्रामीण व नागरी मासिक दरडोई खर्चात 1972 ते 1993 या काळात वाढ झाली आहे. ग्रामीण भारतात मासिक दरडोई खर्च 1972 या वर्षी 44.2 रुपये होता तो 281.4 रुपये इतका 1993 मध्ये वाढला आहे. नागरी मासिक दरडोई खर्चात 1972 ते 1993 यावर्षात 63.30 रु ते 458 रु अशी वाढ झाली आहे. एकूण दरडोई मासिक खर्चात अन्नधान्यावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण नागरी व ग्रामीण भागात घटले आहे. या प्रकारची अन्नधान्यावर केल्या जाणाऱ्या खर्चाच्या प्रमाणातील घट वास्तविक उत्पन्नातील व राहणीमानाच्या दर्जातील वाढ निर्देशित करते. (तक्ता क्र. 2 पहा)

**तक्ता क्र.-1**

**भारतीय अर्थव्यवस्थेसाठी आर्थिक विकासाचे निर्देशक**

| | 1950-51 | 1960-61 | 1970-71 | 1980-81 | 1990-91 | 1993-94 | वार्षिक बदल 1970-71 ते 90-91(%) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थिर किमतीला दरडोई नक्त राष्ट्रीय उत्पादिताचा निर्देशांक (1950-51=100) | 100 | 120 | 135 | 145 | 197 | 203 | 1.8 |
| कृषि उत्पादन निर्देशांक (1950-51 =100) | 100 | 148 | 191 | 231 | 328 | 342 | 2.5 |
| औद्योगिक उत्पादन निर्देशांक (1950-51 =100) | 100 | 198 | 357 | 546 | 1162 | 1244 | 5.8 |

स्रोत : Amartya Sen & Jean Dreze Omnibus, Oxford, 1999.

**तक्ता क्र.-2**

**ग्रामीण व नागरी मासिक दरडोई खर्च**

| | 1972-73 | 1977-78 | 1983 | 1987-88 | 1993-94 |
|---|---|---|---|---|---|
| मासिक दरडोई उपभोग खर्च (रुपये) फेरी रा.न.स. (ग्रामीण) | 44.2 | 68.9 | 112.5 | 158.1 | 281.4 |
| एकूण खर्चात अन्न धान्याचा वाटा (%) (ग्रामीण) | 72.8 | 64.3 | 65.6 | 63.8 | 63.2 |
| मासिक दरडोई उपभोग खर्च रुपये रा.न.स. फेरी (नागरी) | 63.3 | 96.2 | 164.0 | 249.9 | 458.0 |
| एकूण खर्चात अन्न धान्याचा वाटा (%) (नागरी) | 64.5 | 60.0 | 59.9 | 55.9 | 54.7 |

रा.न.स. रु- राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण, स्रोत : NSSO (1996) & Dubey & Gangopadhyay (1998)

## 2. राहणीमानाचा दर्जा ठरविणाऱ्या निर्देशकातील सुधारणा :

राहणीमानाचे निवडक निर्देशक पुढील प्रमाणे कामगिरी दाखवितात :

1. भारत सरकारने आरोग्यावर केलेल्या खर्चाचे सकल अंतर्गत उत्पादिताशी प्रमाण 1990 ते 1998 या आठ वर्षात 0.6 टक्के इतके आहे. हे प्रमाण अत्यंत अपुरे असून चांगल्या दर्जाच्या आरोग्यसेवा उपलब्ध करण्यासाठी त्यात सरकारने वाढ केली पाहिजे.(World Development Report 2000-2001)

2. भारतात 1975 मध्ये दर 4958 लोकसंख्ये मागे 1 डॉक्टर असे जे प्रमाणे होते ते 1985 मध्ये 2515 लोकसंख्येस 1 डॉक्टर अशा प्रमाणात सुधारले आहे. (मिड टर्म अप्रेझल ऑफ नाइन्थ फाइव्ह इयर प्लॅन, 2001)

3. पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण 1982-85 या काळात 54 टक्के होते ते 1990-96 याकाळात 81 टक्के असे वाढले आहे तरी देखील ग्रामीण अंतर्भागातील खेडयात उन्हाळ्यात पाण्याची टंचाई दिसून येते. भारतात नागरी भागात देखील केवळ 60 टक्के कुटुंबांना घरात नळाचे पाणी उपलब्ध होते. (Approach paper to 10th Five year plan 2002-2007)

## 3. शिक्षणाच्या संधी व स्त्रियांबाबतचा पूर्वग्रह :

साक्षरता : 1991 या वर्षासाठी साक्षर लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर 565 असे होते. याचा अर्थ दर हजार साक्षर पुरुषांमागे साक्षर स्त्रियांची संख्या 565 इतकी होती. इ. स. 2001 या वर्षीच्या जनगणनेत मात्र दर हजार साक्षर पुरुषांमागे साक्षर स्त्रियांची संख्या 666 अशी वाढली आहे .

### स्त्रियांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या संधी :

स्त्रियांना शिक्षणाच्या संधीची उपलब्धता

तक्ता क्र.3

| वर्ष | साक्षरांचे लिंग गुणोत्तर (दर हजार साक्षर पुरुषामागे साक्षर स्त्रियांची संख्या) |
|---|---|
| 1971 | 446 |
| 1981 | 494 |
| 1991 | 565 |
| 2001 | 666 |

स्रोत : भारताची जनगणना

पुरुषांच्या तुलनेत किती प्रमाणात प्राप्त होते हे मोजण्याकरता ची-झीएन-तुआन यांच्या पूर्वग्रह निर्देशांक पद्धतीचा वापर या निबंधात केला आहे. ( Juan 1993)

$$\text{पूर्वग्रह निर्देशांक (शिक्षणाची संधी)} = \frac{\text{साक्षरांचे लिंग गुणोत्तर}}{\text{एकूण लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर}} \times 100$$

पूर्वग्रह निर्देशांक 100 इतका असल्यास स्त्रिया किंवा पुरुष यांच्या बाबत शिक्षणाच्या संधीबाबत कुठलाही पूर्वग्रह नाही किंवा संधीची असमानता नाही असे समजावे. निर्देशांक 100 पेक्षा कमी असल्यास तो जितका कमी असेल तितक्या प्रमाणात स्त्रियांना शिक्षणाच्या संधीची पुरुषांपेक्षा कमी उपलब्धता आहे असे समजावे. निर्देशांक 100 हुन अधिक असल्यास तो जितका अधिक असेल तितक्या प्रमाणात पुरुषांना शिक्षणाच्या संधीची, स्त्रियांपेक्षा कमी उपलब्धता आहे असे समजावे.

पुढील तक्ता क्र. 4 मध्ये शिक्षण संधी बाबत पूर्वग्रह दाखविणारा निर्देशांक 1971,1981,1991 आणि 2001 या वर्षाकरिता दाखविण्यात आला आहे.

1971 यावर्षी भारतात पूर्वग्रह निर्देशांक 48 इतका होता म्हणजे यावर्षी भारतात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना शिक्षणाच्या संधी 52 टक्क्यांनी कमी होत्या.

**तक्ता क्र.4**

| वर्ष | पूर्वग्रह निर्देशांक |
|---|---|
| 1971 | 48 |
| 1981 | 53 |
| 1991 | 61 |
| 2001 | 71 |

1981 या वर्षी या पूर्वग्रह निर्देशांकात 53 इतकी वाढ झाली म्हणजे या वर्षी भारतात स्त्रियांना पुरुषांपेक्षा शिक्षणाच्या संधी 47 टक्के इतक्या प्रमाणाने कमी उपलब्ध होत्या. 1991 यावर्षी पूर्वग्रह निर्देशांक 61 होता म्हणजे स्त्रियांना पुरुषांपेक्षा 39 टक्क्याने शिक्षणाच्या संधी कमी उपलब्ध होत्या. 2001 यावर्षी पूर्वग्रह निर्देशांक 71 असा वाढल्याचे दिसून येते. याचा अर्थ या वर्षी स्त्रियांना मिळणारी शिक्षणाची संधी पुरुषापेक्षा 29 टक्याने कमी प्रमाणात उपलब्ध होती.

### विविध राज्यांमधील स्थिती

1991 या वर्षी भारतातील विविध राज्यांपैकी राजस्थान (37) आणि बिहार (43) ही राज्ये शिक्षणात स्त्रियांबाबत सर्वाधिक पूर्वग्रह दाखवित होती. याचा अर्थ राजस्थानात 1991 या वर्षी स्त्रियांना शिक्षण मिळण्याची संधी पुरुषांपेक्षा 63 टक्क्यांनी कमी होती. 2001 या वर्षी या दोन्ही राज्यांनी लक्षणीय सुधारणा दर्शविली आहे. (तक्ता क्र. 5 पहा)

भारतात शिक्षणाच्या संधीत स्त्रियांबाबत सर्वात कमी पूर्वग्रह दाखविणारे राज्य केरळ हे आहे. केरळ राज्याचा पूर्वग्रह निर्देशांक 94 इतका आहे. याचा अर्थ केरळ राज्यात पुरुषांपेक्षा स्त्रियांना केवळ 6 टक्क्याने शिक्षणाची संधी कमी प्रमाणात मिळते.(तक्ता क्र. 5 पहा) तर महाराष्ट्रात या निर्देशांकात 1991 ते 2001 या काळात 68 वरुन 78 अशी सुधारणा झाली आहे.

एकंदरीत भारतासाठी पूर्वग्रह निर्देशांकात स्त्रियांना अनुकूल अशी वाढ झाल्याचे दिसते. हा निर्देशांक 1971,1981, 1991 व 2001 या वर्षासाठी अनुक्रमे 48,53, 61 व 71 असा वाढला आहे.

**तक्ता क्र.5**

| राज्य | शिक्षण संधीबाबतचा पूर्वग्रह निर्देशांक | |
|---|---|---|
| | 1991 | 2001 |
| राजस्थान | 37 | 58 |
| बिहार | 43 | 55 |
| केरळ | 93 | 94 |
| महाराष्ट्र | 68 | 78 |
| भारत | 61 | 71 |

### प्राथमिक शिक्षण

भारताच्या ग्रामीण व नागरी भागात प्राथमिक शाळात नोंदणी करणाऱ्या मुलींच्याप्रमाणात प्रचंड तफावत आहे. 1987-88 या वर्षी ग्रामीण भागात मुलींच्या प्राथमिक शाळा नोंदणीचा दर 35.25 होता. त्याच वर्षी नागरी भागात हा दर 70.00 इतका होता. हे प्रमाण 1993-94 या वर्षी ग्रामीण भागासाठी 55.4 तर शहरी भागासाठी 80.00 असे वाढले आहे.

**तक्ता क्र.6**

**शाळेत जाणाऱ्या मुलींचे प्रमाण**

| वर्ष | नोंदणी दर वर्ग 1 ली ते 4 थी ग्रामीण मुली | नोंदणी दर वर्ग 1 ली ते 4 थी नागरी मुली |
|---|---|---|
| 1987-88 | 32.25 | 70.00 |
| 1993-94 | 55.4 | 80.00 |

स्रोत : NSSO 1997
Ramachandran, Rawal & Swaminathan (1997)

ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण शहरी भागातील मुलींपेक्षा कमी आहे याचे कारण म्हणजे 5 ते 14 या अवलंबी लोकसंख्येच्या वयोगटातील मुली ग्रामीण भागात अधिक प्रमाणात आर्थिक दृष्टया कार्यरत असतात हे होय. 5 ते 14 या वयोगटातील मुलींची आर्थिक कार्यरतता म्हणजेच शिक्षणाची संधी नाकारली जाणे ही बाब गंभीर आहे.

### अनुसूचित जाती व जमातीतील स्त्रियांची साक्षरता

भारतात अनुसूचित जाती व जमातीतील लोक सामाजिक दृष्टया उपेक्षित व वंचित घटकांत येतात. अनुसूचित जातीतील स्त्रियांचा साक्षरता दर 1971 मध्ये 6.4 टक्के होता तो 1991 मध्ये 23.8 टक्के इतका वाढला आहे. अनुसूचित जमातीतील स्त्रियांचा साक्षरता दर 1971 मध्ये 4.9 टक्के होता तो 1991 मध्ये 18.2 टक्के इतका वाढला आहे. परंतु या दोन्ही गटातील स्त्रियांचा साक्षरता दर सर्वसाधारण स्त्री साक्षरता दरापेक्षा (1991 मध्ये 39.3 टक्के) फार कमी आहे. ही प्रचंड तफावत भरुन काढण्यासाठी स्त्री साक्षरतेच्या कार्यक्रमात सामाजिक दृष्ट्या दुर्बल गटातील स्त्रियांच्या साक्षरतेवर भर दिला पाहिजे. (तक्ता क्र. 7 पहा)

**तक्ता क्र. 7**

**अनुसूचित जाती व जमातीच्या स्त्रियांचा साक्षरता दर**

| वर्ष | स्त्री साक्षरता दर | पुरुष साक्षरता दर |
|---|---|---|
| 1971 | 18.7 | 39.5 |
| 1991 | 39.1 | 64.1 |

स्रोत : Mid term appraisal of 9th Five year plan, October-2000

शैक्षणिक दृष्टया पात्रता जेवढी अधिक तितके अधिक वेतन स्त्रियांना मिळते असे अभ्यासाद्वारे सिद्ध झाले आहे. स्त्रियांना निरक्षर ठेवल्यामुळे आर्थिक अभिवृद्धीला खीळ बसते. जो समाज स्त्रियांच्या शिक्षणात गुंतवणूक करीत नाही असा समाज मानवी भांडवलाच्या पूर्ण क्षमता पातळीला पोहचत नाही. कारण स्त्री साक्षरतेकडे दुर्लक्ष केल्यामुळे स्त्रियांना शिक्षणाच्या संधीची उपलब्धता नाकारली जाते आणि त्यामुळे मानवी भांडवलाचा विकास मंद गतीने होतो.

### केंद्र सरकारचा शिक्षणावरील खर्च

1980 सालच्या तुलनेत 1997 या वर्षी केंद्र सरकारचे शिक्षणावरील खर्चाचे सकल राष्ट्रीय उत्पादिताशी प्रमाण 3 टक्क्या वरुन 3.2 टक्के असे वाढले आहे. सतरा वर्षाच्या काळात शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण केवळ 0.2 टक्के ने वाढले आहे. ही वाढ अत्यंत अपुरी आहे. भारतात 1951 मध्ये शिक्षक विद्यार्थी गुणोत्तर (प्राथमिक शिक्षण) 1:24 असे होते ते 1998 मध्ये 1:42 असे वाढले आहे. सरकारने नवव्या पंचवार्षिक योजनेत प्राथमिक शिक्षणावर भर देऊन देखिल अशी परिस्थिती दिसून येते. शिक्षक विद्यार्थी गुणोत्तरावरुन हे स्पष्ट होते की शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्राथमिक शिक्षकांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. वाढत्या शिक्षक विद्यार्थी गुणोत्तराचा अध्यापनाच्या गुणवत्तेवरील परिणाम व विद्यार्थ्यांच्या शाळेबाबतच्या उदासीनतेच्या संदर्भातील सहसंबंध हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरु शकेल.

### 4. स्त्रियांचा प्रशासकीय व राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग :

भारतात 1987 मध्ये महिला आय. ए. एस. आय.पी. एस. अधिकाऱ्यांचे प्रमाण 5.4 टक्के होते ते 2000 या वर्षी 7.6 टक्के असे वाढले आहे. संसदेतील स्त्री सदस्यांचे प्रमाण 1989 मध्ये 6.1 टक्के होते ते 1999 मध्ये 8.4 टक्के झाले आहे. 72

तक्ता क्र.8

निर्णय प्रक्रीया(प्रशासकीय व राजकीय)

| अनु.क्र. | निर्देशक | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रशासकीय<br>भाप्रसे व भापोसे<br>(1987,2000) | 360<br>(5.4 टक्के) | 6262 | 645<br>(7.6 टक्के) | 7815 |
| 2 | संसद सदस्य<br>(1989 ,1999) | 47<br>(6.1 टक्के) | 721 | 67<br>(8.4 टक्के) | 723 |
| 3 | केंद्रीय मंत्रीमंडळ<br>(1985 ,1999) | 4<br>(10 टक्के) | 36 | 8<br>(10.9 टक्के) | 65 |

भाप्रसे : भारतीय प्रशासन सेवा , भापोसे : भारतीय पोलीस सेवा

स्रोत : Mid Term Appraisal of 9th Five Year Plan, (1997-2001) Govt. of India, Planning Commission, New Delhi, Oct. 2000

व्या व 73 व्या घटना दुरुस्ती कायद्यानुसार (1992) भारतात सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये एकूण जागांच्या 1/3 जागा स्त्रियांसाठी आरक्षित ठेवणे आवश्यक झाले आहे. इ.स. 2001 हे स्त्री सबलीकरण वर्ष म्हणून साजरे झाले आहे. स्त्रियांसाठी संसदेत आणि राज्य पातळीवर 1/3 जागा आरक्षित करण्याचा मुद्दा सध्या ऐरणीवर आहे. (तक्ता क्र.8 पहा)

महाराष्ट्र सरकारने राज्य सरकारी सेवांमध्ये स्त्रियांसाठी 33 टक्के आरक्षणाचा मुद्दा तत्वत: मान्य केला आहे. इतर राज्यांनी देखिल महाराष्ट्राचे अनुकरण करणे आवश्यक आहे.

**5.भारतातील स्त्रियांची आर्थिक क्रियाशीलता :**

1971 ते 1991 या काळात आर्थिक दृष्टया क्रियाशील स्त्रीयांचे प्रमाण 14.2 टक्के वरुन 22.3 टक्के इतके वाढले तर आर्थिक दृष्टया क्रियाशील पुरुषांचे प्रमाण याकाळात 52.17 टक्के वरुन 51.56 टक्के असे घटले (Mid Term Appraisal of Ninth Five year plan, 1997-2000) आहे. स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचा (एकमेव नसला तरी) आर्थिक क्रियाशीलता हा मोजता येण्यासारखा आणि म्हणून एक महत्वपूर्ण निर्देशांक आहे. भारतात ग्रामीण भागातील स्त्रिया नागरी भागातील स्त्रियांपेक्षा आर्थिक दृष्टया अधिक क्रियाशील आहेत. तक्ता क्र. 9 च्या आधारे असे दिसते की स्त्री रोजगार हा मुख्यत: कृषी क्षेत्रात शेतकरी व शेतमजुर या गटांत केंद्रित झाला आहे. भारतात 1972-73 यावर्षी कृषी क्षेत्रातील स्त्री रोजगाराचे एकूण स्त्री रोजगाराशी प्रमाण हे 84.3 टक्के होते ते 1993-94 मध्ये 78 टक्के म्हणजे एकवीस वर्षानंतर 6 टक्कयांनी घटले. भारतातील कृषी क्षेत्रातील श्रमिक हे असंघटित आहेत. आणि या क्षेत्रात स्त्रीया व पुरुषांना दिली जाणारी वेतनाची पातळी भिन्न-भिन्न आहे. अर्थात स्त्रियांना मिळणारी मजुरी पुरुषांपेक्षा कमी आहे.

तक्ता क्र.9

**क्षेत्रनिहाय स्त्री रोजगाराचे प्रमाण**

**(भारत)**

| अ.क्र. | क्षेत्र | 1972-73 | 1977-78 | 1983 | 1987-88 | 1993-94 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कृषी | 84.3 | 81.8 | 81.2 | 77.7 | 78 |
| 2 | खनिकर्म | 0.3 | 0.2 | 0.4 | 0.5 | 0.4 |
| 3 | वस्तुनिर्मिती | 6.6 | 8.5 | 8.9 | 9.5 | 9.3 |
| 4 | वीज, वायु व पाणी | --- | --- | --- | --- | --- |
| 5 | बांधकाम | 1.3 | 0.8 | 1 | 2.8 | 1.2 |
| 6 | व्यापार | 2.3 | 2.8 | 2.7 | 3.1 | 3.2 |
| 7. | वाहतूक व साठवण | 0.1 | 0.2 | 0.3 | 0.2 | 0.3 |
| 8. | सेवा | 5.1 | 5.7 | 5.5 | 6.2 | 7.6 |
| 9. | सर्व क्षेत्र | 100 | 100 | 100 | 100 | 100 |

स्रोत : T.S. Papola & Alakh N. Sharma (eds), Gender and employment in India, 1998

संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण 1971 मध्ये केवळ 11 टक्के होते ते 1997 पर्यंत म्हणजे 27 वर्षात 17.9 टक्के असे वाढले आहे. हे तक्ता क्रमांक 10 वरुन दिसून येते.

**तक्ता क्र.10**

**संघटित क्षेत्रातील स्त्री रोजगार**

| अनु.क्र. | निर्देशक | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **कार्य व रोजगार**<br>कार्य सहभाग दर<br>(1971 व 1991) | 14.2 | 52.8 | 22.3 | 51.6 |
| 2 | संघटीत क्षेत्र<br>(कामगार) लाखात<br>1971 व 1997 | 19.3<br>11 टक्के | 155.6 | 43.9<br>15.9 टक्के | 231.8 |
| 3 | सार्वजनिक क्षेत्र<br>कामगार संख्या लाखात<br>(1981 व 1996) | 8.6<br>(8 टक्के) | 98.7 | 26.1<br>(13.8 टक्के) | 162.6 |
| 4 | सरकारी सेवक लाखात<br>(1995 व 1997) | 11.9<br>( 11 टक्के) | 97.1 | 15.0<br>(13.9 टक्के) | 92.7 |

स्रोत : Mid Term Appraisal of 9th Five Year Plan, (1997-2000) Govt. of India, Planning Commission, New Delhi, Oct. 2000

स्त्रियांना संसदेत, राज्यसभेत व सरकारी सेवांमध्ये 33 टक्के आरक्षण ताबडतोब लागू केले पाहिजे. कारण जोपर्यंत स्त्रियांना संसदेसारख्या सभागृहात पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही तो पर्यंत त्या मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून दूरच राहतील. शिवाय स्त्रियांचे अपुरे प्रतिनिधित्व भारतीय संविधानातील समानतेच्या उद्दिष्टांशी देखिल विसंगत आहे.

## 6. काही लोकसंख्या शास्त्रीय निर्देशांकातील प्रवृत्ती :

### लिंग गुणोत्तर

2001 च्या नव्या जनगणना अहवालात काही लोकसंख्याशास्त्रीय निर्देशकाबाबत नवी माहिती समोर आली आहे. सर्व वयोगटासाठीच्या लिंग गुणोत्तरात 1991 ते 2001 या काळात 927 वरुन 933 अशी वाढ झाली आहे. परंतु 0 ते 6 वर्षे या वयो गटासाठीचे लिंग गुणोत्तर 1991 च्या तुलनेत 2001 या वर्षी 945 वरुन 927 इतके घटले आहे म्हणजेच मुलींना प्रतिकुल झाल्याचे दिसून येते.

0 ते 6 वर्षे या वयोगटासाठीच्या लिंग गुणोत्तरातील ही घट समाजात मुलाच्या जन्माला आणि अस्तित्वाला असलेले महत्व व दिले जाणारे प्राधान्य व्यक्त करते. यातून भारतात भ्रुणहत्या व बालहत्येचे प्रमाण वाढले असावे असाही एक निष्कर्ष निघतो. या निष्कर्षाला पुष्टी देणारे काही अभ्यास राज्यांच्यापातळीवर बिगर शासकीय संस्थांनी केले आहेत. भ्रूणहत्या व बालहत्येची पद्धत केवळ उत्तर भारतातच आहे हा गैरसमज चुकीचा असल्याचे तामिळनाडू राज्यातील परिस्थितीचा अभ्यास करुन साबू जार्ज यांनी दाखवून दिले आहे ( Times of India, 30-8-2001)

जन्म समयीचे लिंग गुणोत्तर प्रतिकूल असूनही स्त्रियांच्या आयुर्मानात वाढ व मृत्युदरात घट झाल्यामुळे 2001 या वर्षासाठी सर्व वयोगटासाठीच्या

**तक्ता क्र.11**

**भारतातील लिंग गुणोत्तर 1901-2001**

| जनगणना वर्ष | लिंग गुणोत्तर (दर हजार पुरुषांमागे स्त्रिया) |
|---|---|
| 1901 | 972 |
| 1911 | 964 |
| 1921 | 955 |
| 1931 | 950 |
| 1941 | 945 |
| 1951 | 946 |
| 1961 | 941 |
| 1971 | 930 |
| 1981 | 934 |
| 1991 | 927 |
| 2001 | 933 |

स्रोत : Census of India 2001

लिंगगुणोत्तरात वाढ झाली आहे. तेव्हा सर्वसाधारण लिंग गुणोत्तरातील वाढीचे श्रेय भारतीय समाजाच्या स्त्री विषयक दृष्टिकोनातील बदलाला देता येणार नाही हे निश्चित आहे. उलट 0 ते 6 या वयोगटासाठीचे प्रतिकूल लिंगगुणोत्तर भारतीय समाजात स्त्रिया/मुलींबाबत केला जाणारा भेदभाव व्यक्त करते हे तक्ता क्र. 12 च्या साहाय्याने स्पष्ट होते.

**तक्ता क्र.12**

**बालकांचे लिंग गुणोत्तर**

**(0 ते 6 वर्षे या गटात हजार मुलांमागे मुलींची संख्या)**

| वर्ष | लिंग गुणोत्तर |
|---|---|
| 1961 | 976 |
| 1971 | 964 |
| 1981 | 962 |
| 1991 | 945 |
| 2001 | 927 |

स्रोत : Census of India 2001

### जन्मसमयी आयुर्मान अपेक्षा

1970 ते 75 या काळात पुरुषांच्या आयुर्मानाची अपेक्षा (50.5 वर्षे) स्त्रियांपेक्षा (49 वर्षे) जास्त होती. 1993ते 1997 या काळात पुरुष व स्त्रियांचे आयुर्मान वाढले असून स्त्रियांचे आयुर्मान (61.8 वर्षे) पुरुषांच्या आयुर्मानापेक्षा(60.4 वर्षे) वाढले आहे.

### मृत्युदर

स्त्रियांच्या मृत्युदर देखील1983-87 या काळापेक्षा (11.8 टक्के) 1999 मध्ये (8.3 टक्के) घटला आहे. अशा प्रकारे स्त्रियांचा मृत्युदर घटला असला तरी भारतीय बालिकेविरुद्ध भेदभावाची परंपरा सुरुच आहे, हे 0-6 या वयोगटातील लिंग गुणोत्तराच्या आधारे दिसते.

### 7. स्त्रियांविरुद्धचे गुन्हे :

भारतात एकूण गुन्ह्यांच्या प्रमाणात 1997 ते 1998 या एका वर्षात 8.3 टक्के ने वाढ झाली आहे. स्त्रियांवरील अत्याचारी संबंधित एकूण नोंदणी केलेल्या गुन्ह्यांपैकी 31.5 टक्के गुन्हे स्त्रियांच्या छळाच्या तक्रारीशी संबंधित आहेत. 33.6 टक्के विनयभंगाचे गुन्हे, 12.5 टक्के स्त्रियांच्या अपहरणाचे, 11.4 टक्के गुन्हे बलात्काराचे, 6.2 टक्के लैंगिक छळाबाबतचे, 5.3 टक्के हुंडाबळीचे, तर 9.५ टक्के इतर कारणांशी संबंधित गुन्हे आहेत. गुन्ह्यांच्या सर्वाधिक घटना उत्तरप्रदेश (एकूण गुन्ह्यांच्या 13.3 टक्के) मध्य प्रदेश (12.1 टक्के) आणि महाराष्ट्र (10.9 टक्के) ह्या राज्यांत असल्याचे तक्ता क्र. 13 च्या आधारे दिसते. गुन्ह्याच्या सर्वाधिक घटनांची नोंद ही कायदा सुव्यवस्था परिस्थिती समाधानकारक नसल्याचीच द्योतक आहे.

महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती इतर राज्यांच्या तुलनेत समाधानकारक आहे. त्यामुळे जवळच्या पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदविण्याचे धैर्य महाराष्ट्रातील नागरिक करु शकतात. परंतु भारतात अशी राज्ये देखिल आहेत की जिथे लोकांना आपल्या अधिकारांचीही जाणीव नाही आणि जरी असली तरी पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवण्याचे धैर्य निर्माण होईल अशी कायदा सुव्यवस्थेची समाधानकारक परिस्थिती ही नाही म्हणून वास्तवाच्या पातळीवर गुन्ह्यांचे प्रमाण महाराष्ट्रासारख्या राज्यात उच्चतम आहे असे म्हणणे योग्य ठरणार नाही. भारतात स्त्रियांना न्याय आणि संरक्षण मिळावयास हवे असेल तर सर्व राज्यांत कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीत सुधारणा झाली पाहिजे.

**तक्ता क्र.13**

**भारतात स्त्रियांविरुद्धचे गुन्हे**

| | |
|---|---|
| 1.1997 ते 1998 या काळात गुन्ह्यांच्या प्रमाणातील वाढ | 8.3 टक्के |
| 2. भारतीय दंड विधाना अंतर्गत स्त्रियांसंदर्भात गुन्ह्यांची संख्या (1998) पैकी:- | 1.31 लाख |
| स्त्रियांचा छळ | 31.5 टक्के |
| विनयभंग | 23.6 टक्के |
| अपहरण | 12.5 टक्के |
| बलात्कार | 11.4 टक्के |
| लैंगिक छळ | 6.2 टक्के |
| हुंडाबळी | 5.3 टक्के |
| इतर | 9.5 टक्के |
| 3. सर्वाधिक गुन्ह्याचे प्रमाण दाखविणारी राज्ये | |
| उत्तर प्रदेश | 13.3 टक्के |
| मध्य प्रदेश | 12.1 टक्के |
| महाराष्ट्र | 10.9 टक्के |

स्रोत : Mid term appraisal of Ninth five year plan (1997-2002)

## ८. समारोप :

जॉर्ज ऑर्वेल या लेखकाची ' ॲनिमल फार्म' ही प्रसिद्ध कादंबरी आहे. या कादंबरीत लेखकाने एका शेतावरील प्राणी माणसांच्या राज्याविरुद्ध यशस्वी बंड करतात असे दाखविले आहे. या बंडातील प्राण्यांचे नेते एक घोषणा करतात 'सर्व पशू समान आहेत'. या बंडात यशस्वी झाल्यावर काही काळाने हे नेते समानतेच्या तत्वाला मुरड घालून राज्य करु लागतात. यावर त्यांचे काही अनुयायी त्यांना त्या घोषणेची आठवण देऊन जाब विचारतात. त्यावर एक पशू नेता उत्तर देतो की सर्व प्राणी समान आहेतच परंतु तरी काही प्राणी इतर प्राण्यांपेक्षा अधिक समान आहेत.' ही मानसिकता बदलायची असेल तर स्त्रियांना शासकीय निर्णय प्रक्रियेत महत्वाचे स्थान देणे आवश्यक आहे.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत काही क्षेत्रात भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे पण विकासाची ही गती काहीशी मंद आहे. विकासाची अधिक वरची पातळी गाठायची असेल तर भारतात स्त्रियांना अनुकूल असा भेदभाव करुन समाजकारण, राजकारण व अर्थकारणात स्त्रियांना अधिक संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. स्त्रियांना लोकसभेसारख्या कायदा करणाऱ्या सर्वोच्च सभेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले तर स्त्रिया सरकारच्या सर्व धोरणावर निर्णयकारी प्रभाव पाडू शकतात. त्यातूनच स्त्रियांचा विकासही होईल. स्त्रियांचा विकास झाला तरच राष्ट्राचा विकास होईल.

### संदर्भ सूची


1 Ashraf and Ashraf (1996), Evidence on gender wage discrimination from the 1984-85 HIES : a note, Pakistan Journal of Applied Economics 12(1): 85-94

2 Amartya Sen and Jean Dreze Omnibus, Oxford. (1999)

3 Census of India 1971,1981,1991,2001.

4 Dubey and Gangopadhyay (1998) "Counting the poor : Where are the poor in India?", Sarvekshana Analytical Report No.1.

5. Jeffery and Basu (eds.)(1996). Girls schooling, women's autonomy and fertility change in South Asia, New Delhi, Sage Publication.

6. Mahajan D.J. (1998), "Status of Women in India related to employment and education", Paper presented at all India conference on status of women held in Aurangabad, Nov. 11-13, 1998, unpublished.

7. Mid Term Appraisal of Ninth Five Year Plan(1997-2002). Govt. of India, Planning Commission, New Delhi, Oct.2000

8. NSSO (1996), Consumer Expenditure 1993-94. NSS 50th round', Goverment of India.

9. NSSO(1997),"A Note on Economic Acitivities and School Attendance by Children of India, NSS 50th round (July 1993-June 1994), Sarvekshana, Vol.XXI, No.2, 73rd Issue, October-December.

10. Premi Mahendra K.(2001), "The Miss ing Girl Child", Article in Economic and Political Weekly, May 26,2001

11. Ramchandran, Rawal and Swaminathan (1997), " Investment Gaps in Primary Education : A Statewise Study", Economic and political Weekly, Vol 32, Nos 1 & 2, 4th January 1997.

12. Times of India 30-8-2001,"Little Girl Lost", Q & A, Sabu George.

13. T.S Papola & Alakh N. Sharma (eds) "Gender and employment in India" 1998.

14. Tuan Chi-hsien (1993)"Women in China Today", Article in the book titled"Women and Population Dynamics."Edited by K. Mahadeven, Sage Publications, New Delhi.

15. World Development Report-2000-2001.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## सव्विसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सव्विसावे वार्षिक अधिवेशन **दिनांक 17 नोव्हेंबर ते 19 नोव्हेंबर 2002** या दरम्यान परळी वैजनाथ, जिल्हा-बीड येथे होणार आहे. वैद्यनाथ महाविद्यालय, परळी वैजनाथ,यांच्या विद्यमाने हे अधिवेशन आयोजित करण्यात आले असून त्यामध्ये परिषदेच्या सदस्यांनाच फक्त सहभागी होता येईल. अधिवेशनाच्या संयोजकांकडून परिषदेच्या सदस्यांना निमंत्रण व माहिती पत्रक पाठविण्यात आले आहे. प्रतिनिधी शुल्क रुपये चारशे फक्त मनी ऑर्डरने/ डिमांड ड्राफ्टने ''कार्यवाह, अर्थशास्त्र परिषद - 2002, वैद्यनाथ कॉलेज, परळी वै.'' या नावाने स्थानिक कार्यवाहांकडे पाठवावे. नव्याने परिषदेचे सदस्य होऊ इच्छिणाऱ्यांनी आपली सदस्यत्वाची वर्गणी (वार्षिक साधारण सदस्य वर्गणी रु. 150 किंवा आजीव सदस्य वर्गणी रु. 800) परळी येथेच प्रतिनिधी शुल्काबरोबर पाठवावी. या रकमेची रीतसर पावती यथावकाश संबंधितांकडे परिषदेच्या कार्यालयाकडून पाठविली जाईल.

आयत्या वेळेचा विषय (चौथ्या चर्चासत्रासाठी) खालीलप्रमाणे राहील.

**''महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँका - समस्या आणि उपाय''**

अधिवेशनासंबंधी आवश्यक तपशिलासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा :

**प्रा. के. के. पोकरणा, स्थानिक कार्यवाह,**
**मराठी अर्थशास्त्र परिषद, सव्विसावे वार्षिक अधिवेशन,**
**वैद्यनाथ कॉलेज, परळी वैजनाथ - 431515**

**सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह - खजिनदार

## ग्रंथ परीक्षण

# विकास म्हणिजे स्वातंत्र्य

Sen Amartya, Development As Freedom,
Oxford University Press
(Oxford India Paperbacks), 1999, PP. xvi + 366
Price : Rs. 250

● शि. ना. माने
भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

अमर्त्य सेन यांना 1998 चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. ते प्रदान करताना 'कल्याणाविषयक (आदर्शनिष्ठ) अर्थशास्त्र व सामाजिक (सामुहिक) निवड' या क्षेत्रातील सेन यांच्या विशेष योगदानाची नोंद करण्यात आली. त्याबरोबरच अर्थशास्त्र या विषयाशी 'इमान' राखणारे एक अर्थशास्त्रज्ञ म्हणून सेन सुपरिचित आहेत.

नोबेल पारितोषिक प्राप्त झाल्याच्या दुसऱ्याच वर्षी सेन यांनी 'Development As Freedom' (विकास म्हणजे स्वातंत्र्य) हा ग्रंथ लिहिला. ॲरो यानी त्याला 'स्वतंत्रतेतील वाढ' असे संबोधले, तर द इकनॉमिस्टने सेन यांचा 'वैयक्तिक जाहीरनामा'[1] अशी मल्लिनाथी केली.

सदरचा ग्रंथ लिहिण्याची प्रेरणा सेन यांना कशी मिळाली ? या प्रश्नाचे सेन यानी पुढीलप्रमाणे उत्तर दिले आहे : एका बाजुला आपण एका 'अभूतपूर्व समृद्धीत' राहत आहोत आणि दुसऱ्या बाजुला आपण 'वैशिष्ट्यपूर्ण वंचिततायुक्त जगात जीवन व्यतीत करीत आहोत'. या विरोधाभासावर विजय संपादन करणे हा विकासाच्या अभ्यासाचा प्रमुख हेतु आहे. (प्रस्तावना, पृ.xi).

1996-97 मध्ये सेन यांनी दिलेल्या सहा भाषणांवर हा ग्रंथ आधारित असून त्यांची बारा प्रकरणांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. आणखी एक खुलासा. ग्रंथाचे शीर्षक "विकास म्हणिजे स्वातंत्र्य" असले, तरी त्यात आर्थिक, सामाजिक, राजकीय तसेच सांस्कृतिक व्यवहारांच्या एकात्मिक विश्लेषणावर प्रकाश टाकण्यात आला आहे. सेन हे एक अव्वल दर्जाचे तत्वचिंतक आहेत. हे या ग्रंथात प्रतिबिंबित होते. सेन यांनी त्यांच्या विश्लेषणावर सर्व संबंधितांकडून टीका-टिपणीची अपेक्षा केली आहे. केवळ त्याच भूमिकेतून मी या ग्रंथाचे परीक्षण करण्याचे साहस केले आहे.

### नावात काय आहे ?

तत्वचिंतक सेन विकासाकडे दोन दृष्टिकोनांतून बघतात. एक संकुचित, तर दुसरा व्यापक. त्यांच्या शब्दात, "लोक उपभोग घेतात त्या वास्तव स्वातंत्र्यांचा विस्तार करण्याची प्रक्रिया म्हणून विकासाकडे पाहिले जावू शकते, असा येथे युक्तीवाद करण्यात आला आहे" (पृ.3) मानवरुप स्वातंत्र्ये हा

विकासाचा संकुचित अर्थ आहे. त्यानुसार स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, वैयक्तिक उत्पन्नात वाढ, उद्योगीकरण, तंत्रज्ञानातील प्रगती किंवा सामाजिक संघटन यांना विकासाचे अभिन्न अंग मानले जाते. स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील वृद्धि किंवा वैयक्तिक उत्पन्नातील वाढ स्वातंत्र्यांचा विस्तार करण्याचे 'साधन' आहे. परंतु त्यापलीकडील 'सारभूत/मौलिक स्वातंत्र्याचा' विस्तार होवू शकत नाही. विकासाच्या पहिल्या संकुचित अर्थानुसार गरजांची भौतिक तृप्ति होते. त्याने मुक्ती प्राप्त होत नाही. त्यासाठी विकासाच्या मौलिक अर्थाकडे जावे लागते. दुसऱ्या शब्दात, दरडोई उत्पन्नातील वाढीला विकासाचे अभिन्न अंग मानले तर 100 मीटरच्या त्रिज्जेतील पाण्याचा नळ, घराशेजारी शिधावाटप दुकान, एक किलोमीटरच्या अंतरावर सरकारी रुग्णालय व तेवढ्याच अंतरावर प्राथमिक शाळेची इमारत, इत्यादी सुविधांच्या केवळ उपलब्धतांना विकास म्हणावयाचे काय ? नळ कोरडा असेल, तो ओला असला तरी त्यातील पाणी अशुद्ध असेल, शिधा वाटप दुकानातील सडके-किडके धान्य, दवाखाना असला तरी तेथे वैद्य नसणे किंवा शाळा असली तरी शिक्षक नसणे, या तथाकथित सुविधा विकास नसून विकासविषयक भ्रम आहे. तो भ्रम दूर सारण्यासाठी '' सारभूत स्वातंत्र्याचा एकात्मिक विस्तार करण्याची प्रक्रिया ठरणारा विकास''(पृ.8), सेन यांच्या मते एक प्रभावी उतारा आहे.

## विभाग एक

या विभागात पहिल्या चार प्रकरणांचा समावेश आहे. 'स्वातंत्र्याचे परिप्रेक्ष्य' (सम्यक दर्शन), 'विकासाची ध्येये व साधने', 'स्वातंत्र्य व न्यायाचा पाया' आणि 'शक्तता-वंचितता' म्हणजेच (capability deprivation) दारिद्र्य, या पहिल्या चार प्रकरणांमध्ये स्वातंत्र्य, विकास व दारिद्र्य या संकल्पनांवर जास्त जोर देण्यात आला आहे.

स्वातंत्र्याच्या परिप्रेक्ष्याचे स्पष्टीकरण करताना सेन यांनी त्यांच्या खास शैलीत बृहदरण्यक उपनिषदातील मैत्रेयी व तिचा पती याज्ञवल्क्य यांच्यातील संवाद दिला आहे. संपत्तीच्या साहाय्याने हवी ती गोष्ट मिळविता येते काय, या विषयीचा हा संवाद आहे. मैत्रेयी म्हणते की 'संपत्तीने विपुल वसुंधरा' तिच्या मालकीची झाली, तर तिला अमरत्व मिळेल. त्यावर 'मुळीच नाही',याज्ञवल्क्य प्रतिसाद देतो, 'श्रीमंत लोकांप्रमाणे तुझे जीवन होईल. परंतु संपत्तीच्या साहाय्याने अमरत्व प्राप्त करण्याची मुळीच आशा करता येत नाही'(पृ.13). या प्रकारच्या अमरत्वाविषयी सेन अनुकूल नाहीत. तथाकथित अमरत्व व संपत्ती यांचा विनिमय शक्य नाही. त्यासाठी अर्थशास्त्र व विकासाचे स्वरूप यांचा संदर्भ ध्यानात घ्यावा लागतो. म्हणजे सेन यांच्या प्रतिपादनानुसार 'उत्पन्ने व संपादणूका, वस्तु व शक्तता, आपली आर्थिक संपत्ती व आपणाला पाहिजे तसे जगण्याची आपली क्षमता यांच्यातील नातेसंबंध'(पृ. 13) जास्त महत्वाचा असतो. पुढे सेन म्हणतात, 'आपल्या सूज्ञपणानुसार (न्यायबुद्धीनुसार) विशिष्ट प्रकारचे जीवन व्यतीत करण्यासाठी आपणाला त्यांचे मूल्यन करण्याचे जास्त स्वातंत्र्य असणे.'(पृ.14) या स्थितीचे स्पष्टीकरण करण्यासाठी सेन 'सारभूत स्वातंत्र्ये' (substantive Freedoms) असा शब्दप्रयोग करतात. म्हणजेच अशा स्थितीच्या अभावाला ते 'अमुक्त अवस्था'(unfreedom)म्हणतात.

हा निष्कर्ष काढून सेन तेथे थांबत नाहीत. त्या निष्कर्षाचा धागा दुसऱ्या प्रकरणाशी जोडून ते म्हणतात, ''.. मानवरूप स्वातंत्र्याचा विस्तार करणे हा जसा विकासाचा प्रमुख उद्देश आहे तसेच ते त्याचे प्राथमिक साधन आहे''(पृ. 53). सारभूत स्वातंत्र्याचे संपादन व त्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या व्यक्तींमधील

शक्ततांना प्रवाही करणे ही विकासाची गुरुकिल्ली आहे, हे सेन यांचे योगदान आहे. सेन यानी आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ दक्षिण कोरिया, तैवान, ब्राझील, श्रीलंका व भारतातील केरळ यांचे तौलनिक दाखले दिले आहेत.

विकास व स्वातंत्र्य या संकल्पनांविषयीच्या पारंपरिक विवेचनाचे स्वरूप हे पाठ्यपुस्तकी धाटणीचे आहे. व्यक्तीला वंचिततांपासून मुक्त करण्यासाठी (तिचे दारिद्र्य कमी करण्यासाठी) कोणता निर्णय करावयाचा किंवा त्यासंबी कोणती कृती करावयाची, हे प्रश्न निरुत्तरित राहिले होते. आता अशा प्रश्नांची सोडवणूक करण्याची गरज निर्माण झाली आहे आणि त्या अनुरोधाने सेन 'स्वातंत्र्य व न्यायाचे आधार' या तिसऱ्या प्रकरणाकडे वळले आहेत. त्याप्रकरणाच्या सुरुवातीला त्यानी उल्लेख केलेली अन्नपूर्णा बाई व कामाच्या शोधात असलेल्या दिनू, विष्णू व रोगिणी या गरीब व्यक्तींची दृष्टान्तरूप कथा उधृत करुन त्या अनुषंगाने पुढील चर्चा करू.

अन्नपूर्णा बाईना त्यांच्या बागेची देखभाल करण्यासाठी एक नोकर हवा. वर उल्लेख केलेल्या तीन बेकार व्यक्तींना ते काम पाहिजे, देखभालीचे काम अविभागणीय असल्यामुळे बाई तीनपैकी एका व्यक्तीलाच काम देवू शकतात. कामाचे स्वरुप असे आहे की, ठराविक पगारावर ठराविक काम करावयाचे आहे. एखाद्याने अल्प वेतनावर काम करण्याची तयारी दर्शविली, तरी तशी परिस्थिती नाही. बाई विचारी आहेत व घाईने निर्णय घेणे त्यांना नको आहे. अशा वेळी बाई असा विचार करतात की तीन गरीब व्यक्तींपैकी दिनू जास्तीत जास्त गरीब असल्यामुळे त्याला ते काम द्यावे, मात्र त्याच वेळी त्यांच्या मनात " सर्वाधिक गरीबाला काम देण्यापेक्षा जास्त महत्वाचा आणखी एखादा मार्ग आहे काय ?" असा प्रश्न निर्माण होतो.

नंतर बाईंच्या मनात असा विचार येतो की विष्णू मानसिक दृष्टीकोनातून नुकताच खचून गेला आहे. त्यामुळे दिनू व रोगिणीच्या तुलनेत गरिबीचे जास्त तीव्र चटके विष्णूला सहन करावे लागतात. दिनू व रोगिणी यांनाही वाटते की विष्णू सर्वाधिक दुःखी असल्याने कामापासून त्याला जास्त समाधान मिळेल. बाईनाही ही कल्पना पटते. परंतु लगेच "(विष्णूचे) दु:ख निवारण करण्याला प्राधान्य द्यावयाला हवे", असा स्वत:शीच बाई संवाद करतात.

परंतु बाईंच्या मनात असाही एक विचार डोकावतो की रोगिणी दुर्बल झाली आहे. ती आजाराने जर्जर आहे. ती कशी-बशी वाचली हेच तिचे नशीब. ती दुसऱ्या दोघांपेक्षा अल्प गरीब (म्हणजे गरीबच) असून ती त्या दोघांइतकी जास्तीत जास्त दु:खी नाही. ती वंचित आहे. परंतु वंचिततांशी जुळवून घेण्याची तिला सवयच झाली आहे. तेव्हा" रोगिणीला काम देणे खरोखरच बरोबर ठरेल ना?" असा बाईंच्या मनात वेगळाच प्रश्न निर्माण होतो. तसे झाले, तर "आजारापासून मुक्ती व जीवनाची गुणवत्ता यांच्या दृष्टिकोनातून जास्तीत जास्त मोठा फरक केल्यासारखे होईल," अशी बाईंची अटकळ आहे. दुर्बल दिनू जास्तीत जास्त गरीब आहे. विष्णू जास्ती दु:खी आहे आणि रोगिणीला तिच्या जुनाट आजारापासून बरे होण्यासाठी पैशाची जास्तीत जास्त गरज आहे. अन्नपूर्णा बाईंना या तीन व्यक्तीपैकी एकीचीच माहिती असती, तर संबंधित गरजू व्यक्तीला एव्हाना काम देवून त्या मोकळ्या झाल्या असत्या. पण तसे होणे नाही. तसे घडले असते, तर पुढील व्यावहारिक समस्याच निर्माण झाल्या नसत्या. काय आहेत त्या समस्या?

दिनू, विष्णू व रोगिणी यांच्या परस्पर माहितीयुक्त आधारांच्या बळावर पुढील

न्यायनीतीविषयक तत्वे प्रकट होतात. उत्पन्न समतावादी दृष्टीकोनातून दिनू उत्पन्न-गरीब प्रकारात मोडतो. अभिजात उपयोगितावादी (classical utilitarian) विष्णूचा प्रकार आनंद-सूख म्हणजे स्वतंत्रतावादी सदरात मोडतो आणि रोगिणीचा जीवनाची गुणवत्ता प्रकार रॉल्स प्रणित (Rawlsian) न्याय सिद्धांताकडे जातो. सेनप्रणित सारभूत/मौलिक वैयक्तिक स्वातंत्र्यवादी दृष्टीकोन, सेन दावा करतात त्याप्रमाणे, वरील तीन सदोष प्रकारांना एक चांगला पर्याय आहे. कारण वैयक्तिक शक्ततांच्या स्वरुपातील तो दृष्टीकोन ''....अशा गोष्टी करतो की ज्या करण्यातून व्यक्ती तिच्या सूज्ञपणानुसार/न्यायबुद्धीनुसार(म्हणजे कुवतीनुसार किंवा क्षमतेनुसार) तिच्या जीवनाचे मूल्यन करते'' (पृ. 56).

आर्थिक व सामाजिक धोरणांच्या मूल्यांकनाकडे जाणारा मार्ग क्वचितच 'राजमार्ग' असतो. वरील उपयोगितावादी, स्वतंत्रतावादी व रॉल्सवादी दृष्टीकोन त्याची साक्ष देतात. सेन यांचा सारभूत/ मौलिक वैयक्तिक स्वातंत्र्यवादी दृष्टीकोन तौलनिक दृष्टीने उजवा ठरतो. अर्थात, त्यावरही काही मर्यादा पडतात. परंतु पायाभूत विश्लेषण व फलप्रामाण्यवादी वापर यांचा योग्य संयोग झाला, तर सेन यांचा शक्तता दृष्टीकोन एक जास्त चांगला पर्याय ठरतो. तूर्तास हा निष्कर्ष मान्य करुन पुढे जावू.

चौथे प्रकरण (शक्तता-वंचितता म्हणजेच दारिद्र्य)'' ग्रंथाचा गाभा आहे. मागील प्रकरणातील सामाजिक न्यायाचे विश्लेषण व्यक्तीच्या शक्ततांवर आधारित होते. ''तिच्या किंवा त्याच्या न्यायबुद्धीनुसार विशिष्ट प्रकारचे जीवन व्यतीत करुन त्या जीवनाचे मूल्यन करणे व तिने किंवा त्याने आनंदाचा आस्वाद घेणे,'' (पृ.57)म्हणजेच सारभूत स्वातंत्र्ये होत. तोच सामाजिक न्यायाचा पाया होय.

अल्प उत्पन्न हे दारिद्र्याच्या अनेक कारणांपैकी एक प्रमुख कारण आहे, हे सेन मान्य करतात. परंतु लगेच ते पर्याप्त कारण असू शकत नाही, असा ते दावा करतात. ते म्हणतात की शक्तता दृष्टीकोनाला त्यात योग्य स्थान देण्यात आले नाही. ते कसे, याची व अन्य महत्वाच्या मुद्यांची या प्रकरणात सखोल चर्चा करण्यात आली आहे. संक्षेपात त्यांचा आता विचार करु.

दारिद्र्याविषयीचे दोन प्रमुख दृष्टीकोन आहेत. एक पारंपरिक उत्पन्न दारिद्र्य आणि दुसरे सेनप्रणित वंचितता दारिद्र्य. दारिद्र्याच्या शक्तता दृष्टीकोनाच्या (शक्तता-वंचितता म्हणजेच दारिद्र्य) स्पष्टीकरणासाठी सेन यानी पुढील तीन प्राचलांची नोंद केली आहे.(1)दारिद्र्य ओळखण्यासाठी अल्प उत्पन्न साधनभूत (instrumental)असते, तर वंचितता अंगभूत (intrinsic)असतात. (2) शक्ततांची निर्मिती करण्यासाठी उत्पन्न हे केवळ एकच साधन नसते.(3) अल्प उत्पन्न व अल्प शक्तता यांच्यातील नातेसंबंध निरनिराळया समाजांमध्ये, कुटुंबांमध्ये व व्यक्तीं मध्ये चल किंवा अस्थिर असतो. म्हणजेच उत्पन्नाचा शक्ततांवरील आघात सशर्त व आकस्मिक असतो(पृ. 87-88).

येथे शक्ततांच्या अधिक स्पष्टीकरणासाठी पुढील दोन उदाहरणांचा उल्लेख करु. विख्यात शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकरानी त्यांच्या एका भाषणात पुढील प्रश्न केला : भारतीयांच्याकडे 'ऊर्जा'आहे परंतु भारताची अपेक्षेप्रमाणे प्रगती का नाही ? या प्रश्नाचे उत्तर देताना ते पुढे म्हणाले की त्या ऊर्जेचे प्रत्यक्षात पर्याप्त उपयोजन(utilisation)होत नाही. ती डोहातील पाण्यासारखी सुप्त, कुंठित आहे. तिला प्रवाही करणे म्हणजे तिच्या सुप्त शक्ततेचा विकास करणे. म्हणजेच सेन म्हणतात त्या शक्ततेला तिची कोंडी करणाऱ्या वंचिततांपासून (निरक्षरता, अनारोग्य,

प्रदूषण, शुद्ध पिण्याच्या पाण्याची दुर्मिळता, गुन्हेगारी, लिंग-जाति भेदभाव, असुरक्षा, सामाजिक वर्जन, इत्यादींपासून मुक्त करणे. ते शक्य होत नाही तोपर्यंत नाही विकास, नाही स्वातंत्र्य. जी गोष्ट ऊर्जेची तीच बुद्धीची व शेतीची.

आता त्या भाषणातील डोहाकडून प्रत्यक्षातील तळ्याकडे वळू. म्हणजे प्रतिमेकडून प्रत्यक्षाकडे. येथे वंचिततांपासून निर्माण झालेले दारिद्र्य, त्याच्या पुढील पायरी म्हणजे विकास व अखेरीस स्वातंत्र्य या क्रमाने विचार करता प्रत्यक्ष हे किती विषादपूर्ण आहे, याचा प्रत्यय येतो. उदाहरण आहे सांगली जिल्ह्यातील नऊशे पाझर तलावांचे. महाराष्ट्रात सदतीस वर्षापूर्वी रोजगार हमी योजना सुरु झाली. वि. स. पागे त्या योजनेचे प्रवर्तक होते. त्यांच्या प्रारुपावर आधारित योजनेखाली सांगली जिल्ह्यात आजपर्यंत (एप्रिल 2002), नऊशे पाझर तलाव बांधून पूर्ण झाले. महाराष्ट्रातील दुसऱ्या जिल्ह्यांप्रमाणेच सांगली जिल्ह्यातही आज पाणी टंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. जिल्ह्याचे भूवैज्ञानिक श्री. दुर्गे यानी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार मागील कित्येक वर्षांत तलावांमधील गाळ काढण्यात आला नाही. त्यामुळे भूगर्भात पाणी झिरपण्याची प्रक्रियाच ठप्प झाली आहे. तलावांतील पाण्याचे बाष्पीकरण होवून त्याचा अपव्यय होत आहे. पाझर तलावांचे रुपांतरण गाळ तलावांमध्ये झाले आहे. खरोखर, प्रत्यक्ष प्रतिमेपेक्षा जास्त भयावह आहे.

या प्रकरणाच्या उत्तरार्धात उत्पन्न दारिद्र्य व शक्तता दारिद्र्य यांच्यातील आंतरसंबंध किंवा विरोध विशद करताना 'विषमता कशाची?' 'बेकारी व शक्तता-वंचितता', 'आरोग्य संगोपन व मृत्यु प्रमाण' आणि 'भारत व सब-सहारा आफ्रिका यांची आंतरदेशीय तुलना' अशा मुद्दांची सविस्तर चर्चा केली आहे.

### विभाग दोन

या विभागात पाच चे आठ प्रकरणांचा ('बाजार, राज्य व सामाजिक संधि', 'लोकतंत्राचे महत्व', 'दुष्काळ व दुसरी संकटे' आणि 'महिलांचे अभिकरण व सामाजिक बदल') समावेश करण्यात आला आहे.

स्मिथ यांच्या 'वेल्थ ऑफ नेशन्स' (1776) पासून आजपर्यंत राज्य व बाजार यांच्या परस्पर संबंधाविषयी विपुल लिखाण झाले आहे. ते लिखाण करणाऱ्यांमध्ये बाजार चतुर (market savvy) किंवा बाजार आस्तिक व बाजार नास्तिक (market sceptics) यांचा प्रामुख्याने समावेश होतो. विशेषतः मागील दशकात बाजार पाखंडांची (नास्तिकांची) संख्या (प्रभाव नव्हे) वाढली. बाजार व राज्य यांच्या आंतरसंबंधातील अलीकडील पुस्तकांत/अहवालांत 'फ्रॉम मार्क्स टु मार्केट', 'फ्रॉम प्लॅन टु मार्केट', व्हिजिबल हॅंडकफ्स' (स्मिथ यांच्या 'इनव्हिजिबल हॅंड' चे खंडन), 'कॉंटेस्टेड कमॉडिटिज', इत्यादी मला माहित असलेल्या निवडक लिखाणाचा उल्लेख करावा लागेल. काही निवडक अपवाद सोडले, तर बहुतेक अर्थशास्त्रज्ञांनी टोकाची भूमिका स्वीकारली आहे. सेन त्याला अपवाद आहेत. 1989 साली त्रिवेंद्रम येथे आयोजित इंडियन इकनॉमिक कॉन्फरन्स मधील सेन यांचे अध्यक्षीय भाषण त्याची साक्ष देते. त्या भाषणाचा आशय पुढीलप्रमाणे होता : राज्य किंवा बाजार, अशी निवड असू शकत नाही.... राज्य हवे किंवा नको, असाही प्रश्न निर्माण होवू शकत नाही. समाजवादी अर्थव्यवस्थेला किंमत यंत्रणेचे अपथ्य मानण्यास तांत्रिक आधार नाही. तसेच भांडवली अर्थव्यवस्थेत बाजार यंत्रणा सर्व आर्थिक आजारांवर रामबाण उपाय असू शकत नाही. एवढ्या प्रस्तावनेच्या आधारे आता प्रकरण पाचचा विचार करणे योग्य ठरते.

बाजार व राज्य यांच्या संबंधातील सेन यांनी समन्वयवादी मते प्रसिद्ध आहेत. त्यांच्या मताशी

तंतोतंत जुळणारे मत पूर्वी जागतिक विकास अहवालात (1991) मांडण्यात आले आहे. मूळ इंग्रजी मजकूर पुढीलप्रमाणे : "If markets can work well and are allowed to, there can be a substantial gain. If markets fail and governement intervenes in response judiciously, there is further gain. But if the two are brought together the evidence suggests that the whole is greater than the sum"[2]

परंतु 'विकास म्हणजे स्वातंत्र्य' या ग्रंथाच्या संदर्भात व विशेषत: स्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते म्हणून बाजाराकडे पाहाताना सेन यांनी बाजाराविषयीच्या त्यांच्या विश्लेषणात नवीन मुद्याची भर टाकली आहे. त्या संदर्भात पुढील दोन गोष्टींचा उल्लेख करु इच्छितो. परंतु त्यापूर्वी एक खुलासा. बाजार यंत्रणेची सर्वसाधारण चर्चा विशिष्ट चौकटीच्या मर्यादेत होत असते. खरे तर, ती एक फॅशन झाली आहे. म्हणजेच जो बाजार जास्त उत्पन्न व उपयोगिता यांचा लाभ मिळवून देतो तो बाजार जास्त चांगला असतो. हे जर खरे मानले तर रिलायन्स उद्योगांना 31 मार्च 2002 अखेर संपलेल्या वर्षातील रु. 2456 कोटी (मागील वर्षाच्या तुलनेत 17 टक्के घसघसीत वाढ) एवढ्या नक्त नफ्याचे श्रेय त्या उद्योगांच्या बाजारांना देवून मोकळे होता येईल काय ? उत्पादित वस्तुंच्या चढ्या किंमती, नफ्याच्या अल्प किंमती, कच्च्या मालाच्या अल्प किंमती, वाढीव विक्री व व्यवस्थापन यापैकी कोणत्या घटकाचा नफ्यात किती हिस्सा आहे, हे अद्याप स्पष्ट झाले नाही[3]. विशेष म्हणजे 17 टक्के जास्त नक्त नफा त्या वर्षातील औद्योगिक अवदोलनाच्या पृष्ठभूमीवर निर्माण झाला आहे. सेन यांना अभिप्रेत देवघेवीचे स्वातंत्र्य (freedom to transact) या अंगभूत घटकाचे सत्यापन झाल्याशिवाय निव्वळ पैशातील नफ्याचा सेन कधीच स्वीकार करणार नाहीत. सेनप्रणित देवघेवीच्या स्वातंत्र्याची संकल्पना किती मौलीक आहे, याचे स्पष्टीकरण करण्यास एनरॉन कंपनीचे उदाहरण पुरेसे आहे. त्या कंपनीने बाजाराचे कावेबाजपणे केलेले व्यवस्थापन (crafty market management) किंवा बाजारात गैर वधघट करणे (rigging the market) आज जगजाहीर झाले आहे.

म्हणून सेन यांना देवीघेवीच्या मौलीक स्वातंत्र्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या बाजाराच्या चौकटीची मर्यादा मान्य नाही. देवघेवीचे स्वातंत्र्य हा त्यांच्या दृष्टीकोनातून कळीचा प्रश्न आहे. प्रदीर्घ काळात जो बाजार देवघेवीचे स्वातंत्र्य देतो तो बाजार कार्यदक्ष व चांगला असतो. यावर सेन अढळ आहेत. स्पष्टीकरणासाठी त्यानी चार उदाहरणे दिली आहेत. जागेअभावी त्यापैकी येथे दोन उदाहरणांचा उल्लेच करतो. (1) बंधपत्रित किंवा करारबद्ध श्रम (bonded labour)आफ्रिकेत व आशियात मोठ्या प्रमाणात आढळतात. विशेषत: बिहारसारख्या राज्यात विशिष्ट जातीतील कुटुंबे जमीनदारांना हयातभर बांधील राहातात. काही मजूर मालकांच्या गुन्हेगारीचे "धनी" होतात. अशा अन्यायांच्या आवरणाखाली दडलेला मूलभूत प्रश्न आहे रोजगाराचा. त्यासाठी रोजगाराची व मालकी हक्काची लढाई हवी. अमेरिकेतील आफ्रिकी पुरुष मजुरांचे वेतन चीनमधील किंवा केरळमधील मजुरांच्या तुलनेत बरेच जास्त आहे. परंतु वेतन जास्त असूनही त्यांचे उत्तरजीवित्वाचे प्रमाण (कामोत्तर जीवंत राहण्याचे प्रमाण) बरेच अल्प आहे. त्यांच्या भारी वेतनावर वंचितता मात करतात.(2) सोविएत युनियनमधील नोकरशाहीयुक्त समाजवादाचे अपयश: सेन यांच्या मतानुसार साम्यवादी राजवटीच्या तुलनेत समाजवादी सोविएत युनियनमधील लोकांचे अपेक्षित आयुर्मान घटले आहे.1991 पर्यंत भारताच्या तुलनेत ते अल्प होते. बाजार यंत्रणेचा एक पर्याय म्हणजे नोकरशहांच्या प्रभावाखालील नियोजन. त्याचे दुसरे नाव म्हणजे केंद्राकडून नियोजित अर्थव्यवस्था. या व्यवस्थेत नोकरशहा सरंजामदारांसारखे वागू लागतात. त्यात

नागरिकांच्या स्वातंत्र्याचा बळी जातो. व्यक्ती केवळ दाळ-रोटीवर जगू शकत नाही.

सत्यांची सुरुवात पाखंडानी (heresies) होते व त्यांचा शेवट लोकभ्रमांत (superstitions) होतो, या आशयाचे टी. एच. हक्स्ले यांचे 'सायन्स अँड कल्चर' मधील विधान सेन याची पाचव्या प्रकरणाच्या सुरुवातीला उधृत केले आहे. पुढे सेन म्हणतात की कालचा पारखून न घेतलेला विचार आजचे पाखंड बनते आणि कालच्या पाखंडाचे रूपांतरण नवीन लोकभ्रमात होते (पृ. 111) तसे घडू नये म्हणून आतापर्यंत बाजार व राज्य यांच्या विषयी सेन यानी सावधपणे विश्लेषण केले. जी गोष्ट बाजाराची तीच स्वातंत्र्य व लोकतंत्र यांची. स्वातंत्र्य हा लोकतंत्राचा आत्मा आहे. आतापर्यंतच्या सेन यांच्या स्वातंत्र्याच्या साराभूत/ मौलिक विश्लेषणाच्या आधाराने त्यांच्या "लोकतंत्राचे महत्व" या सहाव्या प्रकरणाकडे आता वळू.

लोकतंत्राकडे पाहाण्याचा सेन यांचा एक विशिष्ट दृष्टीकोन आहे. आणि त्यावर त्यांची अढळ निष्ठा आहे. तुम्हाला काय हवे ? आर्थिक गरजांची पूर्तता ?किंवा राजकीय स्वातंत्र्ये ? तुमचा अग्रक्रम कशाला असेल ? दारिद्र्याचे निवारण ? किंवा राजकीय स्वातंत्र्याची हमी ? या प्रश्नांची उत्तरे देण्यापूर्वी सेन त्या प्रश्नांसंबंधीची तथाकथित भिन्नता (dichotomy)अमान्य करतात. ती फट त्या प्रश्नांकडे पाहाण्याच्या अशास्त्रीय तसेच पूर्वग्रह दूषित दृष्टिकोनातून निर्माण झाली आहे, असे सेन प्रतिपादन करतात. मूलभूत गरजा भागविण्याच्या कामात अधिकारशाही लोकतंत्रापेक्षा जास्त चांगली असते, असा एक मतप्रवाह आहे. परंतु सेन यांचा पुढील प्रश्न असा: सिंगापूरचे अधिकारशहा ली यांच्या अधिकारशाहीत लोकांच्या गरजा जास्त कार्यदक्षतेने भागविल्याचे सांख्यिकी अधिप्रमाण (authenticity) कोठे आहे ? गरजा भागल्याच असतील, तर तेथील लोकांच्या शक्ततांवर कोणता व किती थेट परिणाम झाला ? लोकांच्या गरजा कोणत्या ते जाणून घेण्यासाठी त्यांचा साधनभूत कार्यभाग त्यांना पार पाडता आला काय ? सामाजिक संदर्भात त्यांच्या गरजांचे संकल्पन करण्यासाठी (conceptualization) रचनात्मक कार्यभाग पार पाडण्याची त्यांना पुरेशी संधि मिळाली काय ? या तीन प्रश्नांतील तीन अधोरेखिते हे लोकतंत्राचे महान योगदान आहे (पृ. 148). सेन यांनी याची विस्ताराने चर्चा केली आहे. सेन यांनी याच प्रकरणात चर्चा केलेल्या दोनच गोष्टींची येथे नोंद करु इच्छितो. एक, भारतात केरळमध्ये दुसऱ्या राज्यांच्या तुलनेत जननक्षमता (fertility) प्रमाण अल्प असण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे तेथील साक्षरतेचे प्रमाण व परिवार कल्याणाविषयीच्या सार्वजनिक चर्चेतील लोकांचा वाढता सहभाग (आविष्कार स्वातंत्र्य), दुसरी गोष्ट आहे दुष्काळासंबंधीची. 1943 सालातील दुष्काळात (पारतंत्र्यातील भारत) जेवढे मृत्यू झाले तेवढे स्वतंत्र भारतातील दुष्काळांत झाले नाहीत. त्याचे प्रमुख कारण म्हणजे लोकतंत्र. "पॉव्हर्टी अँड फॅमिन्स" (1981) हा सेन यांचा प्रबंध एक पायाभूत योगदान म्हणून मान्यता पावला. या प्रकरणाच्या संदर्भात त्या प्रबंधाचे सार पुढील एका वाक्यात सांगता येईल. लोकतंत्रात दुष्काळाला स्थान नाही. अलोकतांत्रिक किंवा लोकतंत्राविरोधी सरकारला मतदार चांगलाच धडा शिकवितात हे भारत व जगातील अन्य लोकतांत्रिक देशांतील सरकारांना हे चांगले ठावूक आहे.

दुष्काळावरील सेन यांच्या विश्लेषणाच्या संदर्भात लोकतंत्राविषयी आता एकाच प्रश्नाचा उल्लेख करणे बाकी आहे. तो प्रश्न आहे कुपोषणाचा. परिवार कल्याणाचे यश व लोकतंत्रातील दुष्काळाचे नियंत्रण यांचे मोठे श्रेय राजकीय स्वातंत्र्याकडे जाते. परंतु त्याच लोकतंत्रात कुपोषणाच्या प्रश्नाच्या बाबतीत अपेक्षित यश प्राप्त होत नाही. असे का घडते ?

याही प्रश्नाचे सेन यांनी उत्तर दिले आहे.

त्याचा सारांश पुढीलप्रमाणे : भारतीय लोकतंत्रात लोक तसेच विरोधी पक्ष दुष्काळाचा प्रश्न लावून धरण्यात जी एकजूट व तत्परता दाखवितात ती कुपोषणाच्या प्रश्नासंबंधी दाखवत नाहीत. विशेषत: विरोधी पक्षांवर त्यासंबंधात जास्त जबाबदारी पडते, आणि तशा प्रकारची जबाबदारी पार पाडण्याची संधी केवळ लोकतंत्रात उपलब्ध होते. म्हणूनच लोकतंत्राला खऱ्या अर्थाने जबाबदार राज्यपद्धती म्हटले जाते.

या विभागातील सातवे प्रकरण 'दुष्काळ व दुसरी संकटे' याविषयी आहे. त्याची या ठिकाणी स्वतंत्र प्रकरण म्हणून चर्चा केली नाही. ती करणे योग्यही नाही. कारण आतापर्यंतच्या चर्चेत त्याविषयीचे महत्वाचे संदर्भ आले आहेत.

प्रकरण आठ हे 'महिलांचे अभिकरण व सामाजिक बदल' या विषयाला वाहिले आहे. 1998 नंतरच्या मानवरूप विकास अहवालांमध्ये वंचितता-दारिद्र्याची संकल्पना पुढे आली. यापूर्वी (1981) सेन यांनी ती संकल्पना मांडली आणि लिंग-भेदभाव'' हा वंचितता-दारिद्र्याचा एक महत्वाचा घटक असलेली संकल्पना उचलून धरुन अलीकडील मानवरूप विकास अहवालांमध्ये सेन यांची संकल्पना प्रमाण मानण्यात आली आहे.

सेन, महिला वर्गाकडे दोन दृष्टीकोनातून पाहतात. पहिला, महिला वर्गाच्या 'कल्याणावर' लक्ष केंद्रित करणारा महिला 'संघटन' दृष्टीकोन आणि दुसरा दृष्टीकोन म्हणजे 'बदलाचा अभिकर्ता'. महिला चळवळीच्या प्राथमिक अवस्थेत त्या चळवळीचे उद्दिष्ट महिलांच्या कल्याणापुरते मर्यादित होते. हळुहळु आज त्या चळवळीने/ संघटनेने बदलाच्या क्रियाशील अभिकर्त्यापर्यंत आपल्या कार्याचा विस्तार केला आहे.

कुटुंब या घटकाचा किंवा संस्थेचा विचार करताना सेन यानी ''सहकारी संघर्ष'' असा एक अन्वर्थक शब्दप्रयोग केला आहे. प्रत्येक कुटुंबात, कुटुंबाशी संबंधित छोट्या-मोठ्या गोष्टी संबंधित विषयीच्या चर्चेची सुरुवात संघर्षाने होते. परंतु सर्वसाधारणपणे त्या संघर्षाचे फलित तडजोड व एकोपा यांच्या स्वरुपात मिळते. अर्थातच, त्या फलितात तिचा सिंहाचा वाटा असतो, हे सांगणे न लगे.

सारभूत/ मौलिक विकासाच्या संदर्भात महिला अभिकरणाला पुढील दोन जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या आहेत.(1) मुलांच्या उत्तरजीवित्वात (survival) वाढ करणे. (2)जननक्षमता प्रमाण कमी करण्यास सहाय्य करणे (पृ. 202). या संबंधातील महिलांचा ''सहभाग'' व त्यांचे ''नेतृत्व'' म्हणजे ''विकास म्हणजे स्वातंत्र्य'' याची कसोटी होय. (पृ. 203).

**विभाग तीन**

अखेरच्या व तिसऱ्या विभागात उर्वरित चार प्रकरणांचा ('लोकसंख्या अन्न व स्वातंत्र्य, संस्कृती व मानवरुप हक्क' 'सामाजिक निवड व वैयक्तिक वर्तणूक' आणि 'वैयक्तिक स्वातंत्र्य म्हणजेच सामाजिक प्रतिबद्धता') समावेश आहे.

'लोकसंख्या, अन्न व स्वातंत्र्य' या नवव्या प्रकरणाचा थेट विचार करण्यापूर्वी त्याची पार्श्वभूमी पाहाणे जास्त योग्य होईल. माल्थस यानी 'लोकसंख्येवरील निबंध' (1798) लिहून एका बाजुला अन्नधान्य व दुसऱ्या बाजुला लोकसंख्या यांच्यातील 'शर्यतीच्या' वादाला तोंड फोडले. त्या वादाचा सैद्धांतिक पाया घालण्याचे काम एका बाजुला कोल व हूअर (1958), तर दुसऱ्या बाजुला ज्युलियन सायमन (19981) यानी केले. आज त्या परस्परविरोधी दृष्टीकोनांना अनुक्रमे 'नियोजनवादी' व 'अभिवृद्धीवादी'[4] या नावांनी ओळखले जाते.अगदी अलीकडे वसंत पेठे यांनी सक्तीच्या निर्बिजीकरणाविरुद्ध 'धर्मयुद्ध' घोषित करुन लोकसंख्या एककात न मोजता उपलब्ध

साधनसामग्रीच्या सेवनाच्या संबंधात मोजली पाहिजे, असा दावा केला व अभिवृद्धीवादी मताला एक पुरवणी जोडली. समजा, पेठे दावा करतात त्याप्रमाणे, अमेरिकेची लोकसंख्या आज 25 कोटी (प्रत्यक्षात 2000 मध्ये ती 28 कोटी 20 लक्ष होती) आहे. सरासरी अमेरिकी व्यक्ती जागतिक तुलनेत साधनसामग्रीचे चार पट सेवन करते. म्हणजे अमेरिकेची लोकसंख्या 100 कोटी म्हटली पाहिजे. असो. एवढ्या प्रस्तावनेनंतर आता सेन यांच्या विश्लेषणाकडे वळू.

प्रकरणाच्या प्रारंभी सेन यांनी आजच्या 'अभूतपूर्व समृद्धीच्या जगात व्यापक भूक टिकाव धरुन असल्याचा' अन्वर्थक तसेच विदारक शब्दप्रयोग केला आहे. त्याचे समर्पक विशदीकरण करण्यासाठी मानवरुप विकास अहवालातील (1998) उपलब्ध सांख्यिकीचा आधार घेणे आवश्यक आहे. विशेष उल्लेख करण्यायोग्य गोष्ट म्हणजे स्वत: सेन त्या अहवालाच्या सल्लागार समितीचे सदस्य होते. अहवालात जगातील 20 टक्के शिखरावरील श्रीमंतांच्या निवडक वस्तुंच्या सेवनाची 20 टक्के तळातील गरिबांच्या त्या वस्तुंच्या सेवनाशी असणारी पुढील गुणोत्तरे मांडण्यात आली आहेत.

| वस्तु | सेवन गुणोत्तरे |
|---|---|
| मटण | 11 |
| ऊर्जा | 17 |
| सर्व सेवन | 16 |
| मासे | 07 |
| दूरसंचार | 49 |
| कागद | 77 |
| मोटरगाड्या | 145 |

आधार :Human Development Report, 1998, oxford university Press, backside of the frontpage.

एकीकडे अभूतपूर्व सेवन विपुलता आहे तर दुसरीकडे 100 कोटी लोक या सेवनाच्या बाहेर आहेत. अहवालात उल्लेख केलेल्या 'सेवन प्रस्फोटाचा' प्रश्न माल्थस यांचा सिद्धांत सोडवू शकतो काय ? या प्रश्नांचे सेन यानी दिलेले उत्तर पाहाण्यापूर्वी या तक्त्यात स्पष्ट होणारी गंभीर गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. ती म्हणजे 'चढाओढीचा खर्च व भपकेबाज सेवन हे काहींच्या संपन्नतेचे रुपांतरण अनेकांच्या सामाजिक वर्जनात (social exclusion) करतात'[5]. ही वस्तुस्थिती पाहून सेन यांचे या प्रश्नाचे उत्तर पुढीलप्रमाणे आहे: माल्थस म्हणतात तो अन्नधान्यांचा पुरवठा हा निश्चितच महत्वाचा प्रश्न आहे. परंतु केवळ त्यावर संपूर्ण लक्ष केंद्रित करुन माल्थस यानी एक चूक केली, असे सेन यांचे प्रतिपादन आहे. 'भूक, कुपोषण व दुष्काळ हे प्रश्न' (पृ. 204) निव्वळ अन्नधान्ये व लोकसंख्येचे जबरदस्तीने नियंत्रण करणे (माल्थस म्हणतात त्याप्रमाणे) यांवर अवलंबून राहून सुटणार नाहीत. दुसऱ्या शब्दात, सेन यानी उपरिनिर्दिष्ट अभिवृद्धीवादी मताला दुजोरा दिला आहे.

याचा अर्थ असा नव्हे की सेन लोकसंख्या नियंत्रणविरोधी आहेत. त्याना लोकसंख्या नियंत्रण हवे आहे. परंतु माल्थस यांच्या जबरदस्तीला त्यांचा विरोध आहे. आणि त्या विरोधाचे प्रमुख कारण म्हणजे ते स्वातंत्र्याला मारक ठरते. ते कसे, त्याचाच आता विचार करु.

सेन यांचा दावा आहे की लोकसंख्या नियंत्रणा विषयीची जबरदस्ती जशी वैयक्तिक स्वातंत्र्याला मारक ठरते, तशीच ती लोकसंख्या नियंत्रणाच्या संबंधात 'आशयविरहित परिणामांना' जन्म देते. प्रथम जबरदस्ती व्यक्तीस्वातंत्र्याला मारक कशी ठरते ते पाहू. कुटुंबातील व्यक्तींची संख्या नियंत्रित ठेवण्याची जशी संख्यात्मक बाजू आहे, तशीच किंवा तिच्यापेक्षा महत्वाची व परिणामकारक अशी एक 'सामाजिक'

बाजू आहे. स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण जसे वाढते, तसे कुटुंबाचा आकार कमी होतो. भारतातील केरळचे उदाहरण बोलके आहे. तसेच संशोधनांती औद्योगिक देशांतही स्त्रियांची वाढती साक्षरता जास्त प्रभावी ठरते, असे सिद्ध झाले आहे. आता 'आशयविरहित परिणामांविषयी' दोन शब्द. चीनमधील 1979 च्या आर्थिक सुधारणांचा एक भाग म्हणून 'एक- मूल-कुटुंब' धोरण लागू करण्यात आले. त्या धोरणाचे पालन न करणाऱ्या कुटुंबातील मिळवत्या व्यक्तींच्या शासन सुविधा (शासन निवास खाली करणे) मागे घेण्यात आल्या. सेन यांच्या निरीक्षणानुसार अशा कुटुंबांमध्ये 'घबराटीचे' व 'दहशतीचे' वातावरण निर्माण झाले. परिणाम ? लिंग - विशिष्ट गर्भपातांचे प्रमाण वाढले. लोकसंख्येत स्त्री-पुरुष असमतोल निर्माण झाला व तो वाढला (की जो लोकसंख्या धोरणाचा मूळ आशय नव्हता).

'आशयविरहित परिणाम' हा मुद्दा या विभागातील 'सामाजिक निवड व वैयक्तिक वर्तणूक' या अकराव्या प्रकरणात सेन यानी विस्ताराने मांडला आहे. विचारांची संगती व सलगता ध्यानात घेवून येथे अगोदर प्रकरण अकराचा विचार करु.

स्मिथ यांच्या ' वेल्थ ऑफ नेशन्स'(1776) मधील कसाई, दारु गाळणारा व पाव भाजणारा (रोटीवाला) या व्यक्ती जाहीराती शिवाय प्रसिद्ध झाल्या आहेत. स्मिथ यांच्या 'अदृश्य शक्ती' च्या सिद्धांताने अनेक अर्थशास्त्रज्ञांना प्रभावित केले. फ्रेडिक हायेक त्यांपैकी एक. पाव भाजणारी व्यक्ती पाव भाजते कारण तिचा स्वार्थ (स्वहित). परंतु मी पावाचे सेवन करतो व समाधान पावतो. आश्चर्याची गोष्ट अशी की त्या पावाच्या सेवनाने माझे कल्याण व्हावे, असा भाजणाऱ्या पाववाल्याचा मूळ आशय नसताना हे घडले. त्याला 'आशयविरहित परिणाम' संबोधण्यात आले. या अदृश्य शक्तीच्या सिद्धांताला किंवा आशयविरहित परिणामांना उचलून धरताना हायेक यानी 'अवघ्या सामाजिक सिद्धांताच्या विषयातील अगाध ज्ञान' या शब्दांत त्याचे उदात्तीकरण केले. सेन यांना ते खटकले. त्यांनी हायेक यांना पुढील शब्दांत टोला हाणला : ''हायेक म्हणतात त्याप्रमाणे ते जर अगाध ज्ञान आहे, तर त्या अगाधतेत काही तरी चूक आहे''(पृ. 257). ती चूक स्पष्ट करण्यासाठी सेन यानी चीनमधील उपरिनिर्दिष्ट जबरदस्तीच्या लोकसंख्या नियंत्रणाचे उदाहरण दिले आहे. दुसऱ्या शब्दात, जे आशयविरहित परिणाम स्वहितापोटी दुसऱ्याचे कल्याण साधतात ते चीनमधील स्त्री-पुरुष असमतोल निर्माण करणारे दुष्परिणाम ठरतात. वैयक्तिक वर्तणूक (स्वहितवाद) सामाजिक निवडीचा परिपूर्ण पर्याय असत नाही. त्या भूमिकेतूनच सेन यानी त्यांच्या ' सामुहिक निवड सिद्धांताची ' (1970,71) मांडणी केली. अर्थात, त्याचा अधिक विचार करण्याचे हे ठिकाण नव्हे.

आता मागे उल्लेख केल्याप्रमाणे प्रकरण अकराकडून परत प्रकरण दहाकडे ('संस्कृती व मानवरुप हक्क') वळू. या प्रकरणात प्रवेश करताना माझी अवस्था 'बुरिदानच्या गाढवा' सारखी झाली आहे. त्याला गवताच्या दोन्ही पेंडया अतिशय पसंत पडल्या, तरी त्यांच्या संबंधात निवड करण्यात ते गाढव यशस्वी ठरले नाही. या प्रकरणातील सर्वाधिक उंचीच्या तसेच उत्तुंग व्यक्ती व त्यांची शिकवण ('यथान्यायनैतिकता समीक्षा','आशियायी मूल्ये', 'कन्फ्युशिअस', 'अशोक', 'कौटिल्य', 'इस्लामी सहिष्णुता', 'जागतिकीकरण', इत्यादी ) पाहिल्यानंतर 'कोण' 'कोण' व 'काय' 'काय' असा संभ्रम निर्माण होतो. अशा वेळी विशाल विश्वाची छोटी प्रतिकृती तयार करण्याशिवाय तरुणोपाय नाही. त्या प्रतिकृतीच्या आधाराने पुढील परिच्छेदाकडे वळू.

वर्तमानात मानवरुप हक्क व विकास या

एकाच नाण्याच्या दोन बाजू मानण्याइतपत जगात जलद बदल घडत आहेत. परंतु बदलांच्या पुढील मार्ग सरळ व स्पष्ट दिसत नाही. त्या धूसर मार्गावर दोन आशंका व्यक्त केल्या जातात. एक, 'अ' ला मानवरूप हक्क प्राप्त होण्यापूर्वी 'ब' ने 'अ' च्या कर्तव्यांचे नियमन केले पाहिजे. हक्क हे पोकळीत अस्तित्वात येवू शकत नाहीत. त्यासाठी नियंत्रक अपरिहार्य आहे. दोन, समजा, देशात मानवरुप हक्क अस्तित्वात आले, तरी तो देश कायद्यांच्या माध्यमातून 'चांगले आरोग्य' किंवा 'काम' याची वैधानिक हमी देवू शकतो काय ? या आशंकांचे निराकरण सेन यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. बाजार यंत्रणा ही एक अशी यंत्रणा आहे की जिच्या माध्यमातून लोक परस्पर लाभदायक व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य मिळवितात व ते टिकवितात. परंतु बाजार किंवा चांगले शासन यांच्या सहाय्याने सर्वाधिक गरीब देश दुष्काळाचे निवारण करतील व लोकांच्या कल्याणात वाढ करतील, असे समजणे पुरेसे ठरत नाही, अशा आणखी एका आशंकेचे सेन याना निराकरण करणे भाग आहे. ते करताना चांगले शासन तसेच 'फलप्रामाण्यवादी' व 'खुल्या मनाने केलेली छाननी' यांवर सेन यांची भिस्त आहे. परंतु तेवढ्याने समस्येचे संपूर्ण निवारण होत नाही. कारण? चांगले शासन दुर्मिळ असते आणि वाईट सरकार फलप्रामाण्यवाद व खुली छाननी यांचा जरबेने प्रतिकार करते. अशा प्रसंगी सेन मानवरुप हक्कांकडे एक आशेचा किरण म्हणून पाहातात.

बाराव्या प्रकरणात 'वैयक्तिक स्वातंत्र्य म्हणजेच सामाजिक प्रतिबद्धता'(social commitment) याविषयी चर्चा आहे. स्वातंत्र्य व जबाबदारी 'परस्परावलंबी' आहेत आणि 'वैयक्तिक स्वातंत्र्याला पर्याय नाही',(पृ. 283) हे या प्रकरणाचे आधारविधान (axiom)आहे. शक्ततांना प्रवाही करण्यासाठी किंवा व्यक्तीला विविध वंचिततांपासून (प्राथमिक शिक्षणाचा अभाव, वैद्यकीय सेवांची दुर्मिळता, जाति-लिंग भेदभाव, सामाजिक वर्जन, इत्यादी) मुक्त करण्यासाठी सरकारी हुकूमनामे पुरेसे पडत नाहीत. त्यासाठी मूळात स्वातंत्र्याची गरज असते. या संदर्भात मला सॅम्युअलसन यांच्या एका विधानाची आठवण होते. कोणत्याही बदलाचे यशापयश 'केवळ तुम्ही त्यासाठी कोणती किंमत मोजता'यावर अवलंबून असते. सेन यांची प्रतिबद्धतेची संकल्पना तसाच एक बदल आहे. खरे तर, ते एक परिवर्तन आहे. सेन यांच्या प्रस्तुत ग्रंथात 'प्रतिबद्धता' या संकल्पनेचे उल्लेख आढळतात. परंतु तिची व्याख्या मला सापडली नाही. कदाचित ती माझ्या नजरेतून निसटली असावी. ते काही असो. सेन यानी त्यांच्या दुसऱ्या ग्रंथात नोंदलेली व मी अभ्यासलेली व्याख्या देवूनच पुढील विश्लेषण करणे जरुर आहे. 'उपलब्ध पर्यायी क्रियेपेक्षा जे अल्प अपेक्षित (वैयक्तिक) कल्याण निर्माण करते त्या क्रियेची निवड करणे, ते प्रतिबद्धतेत अंतर्भूत असते'. उदाहरणार्थ, राजस्थानच्या अल्वार जिल्ह्यातील मॅगसेसे पारितोषिकाचे मानकरी राजेंद्रसिह यांची पाण्याच्या भूमीगत साठवण प्रक्रियेला(rain harvesting)व पाण्यावरील सामुहिक मालकीला असलेली प्रतिबद्धता. त्यानी वैयक्तिक लाभासाठी स्वत:ची विंधण विहीर खोदणे व वैयक्तिक स्वार्थ बाजुला ठेवून समाजासाठी भूमीगत पाण्याचे स्रोत जीवंत करणे यांच्यात मूलभूत फरक आहे. त्यात सिंह यांच्या वैयक्तिक कल्याणाचा त्याग आहे. नैतिकता त्याचा पाया आहे.

प्रतिबद्धतेच्या या पार्श्वभूमीवर सेन निवडीच्या विस्ताराकडे वळतात. पीटर बॉअर(Dissent on Development) तसेच लेविस (The Theory of Economic Growth) यांच्या सारख्या विकास

अर्थशास्त्रज्ञांनी, सेन स्पष्ट करतात त्याप्रमाणे, निवडीचा टप्पा विस्तारण्यावर जोर दिला असला, तरी ते 'दरडोई उत्पादन वृद्धीला' जास्त प्रमाणात चिकटून राहिले. दरडोई उत्पादन वृद्धीमुळे जास्त समृद्ध जीवन जगणे शक्य आहे. परंतु त्यामुळे जास्त प्रदीर्घ (longer) जीवन जगण्याची हमी मिळेलच असे नाही. तसे अनुभवनिष्ठ पुरावे उपलब्ध झाले आहेत आणि मागील काही प्रकरणांत त्याविषयीचे उल्लेख आले आहेत.

विकासाची व विशेषत: सारभूत किंवा मौलिक विकासाची संकल्पना विभक्त, एकटया किंवा रेषीय 'सूत्रात' ('भांडवल संचय', 'बाजार खुले करणे' किंवा 'कार्यदक्ष आर्थिक नियोजन') गोवता येत नाही, हा सेन यांचा या ग्रंथातील संदेश आहे(पृ. 297). अखेरीस, विल्यम कॉउपर (William Cowper) यांच्या पुढील काव्य पंक्तींचा सेन यानी, त्यांच्या खास शैलीत, उल्लेख करुन या ग्रंथाचा मार्मिक समारोप केला आहे.

Freedom has a thousand charms to show, That slaves, howe'er contented, never know.

**समारोप :**

"विकास म्हणिजे स्वातंत्र्य" हा ग्रंथ जसा मानवरूप विकासाचे अर्थशास्त्र आहे, तशीच (किंबहुना त्यापेक्षा जास्त) ती स्वातंत्र्याची एक सनद आहे. सेन व्यवसायाने अर्थशास्त्रज्ञ असले, तरी त्यांचा मूळ पिंड तत्वचिंतकाचा आहे.

सेन यानी मानवरुप विकास संकल्पनेची उपयुक्तता व विश्वासार्हता वाढविली. त्याचे योग्य ते श्रेय त्याना द्यावयाला हवे. त्याबरोबरच समष्टिच्या वरील परमेष्टिच्या (जेथे विकास केवळ स्वयंचलित राहात नसून ती प्रक्रिया स्वयंपोषितही होते) पायरीवर पाऊल ठेवण्यापूर्वी सेनप्रणित समष्टिचा संरचनात्मक पाया जास्त भक्कम करण्याची आज गरज आहे आणि स्वत: सेन यानी ती गरज (मर्यादा) मान्य केली आहे. एक व्यक्ती व सकल समाज यांच्यामध्ये वर्ग, जाति, कामगार संघ व उत्पादकांच्या संघटना यांचा अंतर्भाव होतो. व्यक्ती स्वहितप्रेरित असते. उलट, दुसऱ्या टोकाला वर्ग-जाति-संस्था-संघटना मिळून जो समष्टीय समाज बनतो त्याचे वर्तन 'सार्वत्रिक नैतिकतेने'[३] प्रेरित असेल, याची निरंतर हमी देता येत नाही. उदाहरणार्थ, एक नमुना वसाहतीतील दररोज निर्माण होणारा कचरा प्रत्येक कुटुंबातील व्यक्ती सार्वजनिक रस्त्याच्या कडेला फेकून स्वत:चे घर व अंगण स्वच्छ केल्याचे पुण्य पदरात पाडून घेते. परंतु रस्त्यावर जे कचऱ्याचे ढीग निर्माण होतात त्यांची कायमची व्यवस्था लावण्यासाठी त्या वसाहतीतील व्यक्तीला (जेवढ्या तत्परतेने सत्यनारायण पूजा-प्रसादासाठी एकत्र येतात तेवढ्या तत्परतेने) क्वचितच संघटित होतात. स्वहितवादाचा संपूर्णपणे त्याग केल्याशिवाय सार्वत्रिक नैतिकतेची कार्यप्रेरणा सशक्त होईल? सेन यांचे त्यांच्या 'सारभूत स्वातंत्र्याच्या' संकल्पनेत ध्वनित झालेले व मला समजलेले उत्तर होकारात्मक आहे. फ्रीडमन एका ठिकाणी म्हणतात त्याप्रमाणे प्रतिमानाची खरी कसोटी ते वास्तवात कसे काम करते यावर अवलंबून असते. आज नाही, उद्या तो दिवस उजाडेल, अशी आशा व्यक्त करुन ही समीक्षा आता आटोपती घेतो.

## References

(Unless otherwise noted, all quotations in the review article are drawn from the book under review.)

1. The Economist, "The measure of progress", september 18-24, 1999.

2. World Development Report (The challenge of Development) Oxford University Press, 1991, P.2.

3. The EconomicTimes, April 24,2002.

4. सोवनी नी.वि. ''भारतातील लोकसंख्येची वाढ आणि आर्थिक अभिवृद्धी, अर्थसंवाद, जानेवारी-मार्च 1992,PP285-297

5. Human Development Report (1998), Oxford University Press, P.Vii.

6. Sen Amartya, Choice, Welfare and Measurement, Oxford University Press, 1983, P. 61.

7. Ibid, P.93

8. Ibid, P.106.

●●●

## निवेदन

आतापर्यंत अर्थसंवाद चा अंक प्रत्येकी दोन रुपये तिकिट लावून जात असे. आता टपाल खात्याने 1 जून 2002 पासून टपाल दरात भरमसाठ वाढ केली आहे. नवीन टपाल दरानुसार प्रत्येक अंक पाठविण्याचा खर्च पाच रुपये तीस पैसे येणार आहे. अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंग या पद्धतीच्या दरात देखील वाढ झाल्याने अंक **UCP** ने पाठविता येणार नाही. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

अर्थसंवाद वितरणाचा वाढता खर्च लक्षात घेता सदस्यांनी निधी उभारण्यास उदार मनाने सहकार्य द्यावे. यासंदर्भात आपल्या मौलिक सूचनांचे स्वागत आहे.

**संपादक**

**विनायक श्री. देशपांडे**

## 'अर्थसंवाद' पूर्वीच्या वर्षांचे अंक

'अर्थसंवाद' चे 1992-93 पासून पुढील वर्षांचे मर्यादित अंक उपलब्ध आहेत. ज्या व्यक्ती, संस्था आणि ग्रंथालयांना या वर्षांचे प्रत्येकी चार अंकांचे संच पाहिजे असतील त्यानी कार्यवाहांकडे प्रत्येक वर्षासाठी रु.150/- पाठवून मागणी करावी. मर्यादित संच उपलब्ध असल्याने 'प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी' यानुसार अंक पुरविले जातील.

**सर्जेराव ठोंबरे**

कार्यवाह - खजिनदार

# 2001 वर्षातील बालकांची स्थिती
## (युनिसेफचा महत्वपूर्ण अहवाल)

● **किशोर महाबळ**
*प्रपाठक, राज्यशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.*

**बा**लकांचा सर्वांगीण विकास होणे हे अनेक दृष्टींनी महत्वाचे असते. चांगले जीवन जगण्यासाठी आवश्यक अशा सर्व सोयी व संधी प्रत्येक बालकाला मिळणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ज्या देशाचा तो नागरिक आहे त्या देशाच्या विकासासाठीही ते तेवढेच आवश्यक आहे. प्रत्येक बालकाला आपला शारीरिक, बौद्धिक व मानसिक विकास करण्यासाठी पुरेसे सकस अन्न, चांगले शिक्षण, चांगले घर, पुरेसे कपडे व अन्य आवश्यक अशा सर्व प्रकारचे सहाय्य शासनाकडून, पालकांकडून व समाजाकडून मिळाले पाहिजे. बालकांचे उत्तम पालनपोषण करणे हे खरेतर पालकांचे, समाजाचे, व देशाचे कर्तव्यच आहे. असे असले तरीही अनेक कुटुंबात, अनेक समाजात व अनेक देशांत या महत्वपूर्ण कर्तव्याकडे पूर्ण दुर्लक्ष होतांना दिसते आहे. यामुळे बालकांचा विकासच खुंटतो व पर्यायाने समाजाचा विकास घडून येत नाही. बालकांचे कुपोषण झाल्यास एकतर ते रोगराईला बळी पडतात, अन्यथा त्यांची वाढच थांबते. यातूनच मग बालमृत्युंचे प्रमाण वाढत जाते. संपूर्ण समाजजीवनावर याचा अत्यंत दूरगामी परिणाम होतो. बालकांच्या बौद्धिक विकासासाठी चांगले शिक्षण देण्याची सोय नसेल तर निरक्षरता वाढते. त्यामुळे शिक्षणामुळे मिळणाऱ्या सर्व लाभांपासून ही मुले वंचित राहतात. अपुऱ्या शिक्षणामुळे, नविन कल्पना व नव्या विचारांचा परिचय न झाल्याने आधुनिकीकरण व विकास होणे कठीण होत जाते. अंधश्रद्धा, मागासलेपण अशा अनेक प्रश्नांना ते बळी पडतात. बालकांच्या मानसिक विकासासाठी अनुकूल असे वातावरण कुटुंबात, समाजात असले पाहिजे. कुटुंबात, समाजात, सौहार्द, प्रेम, आस्था, सहकार्य, सामंजस्य असले पाहिजे. साहित्य, संगीत व विविध कलांचा समाजात परिपोष झाला पाहिजे. असे झाले तर बालकांचा विकास चांगल्या पद्धतीने होऊ शकतो. चांगले जीवन जगण्यासाठी या सर्व सोयी खरेतर आजन्म मिळाल्या पाहिजेत. मात्र वयाच्या पंधरा वर्षापर्यंत तरी सर्व बालकांना या सोयी मिळणे हे अत्यावश्यकच आहे. कारण याच काळात बालकांची खरी जडणघडण होत असते. त्यातही तीन वर्षाखालील मुलामुलींना तर या सर्व सोयी जेवढ्या जास्त प्रमाणात देता येतील तेवढ्या प्रमाणात देण्याचा

प्रयत्न व्हायला हवा. हा काळ अत्यंत महत्वाचा असतो. कारण या काळातच लहान बालकांच्या मेंदुची बहुतांश वाढ होते. विचार करण्याची, बोलण्याची, शिकण्याची व तर्क करण्याची क्षमता याचकाळात मेंदूत विकसित होते. या विकासावर, भविष्यातील त्या बालकाची बौद्धिक प्रगती निश्चित होते असे आता वैज्ञानिकांनी सिद्ध केले आहे. बालकांच्या सर्वांगिण विकासाकडे लक्ष देणे किती महत्वाचे व गरजेचे आहे हे यातून लक्षात येईल.

जागतिक स्तरावर युनिसेफने बालकांचे प्रश्न सातत्याने मांडले आहेत. बालकांचे मूलभूत हक्क व अधिकार, बालकांचा विकास याबद्दल उदंड साहित्य युनिसेफच्या वतीने प्रकाशित केले जाते. जगभरातून बालकांसंबंधी गोळा केलेल्या माहितीचे व्यवस्थित वर्गीकरण करुन विविध अहवालांच्या रूपाने ती अभ्यासकांना उपलब्ध करुन दिली जाते. तसेच बालकांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव विविध लेखाद्वारे, पत्रकांद्वारे, पुस्तिकांद्वारे भित्तीपत्रकांद्वारे सातत्याने करुन दिली जाते. विविध प्रकल्पांद्वारे बालकांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले जाते.

युनिसेफने जगातील 193 देशांतील महिला व बालकांची सद्यस्थिती स्पष्ट करणारा 2001 सालचा वार्षिक अहवाल प्रकाशित केला आहे. या अहवालात या देशांतील सर्वसाधारण जन्मदर, मृत्युदर, बालमृत्युदर, जन्माच्या वेळी कमी वजन असलेल्या बालकांचे प्रमाण, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, स्वच्छतागृहांची सोय, प्रौढ साक्षरतेचा दर, प्राथमिक शाळेत व माध्यमिक शाळेत जाणाऱ्या मुलामुलींचे प्रमाण, लोकसंख्यावाढीचा दर, शहरी लोकसंख्येचे प्रमाण, वार्षिक उत्पन्न, स्त्रियांचे लोकसंख्येतील एकुण प्रमाण, शाळेत प्रवेश घेउ शकणाऱ्या मुलींचे प्रमाण, रोगप्रतिबंधक लस उपलब्ध असणाऱ्या गर्भवती स्त्रियांचे प्रमाण अशा विविध मुद्यांबद्दलची आकडेवारी दिलेली आहे. ती अत्यंत महत्वाची आहे.

**बालकांचे हक्क :**

या अहवालात प्रारंभी विविध देशांत यशस्वी झालेल्या योजनांची माहिती आहे. त्यानंतर बालकांचे मूलभूत अधिकार व हक्क नोंदविले आहेत. विविध वयोगटातील बालकांच्या सर्वांगिण विकासाचा विचार या बालकांच्या हक्कविषयक सनदेत केला आहे. सर्व बालकांना पुरेसे सकस अन्न व आरोग्य विषयक सोयी, योग्य ते लसीकरण, त्यांच्या गरजा ओळखणाऱ्या व त्यांना समजून घेणाऱ्या चांगल्या प्रौढ व्यक्तिचा सहवास, ऐकण्यासाठी, बघण्यासाठी, वास घेण्यासाठी व चव घेण्यासाठी विविध वस्तुंची उपलब्धता, बोलण्याद्वारे वाचनाद्वारे व संगीताद्वारे विविध कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळणे हा बालकांचा हक्क आहे. तसेच भाषा शिकण्यास प्रोत्साहन, आजूबाजूचे जग समजून घेण्याची संधी, भाषा विषयक कौशल्ये व विचार करण्याची कौशल्ये आत्मसात करण्यासाठी सहाय्य, स्वातंत्र्याचा अनुभव घेण्याची संधी, स्वत:च्या वागण्यावर संयम व नियंत्रण ठेवता येण्यासाठी इतरांकडून आवश्यक ते सहकार्य, स्वत:ची काळजी घेण्याची जाण येण्यासाठी संधींची उपलब्धता, सहकार्याची भावना शिकण्याची संधी ही प्रत्येक बालकाला मिळाली पाहिजे. लेखन व वाचन येण्यासाठी आवश्यक अशी पूर्व तयारी करण्याची संधी, व त्यानंतर त्यासंबंधातील कौशल्ये विकसित करण्याची संधी, स्वत:चे विचार व्यक्त करण्याची संधी, सर्जनशील होण्यासाठी प्रोत्साहन, रोज विविध वस्तुंचा उपयोग करुन खेळण्याची संधी, हातांचा उपयोग करुन प्रत्यक्ष कृतीद्वारे शिक्षण घेण्याची संधी, जबाबदारीची भावना विकसित करण्याची व योग्य ती निवड करण्याची संधी, सहकार्य करणे व चिकाटीने काम करणे या गोष्टींसाठी प्रोत्साहन सर्वच बालकांना

मिळाले पाहिजे. विचार करण्याचे व विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, भाषेचा उपयोग करण्याची सर्व कौशल्ये आत्मसात करण्याचे स्वातंत्र्य, स्वातंत्र्याचा अनुभव घेण्यासाठी अधिक संधी विविध प्रकारची कौशल्ये आत्मसात करण्याची संधी, विविध प्रकारच्या संकल्पना व कौशल्यांवर प्रभुत्व मिळविता येण्यासाठी विविध उपक्रमांची उपलब्धता असणे हे सारे बालकांचे हक्क आहेत. बालकांच्या हक्कांची ही सनद जागतिक स्तरावर मान्य करण्यात आलेली आहे. त्यात प्रौढ व्यक्तिला असलेले बहुतेक सर्वच हक्क(फक्त प्रौढांनाच देता येणारे हक्क सोडून) बालकांनाही असल्याचे नमूद केलेले आहे. ते महत्वाचेच आहे. हे सारे मूलभूत हक्क व अधिकार प्रत्येक बालकाला म्हणजे मुलीला आणि मुलाला मिळाले पाहिजेत हे अहवालात नोंदविलेले आहे असे असूनही अनेक देशांत मात्र या सर्व बाबींकडे दुर्लक्षच केले जाते असे आढळते. या सर्व हक्कांची प्रत्येक देशांतील शासनाने खरे तर अत्यंत गंभीरपणे दखल घेतली पाहिजे. काही देश वगळता या हक्कांची दखल गंभीरपणे अनेक देशांत घेतली जात नाही, उलट या हक्कांची पायमल्लीच होते हे या अहवालाचा अभ्यास केल्यावर प्रकर्षाने दिसून येते.

या अहवालातील माहितीचे विश्लेषण केल्यास काही गोष्टी लगेच लक्षात येतात. आफ्रिका व आशियातील देशांत बालकांची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. स्त्रियांच्या हक्कांची व बालकांच्या मूलभूत हक्कांची वारंवार व जागोजागी पायमल्ली होत आहे, त्यांच्या मूलभूत गरजाही भागविल्या जात नाहीत. त्यांच्यासाठी आरोग्याच्या, शिक्षणाच्या सोयीच उपलब्ध नाहीत. त्यातही ज्या सोयी उपलब्ध आहेत त्या फक्त उच्च वर्गातील लोकांसाठीच उपलब्ध आहेत. बहुतांश लोकांना कोणत्याही सोयी उपलब्ध नाहीत. त्यातही स्त्रिया व लहान मुलींना तर, मुलांना व पुरुषांना मिळणाऱ्या सोयी सुविधा मिळत नाहीत. ही दुरावस्था तर कायमच दुर्लक्षिली गेली आहे.

या अहवालातील माहिती अत्यंत विचार करायला लावणारी आहे. या अहवालातील सर्व माहितीचे विश्लेषण करायचे ठरवल्यास तो एका ग्रंथाचाच विषय होईल म्हणून या लेखात जगाच्या विविध प्रदेशातील व प्राधान्याने भारत, चीन, पाकिस्तान या देशांतील स्त्रिया व बालकांसंबंधीची माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जगात 15 वर्षाखालील बालकांची संख्या वाढत चालली आहे. दक्षिण आशिया, सहारा भाग व आफ्रिकेत बालकांची लोकसंख्या वाढत गेली आहे. तर अमेरिका, इंग्लंड आदी विकसित देशांत आणि पूर्व आशिया व पॅसिफिक भागातील चीन, कोरीया, मलेशिया आदी देशांत बालकांची लोकसंख्या कमी होत आहे याचा अर्थ तिथे लोकसंख्या नियंत्रणाचे उद्दिष्ट साध्य झाले आहे.

विकसनशील देशांमधील प्राथमिक शाळेत जाण्याच्या वयोगटातील सुमारे 20 टक्के मुले शाळेत जाऊ शकत नाहीत. जन्माला आलेल्या सुमारे 1/3 बालकांच्या जन्मांची शासकीय कार्यालयात नोंद होत नाही. यामुळे मूलभूत सोयी सवलतींपासून ही बालके कायम वंचित राहतात. कुपोषित मुली पुढे कुपोषित माता होतात. यामुळे त्यांनी कमी वजनाच्या बालकांना जन्म देण्याची शक्यता वाढते. स्त्रियांच्या कुपोषणामुळे सुमारे 177 दशलक्ष लहान बालकांची वाढ कायमची खुंटते. 15 ते 19 या वयातच सुमारे 15 दशलक्ष मुली माता होतात. या वयातील बाळंतपणामुळे त्यांचा मृत्यू होण्याची शक्यता खूप असते. प्रसूतीच्या काळात योग्य वैद्यकीय सुविधा मिळाल्या पाहिजेत. प्रशिक्षित तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत प्रसूती झाली पाहिजे. भारत व पाकिस्तानमधे फार कमी स्त्रियांना अशी सोय उपलब्ध होते. यामुळेच या देशांत मातामृत्युदरही वाढतच चालला आहे. सहारा व

आफ्रिका व द. आशियातील बहुतांश स्त्रियांना अशा वैद्यकीय सोयी उपलब्ध नाहीत. पूर्व आशिया व पॅसिफिक भागात व औद्योगिक देशांत मात्र बहुतांश स्त्रियांना अशी सोय उपलब्ध आहे. यामुळेच तेथील मातामृत्युदरही कमी आहे.

पाच वर्षाखालील जवळजवळ 11 दशलक्ष लहान मुले दरवर्षी मृत्युमुखी पडतात. हे मृत्यु टाळता येण्यासारखे असतात. या बालकांना आईचे दुध मिळाल्यास 1.5 दशलक्ष बालकांचा मृत्यु आपण टाळू शकतो. दरवर्षी जगभरात गोवरामुळे 7 टक्के बालकांचा मृत्यु होतो. त्यापैकी अर्धे मृत्यु हे एकवर्षाखाली बालकांचे असतात. 5 वर्षाखालील बालकांचे 15 टक्के मृत्यु हे योग्य ते लसीकरण झाल्यास टाळता येऊ शकतात. 18 टक्के बालकांचे मृत्यु हे श्वासाच्या रोगांमुळे होतात तर मलेरिया मुळे 7 टक्के व डायरियामुळे 17 टक्के बालके मृत्युमुखी पडतात. स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध झाल्यास 5 वर्षाखालील बालकांचे मृत्यु टाळता येऊ शकतात. पण अजूनही 2.4 अब्ज (बिलीयन) लोकांना या सोयी उपलब्ध नाहीत.

जगातील सुमारे 40 दशलक्ष लहान मुले विविध संघर्षामुळे किंवा मानवी हक्कांच्या पायमल्लीमुळे विस्थापित झालेली आहेत. हिंसेला स्त्रिया व बालके सारख्याच प्रमाणात बळी पडतात. जगातील विविध संघर्षात मृत्युमुखी पडणाऱ्या किंवा जखमी होणाऱ्यांमधे 80 ते 90 टक्के स्त्रिया व बालके असतात. मागील दहा वर्षात 2 दशलक्ष बालकांना वेगवेगळया संघर्षात ठार मारण्यात आले, यात 6 दशलक्ष मुले गंभीररित्या जखमी किंवा अपंग झाली व 12 दशलक्ष बालके बेघर झाली. या संघर्षात सुमारे 10 दशलक्ष लहान मुले आपल्या आई वडिलांना गमावून बसली आहेत.

जगातील सुमारे 876 दशलक्ष स्त्रिया निरक्षर आहेत. दक्षिण आशिया व आफ्रिकेत स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण गेल्या दोन दशकात वाढत गेले असले तरीही ते अजूनही समाधानकारक नाही.

बालमृत्युदर व मातामृत्युदर, कमी वजन असलेल्या बालकांचे प्रमाण, वाढ खुंटलेल्या बालकांचे प्रमाण, द. आशिया, आफ्रिका या भागात अजूनही लक्षणीयरित्या कमी झालेले नाही. विकसित देशांत याबाबतीत विशेष काळजी घेतली जात असल्याने तिथे हे प्रमाण नगण्य आहे हे या अहवालातून दिसून येते.

अठराविश्व दारिद्रच हे बालकांच्या सर्व समस्यांचे एक प्रधान कारण आहे. शिक्षण, अन्न, वस्त्र, निवारा, योग्य असे पालनपोषण, प्रेम, आस्था व संरक्षण या बालकांच्या मूलभूत गरजाही पूर्ण होत नाहीत. या शिवाय दारिद्रचामुळे बालकांना कामाला लावण्याचे प्रमाणही खूप आहे. त्यातूनच बालकामगारांचा प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षण जरी नि:शुल्क असले तरीही शिक्षणासाठी लागणारी पाठयपुस्तके, गणवेश, वहया या सारख्या मूलभूत गोष्टी इच्छा असूनही आपल्या पाल्यांना देणे दारिद्र्यामुळे पालकांना शक्य होत नाही. शिक्षणच मिळाले नाही तर या बालकांचे भविष्य कसे असेल याचा सहज अंदाज करता येतो. त्यातही जातपात, पंथ, धर्म, लिंग, वर्ण अशा सर्व आधारावर आधीच समाजात भरपूर विषमता व तदनुषंगिक येणारे शोषण आहे. त्या विषमतेशी लढण्याची या बालकांची क्षमता नाही. शिक्षण हे जर विषमता नष्ट करण्याचे एक प्रभावी साधन आहे असे मानले तर त्याही बाबतीत ही मुले मागे राहणार. परिणामत: ही विषमता त्यांचे जीवनच असह्य करणार. समाजात लिंगभावविषयक न्याय (Gender Justice) व लिंगभावविषयक समता या बाबी अजूनही दुर्लक्षिल्या जातात. लहान मुलींचे प्रश्न तर मुलांच्या तुलनेत कितीतरी पटीने अधिक गंभीर स्वरुपाचे आहेत.

या लक्षावधी बालकांचा चांगले जीवन जगण्याचाही हक्क डावलला जात आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. ही परिस्थिती कशी बदलायची व एक मोठे आव्हान ही आहे. त्यासाठी अनेक स्तरांवर प्रयत्न करावे लागतील. बालकांचे प्रश्न हे सर्वात महत्वाचे व सर्वात जास्त प्राधान्य देण्याचे प्रश्न आहेत याची जाणीव देशादेशांतील सरकारांना होणे ही पहिली आवश्यकता आहे. पण त्याचबरोबर हे सारे प्रश्न समाजातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, परिस्थितीतील विषमतेतून निर्माण झाले आहेत हे लक्षात घ्यावे लागेल. बेकारी, दारिद्र्य, कुपोषण यासारखे प्रश्न हे व्यापकस्तरावरील विषमतांमुळे निर्माण झालेले आहेत. त्यामुळे ही सामाजिक, आर्थिक विषमता दूर करणे हे आवश्यकच आहे. त्यासाठी तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे. जगभरातील सर्वच बालकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी दरवर्षी 25 (बिलीयन) अब्ज रुपये लागतील. त्यासाठी विकसनशील देशांना आपल्या अंदाजपत्रकापैकी फक्त 20 टक्के रक्कम यासाठी खर्च करावी लागेल असे अभ्यासकांचे मत आहे. हे शक्य होण्यासाठी विकसनशील देशांना आपला प्राधान्यक्रम बदलावा लागणार आहे. शस्त्रास्त्रांवरील अनुत्पादक कामांवरील खर्च कमी करावा लागेल. हे सहजासहजी होणार नाही. कारण एकतर ह्या बालकांचे प्रश्न मांडण्यात कोणत्याच राजकीय पक्षाला विशेष रुची दिसत नाही. त्यामुळे बालकांचे हे प्रश्न सोडविण्यासाठी कोण आग्रह धरणार, कोण शासनावर दबाव आणणार? संघटित कामगार संघटनांनाही ह्या प्रश्नावर आंदोलन करावेसे वाटत नाही त्यामुळे भारतात तरी सद्यस्थिती कशी बदलणार हा प्रश्नच आहे. ज्या देशात बालकांच्या मूलभूत गरजा भागविल्या जातात तिथेही सगळे आलबेल आहे असे मानण्याचे कारण नाही. एक व्यक्ति म्हणून बालकांचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे याची जाणीव किती ठिकाणी आहे ? म्हणजे बालकांना सोयी, संधी कितपत आहेत ? विचार करण्याचे, विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य कितपत आहे ? जागृत पालकत्व किती प्रमाणात आहे ? लहान मुले कोणत्या वातावरणात लहानाची मोठी होत आहेत? हिंसा, असहिष्णुता यांनी ग्रस्त झालेल्या समाजजीवनात बालकांच्या हक्कांचे काय होणार ? असे प्रश्न आज प्राधान्याने विचारावेसे वाटतात. कारण जगभरातील वाढती हिंसा, असहिष्णुता व त्यामुळे होणाऱ्या दंगली हे आता एक नवे आव्हान उभे ठाकले आहे. जगभरात असे संघर्ष अनेक भागात घडू लागले आहेत. दंगलीमधे किंवा धर्माच्या नावावर किंवा अन्य कारणांमुळे होणाऱ्या संघर्षामधे हकनाक बळी पडणाऱ्या निरपराध बालकांची व स्त्रियांची संख्या सर्वात जास्त असते. यात बालकांचे व महिलांचे अतोनात नुकसान होते आणि त्यांच्या अधिकारांची सर्वात जास्त पायमल्ली होते. या हिंसेचेही निर्लज्जपणे समर्थन करण्याऐवढी संवेदनशून्यता आता दिसू लागली आहे. हिंसेचे व क्रौर्याचे निलाजरे समर्थन हे तर सर्वात जबरदस्त मोठे आव्हान आहे. हिंसेचे दंगलींचे व त्यात होणाऱ्या मनुष्यहानीचे समर्थन करणारे हे पर्यायाने निरपराध महिला व बालकांच्या हत्येचे समर्थन करतात ! सर्वच मानवी अधिकारांची पायमल्ली करणाऱ्या दंगली समर्थनीय वाटू लागणे ही बालकांच्या व महिलांच्या हक्कांची मृत्युघंटाच होय. हे नवे आव्हान तर महिला आणि बालकांच्या हक्कांची अंमलबजावणी करणे हे किती कठीण काम आहे हेच दाखवून देत आहे. अशा परिस्थितीत सातत्याने लोकप्रबोधन करणे, या प्रश्नांचे गांभीर्य वारंवार जनतेच्या निदर्शनास आणून देणे व होताहोईतो ही परिस्थिती बदलविण्यासाठी व्यक्तिगत, सामाजिक व राजकीय स्तरावर कार्यरत राहणे एवढेच हाती आहे. युनिसेफ सारख्या संस्थांचे अहवाल या कामात आपल्याला अत्यंत उपयुक्त ठरु शकतात.

## युनिसेफच्या अहवालातील निवडक माहिती

| | चीन | भारत | पाकिस्तान |
|---|---|---|---|
| जन्म घेणाऱ्या बालकांची संख्याप्रतिवर्षी | 1.98 कोटी | 2.44 कोटी | .53 कोटी |
| प्रसूतीच्या काळात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीचे प्रमाण | 67 टक्के | 34 टक्के | 19टक्के |
| प्रसुतीच्या काळात मुत्युचे प्रमाण दर लाखात | 55 | 410 | -- |
| एका वर्षाखालील बालकांचा मृत्यु दरहजारी 1960 | 150 | 146 | 139 |
| 1999 | 33 | 70 | 84 |
| दर हजारी व दर वर्षी एक वर्षा खालील बालकांचा मृत्यु | 33 | 70 | 84 |
| जन्माच्या वेळी कमी वजन असलेली बालके | 6 टक्के | 33 टक्के | 25 टक्के |
| पाच वर्षाखालील कमी वजनाची बालके | 10 टक्के | 53 टक्के | 26 टक्के |
| वाढ खुंटलेली बालके | 17 टक्के | 52 टक्के | 23 टक्के |
| कांजिण्या व गोवर प्रतिबंधक लस | 85 टक्के | 55 टक्के | 54 टक्के |
| पोलियो प्रतिबंधक लस | 90 टक्के | 69 टक्के | 58 टक्के |
| टी बी प्रतिबंधक लस | 85 टक्के | 72 टक्के | 73 टक्के |
| पाचव्या वर्गापर्यंत प्राथमिकशाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी | 91 टक्के | 52 टक्के | 50 टक्के |
| मुलांच्या तुलनेत मुलींच्या प्राथमिक शाळेतील प्रवेशाचे प्रमाण | 99 टक्के | 83 टक्के | 70 टक्के |
| माध्यमिक शाळेतील प्रवेशाचे प्रमाण | 90% | 66% | 52% |
| एक डॉलरपेक्षा कमी उत्पन्न असलेले लोक(प्रती दिवशी) | 19% | 44% | 31% |
| केंद्र शासनाचा खर्च (1997) | | | |
| शिक्षण | 2 % | 3% | 2% |
| आरोग्य | 0% | 2% | 1% |
| सैन्य | 14% | 16% | 21% |

| | | जग | द.आशिया | पूर्वआशिया | सबसहारन आफ्रिका | विकसित देश |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 वर्षांखालील बालकाची संख्या | 1970 | | 96 दशलक्ष | 153 दशलक्ष | 41 दशलक्ष | 47 दशलक्ष |
| | 1985 | | 124 दशलक्ष | 133 दशलक्ष | 62 दशलक्ष | 42 दशलक्ष |
| | 2000 | | 132 दशलक्ष | 127 दशलक्ष | 84 दशलक्ष | 30 दशलक्ष |
| प्रसूतीच्याकाळात तज्ज्ञ डॉक्टरांची मदत | | | 29 % | 66% | 37 % | 99 % |
| निरक्षर स्त्रिया | | 876 | | | | |
| साक्षर स्त्रिया | 1970 | 5 टक्के | 17 टक्के | 42 टक्के | 19 टक्के | -- |
| | 1990 | 69 टक्के | 33 टक्के | 72 टक्के | 39 टक्के | -- |
| | 2000 | 74 टक्के | 41 टक्के | 80 टक्के | 52 टक्के | -- |
| प्राथमिक शाळेत प्रवेश | मुले | 85 टक्के | 78 टक्के | 97 टक्के | 59 टक्के | -- |
| | मुली | 79 टक्के | 64 टक्के | 96 टक्के | 51 टक्के | -- |
| एकवर्षाखालील बालकांचा मृत्यु दरहजारी | 1960 | 127 | 148 | 140 | 156 | 31 |
| | 1999 | 57 | 74 | 35 | 107 | 06 |
| पाचवर्षाखालील बालकांचा मृत्यु दरहजारी | 1960 | 198 | 244 | 212 | 259 | 37 |
| | 1990 | 92 | 128 | 57 | 180 | 09 |
| | 1999 | 82 | 104 | 45 | 173 | 6 |
| जन्माच्या वेळी कमी वजन असलेली बालके | | 16 % | 31% | 8% | 15% | 6% |
| पाच वर्षाखालील कमी वजनाची बालके | | 28% | 49% | 19% | 31% | |
| वाढ खुंटलेली बालके | | 32% | 48% | 24% | 37% | |
| कांजण्या व गोवर प्रतिबंधक लस | | 72% | 56% | 82% | 51% | 89% |
| पोलीयो प्रतिबंधक लस | | 76% | 67% | 87% | 50% | 94% |

| | जग | द.आशिया | पूर्वआशिया | सबसहारन आफ्रिका | विकसित देश |
|---|---|---|---|---|---|
| टीबी प्रतिबंधक लस | 81% | 74% | 88% | 65% | -- |
| पाचव्या वर्गापर्यंत प्राथमिक शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी | 75% | 54% | 87% | 66% | 99 % |
| मुलांच्या तुलनेत मुलींच्या प्राथमिक शाळेतील प्रवेशाचे प्रमाण | 92% | 82% | 98% | 84% | 99 % |
| मुलांच्या तुलनेत मुलींच्या माध्यमिक शाळेतील प्रवेशाचे प्रमाण | 70% | 64% | 92% | 80% | 102% |
| एका डॉलरपेक्षा कमी उत्पन्न असलेले लोक (प्रती दिवशी) | 24% | 40% | 18% | 43% | -- |
| शासनाचा खर्च | | | | | |
| शिक्षण | 5 % | 4 % | 11 % | 13 % | 4% |
| आरोग्य | 12% | 2% | 2% | 4% | 14% |
| सैन्य | 09% | 17% | 14% | 10% | 09% |


## मराठी अर्थशास्त्र परिषद

### आंतरराष्ट्रीय व्यापार – सिद्धान्त व धोरण (लेखक : भ.ग. बापट)

एम.ए.अर्थशास्त्र अभ्यासक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र विषयासाठी उपयुक्त आणि दर्जेदार म्हणून प्रशंसा लाभलेला वरील ग्रंथ वाचकांना उपलब्ध झाला आहे.

किंमत रु 160 आणि सूट 10 टक्के. सूट वजा जाता रक्कम म.ऑ. ने/ डिमांड ड्राफटने ('मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने आणि औरंगाबाद येथील बँक शाखेवर देय) कार्यवाहांकडे पाठवावी. ग्रंथ आमच्या खर्चाने रजिस्टर्ड बुक पोस्टाने पाठविला जाईल.

**पत्ता : डॉ. सर्जेराव ठोंबरे , समन्वयक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, अभ्यास केंद्र, विवेकानंद महाविद्यालय , समर्थ नगर, औरंगाबाद- 431001**



हे त्रैमासिक सर्जेराव आसाराम ठोंबरे यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता श्रीनिवास मुद्रणालय, धंतोली, नागपूर 440012 येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, 42,रंजन 1 सोसायटी एन -9 सिडको, औरंगाबाद 431003 येथे प्रसिद्ध केले.